UNIVERSAL
LIBRARY
OU_192570
UNIVERSAL
LIBRARY

# दी पा व ली

लेखकः—वाग्भट नारायण देशपांडे, बी. ए. एल्. एल्. बी.

प्रस्तावनाकारः—विद्यासागर सदाशिव बखले,
एम्. ए. एल्. एल्. बी. ॲड्व्होकेट

गणेश महादेव आणि कंपनी
६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर

किंमत १। रुपाया

मुद्रक व प्रकाशकः—गणेश महादेव वीरकर
'साहित्य-सेवक' छापखाना, ६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर
मे, १९३३

ज्यांनीं

मतभेद व स्वभावदोष यांजकडे लक्ष न देतां मज-
विषयीं अकृत्रिम मित्रप्रेम बाळगिलें, आणि
सहानुभूतीनें माझ्या लेखनांत मला
वेळोंवेळीं साह्य करून प्रोत्साहन
दिलें, त्या माझ्या
सर्व

# निकट मित्रांस

# गालबोट

( ले. विद्यासागर सदाशिव बखले,

एम्. ए., एल्‌एल्. बी. ॲड्व्होकेट )

श्री. वाग्भटांनी जेव्हां 'अतिपरिचयादवज्ञा' या न्यायाचें विस्मरण होऊन त्यांच्या या लघुकथासंग्रहाला प्रस्तावना लिहिण्याची मला विनंति केली त्यावेळी ती तत्काल मान्य करणें मला इष्ट वाटलें. कारण एखाद्या प्रसिद्ध साहित्यसेवकाच्या प्रस्तावनेपेक्षां श्री. वाग्भटांच्या निकटवर्ती स्नेह्याचें त्यांच्या लघुकथांसंबंधीं काय मत आहे तें जाणण्याची बऱ्याच वाचकांना उत्सुकता असणें साहजिक आहे. महाराष्ट्र वाङ्मय-क्षेत्रांत श्री. वाग्भटांनीं उच्च दर्जाचें स्थान संपादन केलें आहे; व यामुळे त्यांच्या लेखनशैलीची तसेंच त्यांच्या लघुकथांच्या विशिष्ट धाटणीची सर्वत्र स्तुतीच ऐकूं येते; आणि श्री. वाग्भटांचा स्वभावही इतका गोड आहे की, त्यांची स्तुति केल्याखेरीज कोणासही राहवत नाहीं. इतकें असूनही या स्तुतीला गालबोट लावून माझें मित्रकर्तव्य पार पाडणें मला भाग आहे.

कै. हरीभाऊ आपटे यांच्या मिळकतीचा कायदेशीर वारसा कोणा-कडेही जावो, त्यांनीं आमच्या वाङ्मयांत सुरू केलेल्या विशिष्ट प्रथेचा वारसा मात्र एकट्या श्री. वाग्भटांच्याकडेच आलेला आहे. यामुळेंच श्री. वाग्भटांच्या लघुकथा वाचतांना हरिभाऊंची मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहिल्या-वांचून रहात नाहीं. हरीभाऊंच्या गुणांचे व त्याबरोबर क्वचित् क्वचित् त्यांच्या दोषांचेहि अनुकरण श्री. वाग्भटांच्या लेखांत व लघुकथांत

दिसून येतें. वाङ्मयक्षेत्रांत गडकऱ्यांच्या अनुयायांनी गेली कित्येक वर्षे ज्याप्रमाणे वाचकांना सळो कीं पळो करून सोडिलें आहे, त्याप्रमाणें श्री. वाग्भट हे एकटेच हरीभाऊंचे अनुयायी असल्यामुळें त्यांना करितां आलें नाहीं ही एका दृष्टीनें आनंदाचीच गोष्ट आहे. परंतु हरीभाऊंच्या साहचर्यांत राहून, त्यांच्या गुणदोषांचें सूक्ष्म निरीक्षण करून व तसेंच त्यांच्या लेखनशैलीचें अध्ययन करून, श्री. वाग्भटांना हरीभाऊंच्या विशिष्ट प्रयेशीं जें तादात्म्य पावतां आलें ते मात्र फारच थोड्यांना साधले असते. मराठी वाङ्मयांत हरीभाऊंच्या साम्प्रदायातील श्री. वाग्भट हे शेवटलेच लेखक ठरतील असें मला वाटतें; आणि मुख्यत याच दृष्टीनें त्याच्या लघुकथा नि संशय चिरस्थायी होतील.

कै. हरीभाऊंच्या काळीं महाराष्ट्रांतील स्त्रियाची–व विशेषत मध्यमवर्गीय स्त्रियांची–स्थिति अत्यंत शोचनीय होती. पाश्चात्य शिक्षणाने सुसंस्कृत झालेले असे फारच थोडे लोक स्त्रियांना रूढीच्या बंधनांतून मुक्त करण्याचा प्रयत्न करीत होते. हरीभाऊंनींहि आपल्या सामाजिक कादंबऱ्यांतून स्त्रियांच्या परवशतेचें चित्र प्रामुख्याने रंगविलें आहे. परंतु स्त्रीस्वातंत्र्य हेंच एक हरीभाऊंचें ध्येय नव्हते. अनेक शतके रूढ झालेल्या कित्येक निंद्य रूढी नष्ट झाल्यावर, व अन्यायाने स्मृतिवचनाची ओढाताण करून हिरावून घेतलेलें त्यांचें स्वातंत्र्य त्यांना परत मिळवून दिल्यावर, स्त्रियानीं सामाजिक प्रगतीच्या कार्यांत पुरुषाना कसा हातभार लावावा याबद्दल हरीभाऊंचे विचार त्यांच्या कादंबऱ्यांत अनेक ठिकाणीं सूचित झालेले आहेत. पण कदाचित् स्त्रियांना स्वातंत्र्य देण्याची आवश्यकता समाजाच्या मनावर बिंबविण्यांतच हरीभाऊंचें सर्व आयुष्य खर्ची पडलें म्हणून, अगर हरीभाऊंनाही रूढीनें थोडेंबहुत ग्रासिलें होतें म्हणून, त्यांच्या हातून स्त्रीपुरुषांना एकमेकांस पोषक होऊन समाजकार्य कसें करितां येईल हें दर्शविणारी एकहि कादंबरी लिहून झाली नाहीं एवढें मात्र खरें. यमुनेला स्वातंत्र्य मिळतें न मिळतें तोंच तिला वैधव्य येऊन परवशतेचा फास तिच्या गळ्याभोंवती पडला, व भावानंदाला संन्यासा

श्रमांत प्रवेश करून स्वतःच्या अंगीकृत कार्याला जरूर असणाऱ्या सुंदरीच्या सहकार्याला मुकावें लागलें. हरीभाऊंचें तात्कालिक ध्येय फक्त आमच्या स्त्रीवर्गावर होणाऱ्या अन्यायांचें निराकरण करणें येवढेच होतें हे अन्याय दूर झाल्यावर पतिपत्नींनीं देशाच्या उन्नतीकरितां एकमेकांशी सहकार्य करणे कसें जरूर आहे हें दाखविण्याला अनुकूल परिस्थितीच दुर्दैवानें हरीभाऊंच्या हयातींत आली नाही यामुळेंच हरीभाऊंनी सुरू केलेले कार्य शेवटास नेण्याची जबाबदारी श्री. वाग्भटांच्यावर पडली. " मी " मध्यें भावानंदाच्या अविवाहित राहण्याचे जे कारण दिलें आहे त्याचेच जास्त स्पष्टीकरण भावानंदाच्या तोंडून श्री. वाग्भटानी " **भावानंदाचें सुंदरीस पत्र** " या **रत्नाकरांतील** आपल्या लेखात वदविलें आहे:—

> " आमच्या स्त्रिया जोंपर्यंत अज्ञ आहेत, त्यांना देशस्थितीचे ज्ञान होऊन देशोन्नत्योप्रीत्यर्थ करावयाच्या प्रयत्नात त्यांचे पुरुषाना सहकार्य जोंपर्यंत मिळूं शकत नाहीं, उलट त्याच्या जुन्या व कोत्या कल्पनांमुळें गळ्यांतला त्याचा पाश पुरुषाना अडथळ्यासारखाच होणार, तोंपर्यंत कार्य करूं इच्छिणाऱ्या पुरुपांनीं अविवाहित व स्वतंत्र राहिलें पाहिजे. "

सुंदरी जरी लोकोत्तर व देवतातुल्य पत्नी झाली असती; तरी तिच्याशी विवाहबद्ध झाल्यावर, अशी देवतातुल्य पत्नी मिळण्याचे ज्यांना भाग्य नसेल त्यांना संसारांत न पडण्याचा उपदेश करण्याला भावानंदाला तोंड उरलें नसतें या कारणामुळें भावानंद अविवाहित राहिला. भावानंदाला अविवाहित ठेवून संन्यासी बनविणें हें त्याला कार्यक्षम करण्याकरितां अपरिहार्य आहे असें हरीभाऊंना वाटलें. याचें कारण माझ्या मतें एकच आहे. हरीभाऊंच्या मनावरील जुन्या विचारांची पकड सुटली नव्हती व स्त्रियांचीं बंधने तोडावयास जरी ते सज्ज झाले, तरी स्वत.च्या मनावरील रूढीचें बंधन त्यांना तोडतां आले नाही. यामुळेंच हरीभाऊंना स्त्रीस्वातंत्र्या-खेरीज दुसरा कांहीं संदेशहि आमच्या समाजाला त्याकाळीं देता आला नाहीं. विवाह हा खऱ्या लोकसेवेच्या मार्गांतील एक मोठाच अंतराय आहे,

ही जुन्या पिढीची कल्पना हरीभाऊंच्या भावानंदाला संन्यासाश्रमांत खेंचण्यास कारणीभूत झाली. लोकोत्तर स्त्रिया कांहीं वाटेवर पडलेल्या नसतात. अशा एखाद्या लोकोत्तर स्त्रीबरोबर विवाहबद्ध होण्याचे ज्याला भाग्य नसेल त्यानें छाटी पांघरून सर्वसंगपरित्याग करावा, अगर लोकसेवेच्या मार्गाकडे चुकूनसुद्धां दृष्टिक्षेप करूं नये हे म्हणणें आजच्या समाजस्थितींत तरी कोणीहि ऐकून घेणार नाहीं.

श्री. वाग्भटाचा वर उल्लेखिलेला **रत्नाकरांतील** लेख हा वाग्भट व हरीभाऊ यांचीं विशिष्ट ध्येये साधणारा दुवा आहे.

> " भावी पिढींतील स्त्रिया सुशिक्षित होऊन त्याचे संसार सुखाचे व देशहितसाधक व्हावेत, यासाठीं तुला व मला आज आपल्या संसारावर पाणी सोडणेच भाग आहे. आपल्या स्वत च्या संसारावर, ऐहिक सुखावर, पाणी सोडताना आपल्या डोळयातून पाण्याचे पूर वाहतील; पण या अश्रूंच्या खतपाण्यामुळेंच आपल्या कार्याला उत्कृष्ट फल येऊन पुढें अनेक भाऊ व सुंदरी सुखाचे संसार थाटतील हें विसरून चालणार नाहीं. "

भावानंदानें मृत्युशय्येवर सुंदरीला हा दिलेला संदेश हेंच हरीभाऊंनीं वर्णिलेल्या संन्यासाश्रमाच्या महतीचें समर्थन आहे. किंबहुना हरीभाऊंनींच पुढील पिढीस सुखाचे संसार थाटण्याकरितां दिलेला तो संदेश म्हणतां येईल. या सुखाच्या संसारांची सुखस्वप्नें पाहणें हें वाग्भटाचें ध्येय आहे. विपरीत परिस्थितीला मान तुकवून, हरीभाऊंना जें कार्य अपुरें सोडावें लागलें, तें कार्य हरीभाऊंचे शिष्य आज पुढें चालवीत आहेत. रूढीच्या जुलमी अंमलामुळें रूढ मार्गाकडे वळलेलें ध्येय ते योग्य मार्गाला लावीत आहेत. स्त्री-पुरुषातील ज्या सहकार्याच्या अशक्यतेला भिऊन भावानंदाला भगवीं वस्त्रें परिधान करावीं लागलीं, तें सहकार्य आमच्या समाजांत रूढ करण्याची जबाबदारी वाग्भटांनीं आपल्या अंगावर घेतलेली आहे ! त्यांच्या गोष्टींत स्त्री-पुरुषांचें अगर पतिपत्नींचें सहकार्य हा एकच संदेश आहे. भावानंदाचा व सुंदरीचा विवाह लावण्याकरि-

तांच ते सारखी धडपड करीत आहेत. या दोघांच्या विवाहाचीं सुखस्वप्नें ते अनेक वर्षे पहात आहेत; व आजच्या सामाजिक परिस्थितींत त्यांचा विवाह केला असतां भावानंदाची कार्यक्षमता तिळमात्र कमी होणार नाही अशी खात्री वाटल्यामुळेच कीं काय, ही दीपाञली लावून भाऊ व सुंदरी यांचा विवाहसमारंभ ते साजरा करीत आहेत !

तथापि श्री. वाग्भटानी आजपर्यंत लिहिलेल्या गोष्टी पाहिल्या म्हणजे मात्र असें वाटूं लागतें कीं, या स्त्रीपुरुषाच्या सहकार्याच्या ध्येया खेरीज दुसरे कसलेंच ध्येय आमच्या समाजापुढें ते ठेवूं इच्छित नाहींत. आमच्या समाजात जणूं काय दुसरा कांही दोषच त्याना दिसत नाहीं; अगर दिसत असलाच तर हरीभाऊच्याप्रमाणेंच त्यांनाही रूढीचा अंमल पार झुगारून देता येत नाहीं. दररोज पोटभरहि खाण्यास न मिळणाऱ्या दीन मजूरवर्गाबद्दल त्याना कळवळा येत नाही, ज्या स्त्रीस्वातन्त्र्याकरिता हरीभाऊ अहर्निश खपले ते स्वातंत्र्य निकृष्ट वर्गांतील स्त्रियांना अजूनहि मिळालेलें नाहीं याची श्री. वाग्भटाना दाद नाहीं, आणि आर्थिक परिस्थितीमुळें स्त्रीपुरुषांवर होत असणाऱ्या अन्यायाचीहि त्यांना फिकीर नाहीं. त्याचें ध्येय एकच आहे. आपल्या लघुकथात, व विशेषत. "**स्त्री**" मासिकांत प्रसिद्ध होत असलेल्या त्याच्या लेखमालेंत, हे एकच ध्येय ते दाखवीत असतात. हें ध्येय अत्यंत मर्यादित आहे असे जरी त्यांना वाटलें तरी प्रामाणिकपणे ते त्याला चिकटून राहिले आहेत. समाजांतील प्रचलित अवशिष्ट अन्यायाकडे जसा ते काणाडोळा करितात, तसेच नवीन पाश्चात्य विचारांचीहि ते दखलगिरी घेत नाहीत. कंपॅनिअनेट विवाह, सुलभ घटस्फोट वगैरे नवीन विचारांना त्यांच्या गोष्टींत कोठेच वाव नाहीं. बंधनाच्या पलीकडील प्रदेशाकडे ते अंगुलिनिर्देशहि करीत नाहीत. उलट स्त्रीस्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांमध्यें पुरुषवर्गाबद्दल जी तिरस्कारवृत्ति दिसून येते, तीच तिरस्कारबुद्धि श्री. वाग्भटांच्या गोष्टींमध्ये दिसल्याखेरीज रहात नाहीं. स्त्रीवर्गाबद्दल अपारिमित आदर, व पुरुषवर्गाला सन्मार्गावर आणण्याकरितां स्त्रीवर्गच मुख्यत्वेंकरून कारणीभूत होईल ही त्यांची

भावना, याचा उगम याच बुद्धींत असावा असें मला वाटते. हरीभाऊंच्या काळापेक्षा आता स्त्रिया पुष्कळ स्वतंत्र झाल्या आहेत; व म्हणून आता त्याना असहाय व अबला समजून, त्याची बाजू घेऊन व देवतातुल्य बनवून पुरुषवर्गावर तोंडसुख घेण्याची जरूरी नाहीं. तसेंच पतिपत्नींच्या सहकार्याचा पुरस्कार करिताना दोघानाही एकाच तराजूनें जोखण्यास हरकत नाहीं हे आजच्या सुशिक्षित स्त्रियाहि कबूल करितील पण स्त्रियाना अनेक शतकें दास्यांत ठेवणाऱ्या पुरुषवर्गावर सूड उगविण्याच्या भरात श्री. वाग्भटाना मात्र याचे विस्मरण होत आहे!

याच कारणामुळें श्री. वाग्भटांनी '**तपश्चर्या**' या गोष्टींत असावरीला देवतातुल्य बनवून नैतिक विजयाची माळ अखेर तिच्याच गळ्यात घातली आहे. असावरीसारखी देवतातुल्य पत्नी मिळण्याची आशा होती म्हणूनच बळवंतराव वीस वर्षे अविवाहित राहिला उलट बळवंतरावाच्या अनेक प्रलोभनांना न जुमानता, स्वतःच्या कर्तव्यापासून च्युत न होणाऱ्या देवतेचे चित्र रंगवून भावानदावर श्री. वाग्भटांनीं स्त्रीजातीच्या वतीनें हा सूडच घेतल्यासारखा आहे. अर्थात आपल्या ध्येयाला अनुसरून असावरी व बळवंतराव याचें संमीलन घडवून आणण्यात, भावानंदानें केलेल्या अन्यायाची त्यांनीं पुनरुक्ति केली नाहीं. भावानदाचें अंगीकृत कार्य अनंत होतें, त्याची तपश्चर्या खरी तपश्चर्या होती. उलट "माझ्या असहाय आईकरितां आणि भावंडांकरितां ही तपश्चर्या करणें मला भाग आहे" असें म्हणून विवाहसुखावर पाणी सोडणाऱ्या असावरीची तपश्चर्या गौण प्रकारची होती. समाजाच्या अगर राष्ट्राच्या कल्याणाकरितां भावानंदानें त्याग केला, तर असावरीनें आपली आई व भाऊ यांना सुखसमृद्धींत यथेच्छ राहतां यावें म्हणून चतुर्भुज होण्याचा लोभ आंवरला. पण असावरी व बळवंतराव यांच्या अविवाहित राहण्याच्या कारणमीमांसेवरून "हा त्याग कसला?" असेच कोणालाहि वाटणें साहजिक आहे. असावरीनें विवाह न करण्याचीं जीं कारणे दिलीं आहेत, तीं भावानंदानें सांगितलेल्या कारणांच्या मानानें अगदींच व्यक्तिगत आहेत. बळवंतराव व

असावरी यांचा आरंभींच जर विवाह झाला असता तर दोघांनाहि एक-मेकांशीं सहकार्य करून बरेंच लोककल्याण साधता आलें असतें. तें न करितां व स्वतःच्या सुखालाहि आंचवून असावरीनें काय साधलें हा प्रश्नच आहे.

भावानंद अविवाहित राहिला त्याच्या इष्टानिष्टतेबद्दल श्री. वाग्भटांच्या मनांत चाललेल्या विचाराचा '**तपश्चर्या**' हा परिणाम असावा असे मला वाटते. असावरी व बळवंतराव यांच्या अखेरच्या संमीलनावरून व त्यावेळच्या संभाषणावरून श्री. वाग्भटांच्या मताचा कल या बाबतीत कोणीकडे झुकतो हें दिसून येणार आहे.

> " विवाहानें बद्ध होऊन परस्पराच्या सहकारितेने आपल्या हातून जे होईल तें एकटें राहून मात्र होणार नाहीं. विद्येनें व ध्येयाने एकमेकांस अनुरूप अशा कार्यकर्त्या पतिपत्नींची आपल्या देशांत आज उणीव आहे अशा पतिपत्नींना काय करितां येते याचे उदाहरण आज आपण घालून दाखवूं. "

असें आमिष दाखवून जरी बळवंतरावांनीं असावरीला लग्नाची गळ घातली, तरी आपला भाऊ व आई यांना सुखसमृद्धीत ठेवणें हें एकच आपलें ध्येय समजणाऱ्या असावरीनें लागलीच त्याच्या विनंतीस मान दिला नाही ! तिची स्तब्धता व विचारमग्नता पाहून बिचारा बळवंतराव जेव्हां पुन. गर्हिवरून तिला आळवूं लागला तेव्हा तिच्या हृदयाला पाझर फुटून, " परस्पराच्या सहकार्यानें आपण दोघें काय करूं शकणार नाही ?" अशी शेखी मिरवीत ती विवाहाला कबूल झाली. या वेळीदेखील सहकार्यानें हातीं घेण्याच्या कार्यापेक्षां, बळवंतरावांशीं मीलन हें आपल्या तपश्चर्येचेंच फळ होय या विचारांत ती दंग होती ! इतकें असूनहि श्री. वाग्भटांनी मी वर म्हटल्याप्रमाणें नैतिक विजयाची माळ असावरीच्याच गळ्यांत घातली आहे !

श्री. वाग्भटांनी स्त्री-पुरुषांचें सहकार्य प्रतिपादितांना अवलंबिलेली ही विचारसरणी स्त्रियांना कितीहि प्रिय वाटली तरी ती न्याय्य आहे असें

मला वाटत नाहीं. उलट आजपर्यंतच्या "पति हाच देव" या कल्पने-ऐवजीं "पत्नी हीच एक संरक्षक व प्रेरक देवता" अशी क़ल्पना रूढ करून श्री. वाग्भट आपल्या सहकार्याच्या ध्येयाला धोक्यांत घालीत आहेत. मला तरी देवता व भक्त यांच्यामध्यें सहकार्य असणें संभवनीय वाटत नाही. या नात्यांत दास्यत्वाचाच अंश विशेष आहे; आणि पत्नीनें पतीचा दास होऊन राहण्याऐवजीं, पतीला पत्नीचा दास करण्यांत श्री. वाग्भट आमच्या समाजावर दुसरीच एक आपत्ति ओढूं पहात आहेत. आपल्याला संरक्षक व प्रेरक देवता समजून सतत भजणाऱ्या पतीबद्दल फारच थोड्या स्त्रियांना खरें प्रेम वाटेल; आणि समानतेची भावना व प्रेम यांखेरीज खरें सहकार्य अशक्य आहे.

"**संरक्षक देवता**" या गोष्टींत श्री. वाग्भटांनीं आपलें ध्येय जितक्या उत्कटपणें मांडिलें आहे तितकें दुसऱ्या कोणत्याहि गोष्टींत नसेल. या गोष्टींतील सर्व पात्रें श्री. वाग्भटांना निकटवर्ती अशा उच्चवर्गांतील असून, सरकारनें दाखविलेल्याला आमिषाला बळी पडूं पहाणाऱ्या भय्यासाहेबाला त्याच्या संरक्षक देवतेनें वांचविल्याचें त्यांनीं शेवटीं दाखविलें आहे. भय्यासाहेबाला कच्च्या दिलाचा, स्वार्थी व देशद्रोही रंगवून श्री. वाग्भटांनीं त्याला सरलाबाईच्या हातांतील एक बाहुलेंच बनविलें आहे. ऐनवेळीं धांवत जाऊन भक्ताचें मोहापासून दरखेपेस रक्षण करणाऱ्या अशा संरक्षक देवता जर प्रत्येक पुरुषाला मिळाल्या, तर कदाचित् श्री. वाग्भटांच्या म्हणण्याप्रमाणें देशाचा भाग्योदय लवकर होईल, पण श्री. वाग्भटांचें ध्येय मात्र दुरावेल! सरलाबाईला अशा नेभळट, कच्च्या दिलाच्या, स्वार्थी व देशद्रोही नवऱ्याचा तिरस्कार वाटण्याऐवजीं, "अशा प्रेमळ पतीबद्दल त्यांना अभिमान वाटूं लागला" असें दाखविण्यांत आपण स्त्रीजातीला अधोगतीला नेत आहोंत याची श्री. वाग्भटांना जाणीव झाली नसावी. गव्हर्नरसाहेबांची भीड तोडण्यास जर सरलाबाईच्या प्रेमाच्या प्रचंड शक्तीची भय्यासाहेबाला जरुरी वाटली, तर सरलाबाईसारख्या प्रखर राष्ट्रीय-वृत्तीच्या, करारी, व बाणेदार स्त्रीचा पति म्हणविण्यास भय्यासाहेब नालाय

यख होता असेंच म्हणावें लागते. यापेक्षां समाजानें जर सरलाबाईला एखाद्या अधिक लायख पुरुषाशीं सहकार्य करण्याची संधि दिली, तरच देशाचा अधिक लवकर भाग्योदय होईल असें म्हटल्यावांचून मला राहवत नाहीं !

सरलाबाईचा हा जो अधःपात श्री. वाग्भटांनीं दाखविला आहे त्याचीच पुनरावृत्ति त्यांनीं **"बायकांची जात"** या गोष्टींत केलेली आहे. या गोष्टीचा पूर्वार्ध जेव्हां प्रसिद्ध झाला, तेव्हां आपल्या सहकार्याच्या ध्येयाबरोबरच स्त्रीवर्गांत स्वाभिमान जागृत करण्याचें आवश्यक कार्यहि श्री. वाग्भट अंगावर घेत आहेत असें मला वाटलें. पण नंतर या गोष्टीचा उत्तरार्ध प्रसिद्ध झाल्यावर मात्र आपल्या सहकार्याच्या ध्येयपूर्तीकरितां इतर अनेक गोष्टींना गौणत्व देण्यास ते कसे तयार होतात तें दिसून आलें. " नवरा या नात्यानें तुमचा माझ्यावर कांहींहि हक्क नाहीं " असें सांगून त्वेषानें दादासाहेबाला घराबाहेर हांकलून देणारी गोदू, उत्तरार्धांत इतकी गोगलगाय कशी बनली हें एक आश्चर्यच आहे ! दादासाहेबांच्या पुनर्विवाहाचा मजकूर वृत्तपत्रांत वाचल्यानंतर यमुनाबाईला ' बायकांचीच जात ' म्हणून तिरस्कारानें हंसणारी गोदूहि अखेर आपल्याच जातीच्या वळणार गेली ! " आमची कशी झाली तरी बायकांचीच जात, पुरुषांना ज्यावेळीं आमची खरी जरूर व मदत लागेल त्यावेळीं ती न करून कसें चालेल ?" हा वेदांत उत्तरार्धांत सांगणाऱ्या गोदूचा धर्म पूर्वार्धांत कोठें गेला होता ? हीच गोदू जर आधुनिक स्त्रियांची आदर्श होणार असेल तर स्त्रीवर्गाची उन्नती होण्यास अजून बराच कालावधि लागेल असें म्हणणें भाग आहे.

गोदूच्या या मतपरिवर्तनाच्या मुळाशीं, आपलें सहकार्याचें ध्येय गांठण्यासाठीं श्री. वाग्भटांना वाटत असलेला अधीरपणाच आहे. स्वाभिमानी गोदूचा ध्येयपूर्तीला अडथळा आल्यामुळें तिचा स्वाभिमान मारून टाकून, गडकऱ्यांच्या सिंधूसारखी तिला गोगलगाय बनविणें त्यांना भाग पडलें. गोदूच्या मनोभूमिकेचा यथार्थदृष्टींनें विचार करण्याबद्दल मला श्री. वाग्भट नेहमीं सांगत असतात; व त्या दृष्टीनें विचार केला

असतां असल्या भोळ्याभाबड्या किती तरी गोदू आमच्या समाजांत वावरत आहेत ही गोष्ट नाकबूल करितां येणार नाहीं. गोदूच्या मतपरिवर्तनाबद्दल श्री. वाग्भटांना दोष देण्याऐवजीं दोषाचें खापर समाजाच्या डोक्यावरच फोडणें अधिक न्याय्य होईल. आमचा स्त्रीवर्ग जोंपर्यंत स्वाभिमानशून्य आहे, तोंपर्यंत श्री. वाग्भटांचें सहकार्याचें ध्येय दृष्टीच्या आटोक्यांत येणें कठीण आहे; आणि कांहीं झालें तरी, भय्यासाहेब अगर गोदू यांच्यासारख्या स्वाभिमानरहित लोकांशीं सहकार्य करून एखाद्या सरलाबाईला अगर दादासाहेबाला कांहींच लोकहित साधतां येणार नाहीं.

'**बायकांची जात-उत्तरार्ध**' ही श्री. वाग्भटांची सर्वांत अलीकडील गोष्ट आहे. यामुळें मला अशी भीति वाटते कीं, तारुण्यांत सुधारकी मतें प्रतिपादन केल्यानंतर वार्धक्यांत पुनः स्नानसंध्या करीत बसणाऱ्या कांहीं पेन्शनरांप्रमाणें, श्री. वाग्भट आपल्या प्रशंसनीय ध्येयापासून च्युत तर होणार नाहींत ना? या गोष्टीच्या शिरोभागीं श्री. वाग्भटांनीं Oscar Wilde याचें एक वचन उद्धृत केलें आहे; जणूं काय गोदूच्या "आमची कशी झाली तरी बायकांचीच जात" या नेभळट उपदेशाला कांहीं तरी आधाराची जरुरीच होती! वाइल्डच्या नाटकांतील ज्या पात्रानें श्री. वाग्भटांनीं उद्धृत केलेले उद्गार काढले आहेत, त्याच पात्रानें लागलीच A man's life is of more value than a woman's. असेंहि म्हटलें आहे. स्त्रियांना पुरुषांच्या हातांतील खेळणें बनविणाऱ्या लोकांचे हे उद्गार आज आम्हांला मार्गदर्शक कसे होतील? आणि श्री. वाग्भटांचें सहकार्याचें ध्येयहि असल्या स्त्रीवर्गाला हीन लेखणाऱ्या तत्त्वांनीं जवळ येणार नाहीं.

श्री. वाग्भटांच्या प्रस्तुत संग्रहांतील या तीन प्रमुख गोष्टी आहेत. बाकीच्या दोन गोष्टी, जरी फारच मनोरंजक असल्या, तरी श्री. वाग्भटांनीं आपल्यापुढें ठेवलेल्या ध्येयाच्या दृष्टीनें मीं त्या दुय्यम समजतों. ऐक्याचे संपादक म्हणून सन १९२६ च्या कौन्सिलच्या निवडणुकींत प्रागतिक व राष्ट्रीय पक्षामध्यें सातारा जिल्ह्यापुरतें तरी ऐक्य करण्याचा

त्यांचा प्रयत्न निष्फळ झाल्यानंतर, "**ऐक्याचे दारांत**" ही गोष्ट लिहून त्यांनीं आपला दुःखभार हलका केला. वास्तविक वाग्भटांची ही राजकीय गोष्ट असून, राजकारणातील नीरस तत्त्वें यशवंतराव व यमू यांच्या प्रेमकथेशीं संलग्न करून, श्री. वाग्भटांनीं या गोष्टीनें वाचकांचें मनोरंजन व तसेंच राजकारणांतील त्यांचें ऐक्याचें ध्येय हीं दोन्हीं साधण्याचा सुंदर व यशस्वी प्रयत्न केला आहे.

'**दयेचा न्याय**' ही गोष्ट मात्र या सर्व गोष्टींहूनहि भिन्न आहे. फांशीचीं शिक्षा रद्द करावी की काय या प्रश्नावर श्री. वाग्भटांचे पुण्याच्या वसंत-व्याख्यान-मालेंत दोन वर्षांपूर्वी व्याख्यान झालें; त्या सुमारासच त्यांनीं ही गोष्ट लिहिली असून, स्वतः फांशीच्या शिक्षेविरुद्ध असतांनाहि एका न्यायाधिशावर भूतदयेच्या तत्त्वासाठीं फांशीची शिक्षा सुनावण्याचा प्रसंग कसा आला हें दाखविलें आहे. वस्तुतः ही गोष्ट प्रत्यक्ष घडलेल्या एका हकीगतीवरूनच लिहिलेली असून, श्री. वाग्भटांच्या हातीं आल्यावर मूळच्या चित्रांत जे फेरफार झाले ते सहज दिसण्यासारखे आहेत. विशेषतः मि. वाटवे व विमलाबाई यांचा आरोपीला काय शिक्षा द्यावी याबद्दलचा विचारविनिमय श्री. वाग्भटांच्या पतिपत्नीमधील सहकार्याच्या ध्येयाला अनुसरूनच या गोष्टींत दाखविला असावा.

श्री. वाग्भटांच्या सर्वच गोष्टी वाचनीय व हृदयाला चटका लावून सोडणाऱ्या असतात. या पांचहि गोष्टी जणूं काय सौंदर्यांत एकमेकींशीं स्पर्धा करीत आहेत असें वाटतें. हरीभाऊंचे शिष्य म्हणून त्यांनीं आपल्यापुढें ठेविलेल्या ध्येयाच्या दृष्टीनें मी वर माझें मत सांगितलेंच आहे; आणि कित्येक प्रसंगीं टीकाहि केलेली आहे. श्री. वाग्भटांची मधुर लेखनशैली, त्यांच्या गोष्टींतील पात्रांचे स्वभावपरिपोष, तसेंच त्यांच्या संविधानकाचा अकृत्रिम निर्दोषपणा वगैरे अनेक गुणसमुच्चयासंबंधीं कितीतरी लिहिण्यासारखें आहे. पण आरंभींच सांगितल्याप्रमाणें त्यांच्या कीर्तीस दृष्ट लागूं नये म्हणून मित्रप्रेमानें गालबोट लावण्याचें कार्य मीं अंगिकारिलेलें आहे. त्यांच्या गोष्टींतील अनेक गुणांचें कौतुक महाराष्ट्रजनता करीत आहेच, त्यांत माझ्यासारख्या मित्रानें केलेली स्तुति खपणार नाहीं.

# गणेश महादेव आणि कंपनीचीं पुस्तकें

## कादंबऱ्याः—

| | | रु. आ |
|---|---|---|
| १ | सदाफुली | २—० |
| २ | लक्षाधीश | ०—८ |
| ३ | अटकेपार | २—८ |
| ४ | सुकलेलें फूल | १—० |
| ५ | फोल आशा | २—० |
| ६ | अजिंक्यतारा | १—८ |
| ७ | शृंगेरीची लक्ष्मी | २—० |
| ८ | कुठें? | १—० |
| ९ | मराठशाहीची ढाल | १—८ |
| १० | राक्षसी रणसंग्राम | १—० |
| ११ | गौरीशंकर | १—८ |
| १२ | हंबीरराव | ०—८ |
| १३ | स्वराज्याचा श्रीगणेशा | २—४ |
| १४ | स्वराज्याची घटना | २—४ |
| १५ | स्वराज्याची स्थापना | २—४ |
| १६ | स्वराज्याचा कारभार | २—४ |
| १७ | स्वराज्यावरील संकट | २—४ |
| १८ | स्वराज्याचें परिवर्तन | २—४ |
| १९ | स्वराज्यांतील दुफळी | २—४ |

## गोष्टी.—

| | | |
|---|---|---|
| २० | दीपावली | १—४ |
| २१ | बीरबलच्या गोष्टी | ०—४ |
| २२ | ओंजळ | १—० |
| २३ | सुख-स्वप्नें | १—४ |
| २४ | कळ्यांची माळ | १—० |
| २५ | मानसपूजा | १—४ |

## नाटकें:—

| | | |
|---|---|---|
| २६ | मराठ्यांचा राजा | १—० |
| २७ | संगीत भोळा शंकर | १—० |
| २८ | ,, श्रीमुखांत | ०—१० |
| २९ | ,, युगान्तर | ०—१० |
| ३० | ,, गुरुदक्षिणा | ०—१२ |
| ३१ | ,, सैतानी संक्रान्त | १—० |
| ३२ | ,, नवजीवन | ०—१० |

## काव्य ग्रंथ:—

| | | रु. आ. |
|---|---|---|
| ३३ | काव्य—सुधा | ०—१२ |
| ३४ | निर्झरिणी | १—० |
| ३५ | गोमान्तक | २—० |
| ३६ | माधवानुज | २—० |

## धार्मिक, निबंध वगैरे:—

| | | |
|---|---|---|
| ३७ | भक्तिमणिमाला | १—८ |
| ३८ | स्वामी रामतीर्थ, खंड १,२,३,४ प्रत्येकीं | २—८ |
| ३९ | विजापूर वर्णन | ०—८ |
| ४० | आपली उपनयनसंस्था | ०—१२ |
| ४१ | परलोकचा प्रवास | १—० |
| ४२ | आनंदाचें साम्राज्य | १—४ |
| ४३ | मरणोत्तरस्थिति, आणि परलोकविद्या | २—० |
| ४४ | मानवी कर्तव्यें | १—० |
| ४५ | निवडक लेख | २—८ |
| ४६ | ग्रेटब्रिटनची शासनपद्धति | ०—१० |
| ४७ | हिंदुत्व | १—० |
| ४८ | विनोदसागर, तरंग १ ला | १—० |
| ४९ | स्वातंत्र्याचीं मूलतत्त्वें | १—८ |
| ५० | थालिपीठ | १—८ |
| ५१ | केळकरांचीं ६ नाटकें | १—४ |

## चरित्रें:—

| | | |
|---|---|---|
| ५२ | राजवाडे | ०—८ |
| ५३ | आपटे | ०—८ |
| ५४ | आगरकर | ०—८ |
| ५५ | श्रीमंत सयाजीराव महाराज | ०—८ |
| ५६ | श्रीएकनाथ | ०—१२ |
| ५७ | महात्मा गांधी | २—४ |
| ५८ | निकोलाय लेनिन | ०—१२ |
| ५९ | जोसेफ मॅझिनी | २—० |
| ६० | वीर वैरागी | १—० |

# आभार

माझे तरुण आणि विद्वान् मित्र श्री. विद्यासागर बखले यांनीं माझ्या या दुसऱ्या कथासंग्रहाला प्रस्तावना लिहिण्याबद्दलच्या माझ्या विनंतीला मान देऊन खरोखरीच मला फार ऋणी केलें आहे. "**सुख-स्वप्नां**"चें "निवेदन" लिहितांना त्यांत मी पुढील वाक्य लिहिलें होतें. "हीं स्वप्नें पडण्यापूर्वी आणि पडत असतांनाहि माझ्या कल्पनाशक्तीवर माझ्या भगिनी, आणि कांहीं निकटवर्ति मित्र यांच्या ध्येयांचा, विचारांचा आणि वादविवादांचा बराच परिणाम झाला." श्री. बखले हे या थोड्या निकटवर्ति मित्रांपैकींच एक होत. त्यांच्या विचारांचें व वादविवादाचें मला किती साह्य झालें याचें उदाहरण म्हणून "**सुख-स्वप्नें**" या संग्रहांतील "**होम-मेंबर**;" आणि या संग्रहांतील "**संरक्षक-देवता**" या दोन गोष्टींचा उल्लेख करितां येईल. "**संरक्षक-देवता**" ही गोष्ट १९२७ सालीं मीं लिहिली; त्यावेळीं केवळ पत्नीच्या भिडेस्तव भय्यासाहेबांनीं आपलें पहिलें धोरण बदलावें या त्यांतील प्रसंगाबद्दल श्री. बखल्यांनीं आपली तीव्र नापसंती व्यक्त करून, स्वतः विचारपूर्वक आंखलेलें धोरण बरोबर असल्याची खात्री असल्यामुळें, पत्नीची कसलीहि भीड न ऐकतां स्वतःच्या मताप्रमाणें वागणाऱ्या नवऱ्याची गोष्ट लिहिण्याबद्दल त्यांनीं मला आग्रह केला; आणि त्याचें फळ "**सुखस्वप्नां**"-तली "**होममेंबर**" ही गोष्ट होय. या एकाच उदाहरणावरून श्री. बखले यांच्या सूचनांचा व प्रेमळ टीकेचा मला किती फायदा होतो, हें दिसून येईल. त्याचप्रमाणें माझे दुसरे स्नेही डॉ. आगाशे, श्री. पंढरीनाथ व

निळूभाऊ घाणेकर, व गं. जोशी, आणि प्रो. श्री. रा. पारसनीस यांचाहि या बाबतींत कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें जरूर आहे.

श्री. बखले हे मराठी वाङ्मयांत लेखक म्हणून प्रत्यक्ष चमकले नसले तरी, त्यांनीं प्राच्येतिहासविद् म्हणून चांगलीच कीर्ति संपादन केली असून आपल्या निकटवर्ति मित्रमंडळांत ते मार्मिक टीकाकार म्हणून ओळखले जातात. त्यांची तीव्र व विवेचक बुद्धी, प्राच्येतिहाससंशोधन आणि कायदा यांजप्रमाणें वाङ्मयाच्या अभ्यासांतहि तितकीच प्रभावी व यशस्वी असल्याचा त्यांच्या स्नेह्यांचा अनुभव आहे. तसेंच त्यांचें इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांतील हरएक प्रकारच्या वाङ्मयाचें वाचन व अभ्यसन अतिशय व्यापक आहे. प्रसिद्ध इंग्लिश नाटककार बर्नार्ड शॉ याचे श्री. बखले हे मोठे भोक्ते व अभ्यासी असून, त्यांच्या विचारांवर व लेखनावर पडलेली शॉची छाया त्यांच्या या “ दीपावली ”च्या “ गालबोटांत ”हि दृष्टीस पडते. विचारांचें नाविन्य व क्वचित् वैलक्षण्य हा शॉप्रमाणेंच श्री. बखल्यांचाहि विशेष आहे. या समानधर्मामुळेच, मला वाटतें, ते शॉच्या वाङ्मयाशीं इतके समरस होऊं शकतात, आणि म्हणूनच रुळलेल्या मार्गानें जाऊन, उत्क्रांतीच्या तत्वानुसार हळूं हळूं सुधारणा करण्याचा मार्ग श्री. बखल्यांना दुबळेपणाचा व कंटाळवाणा वाटतो. अगदीं नवे असे विचार समजण्याची किंवा आकलन करण्याची सर्वसामान्य बहुजनसमाजाची तयारी नसली तरी, आपल्यास जें योग्य वाटेल तें खाडकन् आणि शक्य तितक्या चमत्कृतीजन्य रीतीनें बोलून दाखविणें श्री. बखल्यांस फार प्रिय आहे. इतक्या प्रांजळ आणि निर्भिड विचारसरणीच्या मनुष्यास हरीभाऊ आपट्यांची व्यवहारदृष्टी, आणि एका सुप्रसिद्ध इंग्लिश कवीनें म्हटल्याप्रमाणें “ **दूर बहु ध्येय परी, पाऊल एकहि मला पुरे अल्प ।** ” हा धिमेपणाचा उत्क्रांतिवादाचा मार्ग, न पटणें अगदीं स्वाभाविकच आहे. या संग्रहांतील “**तपश्चर्या,**” “**संरक्षक देवता**” आणि “**बायकांची जात–उत्तरार्ध**” या तीन गोष्टी श्री. बखल्यांच्या टीकेस विशेष पात्र व्हाव्यात, आणि माझ्या कथांतून कंपॅनिअनेट मॅरेज्, घटस्फोट,

इत्यादि प्रश्नांचा निर्देशहि न केल्याबद्दल त्यांनी मला दोष द्यावा, याचें मला मुळींच आश्चर्य वाटत नाही. उलट, परंपरा व जुन्या कल्पना यांजविषयीं फाजील आदरभाव न दाखवितां, सावकाशीने आणि हळूहळूं सुधारणा करण्याच्या मार्गाबद्दल उघड अप्रीति दाखवून, धडाडीनें व निर्भयपणानें पुढें जाऊं पहाणाऱ्या अशा तरुणांबद्दल, प्रत्येक खऱ्या प्रगतिप्रिय सुधारकास अभिमान व कौतुकच वाटलें पाहिजे.

श्री. बखले यांना या कथासंग्रहास प्रस्तावना लिहिण्याची मी विनंति करण्याचें कारण तरी हेंच होय. कारण माझ्या-जुन्या विचारांच्या नसल्या तरी जुन्या वळणाच्या-गोष्टींवर माझ्या निकटवर्ति व प्रेमळ मित्रांच्या होणाऱ्या टीका, त्यांच्या माझ्यामध्यें क्वचित् होणारे प्रामाणिक पण उद्बोधक मतभेद, श्री. बखल्यांसारख्या मित्रांची मार्मिक विद्वत्ता आणि विचारनाविन्य, ही सर्व आमच्या लहानशा मित्रमंडळापुरतींच मर्यादित राहून त्यांचा लाभ मला एकट्यालाच न मिळतां, तो माझ्या वाचकांस देऊन त्यांना माझ्या सुखांत समभागी करणें जरूर आहे असें वाटून, मी श्री. बखल्यांना ही प्रस्तावना लिहिण्याची विनंति केली; आणि त्यांनी ती मित्रप्रेमामुळें तात्काळ मान्यहि केली याबद्दल मला फारच आनंद वाटतो.

श्री. बखले यांनीं म्हटल्याप्रमाणें, आतांपर्यंत लिहिलेल्या गोष्टींत तरी आपलें ध्येय मी अगदीं मर्यादित ठेविलें असून, माझ्या सर्व गोष्टींचा भर पतिपत्नींच्या बौद्धिक सहकार्यावरच विशेष आहे हें खरें आहे. याचें कारण एवढेंच कीं, ज्याला जो प्रश्न जास्त अगत्याचा अथवा आपल्या आटोक्यांतला वाटेल तोच त्यानें हातीं घेणें हें माझ्या मतें अधिक युक्त होय. आज आपल्या समाजांत स्त्रीशिक्षणाचा प्रसार निश्चित वाढत आहे; उच्चशिक्षण घेणाऱ्या स्त्रियांची संख्याहि गेल्या १०।१५ वर्षांत पुष्कळच जास्त झाली आहे; आणि स्त्रियांना समानहक्क आणि दर्जा देण्यास तयार असलेल्या पुरुषवर्गाचें क्षेत्रहि पूर्वीपेक्षां विस्तृत झालें आहे. तरी पण स्त्रीपुरुषांत-किंबहुना सुशिक्षित पतिपत्नींतसुद्धां-बौद्धिक सहकार्य अद्यापि व्हावें तसें होत आहे असें मला वाटत नाहीं. असें सहकार्य होऊं

लागल्याशिवाय सर्वसामान्य पुरुषवर्गाची कार्यक्षमता आणि कर्तव्यतत्परता वाढणें व खरें कौटुंबिक सुख मिळणें शक्य नाहीं असें माझें स्वतःचें ठाम मत असल्यामुळें, तें आजच्या सुशिक्षित स्त्रीपुरुषांना पटविण्यासाठीं माझ्या आतांपर्यंतच्या बहुतेक कथा त्या एकाच तत्वासभोंवतीं गुंडाळणें मला अवश्य वाटलें. स्त्रियांच्या सद्य.स्थितीबद्दल श्री. बखल्यांनीं व्यक्त केलेलें मत खरें मानिलें तरीहि, आजकाल सुशिक्षित म्हटला जाणारा समाजसुद्धां स्त्रीपुरुषांमधील बौद्धिक सहकार्याच्या बाबतींत पाश्चात्यांच्या मानानें इतका मागें व उदासीन आहे कीं, सहवासोत्तर विवाह किंवा विवाहसदृश सहवास, सुलभ घटस्फोट, किंवा बंधनापलीकडील इतर प्रदेश आज त्याच्या आटोक्यापलीकडे असून, त्यांचा उहापोह आजच करून बहुजनसमाजांत आणखी तीव्र मतभेद उत्पन्न करण्याइतक्या जिव्हाळ्याचे हे प्रश्न **या क्षणीं** आहेत असें मला वाटत नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्याचें ध्येय इष्ट तर खरेंच; पण तें आज पुष्कळच दूर असून, सामाजिक प्रगतीच्या मार्गावरील बौद्धिक सहकार्याचें पहिलें लहानसें पाऊल टाकण्याइतकें भाग्य जरी मला मिळालें, तरी त्यांतसुद्धां आनंद मानण्याइतका मी अल्पसंतुष्ट आहें.

माझ्या ज्या तीन गोष्टींवर श्री. बखले यांनीं जोराचा आक्षेप घेतला आहे, त्याबद्दल मी विशेष लिहिण्याचें कांहींच कारण नाहीं. कारण त्या गोष्टी आणि त्यांजवरील श्री. बखले यांचे आक्षेप दोन्हीहि वाचकांपुढें असल्यामुळें ज्यांना जें पटेल त्याप्रमाणें ते आपापलें मत बनवितीलच. मात्र "**तपश्चर्या**" या गोष्टीबद्दल एवढीच गोष्ट सांगावीशी वाटते कीं, वैवाहिक आयुष्याचें ध्येय केवळ विषयसुख आणि प्रपंच एवढेंच नसून वैवाहिक सहकार्य हेंहि असूं शकतें; आणि समान शिक्षणाच्या आणि विचारांच्या, व त्याचप्रमाणें आत्मिक ऐक्याच्या पायावर उभारलेल्या प्रेमाच्या बाबतींत वयाचा किंवा तारुण्याचा प्रश्न उत्पन्न होत नाहीं, हें दाखविण्याच्या हेतूनेंच त्या गोष्टींतील कथानकाची रचना आणि विकास केला आहे. भावानन्द आणि सुंदरी, आणि "**तपश्चर्ये**" तील बळवंतराव

व असावरी यांजमध्यें श्री. बखल्यांनीं दाखविलेला संबंध कुतूहल वाटण्यासारखा आणि त्यांच्या मार्मिक व विवेचकबुद्धीचा निदर्शक असला तरी तो मजकडून अगदीं अकल्पित असा आहे. परंतु लेखकापेक्षां टीकाकार हा अधिक स्वतंत्र व अप्रतिहत असल्यामुळे, एखाद्या कथेंतून किंवा काव्यांतून आपल्या कल्पनेच्या आणि विवेचक बुद्धीच्या सहाय्यानें हवा तो अर्थ काढण्यास तो मोकळा असतो. किंबहुना त्यावरूनच टीकाकाराचें श्रेष्ठत्व व कौशल्य अजमाविलें जातें. आणि म्हणूनच श्री. बखल्यांसारखा मार्मिक टीकाकार प्रेमळ मित्र या नात्यानेंहि लाभल्याबद्दल माझ्या या भाग्याचा माझे अनेक लेखक बंधु हेवा करितील यांत संशय नाहीं.

आजपर्यंतची पद्धति अशी आहे कीं, एखाद्या पुस्तकास दुसऱ्याची प्रस्तावना घेतलीच तर ती वाङ्मयाच्या क्षेत्रांत विशेष प्रसिद्धीस आलेल्या अशा एखाद्या नाणावलेल्या लेखकाची घ्यावयाची; व त्यांत त्या ग्रंथाचें गुणगौरव असावयाचे. पण या "**दीपावली**"च्या प्रस्तावनेनें या दोन्ही रूढी मोडल्या असल्याचें वाचकांस आढळून येईल. कारण श्री. बखले यांचें नांव प्रसिद्ध साहित्यसेवक म्हणून यापूर्वी चमकलेलें नाहीं. एका बाजून राहून आपल्या टवटवीतपणानें आणि गोड सुगंधानें सभोंवतालच्या थोड्या लोकांस उत्साही व आनंदित करणारीं फुलें असतात; व त्यांचें मोल, सार्वजनिक उद्यानांत काळजीपूर्वक जोपासना करून विकासलेल्या फुलांपेक्षां कोणत्याहि प्रकारें कमी नसतें. कित्येकदां तर या फुलांचा ताजेपणा व सौंदर्य बागेंतल्या फुलांपेक्षांहि जास्त असतें. तद्वत्च श्री. बखले यांची गोष्ट आहे. किंबहुना विद्वत्ता, वाचन आणि मार्मिकता या गुणांत त्यांचें स्थान आजकाल पुढें आलेल्या अनेक लेखकांत निःसंशय श्रेष्ठ ठरेल. त्यांनी जी प्रस्तावना लिहिली आणि मीं त्यांना मागितली, ती त्यांनीं माझ्या कथांचें केवळ गुणगौरव करावें यासाठीं नसून, एका निकटवर्ति मित्राकडून आपले गुणदोष उघडपणें वाचकांपुढें यावेत; आणि मतभेदाचीं स्थळें वाचकांना समजून, माझ्या एकांगी विचारांची दुसरी बाजूहि त्यांच्या दृष्टीस पडावी याच हेतूनें होय. त्याप्रमाणें श्री. बखल्यांनींहि अगदीं निर्भिडपणानें

माझ्या कथांवर टीका केली असूंन तिचा माझ्याप्रमाणेंच वाचकांनाहि फायदा झाल्याशिवाय राहणार नाहीं.

या कथासंग्रहासाठीं अगत्यपूर्वक चित्रे काढून देऊन माझे मित्र श्रीमंत बाळामहाराज पंडित, कोल्हापूर, यांनीं मला फारच ऋणी करून ठेविलें आहे. आपले मातुल श्रीमंत बाळासाहेब पतप्रतिनिधी, संस्थानाधिपति औंध, यांच्याप्रमाणेच श्री. बाळामहाराज हेहि स्वतः एक नांवाजलेले शोकी ( amateur ) चित्रकार आहेत; पण पुस्तकांसाठीं चित्रें ( Book-illustrations )काढण्याचें एक स्वतंत्रच तंत्र असून त्याकडे त्यांनीं कधीं लक्ष दिलें नव्हतें. तरी पण या **दीपावलींत** आपलीं चित्रें असावीत अशी इच्छा मी व्यक्त करितांक्षणीच, माझी विनंति तात्काळ मोठ्या हौसेनें मान्य करून, तो आपला व्यवसाय नसतांनासुद्धां, कथांतील प्रसंगांचीं सुंदर चित्रें परिश्रमपूर्वक व आपला बहुमोल वेळ खर्च करून त्यांनीं काढून दिलीं, हें त्यांच्या मित्रप्रेमाचेंच द्योतक होय. माझ्या लेखनांत माझ्या अनेक मित्रांचें मला सहानुभूतिपूर्वक किती साह्य होतें याचें यापेक्षां वेगळें प्रत्यंतर देण्याचें कारण नाहीं. श्री. बाळामहाजांच्या या निर्व्याज मित्रप्रेमाची फेड, केवळ आभारप्रदर्शक शब्द अंतःकरणपूर्वक उच्चारण्यापलीकडे, मी काय करूं शकणार ?

या संग्रहांतील सहाही कथा स्वतंत्र असून, पूर्वी **मनोरंजन, रत्नाकर** आणि **विविधवृत्त** या नियतकालिकांतून त्या प्रसिद्ध झाल्या होत्या. त्या त्या वेळीं प्रत्येक गोष्टीचें वाचकांनीं प्रेमानें स्वागत केलेंच; पण त्यानंतरहि त्या कथा पुस्तकरूपानें संग्रहित करण्याबद्दल अनेक मित्रांनीं व वाचकांनीं सूचना केल्यावरून, त्यांचींच ही लहानशी दीपावली लावण्याचें धाडस केलें आहे. या प्रोत्साहनाबद्दल मी वाचकवर्गाचेहि मनःपूर्वक आभार मानितों, आणि या छोट्या दीपावलीचें स्वागतहि ते तितक्याच प्रेमानें करितील अशी उमेद बाळगितों.

या पुस्तकाचे प्रकाशक श्री. गणेश महादेव वीरकर यांनीं हें पुस्तक प्रसिद्ध केल्याबद्दल व त्याच्या छपाईचें काम अंतर्बाह्य इतकें सुंदर केल्याबद्दल, त्यांचाहि मी फार आभारी आहें.

शेवटीं या संग्रहाच्या " दीपावली " या नांवाबद्दल वाचकांस एवढेंच सांगावयाचें आहे कीं, या नांवाचा " दीपावली " या सणाशीं कांहींच संबंध नाहीं. रोषणाईसाठीं आपण लहान लहान पणत्या लावतों; त्या पणत्यांचा किंवा दीपांचा उपयोग प्रकाशासाठीं नसतो; व त्या प्रकाश देतहि नाहींत. तशा अनेक बारक्या बारक्या दीपांमुळें रोषणाईचें मात्र काम होतें. या लहान कथाही त्याप्रमाणेंच वाङ्मय मंदिराबाहेर शोभे-साठीं माझ्या अल्पसामर्थ्याप्रमाणे मीं लाविलेल्या पणत्या असून, मंदि-राचा आंतल्या, तेजस्वी प्रकाश पाहून अज्ञानांधःकाराचा नाश करणाऱ्या मोठ्या दिव्यांच्या जोडीला बसण्याची त्यांची लायकी नाहीं. तरी पण बाहे-रच्या प्रवेशद्वारावर लागून कां होईना, या लहान दीपांमुळें वाङ्मयमंदि-राची शोभा थोडीबहुत वाढविण्याचें श्रेय जरी या लहान कथांना मिळालें तरी त्यांचें सार्थक झालें असें मला वाटेल.

**वाग्भट नारायण देशपांडे**

# अनुक्रमणिका


१ दीप पहिला

तपश्चर्या .... .... ९

२ दीप दुसरा

दयेचा न्याय .... .... ३४

३ दीप तिसरा

बायकांची जात [पूर्वार्ध] .... ५४

४ दीप चवथा


बायकांची जात [उत्तरार्ध] .... ८०

५ दीप पांचवा

संरक्षक देवता .... .... १०१

६ दीप सहावा

ऐकण्याच्या दारांत .... .... १२१



असावरीचा निरोप घेण्यासाठीं ते वर आले, आणि पहातात तो ती टेबलावर डोकें ठेवून......स्फुंदून स्फुंदून रडत आहे ! —तपश्चर्या [पृ. २३]

# दी पा व ली

## दीप पहिला

### तपश्चर्या

"अरे, आजच्या टाइम्समध्यें आय. सी. एस. चा निकाल आलाय् वाटतं! त्यांत एक आपला दक्षिणीहि दिसतोय्."
शंकरराव हातांतला टाइम्स् पहात म्हणाले.

क्लबांत ब्रिजचा डाव रंगांत आला होता. खेळणाऱ्यांपैकीं चौघांचेंहि लक्ष अर्थातच खेळाकडे गुंतलें होतें. परंतु त्यांच्या आसपास खेळ पहाण्यासाठीं दुसरे दोनचार स्नेही बसले होते. त्यांच्यापैकीं एकजणानें विचारले "काय सिव्हिल सर्व्हिसचा निकाल? किती हिंदी लोक आहेत?"

बळवंतराव जवळच आपला आणि आपल्या 'डमी' चा डाव पाहून कोणतें पान टाकावें याचा महत्त्वाचा विचार करीत होते. या प्रश्नामुळें त्यांच्या विचारांत व्यत्यय येऊन ते त्रासिक स्वरानें म्हणाले, "ही तुह्मांला मोठी वाईट संवय आहे बुवा! इकडे आमची कोण कसोशी चालली आहे, अन् तुमचा या वेळेला टाइम्स न् आय. सी. एस! डाव चालला असतां आसपास कोणीं वर्तमानपत्र वाचूं नये असा खरोखरीच नियम करून

टाकला पाहिजे. स्वतः खेळायचं नाही आणि दुसऱ्याला निवांतपणी खेळूं द्यायचं नाहीं हा काय जुलूम!"

"अहो, असे त्रासतां काय, बळवंतराव" त्यांच्यासमोर बसलेले त्यांचे 'डमी' दत्तोपंत म्हणाले, "अहो, चालायचंच तें! सांगा हो शंकरराव, कोण आपला दक्षिणी आय. सी. एस. झाला आहे तो. मला वाटतं, गेल्या दोन तीन वर्षांत आपला दक्षिणी कोणी आला नाहीं, नाहीं?"

बळवंतरावांना चिडवायचा हा त्यांच्या स्नेह्यांचा एक नेहमींचा उपाय असे. कोणतेंहि काम एकदां हातांत घेतलें, म्हणजे तें अगदीं मनापासून करावयाचें हा त्यांचा स्वभावच. वकीलींत आणि सार्वजनिक कामांत त्यांनीं जें यश व लौकिक मिळविला होता त्याला त्यांचा हा स्वभावच मुख्यतः कारणीभूत झाला. तोच त्यांचा नियम साध्या खेळांतहि दिसून येई. संध्याकाळीं क्लबांत ब्रिजचा डाव सुरू झाला म्हणजे मग डाव चालूं असेपर्यंत त्यांना इतर दुसरा कसलाहि विषय काढलेला खपत नसे; आणि म्हणून त्यांना चिडवून त्यांची जरा गंमत करावयाची असली कीं, ब्रिज चालू असतां त्यांच्याजवळ बसून वर्तमानपत्रांतल्या किंवा कसल्या तरी गोष्टींवर बोलणें काढावें कीं, बळवंतराव चिडलेच. त्यांच्या रागावण्याकडे लक्ष न देतां तें बोलणें तसेंच चालू ठेवलें म्हणजे एखादे वेळीं त्रासून वैतागानें डाव फेंकून देण्यापर्यंतहि त्यांची पाळी येई.

हें जाणून मंडळींनीं विषय मुद्दामच चालू ठेवला. शंकरराव हातांतला टाइम्स वाचीत म्हणाले, "विलायतेंतून एकंदर ११ उमेदवार पास झाले आहेत. त्यांपैकीं पांच हिंदी आहेत; आतां त्यांत हा पहिला सेन, हा अर्थातच बंगाली; दुसरा किडवानी, सिंधी दिसतो. तिसरा—"

"गोपाळराव, तुमचं लक्ष कुठं आहे?" बळवंतराव चिडून ओरडले. "अहो, हातांतल्या डावाकडे पहातां कां आय्. सी. एस. चा निकाल ऐकतां? समोरच्या डावाचा एकदां निकाल लावा की! टाइम्समधला निकाल कांहीं पळून जात नाहीं!"

" अहो, मग डाव तरी कुठं पळून जातोय " गोपाळरावांनीं तोंडांतून सिगारेट काढून हातांतील पानें चाळीत उत्तर दिलें; व समोरच्या गड्यास विचारलें, " काय हो, कुणाचा हात आहे ?"

इतक्यांत शंकररावांनीं आपलें मघांचें अर्धेच राहिलेलें वाक्य संपविलें. " तिसरा-हा पहा हो आपला दाक्षिणी, रामचंद्र वामन परांजपे. कोण हो हा ? "

" रामचंद्र वामन परांजपे " हें नांव ऐकतांच जे बळवंतराव खेळांतलें आपलें लक्ष दुसरीकडे जाऊं देण्यास आतांपर्यंत इतके नाखुष होते त्यांच्यांत एकदम फरक पडला. त्यांच्या हातांतले पत्ते नकळत खालीं गळाले; व ते सोत्सुक म्हणाले " कोण, रामचंद्र वामन परांजपे ? नांव बरोबर आहे ? पाहूं, टाइम्स जरा इकडे करा बघूं ! "

"कां, आतां कां ?" गोपाळराव ह्मणाले. " आधी डाव संपवा, आणि मग टाइम्स पहा. तुम्हींच म्हणालांत ना, कीं निकाल कांहीं कुठं पळून जात नाहीं ह्मणून ?"

परंतु बळवंतरावांचें लक्ष डावांतून केव्हांच उडून गेलें होतें. डाव रंगांत आला असतांना आपण हातांतून पानें टाकल्यामुळें इतरांचा विरस झाला, व आपल्या हातून सामान्य शिष्टाचाराचा भंग झाला हा विचारच त्यांच्या मनांत आला नाहीं. शंकररावांच्या हातांतून त्यांनीं टाइम्स हिसकावून घेतला आणि तेंच नांव आहे अशी आपली खात्री करून घेतली. हातावरच्या घड्याळाकडे पहिलें तों आठाला वीस मिनिटें कमी होतीं. ते लागलेच उठले; डोक्यावर पगडी चढविली, आणि उपरणें घेऊन मंडळीकडे वळून ह्मणाले, " माफ करा अं. मला गेलेंच पाहिजे. जरूरीचें काम आहे."

"अहो कसलं काम ? जरा थांबाल तर खरे ! अगदीं मौजच करता बुवा." पण हे शब्द ऐकण्यास बळवंतराव होते कुठें ? कोपऱ्यांतील काठी घेऊन ते दारांतून केव्हांच बाहेर पडले होते.

मागें राहिलेली मंडळी आश्चर्यचकित झाली. टाइम्समधील " रामचंद्र वामन परांजपे" हें नांव ऐकेपर्यंत जो गृहस्थ नेहमींप्रमाणें शांतपणानें ब्रिज्‌चा डाव खेळत बसला होता, तो तें नांव ऐकतांच एकदम भारल्याप्रमाणें हातां-तला डाव फेंकून घाईघाईनें चालता होतो याचा कोणास अर्थच कळेना. त्यांनीं आपापल्यापरी नानातऱ्हेचे तर्क करून पाहिले; पण बळवंतरावांच्या स्नेह्यांत किंवा आप्तांत या नांवाचा, निदान आडनांवाचा तरी, कोणी मनुष्य असलेला त्यांना आठवेना. ती सर्व वकील मंडळी बळवंतरावां-च्याच बरोबरीची असून त्यांची एकमेकांची आज निदानपक्षीं वीस वर्षांची जानपछान होती. पण ज्याचें नांव ऐकून बळवंतरावांनीं असें विचित्र वर्तन करावें असा हा माणूस कोण याचा त्यांच्यांपैकीं कोणालाच उलगडा होईना. इकडे क्लबांत मंडळींचे तर्कवितर्क चालले असतां बळवंत-राव थेट निघाले ते तारऑफिसांत आले. आठ वाजावयाला आल्यामुळें तारमास्तर ऑफिस बंद करीत होते, त्यांच्याकडून त्यांनीं एक तारेचा फॉर्म मागून घेतला, आणि पुढील अर्जंट तार लिहून दिली.

" लेडी सुपरिंटेंडेंट, गर्ल्स हायस्कूल, मालापूर यांस; भाऊ पास झाल्याबद्दल अंतःकरणपूर्वक अभिनंदन करितों. तपश्चर्या पूर्ण झाली. मी ताबडतोब रात्रींच्या मेलनें निघत आहें.—बळवंतराव."

× × × ×

[ २ ]

बळवंतराव आपल्या डब्यांत एका बर्थवर बिछाना पसरून पडले होते. बाहेर आकाश अभ्राच्छादित असून पाऊस जोरानें पडत असल्यामुळें काळोखाचें स्वरूप विशेषच उग्र झालें होतें. हवेंत गारठाहि मनस्वी होता. तथापि या सर्व अडचणींस तोंड न देतां मेलगाडी झपाट्यानें मैलांमागें मैल टाकीत होती. बळवंतराव डब्यांत एकटेच होते. अशा वेळीं सर्व खिडक्या बंद करून, बांकावरील मऊ गाद्यांतील स्प्रिंगवर आगगाडीच्या वेगामुळें मिळणारे हेलकावे खात, उबदार पांघरूण अंगावर घेऊन सुखानें निजणें कोणास आवडणार नाहीं ? पण बळवंतरावांची मनःस्थिति आज झोंप

येण्यासारखी नव्हती. त्यांना या डब्यांतला एकटेपणाच काय तो सुखकर वाटला. ते आपल्या मऊ बिछान्यावर पडले होते; त्यांचे डोळेहि मिटलेले दिसत होते; पण त्यांच्या डोक्यांतले विचार आगगाडीपेक्षाहि अधिक वेगानें धांवत होते. स्मृतीनें त्यांना यावेळी वीस वर्षे मागें नेलें असून त्यांच्या आयुष्यांतील एक अत्यंत दुःखकारक प्रसंग त्यांच्या अंतश्चक्षूं-पुढून जात होता. वीस वर्षांपूर्वीची असावरीची करुण पण निश्चयी मूर्ति त्यांच्या डोळ्यांपुढें उभी राहिली. ताबडतोब येऊन भेटण्याबद्दलची तिची तार हातांत पडतांच आपण पुण्यास धांवत गेलों; आणि स्टेशनवरून थेट तिच्या घरीं जाऊन दारांत पाऊल टाकतांच दृष्टीस पडलेली, अनपेक्षित आणि एकाहून एक जास्त अशा आलेल्या संकटांनीं विलक्षण खिन्न झालेली असावरीची मुद्रा; आणि मुलगा व नवरा या दोघांचा एकाच आठवड्यांत प्लेगनें बळी घेतल्यामुळें शोकानें दिङ्मूढ झालेली रमाबाईची—तिच्या हतभागी आईची—स्थिति, त्यांना पुनः कालच्याप्रमाणें दिसूं लागली.

असावरीचें व त्यांचें आपापसांत लग्न करण्याचे ठरलें होतें; व तिच्या कुटुंबावर ज्या आठवड्यांत हा कहर गुदरला त्याच आठवड्यांत ते दोघे ही गोष्ट तिच्या आईबापांस कळवून आपल्या विवाहास त्यांची अनुज्ञा मागणार होते. पण याची रमाबाईना कल्पनाहि नव्हती. आपल्या अत्यंत घरोब्यांतला, आपल्याला मुलासारखा वाटणारा, आणि असावरीचा जिव्हाळ्याचा मित्र या दृष्टीनेंच ती बळवंतरावांकडे पहात होती. बळवंतराव घरांत येतांच त्या बिचारीनें त्यांच्या गळ्यांत एकदम मिठी मारून हंबरडा फोडला. असावरी तें ऐकून डोळ्यास पदर लावून आईचें समाधान करण्याचें काम बळवंतरावांवर सोडून तेथून चालती झाली. पण बळवंतराव तरी तिचें समाधान कसें करणार? आपल्या खांद्यावर मान टाकून त्यांनीं रमाबाईनां मनमुराद रडूं दिलें; मुलगा गेला तर त्याच्या जागीं असावरीकडे पाहून, मला आपला मुलगा समजून, दुःख आंवरा म्हणून कसें तरी सांत्वन केलें; पण हाता-तोंडाशीं आलेला मुलगा जाऊन चार दिवस होतात न होतात तोंच, ज्या

एकट्यावर सगळ्या कुटुंबाची व तिची भिस्त, तो नवराहि निर्घृण प्लेगानें ओढून न्यावा या दुःखाचें समाधान कोण करूं शकला असता? रमाबाईंना रडून रडून बराच थकवा आल्यावर त्यांना हळूच चौघडीवर निजविलें; आणि त्यांच्या धाकट्या मुलीला, भैरवीला, आपल्या आईजवळ थोडा वेळ बसण्यास सांगून, "मी जरा असावरीकडे जाऊन येतों" असें म्हणून बळवंतराव वर निघून गेले.

त्यांना वाटलें होतें त्यापेक्षां असावरी शांत दिसली. ती दिवाणखान्यांत आरामखुर्चीवर स्वस्थ डोळे मिटून बसली होती; बळवंतरावांच्या पावलांचा आवाज ऐकून तिनें डोळे उघडले व खिन्नपणें हंसून त्यांना बसण्यासाठीं समोरच्या खुर्चीकडे बोट दाखविलें.

"असावरी" बळवंतराव दुःखित स्वरानें म्हणाले, "या दुःखांत तूं इतका धीर धरला आहेस हें पाहून मला किती समाधान वाटतं म्हणून सांगूं! प्रसंग विलक्षण तर खराच, पण त्यांतच धीर धर एवढं सांगण्या-पलीकडे कोणाला काय करतां येणार? आपल्या आईकरितां, भांवडांकरितां तरी तुला धीर धरलाच पाहिजे. कारण आतां त्यांनीं तुझ्याशिवाय कुणाकडे पहावं?"

"बळवंतराव" तिनें उत्तर केलें, "मी पहिल्यापासूनच धीर धरला होता; आणि आतां तुमच्या शब्दानं तर मला अधिकच सामर्थ्य आलं आहे. पण खरं म्हणायचं म्हटलं म्हणजे, आमच्या घरावर कोसळलेला दुःखाचा डोंगर इतका प्रचंड आहे, आणखी माझ्यावर इतकी मोठी जबाबदारी अकस्मात् येऊन पडली आहे, कीं दुःख करून रडायला मजजवळ अश्रूच उरले नाहींत. आपण गेल्या महिन्यांत मुंबईस परीक्षा संपल्यावर बेत करीत होतों काय, आणि आज हें अनपेक्षित झालं काय! परंतु तें कांहीं नाहीं, आल्या प्रसंगाला तोंड हें दिलंच पाहिजे. नाना गेल्यापासून आज दोन दिवस मी या सगळ्या जबाबदारीचा विचार करतें आहे; आणि त्याकरतांच तुम्हांला मुद्दाम तार करून बोलावलं. कारण माझे पुढचे सगळे बेत आतां तुमच्यावरच अवलंबून आहेत. माझ्या...

माझ्या " असावरी येथें बोलतांना अडखळली, तिचा आवाज गाहिंवरून आला, व डोळ्यांत अश्रुबिंदूहि उभे राहिले; पण ते क्षणभरच तिनें आपलें मन लागलेंच स्थिर केलें, आणि सरळ बळवंतरावांकडे पाहून ती म्हणाली, " माझ्या वचनांतून तुम्ही मला आतां मुक्त करा हींच मला तुम्हांला विनंति करायची आहे. कारण तसं झाल्याशिवाय माझ्यावरील जबाबदारी माझ्या हातून योग्य रीतीनं पार पडणार नाहीं. "

बळवंतराव अगदीं स्तंभित झाले; कारण असावरीची ही विनंति त्यांना अगदीं अनपेक्षित होती. ते एकदम इंग्रजींत म्हणाले, " असावरी, आपण काय बोलतों हें तुला समजतं तरी आहे का? नानांच्या आणि दादाच्या आकस्मिक मरणानं तुझं चित्त ठिकाणावर नाहीं. छे, नको; आज कांहींच बोलूं नकोस. आणखी १५।२० दिवस जाऊं देत. तोंपर्यंत मी इथंच रहातों; म्हणजे तुझ्या मनाला अंमळ विसांवाहि होईल. माझ्याकरतां तरी आज या कसल्याच प्रश्नांचा विचार करूं नकोस; आणि मी तरी आपण योजलेल्या गोष्टी आतांच व्हाव्या असं म्हणेन हें तुला कसं वाटलं? छे, छे, असावरी, या धक्क्यांतून तुमची सगळ्यांचीं मनं पुनः स्वस्थ होऊं देत. एकदां सबळी व्यवस्था नीट लागूं दे; आणि मग आपण आपल्या स्वतःचा विचार अगदीं शेवटीं, सावकाशीनं पाहूं. खरं म्हणशील तर मी त्या गोष्टीचं आतां नांव दिखील काढणार नव्हतों."

" पण आमची सगळी व्यवस्था नीट लागण्याकरितांच तर मी हें बोलतें आहे. बळवंतराव, मला सगळ्या गोष्टी तुम्हांला मोकळेपणानं सांगितल्याच पाहिजेत. म्हणजे मी तुम्हांला केलेली विनंति किती विचारांतीं केलेली आहे हें तुम्हांला समजून येईल. तुम्हांला आमच्या नानांच्या सांपत्तिक स्थितीची कल्पना असेलच?"

" कल्पना काय? इतर चार साधारण वकिलांचं असतं तसंच त्यांचंहि असणार! इतका सगळा प्रपंच चालवून या वयांत त्यांच्याजवळ शिल्लक काय असणार हें दिसतंच आहे. " बळवंतरावांनीं खिन्नपणें उत्तर दिलें.

" पण इतर चार माणसांजवळ शिल्लक असेल तीहि त्यांच्याजवळ नाहीं. अगदीं स्पष्ट सांगायचं म्हटलं तर, आईचे आणखी आम्हां दोघी-

तिर्घांचे थोडेबहुत दागिने, आणि उद्यां विम्याचे काय पांच हजार येतील ते रुपये, याशिवाय एक पैसुद्धां आज आमच्याजवळ नाहीं. आज जवळ थोडे पैसे आहेत ते उद्यां संपले म्हणजे काय करायचं हाच माझ्यापुढं मोठा प्रश्न उभा आहे. ”

“ अरेरे, ” बळवंतराव सखेद म्हणाले “ इतकी मला खरोखरीच कल्पना नव्हती. नानांचा स्वभाव खर्चिक होता, सार्वजनिक देणग्या ते सढळ हातानं देत. आणि शिवाय तुम्हां सगळ्यांचीं शिक्षणं. मग खरंच, शिल्लक तरी कुठून रहाणार ? ”

“ विम्याचा हप्ता भरीत तेवढीच शिल्लक. तरी आई पुष्कळदां म्हणे, कीं पैसे मिळतील ते सगळेच खर्च करूं नका; परंतु त्यांचा तो स्वभावच नव्हता. दुसरा एखादा माणूस असता तर त्यानं याच प्रांतींत आज १५ वर्षांच्या वकीलींत निदान १०।१५ हजारांची तरी इस्टेट केली असती. पण मी त्यांना मुळींच दोष देत नाहीं. आपला असा अकालीं शेवट होईल याची त्यांना कधीं कल्पना होती ? आणि त्यांनीं पैशाची शिल्लक नाहीं ठेवली म्हणून काय झालं ? आमच्या शिक्षणाकरितां पैसा खर्च केला तीहि शिल्लकच नाहीं का ? ”

असावरीच्या शेवटच्या वाक्यानें बळवंतरावांच्या मनांत थोडासा प्रकाश पडला; आणि तिच्या आरंभींच्या भाषणाचा रोखहि त्यांच्या लक्षांत आला. “ मग तुला आतां नोकरी करून सगळ्यांचं चालवलं पाहिजे अशी स्थिति आहे तर ? ” त्यांनीं विचारलें.

आपला हेतु बळवंतरावांच्या इतक्या लवकर लक्षांत आला हें पाहून असावरीला जरा समाधान वाटलें. “ अर्थातच, त्याशिवाय दुसरा उपायच नाहीं. तुम्हींच विचार करा, दादा असता तर आणखी दोन वर्षांनीं बी. ए. झाला असता, व मग त्याचा कुटुंबाला कांहीं तरी आधार होता. पण देवानं त्यालाहि नेलं. आतां आम्हीं तीन बहिणी, आणखी एक भाऊ तो सारा चार वर्षांचा. बहिणी काय त्याहि अजून मुलीच ! दुर्गा यंदा मॅट्रि-कला बसली आहे; मालश्री इंग्रजी पांचवींत; आणि भैरवीचं तर अजून

मराठी शिक्षणच चालू आहे. मीच काय ती सगळ्यांत मोठी, आणि शिक्षण पुरं झालेली. प्रपंच चालवण्याची, आणि या सगळ्या भावंडाच्या शिक्षणाची जबाबदारी मी नाहीं घेतली तर दुसरं कोण घेईल ? ”

असावरीच्या एकंदर विचारांचें पर्यवसान बळवंतरावांच्या लक्षांत आतां पूर्णपणें आलें. तिचे वडील आणि भाऊ अकस्मात् वारल्यामुळें सारी परिस्थिति अकल्पित रीतीनें अशी बदलेल ही कल्पनाच त्यांच्या मनांत आली नव्हती, परंतु ती सगळी वस्तुस्थिति असावरीने त्यांच्यासमोर इतक्या निःसंदिग्ध रीतीनें मांडली कीं तिची सत्यता कबूल करणें त्यांना भागच झालें. आपण आजपर्यंत केलेलें मनोराज्य, भावी आयुष्यांतील सुखाबद्दलच्या केलेल्या कल्पना, अशा एकाएकीं ढांसळून पडणार हें पाहून त्यांचें मन गोंधळून गेलें.

असावरीनें त्यांच्या चेहेऱ्याकडे कांहीं वेळ टक लावून पाहिलें, आणि ती पुढें म्हणाली, “ आज आमची स्थिति कशी आहे ती तुम्हीं पाहिली. मग आतां तुम्हींच विचार करा, मी लग्न करून घरांतून निघून जाणं योग्य होईल काय ? आईची काळजी कोण घेईल ? माझ्या बहिणींची व्यवस्था कोण पाहील ? आणि भाऊचं शिक्षण कोण करील ? मी मुलगी असलें तरी मला नानांनीं मुलाप्रमाणंच पहिल्यापासून वागवलं; आणि खरोखरीच मुलाची जागा घेण्याचा प्रसंग माझ्यावर आतां आला आहे ! त्याकरितां मला माझे यापूर्वींचे सर्व बेत सोडून दिले पाहिजेत. पण यांतहि मी एक प्रकारचं सुदैवच समजते; एरवीं नानांनीं बी. ए. पर्यंत मला शिक्षण देऊन माझ्यावर जे उपकार केले त्यांची फेड मला कशी करतां आली असती ? ”

असावरी हें अत्यंत शांतपणानें बोलत होती हें खरें, पण ती आपल्या भावंडांसाठीं जो स्वार्थत्याग करणार होती तो करितांना तिच्या मनाला किती यातना होत होत्या हें तिच्या मुद्रेवरून दिसत होतें. आंतून येणारा रडण्याचा उमाळा तिनें प्रयासानें दाबला. डोळ्यांतून एक अश्रुहि बाहेर न येऊं देतां हें दिव्य पार पाडण्याचा तिनें निश्चय केला होता.

" मग तुझा आतां बेत तरी काय आहे ?" बळवंतरावांनीं विचारलें.

" आतां सांगितला ह्याच. " असावरीनें उत्तर दिलें. " बी. ए. चा निकाल या आठवड्यांत लागेल. मला एखादा क्लास न मिळाला तरी मी निदान पास तरी होईनच. पास होतांच हुजूरपागेंत नोकरी धरावयाची. आज माझ्याकडे भेटावयाला तिथल्या एक बाई आल्या होत्या. त्यांच्या जवळ सहजगत्या म्हणून मी चौकशी केली आहे. फक्त तुम्ही आल्यानंतर तुम्हांला सर्व गोष्टी कळवून तुमच्या संमतीनं अर्ज टाकावयाचा इतकंच ठेवलं होतं. मी बी. ए. झाल्यावर निदान ८० रुपये तरी प्रथम मिळावयाला मुळींच अडचण पडणार नाहीं. त्यांत आम्हां सगळ्यांचं पोट अगदीं ठीक भरेल. "

" तुझ्या या योजनेंवर कसलाच आक्षेप घेतां येणार नाहीं. पण हें सर्व साधण्याकारितां, असावरी, आपल्या पहिल्या हेतूवर पाणी सोडणं जरूरच आहे का ? मीहि यंदा एल् एल्.बी. होईन; व लवकरच माझा धंदा सुरू करीन. आपल्या आईची आणि भावंडांची काळजी घेणं हें जसं तुझं कर्तव्य आहे तसं माझंहि नाहीं का ? आपलं लग्न झाल्यावर तुझ्यावरील या जबाबदारींत वांटा घेण्याचा मलाहि हक्क प्राप्त होईल. लग्न करून सुद्धां तुला आपल्या बहीणभावंडांचं शिक्षण करतां येणार आहे; मग ती जबाबदारी आपणां उभयतांवर सारखी पडणार असल्यामुळें तुझीहि काळजी तितकी कमी होईल. "

बळवंतरावांचें हें कळकळीचें व अंतःकरणापासूनचें बोलणें ऐकून असावरी खिन्नपणें हंसली, आणि म्हणाली " या बाजूनं मी विचार केला नाहीं असं तुम्हांला वाटतं का ? पण तें शक्य नाहीं. पहिली गोष्ट, तुमची स्वतःची अशी श्रीमंती नाहीं, कीं लग्न केल्यावर आपल्या बायकोच्या माहेरच्या इतक्या माणसांना तुम्हीं पोसूं शकाल. तुमच्या मागं तुमच्या स्वतःच्या किती जबाबदाऱ्या आहेत अन् तुमचं कुटुंब किती मोठं आहे हें मला ठाऊक आहे. त्यांत आणखी माझी भर पडल्यानं तें ओझं तुम्हांला फारच मोठं होईल. बरं, तुम्हीं तितके श्रीमंत असतां तरी सुद्धां जांवयाच्या

जिवावर आपण जगावं, आणखी आपल्या मुलांचं शिक्षण व्हावं ही गोष्ट आईनं कधींच कबूल केली नसती; व मी तिला त्याबद्दल मुळींच दोष देणार नाहीं."

"मग लग्न करून नोकरी केली तर? तूं आपल्या पगाराचे सगळे पैसे आपल्या आईला दे म्हणजे झालं; तसं करणं कांहीं अशक्य नाहीं. लग्नानंतरहि सरकारी नोकरी करून आपल्या नवऱ्याच्या प्राप्तींत भर घालणाऱ्या कांहीं स्त्रिया नाहींत कां?"

"असतील; पण विचारांतीं तो मार्ग मी पसंत करीत नाहीं. पहिलं असं कीं, माझ्या नोकरीची तुमच्या प्राप्तींत भर पडणार नाहीं. शिवाय लग्न केल्यानंतर स्त्रियांनीं नोकरी करण्याचं तत्त्वच मला पटत नाहीं. कारण असं कीं, लग्न करून आपण ज्या जबाबदाऱ्या स्वखुषीनं अंगावर घेतों, त्या अशी नोकरी करण्यानं योग्य तऱ्हेनं पार पडत नाहींत. तुह्मीं पुरुषांनीं लग्न केलं तरी त्यामुळं तुमच्यावर येणाऱ्या जबाबदाऱ्या आमच्या-पेक्षां वेगळ्या असतात. जर माझं तुमच्यावर खरं प्रेम असेल, तर आपलं लग्न झाल्यावर तुह्मांला शक्य तितकं सुख देणं; तुमच्या हरएक कार्यांत तुम्हांला होईल ती मदत करणं; तुह्मांला अधिक कार्यक्षम करणं; आपलं जगांतलं नियोजित कार्य करण्याला तुमचा हुरूप व सामर्थ्य वाढेल असं आपलं घर ठेवणं; हेंच मी माझं पहिलं कर्तव्य समजेन. म्हणून लग्न करून माझं कर्तृत्व एकदां मी तुमच्या स्वाधीन केल्यानंतर, त्याचा दुसऱ्यां-साठीं उपयोग करणं मला मुळींच आवडणार नाहीं."

असावरी जरा थांबली; पण बळवंतराव स्तब्धच राहिलेले पाहून ती पुढें म्हणाली, "तुह्मीं संध्याकाळीं थकून घरीं आलां, ह्मणजे तुमचं मन प्रफुल्लित करून तें आपल्या कार्याला पुनः ताजंतवानं करण्यासाठीं माझी शक्ति खर्च व्हावयाची; त्याऐवजीं ती तुमच्याप्रमाणंच दुसऱ्याचा उद्योग-धंदा करण्यांत दिवसभर घालवून तुमच्याबरोबरच मीहि घरीं थकून यायचं ही कल्पना, माझ्या मनांत तुमच्याबद्दल जें प्रेम आहे, त्याच्याशीं आणि माझ्या वैवाहिक ध्येयाशीं अगदीं विसंगत वाटते. मग त्यांत

आपलं कौटुंबिक सुख तें काय राहिलं? तुम्हांला तशी नड लागलीच तर द्रव्यार्जन करून तुम्हांला मदत करण्याचं सामर्थ्य माझ्यांत आहे इतकी जाणीव मला पुरे आहे. परंतु तें माझ्या वैवाहिक आयुष्याचं ध्येय मात्र मीं ठेवणार नाहीं. तें माझं ध्येय या द्रव्यदृष्टीपेक्षां अधिक उच्च आहे."

असावरीचें हें बोलणें अगदीं मनापासून येत होतें; त्यांतच, तिच्या बळवंतरावांवरील प्रेमामुळें व स्वतःच्या ध्येयावरील निष्ठेमुळें, तिच्या आवाजांत एक विलक्षण स्निग्धपणा व गांभीर्य आलें होतें. त्याचा बळवंतरावांवर फारच परिणाम झाला. त्यांना तिच्या विचारांचें कौतुक वाटलें; आपल्यावर तिचें इतकें प्रेम असावें याचा त्यांना अभिमान वाटला आणि तिचा स्वार्थत्याग पाहून तिजविषयींचा त्यांचा आदरभाव द्विगुणित झाला. असावरीची भावनामय विचारसरणी त्यांना युक्तिवादानें खोडून काढतां आली असती; पण तिच्या पवित्र भावनेला कठोर युक्तिवादाचा स्पर्श करणें म्हणजे तिचा अनादर करणें होय असें त्यांना वाटलें. तथापि ते म्हणाले कीं,

"असावरी, तूं केवळ भावनावश होऊन हा विचार करीत आहेस. जगांत व्यवहारालाहि थोडेसें महत्त्व द्यावें लागतें. माझ्या सुखाबद्दल तूं जें म्हणतेस तें खरं आहे असं धरून चाललं तरी, तुझ्या आईसाठीं आणि भावंडांसाठीं मी तो स्वार्थत्याग करायला तयार आहें. पूर्ण कौटुंबिक सुख मिळणार नाहीं म्हणून परस्परांच्या सहवासाला अजीबात अंतरण्यापेक्षां, त्याच्यासाठीं "सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पंडितः" या न्यायानें थोड्याशा कौटुंबिक सुखाचा त्याग करायलाकाय हरकत आहे? माझ्या जबाबदारींत आपण भाग घ्यावा असं तुला वाटतं, त्याप्रमाणं तुझ्या जबाबदारींत आपलाहि वांटा असावा अशी इच्छा मी केली तर तें अस्वाभाविक होईल कां?"

असावरीजवळ याचेंहि उत्तर तयार होतें. ती लागलीच म्हणाली, "आपल्या स्वतःच्या सुखाचा व हक्कांचा त्याग तुम्ही करूं शकाल, पण आपल्या भावी मुलांच्या सुखाचा व हक्कांचा त्याग तुम्हीं कोण करणार?

मी जर नोकरीच्या मागं लागलें, तर त्यांची काळजी कोण येईल ? त्यांच्या गृहशिक्षणाकडे, व सुखाकडे कोण पाहील ? ज्या आईनं आपल्याला जगांत आणलं, त्या आईकडूनच आपलं संगोपन करून घेण्याचा त्यांचा हक्क आहे; आणि हा त्यांचा हक्क त्यांना देणं जर मला अशक्य होणार असेल, तर ती जबाबदारी अंगावर मुळीं न घेणं हेंच मला अधिक रास्त वाटेल."

बळवंतराव यावर कांहीच बोलले नाहीत. असावरीच्या या मनःस्थितींत तिच्या युक्तिवादाला काय उत्तर द्यावें हें त्यांना सुचेना. कारण बाप आणि भाऊ या दोघांच्या मृत्यूमुळें घराची सर्व जबाबदारी, भावंडांचें शिक्षण करणें, हें सर्व तिच्यावर येऊन पडलें; आणि ती आतां शिक्षण पूर्ण होऊन द्रव्यार्जनक्षम अशी झाल्यामुळें ती जबाबदारी तिला उचलणें प्राप्त होते हें त्यांना दिसत होतें. परंतु लग्न करून हें कसें साधतां येईल याचा ते विचार करीत होते. आणि या मार्गातल्या असावरीनें दाखविलेल्या अड-चणी खोट्या आहेत असेंहि त्यांना ह्मणवेना.

याप्रमाणें थोडा वेळ गेल्यावर असावरी पुनः म्हणाली " बळवंतराव, या बाबतींत मी शक्य तितक्या दृष्टींनीं विचार केला. माझ्यापुढं यावेळीं दोन अगदीं भिन्न कर्तव्यं उभीं आहेत. त्यांपैकीं एक आतां माझ्या अंगावर येऊन पडलंच आहे. दुसरं अंगावर घेणं न घेणं माझ्या इच्छेवर आहे. तें अंगावर घेतलं तर तें नीट पार पडणार नाहीं इतकंच नाहीं, तर त्यामुळं पहिल्या कर्तव्यालाहि अडथळा येणार आहे; आणि पहिलंच कर्तव्य आज अधिक अगत्याचं असल्यामुळं तें शक्य तितक्या उत्कृष्ट रीतीनं पार पडण्याकरितां मला सर्वस्वी त्यालाच वाहून घेतलं पाहिजे. म्हणून ह्मणते, या प्रश्नाकडे माझ्या दृष्टीनें पहा. तुमच्याशीं लग्न करण्याचं नाकारण्यांत मी तुमचं एक मोठं सुख हिरावून घेत आहें हें मला दिसतं; पण त्यांत माझंहि तितकंच मोठं सुख मी दूर करीत नाहीं कां ? परंतु माझ्या सुखापेक्षां दुसऱ्यांच्या सुखांची आज मजवर पडलेली जबाबदारी मला अधिक महत्त्वाची वाटते; व ती पार पाडण्याला-मजवर तुमचं खरं प्रेम असेल तर-मला मोकळीक द्या, एवढंच माझं तुह्मांला मागणं आहे."

मनःसंयमनाला दाद न देतां असावरीचा आवाज गद्गद झाला; ती आपल्या खुर्चीवरून उठून बळवंतरावांच्या समोर उभी राहिली; आणि आर्तस्वरानें पुनः ह्मणाली, " बळवंतराव, माझ्या भाषणानं तुम्हांला तीव्र वेदना होत आहेत हें मला समजतं; पण माझं गोड मनोराज्य आपल्या हातांनीं दूर सारतांना मलाहि तितकंच दुःख होत नाहीं असं कां तुम्हांला वाटतं ? मी हा माझ्या जन्माचा स्वार्थत्याग करीत आहे; माझ्या असहाय आईकरितां आणि लहान भावंडांकरितां ही तपश्चर्या करणं मला भाग आहे, त्याला तुह्मीं आपली संमति नाहीं कां देणार ?"

बळवंतरावांना आतां उत्तर न देणें अशक्य होतें. तेहि उठून उभे राहिले, आणि असावरीचे दोन्ही हात आपल्या हातांत घेऊन तितक्याच गद्गग स्वरांत म्हणाले " असावरी, तुझ्या या पवित्र स्वार्थत्यागाच्या आड मी येणं म्हणजे तो माझा निव्वळ स्वार्थीपणा होईल. आपलं मनोराज्य देवानंच उलथून पाडलं, त्याला आपला नाइलाज आहे. तूं म्हणतेस तें खरं आहे. माझ्यापेक्षां तुझ्या असहाय आईला आणि भावंडांना तुझी आज जास्त जरूरी आहे. त्यांच्यापासून तुला हिरावून घेण्याचा स्वार्थीपणा मी करणार नाहीं. ईश्वर तुझं कल्याण करो. आपलं लग्न न झालं तरी तुझं प्रेम आणि सहानुभूति सदैव माझ्या पाठीशीं आहेत, ही एकच गोष्ट माझ्या आयुष्यांत मला समाधान देईल."

" अहाहा !" असावरी मनावरील एक दडपण उतरल्याच्या आवाजानें म्हणाली " तुमच्या या शब्दांनीं मला किती बरं वाटलं ! तुमच्या मनाच्या मोठेपणाची माझी परीक्षा यथायोग्य होती याचंच हें प्रत्यंतर आहे."

इतक्यांत असावरीचा धाकटा भाऊ दोघांनाहि आईनें बोलावलें आहे म्हणून निरोप सांगण्यास वर आला. तेव्हां बळवंतरावांना ती म्हणाली, ' तुह्मीच जा; माझं डोकं फार दुखतं आहे म्हणून मी जरा पडलें आहे म्हणून आईला सांगा. उद्यां सकाळीं पुनः याल ना ?"

आतां झालेल्या प्रकारावरून कांहीं वेळ स्वस्थ एकटेंच असण्याची असावरीची इच्छा बळवंतरावांच्या लक्षांत आली. ते 'होय' म्हणून खालीं

तिच्या आईकडे गेले. तेथें कांहीं वेळ बसून ते आपल्या मुक्कामाच्या ठिकाणीं जावयास निघाले. पण त्यापूर्वी असावरीचा निरोप घेण्यासाठीं म्हणून ते वर आले, आणि पहातात तों ती टेबलावर डोकें ठेवून दोन्ही हातांत तोंड लपवून आंतल्याआंत पण स्फुंदून स्फुंदून रडत आहे !

ती आपल्या दुःखांत इतकी चूर झाली होती कीं, बळवंतरावांचे जिन्यावर पाय वाजले ते तिला ऐकूं आले नाहींत; ते तिच्याकडे पहात कितीतरी वेळ दारांत विषण्ण मनानें उभे होते, तेंहि तिला समजलें नाहीं. तिच्याजवळ जाऊन तिचें समाधान करण्याचा बळवतरावांना मोह झाला; पण आपल्याशीं बोलतांना आपल्यासमोर जिनें डोळ्यांतून पाण्याचा थेंबहि येऊं दिला नाहीं, तिला ती रडत असतां आपल्या दृष्टीस पडल्याचें कळूं दिल्यानें तिच्या बाणेदार स्वभावाला धक्का दिल्यासारखें होईल, हें जाणून ते तिच्याकडे आदरानें एकवार पाहून पाय न वाजवितां तसेच जिन्यांतून खालीं उतरले. पण असावरीचें करुणदृश्य त्यांच्या हृदयांत मात्र कायमचें राहिलें.

आज आगगाडींतहि तीच मूर्ति त्यांच्या मनश्चक्षूंसमोर सारखी उभी रहात होती. वरील प्रकाराला वीस वर्षें होऊन होऊन गेलीं तरी तो सर्व प्रसंग त्यांच्यासमोर पुनः ताजा उभा होता. त्यावेळचें प्रत्येक अक्षर त्यांना पुनः ऐकूं येत होतें; विचारांच्या तंद्रींत चुकून डोळा लागलाच तर त्यांना स्वप्नांतहि तीच प्रसंग, आणि असावरीची टेबलावर डोकें ठेवून, हातांत तोंड झांकून आंतल्या आंत रडणारी तीच मूर्ति दिसत होती !

[ ३ ]

दुपारी बरोबर ४। वाजतां गाडी मालापूरच्या मोठ्या स्टेशनांत शिरली. लांबून दिसूं लागतांच प्लॅटफॉर्मवर गाडीची वाट पहात उभ्या राहिलेल्या गर्दींतून असावरीची मूर्ति बळवंतरावांनीं ओळखून काढली. गाडी उभी रहातांच त्यांनीं डब्यांतून खालीं उडी मारली; सामान घेण्यासाठीं हमालांची भोंवती गर्दी जमली तोंच असावरी आपला शाळेचा पट्टेवाला घेऊन तेथें पोंचली. पुष्कळ दिवसांनीं भेटल्याचा आनंद दोघांच्याहि मुद्रेवर

उत्कटतेनें विलसत होता. पट्टेवाल्याच्या ताब्यांत सगळें सामान देऊन बळवंतराव असावरीला म्हणाले " तूं स्टेशनवर येशील असं मला वाटतच होतं; पण म्हटलं न जाणों; तुझी शाळेची वेळ, तेव्हां तुला यायला होतं की नाहीं ! "

" शाळेची वेळ होती हें तर खरंच " असावरी हंसून म्हणाली, " पण शेवटचा तास माझ्याकडे नसतो. नुसतं ऑफिसचंच काम पहायचं असतं; तें तुमची तार आल्यामुळं मुद्दामच लवकर उरकून टाकलं. तुमचा प्रवास ठीक झाला ? तब्येत ठीक ? "

हें बोलणें होत आहे तों पट्टेवाल्यानें सर्व सामानसुमान घेऊन हमालाच्या डोक्यावर दिले; व हे दोघेहि त्यांच्या मागोमाग स्टेशनबाहेर पडण्याच्या गेटकडे वळले. बळवंतरावांनीं चालतां चालतां असावरीच्या प्रश्नास उत्तर दिलें " ज्या अर्थी कांहीं शारीरिक त्रास झाला नाहीं त्या अर्थी प्रवास चांगला झाला असंच म्हटलं पाहिजे. "

" म्हणजे, वाटेन मनाला कांहीं त्रास झाला ?" असावरीनें विचारलें.

" तसा त्रास कांहींच नाहीं; पण इथं पोचण्याच्या उत्सुकतेनं वेळ मात्र अतिशय कंटाळवाणा गेला. इतका कीं, मला तर वाटलं की, जगाच्या अंतापर्यंत आजचे चार कधीं वाजणारच नाहींत ! सकाळचा वेळ ताजीं वर्तमानपत्रं घेऊन तीं वाचण्यांत कसा तरी घालवला; पण मग बारा वाजल्यापासून मात्र सेकंदन् सेकंद मोजित होतों."

बळवंतरावांच्या या बोलण्यांतली भावना असावरीच्या लक्षांत आली, व त्यामुळें तिच्या मुद्रेवर नकळत समाधानाची एक लकेरहि चमकून गेली. पण इतक्यांत जवळच उभ्या असलेल्या युरेशिअन स्टेशन मास्तरानें तिला " गुड आफ्टरनून् " म्हणून टोपी उचलून सलाम केला; तो घेण्यांत आपलें मन लागलीच स्थिर करण्यास तिला संधि मिळाली. तोंपर्यंत हमालाच्या मागोमाग तिकीट कलेक्टरच्या हातांत आपलें तिकीट देऊन दोघेजण फाटकाच्या बाहेर पडलेहि. असावरी आपली स्वतःची व्हिक्टोरिआ घेऊनच आली होती; सामान भाड्याच्या टांग्यांतून मागून घेऊन

येण्यास पट्टेवाल्यास सांगून बळवंतरावांस आपल्या गाडींतून घेऊन ती निघाली.

गाडी स्टेशनाच्या कंपौंडांतून बाहेर येतांच बळवंतराव हंसत म्हणाले, "असावरी, तूं येथें बरीच बडी व्यक्ति झाली आहेस! स्टेशनावर सगळ्यांचें सलाम्, स्वत:ची गाडी, शिपाई, बराच थाट आहे तुझा!"

" शाळा घरापासून फार दूर आहे; आणखी पुनः शाळच्या कामासाठीं गांवांतहि पुष्कळांकडं जावं यावं लागतं. म्हणून स्वत:ची गाडी ठेवणंच अधिक सोयीचं वाटलं."

" असं होय? मला वाटलं कीं आतां भाऊ आय्. सी. एस्. झाला तेव्हां त्याची बहीण शोभावी म्हणून ही गाडी आहे?"

" बळवंतराव " असावरी हंसून म्हणाली " तुमचा स्वभाव अगदीं होता तस्सा आहे. आतां एवढे नामांकित वकील झालां, एक बडे पुढारी झालां, तेव्हां म्हटलं तुमच्यांत कांहीं तरी गंभीरपणा आला असेल. आतां घरीं पोंचल्यावर तर प्रत्येक गोष्टीवर किती टीका न् थट्टा कराल कोण जाणे!"

' कां, घरीं याच्यापेक्षांहि थाट आहे वाटतं? तसं असेल तर मलाच जपलं पाहिजे, माझं गांवढळाचं कसं होईल म्हणून! पण आम्ही आपले तुझ्या त्या थाटांत येणारच नाहीं. मी तुझ्या आईच्याच जवळ बसेन म्हणजे झालं. त्या हल्लीं इथंच आहेत ना?"

" तीच काय, आमचं सगळं संमेलनच जमलं आहे. भैरवी पहिलं बाळंतपण म्हणून माहेरीं आली आहे; तिला भेटायला दुर्गा अन् मालश्री याहि आल्या आहेत परवाच. त्या दोघींचीं मुलं तर नेहमीं मजजवळच असतात शिकायला. म्हणून तुमची न् सगळ्यांची गांठ पडेल आज घरीं."

" छानच झालं मग."

इतक्यांत गाडी बाजारच्या मोठ्या पेठेंत शिरल्यामुळें, व बळवंतरावहि पूर्वी कधीं त्या गांवीं आले नसल्यानें त्यांना रस्त्यानें पेठेंतल्या इमारती दाखवून त्यांचीं नांवें सांगण्यास असावरीनें आरंभ केला, यामुळें इतर बोलणें

२

कांहीं झालेंच नाहीं मालपूर हें एक मोठ्यापैकी शहर होतें; आणि घरी येण्याचा मार्ग शहरांतील मोठमोठ्या अशा चार पांच रस्त्यांवरून असल्या-मुळें, प्रेक्षणीय आणि प्रसिद्ध अशा इमारती वाटेंत पुष्कळच लागल्या. त्यांपैकीं बहुधा प्रत्येकाची माहिती असावरीनें त्यांना सांगितली; आणि बळवंतरावहि ती समजून घेतल्यासारखें दाखविण्यासाठीं कांहीं तरी विचारीत. पण त्या सगळ्यांपैकीं एक अक्षर त्यांच्या लक्षांत राहिलें असेल तर शपथ! त्यांचें लक्ष बोलण्यापेक्षां बोलणाऱ्या व्यक्तीकडेच अधिक होतें असावरीचें वय यावेळीं चाळिशीच्या वर गेलें होतें; त्यामुळें तिच्या स्वरूपांत वयोमानास अनुसरून फेरबदल न होणें अशक्य होतें. शरीरानें ती पूर्वीप्रमाणेंच सडसडीत होती तरी वीस वर्षांपूर्वीचा ऐन तारु-ण्यांतला तिचा बांधा आज लोपून गेला होता. फक्त डोळ्यांनीं मात्र आपलें पूर्वीचे तेज व पाणीदारपणा कायम ठेवला, पण तेहि अगदीं पूर्वीप्रमाणेंच होते असें म्हणतां येणार नाहीं. पूर्वी त्यांत आवंदीपणाचें आणि खेळकरपणाचें मिश्रण असें; तें आज जाऊन त्यांची जागा वात्सल्य आणि गांभीर्य या गुणांनीं घेतली होती. परंतु बळवंतरावांच्या दृष्टीला यांपैकीं एकहि फरक आढळून आला नाहीं. त्यांच्या दृष्टीला ती वीस वर्षांपूर्वीची, यौवनानें प्रफुल्लित झालेली, आनंदी व खेळकर वृत्तीची पहिलीच असावरी दिसत होती. या दीर्घ अवधींत काळानें जगांत, आणि खुद्द त्यांच्या स्वतांत, अनेक फेरबदल केले असले तरी, त्याची सत्ता त्यांच्या दृष्टीनें असावरीवर मात्र कांहींच चालूं शकली नव्हती!

[ ४ ]

असावरीची निवांतपणें गांठ पडण्यास बळवंतरावांस त्या दिवशीं बराच वेळ लागला. तिच्या सर्व मंडळींची आणि त्यांची बऱ्याच दिवसांनीं गांठ पडल्यामुळें सर्वांशीं बोलणें, जेवणेंखाणे होऊन आणखीहि गप्पा झाल्या; लहान मुलांमुलींची गाणी म्हणणें झालें; आणि मग एका-मागून एक मंडळी जाऊं लागली. बळवंतराव असावरीची एकटी गांठ घेण्यास अत्यंत उत्सुक होते. पण या त्यांच्या उत्सुकतेची कल्पना इतरांना

कशी येणार ? शेवटीं मालश्रीलाहि आपल्या मांडीवर झोंपी गेलेल्या धाकट्या मुलास बिछान्यावर नेऊन निजविण्यासाठीं उठावेंच लागलें, तेव्हां ती म्हणाली " आतां निजायची वेळ नाहीं का झाली ? ११ वाजायला आले असतील."

मग मात्र बळवंतरावांनीं मनाचा धडा केला व म्हटलें, " वाजूं देत वाजले तर, तूं जाऊन नीज जा. मी व असावरी दोघेच आणखी थोडा वेळ बोलत बसणार आहोंत."

मालश्री निघून गेल्यावर दोघेहि स्तब्ध होते. आपला विषय कसा काढावा याचा बळवंतराव विचार करीत होते, तोंच असावरी म्हणाली, "बरं झालं, भाऊ सुटला एकदांचा. आजपर्यंतच्या सगळ्या श्रमांचं सार्थक केलंन् त्यानं ! मला यामुळं किती हलकं अन् उल्हसित वाटतं आहे."

असावरीचें हें बोलणें बळवंतरावांना फारच उपकारक वाटलें. कारण आतां त्यांच्या विषयाचा त्यांना अनायासेंच प्रस्ताव करतां येणार होता.

"अर्थात्, कां नाहीं वाटणार ?" त्यांनीं उत्तर दिलें. "असावरी, मलाहि आज तुझ्याइतकाच खरा खरा आनंद होतो आहे. भैरवीच्या लग्नाच्या वेळीं मी आलों होतों त्याला आतां तीन वर्षें झालीं. त्यावेळीं तुझ्यावरची जबाबदारी अजून थोडीशी पार पडायची होती. पण आज तुझं घर पाहून मला तुझ्याबद्दल धन्य वाटलं. आपल्या भावंडांसाठीं जो स्वार्थत्याग केलास, त्याचं आज सार्थक झालं. तुझ्या तिघी बहिणींचीं शिक्षणं पूर्ण होऊन, त्या चांगल्या स्थळीं पडून, त्यांचे संसारहि चालू झाले; भाऊहि आज आय. सी. एस्. होऊन चांगलाच मार्गाला लागला. खुद्द नाना असते तरी त्यांनीं यापेक्षां अधिक काय केलं असतं ? मी तर म्हणतों, त्यांच्या हातून झालं असतं त्याच्यापेक्षां तूं अधिक करून दाखवलं आहेस. तुझी दीर्घ तपश्चर्या सफल झाली."

" ही आपली तुमची व्यर्थ स्तुती आहे." असावरी संकोचून म्हणाली.

" तूं तसं खुशाल म्हण पण मला तसं वाटत नाहीं तूं आपल्या बहिणींच्या आणि भावाच्या शिक्षणाबद्दल किती अडचणी सोसल्यास हे काय

काय ठाऊक नाहीं ? पांचशें रुपये पगार तुझा अलीकडे झाला, पण याच्या आधींच पगारांतून सगळ्या कुटुंबाचं पहिल्या इतमामानं चालवून सगळ्यांचं शिक्षण, तिघी बहिणींचीं लग्नं, आणखी त्यांत पुन: भाऊला बिलायतेंत सरकारी स्कॉलरशिपशिवाय लागतील ते पैसे पाठवायचे, यांत विशेष कांहीं नाहीं असं तूं आपलं वाटलं तर ह्मण. पण मी मात्र तसं कधीं ह्मणणार नाहीं. ज्याचं जें योग्य श्रेय तें त्याला दिलंच पाहिजे."

"बरं पण आतां हा वाद कशाला" असावरी ह्मणाली. "सगळ्यांचं नीट झालं; भाऊचीहि जबाबदारी अपेक्षेबाहेर उत्कृष्ट रीतीनं पार पडली; आणखी हें सगळं आईच्या डोळ्यांदेखत झालं, यात सगळं आलं. आतां नाना असते तर इतकं झालं असतं कां याच्यापेक्षां कमी झालं असतं हा वाद कशाला ? मी आपलं एवढंच भाग्य मानते कीं, मी जें अंगावर घेतलं तें देवानं यथास्थित पार पाडलं"

आतां इतर कांहीं न बोलतां आपलें ह्मणणें स्पष्टपणें बोलण्याचें बळवंतरावांनीं ठरविलें; व असावरीचें वाक्य पुरें होतें न होतें तोंच ते एकदम ह्मणाले, "आणि ह्मणूनच तर मी इथं मुद्दाम धांवत आलों आहे. असावरी आपली तपश्चर्या आतां पूर्ण झाली नाहीं कां ?" बळवंतरावांचा आवाज गद्गद व अस्फुट झाला, "असावरी मी आणखी स्पष्ट बोललंच पाहिजे कां ?"

बळवंतरावांच्या या आर्त शब्दांचा अर्थ असावरीस कळला नाहीं हें ह्मणणें व्यर्थ होईल. तो तिच्या ध्यानांत ताबडतोब आला, व आज वीस वर्षांच्या दीर्घ अवधीनंतर बळवंतरावांनीं तोच प्रश्न तितक्याच उत्कंठेनें करावा याचा तिला आनंद वाटल्यावांचून राहिला नाहीं. बळवंतरावांनीं मागें तिला अगदीं प्रथम मागणी घातली त्या वेळींहि नेमके हेच शब्द उच्चारले होते. ते तिच्या स्मृतीपुढें तितक्याच ताजेपणानें उभे राहिले; आणि त्याबरोबर त्यावेळच्या इतक्या स्मृति अकस्मात् जागृत झाल्या कीं, प्रस्तुतच्या परिस्थितीचा क्षणभर विसर पडून ती मनानें मागल्या काळांत वावरूं लागली. परंतु बळवंतरावांच्या शब्दांनीं तिला त्यांतून लागलीच जागृत केलें.

असावरीच्या तोंडून उत्तर येण्याची बळवंतरावांनीं थोडा वेळ वाट पाहिली. गच्चीवर अंधार असल्यामुळें आपल्या प्रश्नाचें तिला काय वाटलें हें तिच्या चेहेऱ्यावरून समजण्यासहि मार्ग नव्हता. म्हणून थोडा वेळ वाट पाहून बळवंतराव अधीरतेनें ह्मणाले,

" असावरी, वीस वर्षांपूर्वी आपल्या दोघांच्या आड ज्या जबाबदाऱ्या आल्या त्या आज संपल्या आहेत. पण आपलं मनोराज्य पूर्ण होण्याच्या मार्गांतल्या अडचणी अझूनहि नाहीं कां संपल्या ?"

यावर उत्तर देणें असावरीस भागच होतें. तिचें गोंधळलेलें मन आतां बरेंच स्थिर झालें; आणि ती ह्मणाली, " बळवंतराव, मी तुह्मांला काय उत्तर देऊं हें मला सुचत नाहीं. वीस वर्षांपूर्वी मी जेव्हां हा विचार मनाआड केला, तेव्हां तो कायमचा केला. कारण मजवरच्या सर्व जबाबदाऱ्या संपतील त्यावेळीं, जनदृष्टीनें लग्नाला योग्य अशा वयाच्या बाहेर मी गेलेली असेन, हें त्यावेळींच मला दिसत होतं. म्हणून या गोष्टीकडे आयुष्यांतलं एक सुखकारक पण अशक्य असं स्वप्न या दृष्टीनंच पहावयाचं आपल्या मनाला मी शिकवलं आहे. या आपल्या दीर्घ तपश्चर्येचं फळ या जन्मीं तरी मिळण्याची मी आशा करीत नाहीं. छे छे बळवंतराव, लग्नाला योग्य असं आपलं दोघांचं आतां वय तरी आहे कां ? आणि जग तरी काय ह्मणेल ? "

" म्हणजे आपलं दोघांचं वय, आणि जगाला कसं वाटेल ही भीति, या दोनच अडचणी तुझ्या मार्गांत आहेत म्हणावयाच्या ? "

" हो, तसं म्हणायला कांहीं हरकत नाहीं. " असावरीनें अडखळत उत्तर दिलें.

" आणखी येवढ्याचसाठीं तूं स्वतःला आणखी मला शेवटपर्यंत दुःखांत ठेवणार ? " बळवंतरावांनीं विचारलें.

" माझ्यापुरतं म्हणाल तर माझं मन मीं त्याला पहिल्यापासूनच तयार करून ठेवलं आहे. " असावरी सखेद ह्मणाली.

"पण मी आपलं मन कुठं तयार केलं आहे?" बळवंतराव आवेशानें ह्मणाले, "असावरी, असल्या काल्पनिक शंकांनी आपल्या दोघांच्याहि सुखाचा नाश करूं नकोस. कारण आज वीस वर्षं मी या दिवसाची वाट पहात होतों; आणि भाऊ पास झाल्यादिवशीं तो दिवस उजाडला. वयाबद्दल ह्मणशील तर, केवळ ऐहिक सुखासाठीं लग्नं करणारांनी वयाचा विचार करावा. पण असावरी, तो नियम आपल्या बाबतींत लावूं नकोस. प्रत्येकावर सत्ता चालविणारा काल तुझें तारुण्य खुशाल हिरावून नेवो; कारण त्या तारुण्यावर मी कधीं प्रेम केलेंच नाहीं. त्यावेळीं मी ज्या असावरीवर प्रेम केले, तीच असावरी आजहि आहे; व तीच शेवटपर्यंत राहील. आणखी ती त्या वेळीं मला जितकी हवी होती, तितकीच—नव्हे त्यापेक्षांहि जास्त—मला ती आज हवी आहे. आतां तिलाच जर माझी तितकी जरूर वाटत नसेल तर भाग वेगळा. तसं असेल तर, मग कांहींच बोलायचं कारण नाहीं."

या उद्गारांतून बळवंतरावांचें सगळें हृदयच बाहेर पडलें, व त्यांचा परिणाम असावरीवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. ती गद्गदस्वर होउन ह्मणाली, "बळवंतराव हें तुह्माला ह्मणवतं तरी कसं? तसं ह्मटलं तर जगाला काय वाटेल याची, मी तुमच्यासाठीं मुळींच फिकीर करणार नाहीं. माझं ह्मणणं इतकंच कीं, इतक्या वर्षांनंतर केवळ संसारसुख भोगण्यासाठींच आतां लग्न करायचं असेल तर, आपल्या दोघांचीहि चाळिशी उलटल्यानंतर, आपापले आजपर्यंतचे भिन्न मार्ग बदलून व जगाचं हंसणं पत्करून तें करण्यांत अर्थ नाहीं. लग्न करण्यापासून तसाच कांहीं मोठा फायदा असेल तर भाग वेगळा."

"तुझी फायद्याची कल्पना काय आहे ती मला कळली पाहिजे. इतकीं वर्षं अंतःकरणांत एकाकी राहून काढल्यानंतर, या वयांत कां होईना, पण दोघांनीं निवळ परस्परांच्या सहवासाचं सुख भोगावं, यालासुद्धां मी कांहीं लहान फायदा ह्मणणार नाहीं. पण या केवळ स्वार्थी सुखापेक्षांहि दुसरं एक मोठं साध्य मला साधायचं आहे; आणि असावरी, त्यासाठीं मी

तुझ्या वैवाहिक सहकारितेची याचना करीत आहे. मी तुजजवळ आजपर्यंत हें कधीं बोललों नाहीं. कारण प्रसंग येईपर्यंत बोलण्या-यचं कारणहि नव्हतं; परंतु ही वीस वर्षे मी एकट्यानं कशीं काढलीं, आणखी मला आतां तुझी जरुरी किती आहे हें मी कसं सांगूं ?"

" तें मला समजत कां नाहीं ? माझ्या मनस्थितीचं चित्र काढलं तर तर तें तुमच्याहून वेगळं खास निघणार नाहीं. पण,—"

" सर्व जबाबदाऱ्यांतून योग्य तऱ्हेनं पार पडून आपला मार्ग मोकळा झाला, तरी तुझा हा ' पण ' संपणार नाहीं ना ? तुला ज्या समाजाच्या हंसण्याची भीति वाटते त्याची सेवा, लग्न करूनच आपण अधिक चांगली करून दाखवूं. माझ्या मनांतला कैक दिवसांचा बेत तुला सांगतों. माझं पंचे-चाळीसावं वर्ष आतां दोन तीन महिन्यांतच संपेल. तें संपतांच वकीलीच्या धंद्याला रामराम ठोकून बाकीचं आयुष्य पूर्णपणें देशाला वहाण्याचं मी ठरविलं आहे; व त्याच हेतूनं मी आजपर्यंतचा पैसा, लौकिक, मिळविला; की पुढल्या कार्यात यापैकी कशाची अडचण पडूं नये. उमेदीनं काम कर-ण्याची आपल्यापुढं अजून २०।२५ वर्षे आहेत; तीं आतां आपण दोघेहि राष्ट्रसेवेंत खर्च करूं. आजपर्यंत दोघांनीं घालवला तसा एकटा आयुष्यक्रम यापुढेंहि घालवतां येईल, नाहीं असं नाहीं. किंबहुना आपल्या आजच्या समाजाच्या दृष्टीनें तेंच रास्त दिसेल. पण विवाहानं बद्ध होऊन परस्परांच्या सहकारितेनं आपल्या हातून जें होईल तें एकटं राहून मात्र होणार नाहीं. विद्येनं आणि ध्येयानं एकमेकांस अनुरूप अशा कार्यकर्त्या पतिपत्नींची आपल्या देशांत आज उणीव आहे. अशा पतिपत्नींना काय करतां येतं त्याचं उदाहरण, असावरी, आपण घालून दाखवूं. माझी संरक्षक आणि प्रेरक देवता तूं पूर्वी जशी होतीस, तशीच आजहि आहेस; आणि म्हणूनच माझ्या कार्याला, आणखी मला, तूं हवी आहेस. "

यानंतर त्या दोघांत बराच वेळ स्तब्धता होती. असावरी आपल्याच विचारांत मग्न होती; तर बळवंतराव तिच्या उत्तराची अपेक्षा करीत आकाशांतल्या ताऱ्यांकडे पहात बसले होते. शेवटीं त्या स्तब्धतेचा

त्यांनींच भंग करून ह्मटलें; " मग काय, असावरी, तुझं उत्तर शेवटीं मी नाहीं ह्मणूनच समजूं ना ? मला फार फार आशा होती; आणि त्या आशेवरच आजपर्यंतचे दिवस काढून, तिच्या पायावर मी केवढं तरी मनोराज्य उभारलं होतं. " बळवंतरावांचा आवाज गहिंवरून आला; ते आपल्या जागेवरून उभे राहिले, व पुढें जाऊन असावरीच्या पुढें दोन्ही हात पसरून ह्मणाले. " असावरी, आज वीस वर्षें मी जी मोठी आशा उराशीं बाळगून ठेवली, तिची तूं नसत्या शंका मनांत आणून, शेवटीं अशी निराशा करणार ना ? "

असावरीच्या मनांतली खळबळ एकदम शांत झाली; तिचा निश्चय झाला. तिनें बळवंतरावांचे दोन्ही हात एकदम आपल्या हातांत घेतले व त्यांच्याप्रमाणेंच गहिंवरून ह्मटलें, " बळवंतराव माझ्याच्यानं तुमची निराशा कशी करवेल ? या वयांत लग्न करणं कसं दिसेल, आणि तें केलं तरी, मला तुमचं काय कार्य करतां येईल या विचारानं मी गोंधळून गेले होतें. पण नाहीं; काळानं आपल्या शरीरावर सत्ता चालविली असली तरी ती तो मनावर चालवूं शकला नाहीं; आणि तीं अद्यापि पूर्वीप्रमाणंच तरुण आहेत हें मला आतांच पटलं. परपस्परांच्या सहकार्यानं आपण दोघं काय करूं शकणार नाहीं ? हा दिवस खरोखरीच मोठा भाग्याचा आहे. आज वीस वर्षं जी गोष्ट अशक्य ह्मणून मी आपलं मन तयार केलं होतं, ती आज देवानं, आपली तपश्चर्या सफल करून, शक्य करून दाखविली ! "

आपल्या मनावरील एक मोठें दडपण नाहींसें झालें असें तिला वाटलें. तिचा आवेग तिला आंवरेना. आपल्या आरामखुर्चीच्या पाठीकडे तोंड वळवून तिच्यावर तिनें आपलें डोकें टेकलें आणि ती स्फुंदस्फुंदून रडूं लागली. पण तें रडें दुःखाचें नसून आनंदाचें होतें.

बळवंतरावांस तिच्याजवळ जाऊन तिचें सांत्वन करण्याचा मोह अनावर झाला; व ते जवळ जाणार तोंच बाहेरच्या माडींत पावलें वाजलीं, आणि, " अग, असावरी, अजून गप्पा पुरे नाहीं कां झाल्या ? " असे तिच्या आईचे शब्द ऐकूं आले. त्याबरोबर तिनं चटूदिशीं अश्रू पुसले,

आणि ती कांहीं उत्तर देणार तोंच बळवंतराव पुढें होऊन ह्मणाले " काकू, बाहेरच या. अगदीं वेळेवर आलांत ! उद्यां सकाळीं जे काम करणार होतों तें आतांच करून टाकतों."

" पुरे बाबा, आतां तुझं काम " काकू बाहेर गच्चीवर येऊन कळकळीच्या स्वरानें ह्मणाल्या. " तुझीं कामं तर सदाचींच आहेत ! आज येवढा प्रवास करून आलास, ती झोंप कशी येत नाहीं ? काय काम असेल तें करूं आतां सकाळीं, विसांवा तरी घे जरा."

" छे, छे, काकू, तें काम आतांच करण्यांत मजा आहे. असावरी, " बळवंतराव असावरीकडे वळून ह्मणाले, " ऊठ. तुझ्या आईना आतांच नमस्कार करून त्यांचा आशिर्वाद मागूं. "

रमाबाईच्या लक्षांत या वाक्याचा अर्थ येण्यापूर्वींच त्या दोघांनीं त्यांच्या पायांवर मस्तक ठेविलें, व तें ठेवतांना बळवंतराव म्हणाले,

" वीस वर्षांपूर्वीं असावरी न् मी विवाहाची जी परवानगी तुम्हांजवळ मागणार होतों, ती आतां आज मागतों. आई, आमच्या दीर्घ तपश्चर्येची सांगता करून पुढील कार्यांत यश येण्यासाठीं आम्हां दोघांना तुमचा आशीर्वाद द्या ! "

## दीप दुसरा

# दयेचा न्याय

शिवाच्या घरापुढे खूप गर्दी जमली होती, आणि तो लखमी-चंद मारवाड्याच्या पायां पडून गयावया करीत होता.

" शेटजी, तुमच्या पायां पडतों, तुम्हीच माझे मायबाप! आज नका हो असा सत्यनाश करूं."

शेटजींनीं शिवाला दूर लोटून दिलें. " चल, हरामखोर कुठचा! आज प्रत्यक्ष कबजा आला तेव्हां तुला मायबाप आठवला का? पैसे घेतांना गोड वाटलं, नाहीं?—आणि देतांना—"

" पण मी पैसे द्यायला कधीं नाहीं म्हटलं आहे? कोर्टात सुद्धां मी आपलं देणं कबूल केलं ना? व्याज जबर तेव्हां व्याजांत सूट मिळावी इतकीच माझी विनंती होती. शेटजी, आपणच विचार करा; दोनशें रुपये मुद्दलावर आज चार वर्षांत दीडशें रुपये व्याज खाऊन वर आणखी पुन्हां तीनशें रुपयांची डिक्री तुम्हीं मिळविली, व दरखास्तींत घर विकत घेतलंत. मी अजूनही आपल्या पायां पडतों. आज कबजा तरी करूं नका; घर मला परत द्यायचं कबूल करा, आणखी पांचसहा महिन्यांत कांहींतरी रक्कम आणून तुम्हांला देतों बघा; अगदीं देवाशपथ!"

"अरे जारे!" शेटजी कडाडले. "असलीं बोलणीं पुष्कळ ऐकली आजपर्यंत. तें कांहीं नाहीं; लिलांवांत घर घेतलंच आहे, तर आज कबजा घेऊन तुम्हांला सगळ्यांना बाहेर काढणारच मी! तुम्हां· हरामखोरांना असंच पाहिजे. व्याज जबर होतं काय? मग पैसे कशाला काढतां? पैसे काय आभाळांतून पडतात?"

"शेटजी, आपलं सगळं मला कबूल आहे; पण पहा पायांवर डोकं ठेवतों—आज तरी घराचा कबजा घेऊं नका. माझा मुलगा लई–लई आजारी आहे; तापानं फणफणलाय्! काल रात्रीं तर वातानं पळत होता. कारभारीण बाळंतीण व्हायला टेकली हाय! आज जर तुम्हीं आम्हांला घराबाहेर काढलं तर आम्हीं कुठं जावं? गांवांत आम्हांला कुणाचा आसरा नाहीं. पोराला औषध देईन म्हटलं तर घरांत तांबडी शिवराई-सुद्धां नाहीं. अगदीं देवाशपथ! घर घेतलंच आहेत, तर कबजा खुशाल घ्या; पण पायां पडतों, शेटजीं, आज तरी घेऊं नका!" शिवाच्या डोळ्यां-तून घळाघळ अश्रु वहायला लागले. आणि त्यानें शेटजींच्या पायांवर पुन्हां डोकें ठेविलें.

शेटजींनीं त्याला दूर लोटलें, व हेटाळणीनें म्हटलें, "अरे, मी काय बोळ्यानं दूध पितों असं तुला वाटलं, होय? अशा प्रसंगीं तुमच्या या अडचणी निघायच्याच."

"आपण म्हणतां तें इतर देणेकऱ्यांच्या बाबतींत खरं असेल, शेटसाब! पण माझी आजची अडचण तशी नाहीं, आपण घरांत येऊन खात्री करून घ्या."

"अरे, खात्री कसली डोंबलाची करायची?" शेटजी जोरानें म्हणाले. "तुम्हां लोकांचीं सोंगं काय मला कळत नाहींत! पोराला आजारी पडा-यचं सोंग करतां येत नाहीं वाटतं!"

"अगदीं देवाशपथ खोटं नाहीं. शेट, पोरगं खरोखरीच अस्वस्थ आहे. औषधपाण्यावांचून जगणं हीच देवाची कृपा. त्यांतून आपण आज घराबाहेर काढलं, म्हणजे संपलंच! त्याच्या जिवाची आशाच करायला

नको. तशीच कारभारीण. केव्हां बाळातीण होईल याचा नेम नाहीं. शेट, कराच एवढी दया!" शिवा पुन्हा लखमीचदाच्या पायावर डोकें ठेवून म्हणाला.

" अरे चल, मोठा आला आहे पोराच्या आजाराच्या न बायकोच्या बाळंतपणाच्या अडचणी सांगायला. जवळ पैसा नाहीं पण पोरं मात्र व्हायला हवींत ?"

शेटजींचा हा ग्राम्य विनोद ऐकून भोंवतालीं जमलेल्या तमासगीर मंडळींतून हास्याचा ध्वनी उमटला. खुद्द शिवालाही तो विनोद झोंबला; पण झोंबला तरी तो काय करणार ? दरिद्याला व कर्जबाजाऱ्याला स्वाभिमान ठेवून कधींच चालत नसतें.

आपला विनोद जमलेल्या मंडळींना आवडला हें पाहून शेटजींना दुप्पट अवसान चढलें ते बेलिफाकडे वळून म्हणाले; " रामभाऊ, चलाहो, शिरा घरांत; पहातां काय? या हरामखोरांची गय करून कधीं चालली आहे का ? या लेकाच्यांना संवयच असली ! आधीं भसांभसां कर्ज काढायचीं; आण हुकमनामे-दरखास्ती होऊन कबजा द्यायची वेळ आली, कीं यांचीं पोरं आजारी पडायची न् बायका बाळंतीण व्हायचीहि वेळ आलीच ! " हें वाक्य बोलून शेटजी मोठ्यांदा हंसले; आणि जमलेल्या लोकांकडे पाहून आढ्यतेनें म्हणाले, " अरे लेको, जवळ पैसा नाहीं दांतांवर मारायला, तर बायकान् पोरं हवींतरे कशाला ? "

अनेक दाव्यांतून जप्त्या करून कबजे देऊन रामभाऊ बेलीफ सरावला होता. जप्त्या व कबजे चुकविण्यासाठीं देणेकऱ्यांच्या अनेक युक्त्याही त्याला ठाऊक होत्या. पण शिवाची मुद्रा व त्याचें अंतः-करणापासून होत असलेलें वर्तन पाहून त्यालाहि त्याची कींव आली. तो शेटजींना म्हणाला, " शेटजी, पहा बुवा, त्याची अडचण खरी दिसते आहे. द्या त्याला सोडून आज. आणखी कांहीं दिवसांनीं कबजाला येऊं पुन्हां. घरच आहे; कांहीं पळून नाहीं जात कुठें. "

" वा ! रामभाऊ—" शेटजी आश्चर्याचा हेल काढून म्हणाले, " तुम्हींच कां बोलताहांत हें ? तुम्हांला तर असल्या लुच्च्या लोकांचा नेहमींचा अनुभव ! अहो, प्रतिवादी घराबाहेर हुसकून काढल्याशिवाय कबजा कधीं सुखानं झाला आहे का ? "

" शेटजी ! " बेलीफ म्हणाला, ' तुमच्यापेक्षां मला असल्या कामाचा जास्त अनुभव आहे. प्रत्यक्ष कबजा द्यायची वेळ आली म्हणजे प्रतिवादी हरतऱ्हेच्या लबाड्या करतो हें मलाही ठाऊक आहे. पण या– तुमच्या माणसाचा मला तसा रंग दिसत नाहीं. पहा त्याचं ऐकलंत तर. वाटलं तर आज नांवाचा कबजा घेऊन भाडेकरी म्हणून त्याला राहूं द्या घरांत कांहीं दिवस. भाडं घ्या त्याच्याकडून रीतसर ! "

" छे हो, तें कांहीं नाहीं. येवढ्याकरितां कां हें घर मी इतक्या प्रयासानं घेतलं विकत. याला घरांतून काढलाच पाहिजे बाहेर. या लोकांचं हें नेहमीच असं आहे. अन् रामभाऊ, तुम्हांलाही आज याची कींव आली, तेव्हां यानं तुमचा हात कांहीं केलाय् वाटतं ओला ? एरवीं तुम्ही बेलीफ लोक कशाला प्रतिवादीची कड घ्याल ? "

" हां ! शेटजी " बेलिफानें जरा तीव्र स्वरांत उत्तर केलें, " असलं बोलणं मी ऐकून घेणार नाहीं अं. मला याची दया आली म्हणून म्हणालों. तुम्हांला नसलं ऐकायचं तर नका ऐकूं. मला काय त्याचं ? मी आपला हुकुमाचा ताबेदार. कबजा घ्यायचा हुकूम झाला कीं बजावला ! "

" मग मी तरी तेंच सांगतों आहें. चला, व्हा घरांत. बाहेर याच्याशीं बोलून वेळ घालवून काय मिळायचं आहे ? "

हुकूमाप्रमाणे घराचा ताबा घेण्यासाठीं घरांत जाण्याशिवाय बेलिफाला गत्यंतरच नव्हतें. तथापि तो शिवाकडे वळून म्हणाला, " पहारे बाबा; मला तर तुझ्या घराचा कबजा घेतल्याशिवाय सोय नाहीं. तुझी अडचण खरी आहे, तर आतां तूंच शेटजींचं मन वळवलंस तर कांहीं सोय निघेल पहा; पहा, कर कांहींतरी उपाय ! "

पण शिवा तरी काय करणार ! त्यानें बेलिफाच्या पायांवर डोकें ठेवलें आणि म्हटलें, " दादा, मजजवळ घरांत कांहीं म्हणण्या कांहींसुद्धां नाही. होतं नव्हतं तें सगळं या शेटजींचे हप्ते भरण्यांतच खर्च केलं. बायकोच्या अंगावर फुटका मणीसुद्धां नाही. दोन हप्ते चुकले तों शेटजींनीं कामलीच दरखास्त देऊन लिलांवांत घर घेतलंसुद्धां ! रक्कम सहा महिन्यांनीं देतों, घर मला परत द्या म्हणून विनवणी केली, ती सुद्धां ते ऐकत नाहींत. तुम्हांला कबजा घ्यावयाचा असला तर घ्या; माझी ना नाहीं; पण आजतरी मजवर दया करा. चार दिवस भाड्यानं तरी राहूं द्यात. आज मला घराबाहेर काढलंत, तर मरणाच्या दारीं पडलेलं पोरगं अन् बाळंत व्हायला टेंक-लेली बायको घेऊन कुठं हो जाऊं ? " शिवाला पुढें बोलवेना. त्याचे पुढचे शब्द गळ्यांतूनच हाटून राहिले

" हं, बस्स् झालं हें सोंग आतां ! " लखमीचंद शेटजी ओरडून म्हणाले, ' रामभाऊ, शिरा घरांत; पाहतां काय ? "

पण बेलिफाची व जमलेल्या लोकांपैकींही पुष्कळांची आपल्याकडे सहानुभूति आहे हें पाहून शिवाला अवसान चढलें. तो ताडकन उठून घराच्या दारांत उभा राहिला आणि शेटजींना म्हणाला, " शेटजी, तुम्हांला खरं वाटत नसलं तर, तर घरांत जाऊन पोराबद्दल व बायको-बद्दल खात्री करून घ्या. आणि त्याउप्परही कबजा घेऊन आम्हांला बाहेर काढायचं असलं तर खुशाल काढा. त्याचा परिणाम जर भलतासलता झाला, तर त्याचं पातक तुमच्या माथीं ! "

शेटजीही निकरालाच चढले. त्यांनीं शिवाचा हात धरून त्याला दारां-तून ओढून काढलें व म्हटलें, " अरे जारे, असा धाकदपटशा पुष्कळ पाहिलाय् आजपर्यंत. कबजाला हरकत तर कर खरा; मग खटला करून तुरुंगच दाखवतों. रामभाऊ शिरा हो आंत, पाहूंच या कशी हरकत होते ती ! "

बेलीफ घरांत शिरला व त्याच्या मागोमाग शेटजीही घरांत शिरले. घर तें काय, सारें कौलारू छपराचें; आणि सैंपाकघरासुद्धां तीन किंवा चार खोल्या. बाहेरच्या ओटीवरच्या खोलींतच शिवाचा आठ नऊ वर्षांचा

मुलगा विषमानें अत्यवस्थ आजारी असलेला एका रकट्यावर पडला होता. त्याचे डोळे मिटले असून श्वास जोरानें चाललेला होता; त्याची आई बाहेरचा प्रकार ऐकत व धळाधळां रडत मुलाच्या जवळ बसलेली होती. शिवाची परिस्थिति आज अनेक दिवस ओढाताणीची असल्यामुळें घरांत सामानसुमानही फारसें नव्हतें. कांहीं गाडग्गीं मडकीं व जुनीं रकटीं एवढेंच काय तें त्याचें सगळें ऐश्वर्य दिसत होतें. अशा घरांत लखमीचंद शेटजींनीं रामभाऊ बेलिफाला घेऊन पाय ठेविला; आणि प्रथमच त्या आजारी मुलाच्या खोलीकडे मोर्चा वळाविला.

शेटजी खोलीकडे वळलेले पाहतांच शिवाच्या बायकोनें त्यांच्यापुढे जमिनीवर डोकें ठेविलें व रडत रडत म्हटलें, "शेटजी, आज पोरगं बघा लई लई बिमार आहे. कालपुन तर त्याला शुधबी नाय. आज मला एवढी भिक्षा घालाच. आम्हांला आज तरी घराबाहेर काढूं नका. शेटजी, तुम्ही आमचे मायबाप आहां. हा पहा, मी पदर पसरतें तुमच्यापुढें."

परंतु शेटजींच्या मनावर तिच्या विनवणीचा कांहींच परिणाम झाला नाहीं. ते एकदम म्हणाले, "बस्, पुरे कर. मला समजतात सगळीं सोंगं हीं. मुकाट्यानं घर खालीं करा."

"शेटजी, नका हो नका, असं बोलूं. पोराच्या अंगाला हात लावून पहा एकदां, म्हणजे समजेल तें किती तापानं फणफणलं आहे तें ? अन् आज सकाळपुन तर पानीबी घोटत नाय् हो." ती बाई हे शब्द अगदीं रडत रडत बोलली; आणि शेवटीं दुःख अनावर होऊन तिनें गळाच काढला.

बेलिफानें त्या मुलाच्या अंगाला हात लावून पाहिला तों खरेंच ! कर सपाटून ताप भरलेला; आणि हातपाय मात्र गार पडत चाललेले. त्याची चर्याही रामभाऊला जरा विचित्रच दिसली. तेव्हां तो म्हणाला, "शेटजी, खरंच, पोरगं फारच अत्यवस्थ आहे, मला तर त्याची स्थिति फार भयंकर दिसते. तुम्हीं आज कबजा नाहीं घेतला तर चालणार नाहीं का ? इतक्यात आग कांहीं पडून जात नाहीं."

"रामभाऊ, तुम्हांला आज भूतदयेचा फारच पुळका आलेला दिसतोय्. तें कांहीं नाहीं; आज घराचा कबजा झालाच पाहिजे. अहो, नाक्यावरची जागा ही; कधींपासून याला मी मागतों आहे ती. आधींच गोडीगुलाबीनं देता, तर पूर्वीच दरखास्त निकालांत नसर्ती निघाली ? पण भिकाऱ्याला ओकारी म्हणतात ना ? सगळं साग्रसंगीत झाल्याशिवाय या भिकाऱ्यांना कुठलं चैन पडायला ? चला, व्हा आंत आणि उचला तें पोर. त्या बाईला मी काढतों बाहेर."

शेटजींचा निर्दयपणा पाहून बेलिफाला सुद्धां वाईट वाटलेसें दिसलें. "पहा बुवा, मला वाटलं तें बोललों. याउप्पर तुमची मर्जी. पण त्या पोराला कांहीं मी हात लावणार नाहीं. तें फारच अत्यवस्थ दिसतंय्. भलतंच कांहीं झालं तर पापाला मला नको धनी व्हायला."

"बरं आहे, मी उचलतों तें पोरट." असें म्हणून शेटजींनीं पुढें होऊन त्या मुलाच्या अंगाखालीं हात घातला

"बाई" बेलीफ केविलवाण्या स्वरांत त्या बाईकडे वळून म्हणाला, "माझा कांहीं उपाय नाहीं. शेटजी ऐकत नाहींत तुम्हांला घरांतून बाहेर गेलं पाहिजे."

पण त्या बाईचें लक्ष शेटजींनीं मुलाच्या अंगाखालीं हात घालतांच एकदम तिकडे जाऊन ती ताडकन् उठली. बाळंतपणाला अगदीं टेकल्या-मुळें तिला उठण्यास थोडेसे श्रम झाल्याचें स्पष्ट दिसलें, पण तिचा सर्व जीव त्या मरणाच्या द्वारीं पडलेल्या पोराकडे लागलेला होता. शेटजींनीं कसें तरी खस्सदिशीं पोर वर उचलून घेतांच ती वाघिणीसारखी चवता-ळून त्यांच्या अंगावर धांवली, आणि ओरडून म्हणाली, "मेल्या, मरू घातलेलं पोर उचलतोस; आणि आम्हांला घराबाहेर काढतोस; कुठं फेडशील हें पातक! ठेव, तें पोर खालीं. तुला स्वतःला कांहीं पोरंबाळं आहेत कीं नाहींत ?"

शेटजीही आतां हट्टलाच पेटले होते. त्यांचा दुराग्रह पाहून, जमलेल्या लोकांतही त्यांची हेटाळणी सुरू झाली; आणि त्यामुळें तर ते विशेषच

चेवलें. बाई आपल्या अंगावर धांवून येतांच त्यांनीं तें मूल हातांत घेऊन तडक बाहेरचा रस्ता सुधारला. ती बाई त्यांच्यामागें " अहो, माझं पोर कुठं नेतां " असें म्हणत धांवली; आणि शेटजींचा पाय मुलासह दाराबाहेर पडतो न पडतो तोंच तिनें त्यांच्या कोटाचा पदर धरून पुन्हा तोच प्रश्न केला. तिचे डोळे संतापानें आणि दुःखानें लाल झाले होते. तिचें अंग थरथर कांपत होतें. तथापि तिनें सर्व बळ एकवटून विचारलें, " अहो तें आजारी पोर; नेतां तरी कुठं ? "

" तुझं पोर होय ? नेतों मसणांत ! " शेटजींनीं उत्तर केलें. तो सर्व देखावा पाहून आणि त्यांतल्या त्यांत शेटजींचे शेवटचे उद्गार ऐकून तेथें, जमलेल्या सर्वच मंडळींच्या अंगावर शहारे आले; आणि " काय लेकाला घराचा लोभ सुटला आहे बघा; जस कांहीं तें याला बांधून बरोबरच न्यायचं आहे ! " असे उद्गार लोकांच्या तोंडून बाहेर पडूं लागले.

इतक्यांत शेटजींनीं बाहेर येऊन तें मूल जोरानें खालीं आदळलें. त्याची आई मागोमाग आली होती. तिनें झटदिशीं पुढें होऊन तें मूल आपल्या हातांत झेलल्यामुळें तें खालीं आपटलें मात्र नाहीं, पण मृतप्राय झालेल्या त्या अर्भकाला इतकी हिसकाहिसक सहन झाली नाहीं. आईच्या हातांत तें पोर येतांच त्यानें एक जोरानें कण्हल्याचा आवाज केला, ' आई ग ' अशासारखा शब्द काढला; डोळे फिरवले; आणि कांहींतरी धरण्यासाठीं म्हणून हात वर करून आपल्या नश्वर देहाचा त्याग केला ! पोराचा प्राण गेल्याचें समजण्यास त्याच्या आईला कितीसा वेळ लागणार ? तिनें पोर जमिनीवर ठेवून आपलें अंग जमिनीवर धाड्कन् टाकलें, आणि " गेलं ग बाई पोर ! मारलंन् या चांडाळानं. " असा टाहो फोडला !

मग त्या गोंधळास काय विचारावयाचें आहे ? शिवा इतका वेळ रस्त्यावर दिङ्मूढ उभा होता. तो बायकोचा आक्रोश ऐकून एकदम पिसाळल्यासारखा होऊन शेटजींच्या अंगावर धांवून गेला. " घराचा कबजा हवा नाहीं का ? हा घे कबजा, हा घे कबजा ! " असें म्हणून त्यानें शेटजींच्या मानगुटीला हात घातला. तो अगदीं बेफाम झाला. जमलेल्या माणसांनीं

मध्यें पडून त्याला आंवरलें नसतें तर त्यानें शेटजींचा त्या क्षणीं जीवच घेतला असता ! पोर बाहेर आणल्याबरोबर मेलें हें ऐकतांच शेजारच्या दोन बाया त्या मुलाच्या आईजवळ आल्या व तिची समजूत करण्या-ऐवजीं तिच्याबरोबरच गळा काढून रडूं लागल्या. गर्दीतले कांहीं समंजस होते ते म्हणाले, " आतां पोर गेलं तर गेलं; प्रेत घरांत नेऊन पुढची तरी व्यवस्था करा," व त्याप्रमाणें दोघांनीं पुढें होऊन प्रेताला उचलण्या-साठीं हात दिलाही.

परंतु शिवा एकदम मागें फिरला व चवताळून म्हणाला, " खबरदार तें पोर त्या घरांत परत न्याल तर ! घर माझ्या कबजांतून एकदां गेलं. त्यांत पुन्हां पाय टाकीन तर हरामाचा ! ज्या घरापायीं पोर गमावलं, जरूर नाहीं त्या घराची. त्या हरामखोराला सांगा, जा बस जाऊन त्या घरांत. माझं पोर तूं मारलंस; पाहून घेईन ! "

---

२

" असेसर्स हो, फिर्यादीपक्षाच्या पुराव्याचें मी आतांपर्यंत जें समालो-चन केलें त्यावरून इतक्या गोष्टी आपल्यापुढें शाबीत झाल्या आहेत.— आरोपी शिवा याचा मुलगा अत्यवस्थ आजारी असतां तो लखमीचंदानें घराबाहेर उचलून आणून जमिनीवर आपटला, व त्यामुळें तो लागलीच गतप्राण झाला. आपले मूल आजारी असल्यामुळें आणि बायको बाळंतीण होण्यास टेंकली असल्यामुळें घराचा आजच कबजा घेऊन आम्हांस अशा स्थितींत घराबाहेर काढूं नका अशी, आरोपी व त्याची बायको हे लखमी-चंदाच्या पायां पडून विनवणी करीत असतांही लखमीचंदानें त्यांचे न ऐकतां घरांत शिरून त्यांना व त्यांच्या मृत्युशय्येवर पडलेल्या मुलाला बाहेर काढलें. या सर्व गोष्टी फिर्यादीतर्फेचा साक्षीदार बेलीफ यानेंच आपल्या उलटतपासणींत सांगितल्या आहेत. त्या वेळचा तो हृदयद्रावक व दगडालाही पाझर फोडणारा देखावा त्या बेलिफानें आपल्यासमोर वर्णन केला; आणि या वेळीं घराचा कबजा घेऊं नको, वाटलं तर नांवाचा कबजा

घेऊन, भाडेकरी म्हणून तरी त्यांना चार दिवस घरांत राहूं दे, अशी आपण स्वतःसुद्धां लखमीचंदास सल्ला दिल्याचें तो सांगतो. परंतु आरोपीचें घर नाक्यावर असल्यामुळें ती जागा आपण घेणारच, घर इतक्या प्रयासानें आपण उगाच घेतलें काय? असेही उद्गार लखमीचंदानें त्या वेळीं काढल्याचें बेलिफानें कबूल केलें असून, त्यावरून कबजा त्याच दिवशीं घेण्याचा प्रकार हट्टानें करण्यांत लखमीचंदाचा निर्दय, स्वार्थी व नीच हेतु व्यक्त होतो.

"मुलाचा प्राण गेल्यावर आरोपीचें डोकें कसें फिरलें याचेंही वर्णन बेलिफानें केलें आहे. अशा वेळीं कोणाचें डोकें फिरून वेड लागणार नाहीं? सद्गृहस्थ हो, आपल्यावर असा प्रसंग आला आहे अशी कल्पना करून तुमचें डोकें त्या वेळीं ठिकाणावर राहील काय याचा विचार करा; आणि मग डोकें फिरल्याबद्दल आरोपीला दोष द्या.

"आरोपी त्या वेळीं लखमीचंदाच्या अंगावर धांवून गेला हें शाबीद करण्यासाठीं फिर्यादीपक्षानें आरोपीच्या घराजवळ राहणारे दोन शेजारी साक्षीसाठीं बोलाविले; पण त्यांनीं काय सिद्ध केलें? मुलाच्या या शोककारक मृत्यूचा आणि घडलेल्या एकंदर प्रकाराचा धक्का बसून आरोपीची बायको, जी आधींच आसन्नप्रसव झाली होती, ती लागलीच दोन तासांत प्रसूत झाली; आणि वायु होऊन संध्याकाळच्या आंत मरण पावली; आणि त्यानंतर थोड्याच वेळांत तिचें तान्हें मूलही मरण पावलें. ही हकीगत यापैकीं एका साक्षीदारानेंच सांगितली आहे. तो आरोपीचा शेजारी होता, आणि त्याच्याच घरांत हा सर्व प्रकार झाला. आरोपीचें घर अशा आणीबाणीच्या वेळीं त्याच्या कबजांतून काढून घेतलें गेल्यामुळें, त्याच्या मुलाला सडकेवर, आणि बायकोला शेजाऱ्याच्या घरीं, आपल्या देहाचा त्याग करावा लागला. सकाळीं सूर्योदयापासून तों सूर्यास्त होईपर्यंत अवघ्या बारा तासांच्या आंत, ज्या मनुष्याला आपलें घर, आठनऊ वर्षांचा मुलगा, बायको आणि तान्हें मूल, या सर्वांना अकस्मात् आणि अशा शोककारक रीतीनें मुकावें लागलें, त्या मनुष्याची सारासार विचारशक्ति जाग्या-

वर राहणें शक्य आहे काय ? हा सर्व प्रसंग झाल्यावर आरोपी अगदीं वेड्यासारखें करीत असल्याचें व त्यास आपण मोठ्या कष्टानें आंवरून धरल्याचेंही या दोन्ही साक्षीदारांनीं कबूल केलें आहे.

"याप्रमाणें सर्व गोष्टी फिर्यादीपक्षाच्या पुराव्यावरूनच शाबीत होत असतां, आपल्यापुढें जो प्रश्न आहे तो तेवढाच कीं, या प्रकारानंतर तीनच दिवसांनीं आरोपीनें लखमीचंदाच्या दहा वर्षांच्या, एकुलत्या एक, मुलाचा जो खून केला तो कशा मनःस्थितींत केला असला पाहिजे ? माझें म्हणणें असें कीं, हा खून आरोपीनें वेडाच्या भरांत केला; आणि म्हणून त्याबद्दल तो दोषी होऊं शकत नाही. मी आतांपर्यंत आपल्यापुढें मांडलेली आरोपीची परिस्थिति पाहिली तर, आरोपीचें डोकें या एकामागून एक आलेल्या संकटांनीं भडकलें होतें असेच आपणांला मान्य करावें लागेल. मी आणखी असेंही म्हणेन कीं, त्याच्या डोक्याची ही स्थिति या घटकेपर्यंतही कायम आहे. आणि म्हणूनच, आपण फांशीं जावें म्हणून आपण हा खून केला असें तो म्हणत आहे. आरोपीनें जर हा खून इतर एकाद्या सामान्य गुन्हेगाराप्रमाणें, केवळ गुन्हा करण्याच्या हेतूनें, स्वार्थी बुद्धीनें केला असता, तर त्यानें गुन्हा छपविण्याचा प्रयत्न केला असता; पण असें त्यानें केलें काय ? त्यानें मुलाचें प्रेत मारल्याजागींच ठेवून लागलीच पोलिसांस कळविलें; आणि सर्व हकीगत सांगून त्याच क्षणीं तो आपण होऊन त्यांच्या स्वाधीन झाला ! त्यानें पोलिसांस ताबडतोब मूल मारल्याची जागा दाखवून, प्रेतहि त्यांच्या ताब्यांत दिले !"

गुन्ह्याचा तपास करणाऱ्या पोलीस अंमलदाराचा जबाबही विचार करण्यासारखा आहे. "मुलाच्या मरणाचें दुःख कसें काय असतें, हें लखमीचंदाला एकदां दाखवून मग आपण मरून जावें यासाठींच आपण त्याच्या मुलाचा खून केला, हें आरोपीनें त्या वेळीं उच्चारलेलें वाक्य अजूनही त्यानें कायम ठेविलें आहे. हे त्याचें म्हणणें व वागणें डोकें ठिकाणावर असून, स्वार्थासाठीं खून करणाऱ्या सामान्य गुन्हेगारासारखें आहे काय ? आरोपी मधून मधून भ्रमल्यासारखें वागतो हें या पोलिस इन्स्पेक्टरांनीही कबूल केलें आहे. या सर्व गोष्टींचा विचार करतां

आरोपीनें हा खून समंजस मनःस्थितींत, देहभानावर असतांना, आपण काय करतों आहों, हें समजत असून केला असें म्हणतां येईल काय ? "

आरोपीतर्फेचे तरुण वकील माधवराव इतकें बोलून थोडा वेळ थांबले. शिवानें स्वतः होऊन वकील दिलाच नव्हता; परंतु ज्या खुनाच्या खटल्यांत आरोपीचा वकील नसतो, त्या खटल्यांत आरोपीच्या बचावासाठीं सरकार आपल्या खर्चानें वकील नेमतें; त्याला ' पॉपर प्लीडर ' अशी संज्ञा असून असलीं कामें बहुधा नव्या वकीलांकडे जातात. माधवराव हे असेच ' पॉपर प्लीडर ' म्हणून या खटल्यांत शिवाच्यातर्फे आले होते. ते जात्या हुषार असल्यामुळें, आणि शिवाची हकीगत ऐकून त्यांनाही त्याच्याबद्दल अंतःकरणापासून सहानुभूति वाटल्यामुळें त्यांनीं हा खटला शक्य तितकें मन लावून चालविला.

त्यांचें आतांपर्यंतचें भाषणही फार चांगलें झालें. त्यांनीं कोर्टाकडे, असेसरांकडे, आणि खटला ऐकण्यासाठीं मागें जमलेल्या गर्दीकडे एकवार नजर फिरविली. आपल्या भाषणाचा सर्वांवर परिणाम झालेला पाहून त्यांना फिरून अवसान चढलें; आणि त्यांनीं आपलें भाषण पुढें सुरू केलें.

" युअर ऑनर व असेसर्स हो, मी आपला आतां फार वेळ घेत नाहीं. आरोपीचें डोकें ठिकाणावर नाहीं, त्यानें हा खून तात्पुरत्या वेडाच्या भरांत केला, व असें वेड लागण्यास त्याची परिस्थिति, आणि ज्याच्या मुलाचा त्यानें खून केला तो लखमीचंद, हे कारण कसें झालें, हें दाखविण्यासाठीं मी या सर्व गोष्टी आपल्यापुढें मांडल्या असून त्या सर्व फिर्यादीपक्षाच्याच पुराव्यावरून शाबीत झाल्या आहेत. मी आपणास एवढीच विनंति करितों कीं, आरोपीच्या परिस्थितीचा, व त्यावर लखमीचंदाच्या निर्दयपणामुळें आलेल्या संकटांचा, आपण सहानुभूतीनें विचार करा; आणि मग हा खून आरोपीनें नेहमींच्या मनःस्थितींत केला असेल काय हें ठरवा. आरोपी हा निढावलेला गुन्हेगार आहे काय ? नाहीं. प्रामाणिकपणें कामधंदा करून, पोटाला मिळवून, सर्वांशीं सुखासमाधानानें वागणारा,

कोणाशीं कधींही भांडणतंटा न करणारा असा मनुष्य तो आहे, हें त्याच्या शेजारी रहाणाऱ्या साक्षीदारांनीं कबूल केलें आहे. त्याजविरुद्ध कधीं कांहींही तक्रार आलेली नव्हती, असें पोलिसांनींही कबूल केलें आहे.

“ ज्या देण्याच्या पायीं आरोपीवर हा दुर्धर प्रसंग ओढवला, त्या कर्जाचा इतिहासही आपल्यापुढे या खटल्यांत आला आहे लखमीचंदानें आरोपीवर दावा केला, त्या दाव्यांतील त्याची कैफियत व कोर्टाचा ठराव या दोन्हीच्या नकला या खटल्यांत आम्हीं दाखल केल्या आहेत. त्यांवरून आरोपी हा प्रामाणिक मनुष्य असून सावकाराच्या लबाड्यांनींच तो पेंचांत आल्याचें दिसून येईल. कारण लखमीचंदानें आरोपीच्या खात्याचे जे हिशेब ठेवले त्यांच्या खरेपणाबद्दल दिवाणी कोर्टानेच आपला संशय व्यक्त करून लखमीचंदाला दोष दिला आहे. असा शान्तवृत्तीचा, आपलें व आपल्या कुटुंबाचें प्रामाणिकपणाने पोट भरणारा, व नेहमीं कायद्याला भिऊन वागणारा हा नागरिक, एकदम आपल्या नेहमींच्या मनःस्थितींत असतांना, खुनासारखा गुन्हा करण्यास प्रवृत्त होईल काय याचा विचार करा.

“ सद्गृहस्थ हो, मी आपणांस पुन्हां सांगतों कीं, आरोपीनें हा गुन्हा शुद्धीवर—नेहमींच्या मनःस्थितीत—असतांना केलेला नाहीं. दुःखाने व अन्यायानें गांजून गेल्यामुळें डोकें फिरून जाऊन, तात्पुरत्या वेडाच्या लहरींत त्यानें हें कृत्य केलें आहे; व उद्यां त्याची सदसद्विचारशक्ति पुन्हां ठिकाणावर आली, म्हणजे त्याला आपण गैरशुद्धींत असतेवेळीं केलेल्या या कृत्याचा पश्चात्ताप झाल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणून आरोपीला आपण खुनी ठरवूं नका. त्याची जागा फांशीचा खांब किंवा काळेंपाणी ही नसून, फारच झालें तर, अल्पकाळपर्यंत वेड्याचें इस्पितळ ही त्याची खरी जागा आहे. कारण त्याचें मन स्थिर झालें, कालांतरानें दुःखाचा विसर पडून त्याचें डोकें पुन्हां ठिकाणावर आलें, म्हणजे तो पूर्वीप्रमाणें प्रामाणिक नागरिक होईल. अशा मनुष्याला, अल्पकाळपर्यंतच्या वेडाच्या लहरींत केलेल्या कृत्याबद्दल, दोषी धरून कायद्यांतील शेवटची शिक्षा देणे खास न्यायाचें

होणार नाहीं. मला वाईट वाटतें तें हें की, आरोपीच्या या संकटांना कारणीभूत झालेला निर्दय सावकार जो लखमीचंद, त्याला मात्र आमचा आजचा कायदा स्पर्श करूं शकत नाहीं. सद्गृहस्थ हो, समाजाचे कंटक खरे जर कोणी असतील तर ते असले निर्दय, कुळांना हव्या त्या खोट्या मार्गांनीं बुडविणारे सावकार होत.यांत खरा गुन्हेगार आरोपी शिवा नसून, त्याला हें कृत्य करावयास लावणारा लखमीचंद हा खरा गुन्हेगार आहे. परंतु असले समाजकंटक सुटून जातात म्हणून त्यांच्या निर्दयपणाला व अन्यायाला बळी पडलेल्या गरीब माणसांना सुळीं देणें हा न्याय होईल काय ? हे कंटक कायद्याच्या पकडींत केव्हां सांपडतील तेव्हां सांपडोत; पण आरोपीसारख्या गरीब व प्रामाणिक, पण संकटांनीं क्षणिक बेभान होऊन, आपण काय करितों यांचें ज्ञान न राहतां, एकादा गुन्हा करणाऱ्या माणसाचा मात्र कायद्याला बळी देऊं नका हीच माझी न्यायासनाला व असेसर्सना शेवटची विनंति आहे."


आरोपीचे वकील खालीं बसले; आणि त्यांच्या भाषणाचा कोर्टांतील सर्व लोकांवर परिणाम झाल्यासारखें दिसलें. स्वतः जज्जसाहेब व असेसर्सही वकिलांचें भाषण चालूं असतांना मधून मधून संमतिदर्शक माना डोलवितांना दिसत होते. वकिलांचें भाषण संपतांच, काय मत द्यावें याबद्दल असेसर्स एकमेकांत कुजबुजूं लागले; आणि जमलेले लोकही आपापसांत "वा, छान, हा वेडाचा मुद्दा चांगला काढलान्. आरोपीचें डोकें दुःखानें ठिकाणावर नव्हतें हेंच खरें! सुटायला पाहिजे" असे उद्गार काढूं लागले. आतां जज्जसाहेब असेसर्सना सवाल करून त्यांचीं मतें विचारणार तोंच आरोपीच्या पिंजऱ्यांत शिवा एकदम उभा राहिला. त्याची मुद्रा शांत व निश्चयी दिसत होती.

"महाराज." तो जज्जसाहेबांना म्हणाला, "मला स्वतःबद्दल आणखी एक गोष्ट सांगायला परवानगी मिळेल काय ?"

"तुझ्या वकिलांनीं जें कांहीं सांगायचें तें उत्तम प्रकारें सांगितलें आहे." जज्जसाहेब म्हणाले, "तूं आतां आणखी काय सांगणार आहेस ?"

"महाराज, मला इतकंच सांगायचं आहे कीं, मी हा जो लखमीचंदाच्या मुलाचा खून केला, तो जाणूनबुजून, एकुलत्या एक मुलाच्या मरणाचं दुःख कसं असतं तें त्याला समजावं या हेतूनं केला. माझ्या वकिलांनीं दयार्द्र बुद्धीनं माझ्या बचावासाठीं आटोकाट प्रयत्न केला, त्याबद्दल मी त्यांचा फार ऋणी आहें; परंतु हा खून मी, लखमीचंदानं कपटानं माझा सत्यनाश केला, माझा मुलगा त्याच्यापायीं मेला, म्हणून जाणूनबुजून केला; व त्याबद्दलची शेवटची जी शिक्षा असेल ती मला मिळावी अशी माझी प्रार्थना आहे. हा खून केल्याबद्दल मला आता वाईट वाटतं; पण त्याला आतां इलाज नाहीं. माझ्या घरादाराचं वाटोळं झालं त्याच्याबद्दल, आणि आपल्या हातून असं कृत्य व्हावं याबद्दल पश्चात्तापाच्या, अशा दोन्हीं दुःखांनीं मी होरपळतों आहें. या जगांत जिवंत रहाण्याची माझी मुळींच इच्छा नाहीं. खून करतांनाही मला त्याबद्दल फांशीची शिक्षा होऊन मी या दुःखांतून सुटेन हा विचार माझ्या मनांत होताच. महाराज, माझं पोर गेलं, बायको गेली, घरही गेलं; 'माझं' असं या जगांत काय राहिलं आहे? म्हणून मला अपराधी ठरवून आपण मला फांशीची शिक्षा द्या, आणि मला या तापांतून सोडवा, हीच मजवर आपण दया करा. अशा रीतीनं आपण मला दुःखांतून मुक्त कराल तर मी आपणां सर्वांना दुवा देत फांशी जाईन. साहेब, दयाळू होऊन मला फांशी द्या हीच माझी आपणांला शेवटची विनंति आहे!" शेवटचे शब्द बोलतांना शिवाचा कंठ दाटून आला; त्याच्या दाढी वाढलेल्या व मळक्या गालांवर दोन अश्रुबिंदु चमकले.

शिवानें आपलें हें म्हणणें इतक्या शांतपणानें व निश्चयानें सांगितलें कीं, त्याचे निर्वाणीचे शब्द ऐकून प्रत्येकाला वाईट वाटलें. त्यानें गुन्हा क्षणिक वेडाच्या भरांत केला हे त्याच्या वकीलांनीं कळकळीनें व यशस्वी तऱ्हेनें केलेलें प्रतिपादन शिवाच्या शब्दांनीं ढांसळून गेलें. शिवाचें बोलणें संपल्यावर दोन मिनिटें कोर्टांत भीषण शांतता पसरली. पण जज्जसाहेबांनीं लागलीच जागृत होऊन असेसर्सना मत विचारलें; आणि सर्वांची


LIBRARY
HYDERABAD-7

साहेब जरा पुढें आले, आणि आपल्या पत्नीच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाले
विमल,......ईश्वराच्या घरीं हा **दयेचा न्याय** तरी खास होईल !"

**—दयेचा न्याय** [ पृ. ५३ ]

एकमतानें सांगितलें कीं, " आरोपी दोषी आहे; पण त्याची मनःस्थिति आणि परिस्थिति पाहून कोर्टानें त्याजवर दया करावी ! "

जज्जसाहेबांनीं असेसरांचें मत लिहून घेतलें व म्हटलें; " ठीक आहे; तुमच्या दयेबद्दलच्या शिफारशीचा मी जरूर विचार करीन. " त्यानंतर आरोपीकडे वळून साहेब म्हणाले, " या खटल्याचा निकाल उद्यां दुपारी तीन वाजतां सांगण्यांत येईल."

" साहेब—" पुन्हां शिवा हात जोडून म्हणाला, " पंचांनीं मजवर दया करण्याबद्दल शिफारस केली आहे. ती दया हीच करा, कीं मला फांशी देऊन या दुःखमय जिण्यांतून सोडवा ! "

---

## २

सेशन्स जज्ज मि॰ वाटवे, आय्. सी. एस्. यांनीं न्यायप्रिय पण दयाळू न्यायाधीश म्हणून फारच चांगला लौकिक कमाविला होता. आय्. सी. एस्. होऊन आल्यावर कांहीं वर्षें त्यांनीं रेव्हेन्यु खात्यांत असिस्टंट कलेक्टर म्हणून काम केलें; पण त्यांचा स्वाभाविक कल न्यायखात्याकडे असल्यामुळें त्यांनीं आपला वर्ग इकडे मुद्दाम करवून घेतला; व त्याप्रमाणें त्यांनीं जज्ज या नात्यानें तसा लौकिक मिळविलाही. न्यायप्रियता, सौजन्य, शांतपणा व त्याबरोबर दयाळूपणा या गुणांत त्यांची बरोबरी करणारा दुसरा जज्ज मिळणें खरोखरीच अवघड होतें.

शिवाच्या खटल्याचा वाटवेसाहेबांसारख्या न्यायाधिशाच्या मनावर परिणाम न होणें अशक्य होतें. विशेषतः शिवानें शेवटीं केलेल्या विनंतीनें तर त्यांच्या हृदयाला पाझरच फोडला. त्यांनीं घरीं येतांच खटल्याची हकीगत आपल्या पत्नीस सांगितली; आणि संध्याकाळीं हिंडावयास गेल्यावरही त्यांचा तोच विचार सारखा चालला होता.

" खरंच, मी या खटल्यांत झालों इतका दिङ्मूढ पूर्वीं कधींच झालों नव्हतों." फिरावयास जातांना ते आपल्या पत्नीस म्हणाले.

" यांत आरोपीचा गुन्हा पूर्णपणें शाबीत झाला आहे. आपल्याला अडचण काय ती शिक्षेबद्दलचीच वाटते ना ?" विमलाबाईनीं विचारलें.

" होय; त्यामुळंच तर मी पंचाइतींत पडलों आहे. तुला ठाऊकच आहे कीं, फांशीची सजा मी होतां होईल तों देत नाहीं. कारण त्यांतला भूतदयेचा प्रश्न जरी सोडून दिला, तरी फांशी देण्यानं खुनी इसमाला खरें शासन होत नाहीं असं मला वाटतं."

" तें आपलं मत जरा गमतीचं आहे खरं." विमलाबाईनीं हंसून उत्तर केलें. " मागं आपल्याकडं ते सोलापूरचे जज्ज पाहुणे आले होते, त्या वेळीं त्यांचा न् आपला याबद्दलच खूप वाद झाला होता. ते म्हणाले कीं, खुनी इसमाला फांशीं न देतां जन्मठेपीची शिक्षा देण्यानं आपण एका गुन्हेगाराला पोसण्याचा बोजा समाजावर विनाकारण टाकतों. आणि आपलं म्हणणं कीं, खुनी इसमाला फांशीं दिल्यानं त्याला आपण दुःखांतून मुक्त करून त्याजवर एकप्रकारें उपकारच करितों. दीर्घकारागृहवासाचे कष्ट काढीत असतांना त्याच्या मनाला आपल्या अपराधाची सारखी जाणीव राहूं देण्यांतच खरी शिक्षा आहे."

" होय, असं मला वाटतं खरं." साहेब म्हणाले.

" पण मी खरं सांगूं ? आपली ही नुसती एक सबब आहे. फांशीसारखी क्रूर शिक्षा आपल्या स्वभावाला देववत नाहीं, हेंच खरं. नाहीं ?" विमलाबाईनीं विचारलें.

विमलाबाईचा तर्क बहुतेक बरोबर होता. परंतु अपराध्यास शेवटचें कडक शासन देण्याचा प्रसंग आल्यास आपली दर्याद्र बुद्धि त्याच्या आड येते ही गोष्ट साहेबांना आपल्या मनाशीं सुद्धां कबूल करणें बरें वाटत नसे, आणि म्हणून त्यांनीं विमलाबाईचा हा प्रश्नच उडवून लावला.

" तो प्रश्न आतां नाहीं. या ठिकाणीं जर कायद्यानं न पाहतां निवळ न्यायानं पाहिलं, तर आरोपीबद्दल कोणालाही सहानुभूतीच वाटली पाहिजे. त्याच्या वकिलांनीं प्रतिपादन केल्याप्रमाणं, सावकारानं केलेल्या अनन्वित

छळामुळं, आणि त्याला आपला मुलगा बळी पडला हे पाहून आरोपीचं डोकं खरोखरीच भ्रमिष्टासारखं होईल. फार कशाला, मी जर त्या वेळीं आरोपीच्या जागीं असतों आणि माझ्या हातांत बंदूक असती, तर मी त्या सावकाराला त्यावेळीं गोळीच घातली असती. ''

'' मग त्याला फांशीची सजा न देतां कांहीं थोड्या वर्षांपुरती कैदेची किंवा काळ्यापाण्याची शिक्षा द्यायला काय हरकत आहे ? '' विमलाबाईंनीं विचारलें.

'' हां ! तिथेंच तर कायद्यानं मला बांधून टाकलं आहे. कारण सावकाराच्या मुलाला शाळेंतून येतांना गांठून, त्याला भुलावणी देऊन एका बाजूला नेऊन त्याचा अगदीं जाणूनबुजून गळा दाबून जीव घेतला, हें कृत्य खुनाच्याच कलमाखालीं येतें. आरोपींची परिस्थिति पाहून त्याला कमी शिक्षा द्यावयाची म्हणजे जन्मठेपीचीच काय ती देतां येईल. '' साहेब विचारपूर्वक आवाजांत म्हणाले.

'' तुमच्यापुढें कोणताही खुनाचा खटला आला, म्हणजे तुम्ही आरोपी फांशीची शिक्षा न देण्यासाठीं काय कारणें सांपडतील हें पहात असतां; आणि इथं तर ती कारणं आयतींच आहेत, मग विचार कसला ? ''

'' मी विचार आरोपीच्या दृष्टीनं करितों आहें; व त्यामुळंच माझं मन द्विधा झालं आहे. गुन्ह्याची एकंदर परिस्थिति पाहतां, धडधडीत खुनाचा गुन्हा असला तरी या आरोपीला जन्मठेपीची शिक्षा देणंच योग्य होईल; पण त्यानं मला अगदीं शेवटीं केलेली विनंति मनांत आली, म्हणजे जन्मठेप देणं म्हणजे दयेपेक्षां त्याला निष्ठुरपणाच दाखविण्यासारखं होईल असं मला वाटूं लागतं. त्या आरोपीबद्दल मला फार, फार, वाईट वाटतं; त्या दुर्दैवी मनुष्यावर कांहीतरी दया कर असं माझं मन मला सारखं सांगत आहे. कायद्याप्रमाणं तो निरपराधी तर ठरूंच शकत नाहीं. मग शिक्षा द्यायचीच तर कोणती शिक्षा जास्त दयेची होईल ? फांशी कां जन्मठेप ?''

'' जन्मठेप दिल्यानं त्याचं दुःख मात्र लांबेल. तुमच्या नेहमींच्या

म्हणण्याप्रमाणं खुनी माणसाला तीच शिक्षा योग्य होईल, नाहीं कां ? " विमलाबाई आपल्या नवऱ्याच्या मतावर कोटिक्रम करून म्हणाल्या.

पण साहेब आपल्याच विचारांत असल्यामुळें त्यांच्या लक्षांत ती खोंच न येतां ते सरळपणानें म्हणाले,

" मग त्यांत त्याजवर दया ती काय झाली ? तो मनुष्य जिवाला कंटाळला आहे हें खास. समज, जर मीं त्याला जन्मठेप काळ्यापाण्यावर पाठवलाच, तर तो उद्यां संधि साधून जीव तरी देईल, किंवा हताश झाल्यावर आपल्या बंदिवासाच्या अवधींत आज तो जो अट्टल गुन्हेगार नाहीं, तो अट्टल गुन्हेगार तरी बनेल. मग ही दया दाखविल्याचा त्याला फायदा तरी काय ? बरें, त्याला फांशीं द्यावें तर त्याच्यासारख्या, आतां-पर्यंतचें सर्व आयुष्य प्रामाणिकपणानें आणि सचोटीनें वागून घालविलेल्या मनुष्याला, त्यानें केवळ विकारवशतेनें केलेल्या या गुन्ह्याबद्दल—मग तो भयंकर असला तरी—एकदम फांशीं द्यावें हेंही माझ्या सदसद्विवेक-बुद्धीला पटत नाहीं "

त्या दोघांचें फिरणें संपून त्यांचा बंगला आल्यामुळें हा वादविवाद तितकाच थांबला. तरी पण जज्जसाहेबांचें मन सारखें ' उद्यां काय करावें ' या विचारांतच गोंधळून गेलें होतें; आणि त्यांची मनःस्थिति जाणून विमलाबाईनींही त्यांच्याशीं पुन्हा तो विषय काढला नाहीं.

साहेबांना त्या रात्रीं झोंपही स्वस्थ आली नाहीं. पहांटेच्या सुमारास ते एकदम इतक्या जोरानें दचकून उठले कीं, विमलाबाईही जाग्या झाल्या; व त्यांनीं काळजीच्या स्वरानें विचारलें; " काय झालं असं एकदम दचकायला ? "

साहेबांनीं उत्तर दिलें, " तसं कांहीं विशेष नाहीं. मला स्वप्न पडलं; आणि त्यांत तो कालचा आरोपी माझे पाय घट्ट धरून विनवीत होता, " साहेब, दया करा, अन् मला फांशीं देऊन या जगाच्या यातनां-तून सोडवा ! "

४

त्या दिवशीं जज्जसाहेब दुपारीं चार वाजतांच कोर्टांतून परत आले. खटल्याचा निकाल जज्जसाहेब शेवटीं काय देतात हें समजण्यासाठीं विमलाबाई उत्सुक होत्याच. म्हणून आपल्या मोटारचा आवाज बंगल्याच्या पोर्चमध्यें ऐकूं येतांच त्या एकदम पुढें आल्या; आणि नेहमींप्रमाणें हंसून त्यांनीं आपल्या पतीचे स्वागत केलें. परंतु साहेबांची चर्या फारच उतरलेली व श्रांत दिसत होती. मोटारींतून उतरल्यावर डोक्यावरील हॅट दाराजवळच्या स्टॅंड्ला अडकावून ते दिवाणखान्यांत येतांच विमलाबाईनीं विचारलें, " मग शेवटीं काय निकाल दिला आज ? "

" आरोपीला हवा होता तोच." साहेबांनीं उत्तर दिलें.

" आणि मग ?— " विमलाबाईनीं कांहीतरी म्हणून उद्गार काढला.

" मग काय ! आरोपी मुद्दाम परवानगी मागून मजजवळ आला; त्यानें माझे पाय घट्ट धरून पायांवर डोकं ठेवलंन् आणि आपल्याला हवी होती ती शिक्षा देऊन या दुःखमय व निर्दय जगांतून सोडविल्याबद्दल मला धन्यवाद दिले ! "

" अग बाई ! " एवढेंच उद्गार विमलबाईच्या तोंडून बाहेर पडलें.

त्या फांशीं जाणाऱ्या मनुष्याचा विचार मनांत येऊन त्यांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आणि त्या थोड्या वेळानें पुन्हां म्हणाल्या, " मग शेवटीं न्यायाची दया ती हीच का ? "

साहेबांनाही आपलें मन हलकें करावयाचें होतें. आरोपीविषयींच्या सहानुभूतीनें त्यांचाही कंठ दाटून आला. ते जरा पुढें आले आणि आपल्या पत्नीच्या खांद्यावर हात ठेवून गंभीर व शांत स्वरांत म्हणाले, " विमल, ही न्यायाची दया नसली तरी, मला वाटतें की, ईश्वराच्या घरीं हा दयेचा न्याय तरी खास होईल ! "

## दीप ३ रा

# बायकांची जात

माजघरांत चाललेला प्रकार पाहून बाहेर ओटीवर बसलेल्या कारकुनाच्यासुद्धां डोळ्यांना पाणी आलेलें दिसलें. आंत चालू असलेल्या संभाषणांतील एक विशेष हृदयद्रावक वाक्य कानीं पडतांच त्याची लेखणी क्षणभर थांबली; डोळ्यांत अश्रु उभे राहून कागदावरील मजकूर दिसेनासा झाल्यामुळें ,त्यानें लेखणी कानावर ठेवली, आणि जवळच्या उपरण्यानें डोळे पुसले.

आंत काशिनाथपंत आपल्या विहिणींच्यापुढें पदर पसरून गयावया करून बोलत होते- " आईसाहेब, " ते गद्गद स्वरानें म्हणाले, " नका असा माझ्या पोरीचा तळतळाट घेऊं. काय हो तिनं असा आपला सगळ्यांचा अपराध केला होता, कीं ज्यामुळं आपण सर्वांनीं तिला जन्माची नागवावी ? ज्यावेळीं आपण मागितलेला हुंडा आम्हीं कबूल केला; आणखी आमच्या शक्तीच्या बाहेर खर्च करून पोरीला आपल्या पदरांत बांधली, त्यावेळीं ती काळी आहे, कुरूप आहे, हें आपल्याला अगदींच का दिसलं नाहीं ? मुलगी पहिल्यांदा करून घेऊन मग तिचं जन्माचं असं नुकसान केलं, यापेक्षां आम्हीं मुलगी करीत नाहीं, असं प्रथमच कां नाहीं म्हटलं ?

आईसाहेब, पहा आपण पुनः विचार करा, आणखी दादासाहेबांच्या दुसऱ्या लग्नाचा हा नाद सोडाच. पहा, मी आपल्या पायांवर डोकं ठेवून विनंति करतों, माझ्या मुलीच्या सुखाचा असा नाश करूं नका !" असें म्हणून काशिनाथपंतांनीं विहिणीच्या पायांवर डोकें ठेविलें, आणि ते ढसांढसां रडूं लागले.

त्यांचे व्याही भाऊसाहेब जवळच पाटावर बसले होते. त्यांच्या मुद्रेवर क्षणमात्र एक खेदाचा विकार प्रतिबिंबित झाला; पण ते विचार करून लागलींच म्हणाले, "अहो काशिनाथपंत, असं प्रदर्शन काय मांडलं आहेत हें ? आपली मुलगी म्हणजे आमची तरी सूनच ती. तिची कळकळ आम्हांला नाहीं असं कसं होईल ? आतां दादाच्या दुसऱ्या लग्नाबद्दल म्हणतां, पण त्यामुळं म्हणजे मुलीच्या जन्माचा नाश होईल अशी भीति बाळगण्याचं आपल्याला मुळींच कारण नाहीं. अहो, अशीं दोन दोन बायकांची उदाहरणं काय आपल्याकडे आजपर्यंत झालीं नाहींत ? पूर्वी एकाहून अधिक बायका करणं हें तर श्रीमंतांना अवश्यच मानलं जात असे. नानासाहेब पेशवे, नाना फडणीस यांनीं अगदीं मरायच्या आधींसुद्धां चौथीं पांचवीं लग्नं केल्याची इतिहासांत साक्ष आहे. इतकं मागलं नकोच. अगदीं परवांपर्यंत अशी उदाहरणं घडलीं आहेत. अन् काय त्या सगळ्या ठिकाणीं पहिल्या बायकांच्या जन्माचं सगळं वाटोळंच झालं ?"

"माझं तरी तेंच म्हणणं आहे," आईसाहेब फणकाऱ्यानें म्हणाल्या. काशिनाथपंतांनीं पायांवर डोकें ठेवतांच आईसाहेब आपले पाय मागें ओढून त्या घेऊन जागेपासून केव्हांच दूर सरल्या होत्या. "मी तर म्हटलं, कीं आमच्या घराण्याच्या लौकिकासाठी दादाचं दुसरं लग्न करणं आम्हांला भागच आहे. घरांत एवढा पैसा आणखी पिढीजाद श्रीमंती असून मुलाला मनासारखी बायको नाहीं, मग करायचा काय तो पैसा ? पहिलं लग्न आपलं आम्हीं आमच्या हौसेसाठीं केलं, दुसरं आतां त्याच्या हौसेसाठीं. नाहीं आवडत त्याला ही शूर्पणखा, मग नको त्याच्या सुखाचा विचार करायला ?"

पार्वतीबाईंचे हे शब्द काशिनाथपंतांच्या हृदयाला जाऊन लागले. ते त्रस्त स्वरांत एकदम म्हणाले, " शूर्पणखा होती, तर केलीत कशाला ? मी तरी तेंच विचारतों आहे आपणांला. लग्नाच्या आधीं आपण मुलगी पाहिली तेव्हां तिचं रूप आपल्याला दिसलं नाहीं का ? त्यावेळीं मुलगी चांगली पाहून हुंड्याचं ठरवून केलीत, अन् आतां शूर्पणखा म्हणून तिचा गळा असा कां कापतां ? कां आपला निवळ पांच हजार हुंडा उकळण्यासाठी आमच्या गळयाला हा असा फांस लावलात ? "

विहिणी त्या ! त्या का असलें बोलणें ऐकून घेणार ? त्या एकदम उसळल्या; " खबरदार असं कांहीं बोलाल तर ! आम्हीं आपलं मघांपासून सहन करून घेतों आहोंत; तों तुमचं जास्तीच वाहवत चाललं ! तुमच्याकडून पांच हजार रुपड्या उकळायला, आम्हांला काय भीक लागली आहे ? तुमच्यासारखे छप्पन्न वकील विकत घ्यायला आम्हांला पिढीजाद सामर्थ्य आहे, समजलांत ! तुमची मुलगी नको म्हणून, तुम्हीं आपले आपसूकच नाहीं म्हणावं, यासाठीं आम्हीं हुंड्याची रक्कम पांच हजार म्हटली; आणखी ती तुम्हीं लागलीच कबूल करून आमच्या गळयांत पडलांत, अन् आमच्याच शब्दांत आम्हांला धरलं. तेव्हां आतां शब्द खोटा कसा करावा म्हणून तुमची मुलगी केली. आणि तुम्हीं आतां उलट आमच्यावरच उलटतां कीं, तुमच्या पांच हजार रुपड्या उकळण्यासाठीं आम्हीं मुलगी केली म्हणून ! खासा न्याय. आम्ही म्हणून ही तरी पतकरली, अन् मुलगी एवढ्या मोठ्या घराण्यांत पडली. दुसरी सवत आली तरी हिला पोटाला कांहीं कमी नाहीं; अन् अमक्याची बायको म्हणून लौकिकांत तरी राहील ! नाहींपेक्षां हें ध्यान एखाद्या भिकारड्याच्याच गळयांत पडायचं, नि जन्मभर दारिद्र्यांत लोळायचं ! आमच्या घरीं आल्यानं ते तरी नाहीं. याबद्दलच लेकीचं दैव मानायला हवं तुम्हीं. तें तर नाहींच, अन् आम्हांलाच दोष देतां ? म्हण आहे ना, ' लंगडं तें लंगडं अन् गांवदरी चरेना ' त्यांतलीच गत ही ! "

पार्वतीकाकूंचा पट्टा आणखी कांहीं वेळ तरी असाच चालला असता. कारण काशिनाथपंतांची कुरूप मुलगी करून व तिच्या-

बरोबर पांच हजार रुपये हुंड्याचे आणि दोन हजार करणी व मानपानाचे घेऊन आपण त्या मुलीचें किती हित केलें, आणि असल्या कुरूप मुलीला लौकिकवान् व श्रीमंत घराणें मिळणें कधींहि शक्य नसतां तें मिळवून दिलें, हे आपले उपकार न स्मरता व्याह्यानें उलट आपल्यास दोषच द्यावा हें पाहून त्या बाईला संताप कां येऊं नये ?

पार्वतीबाईंच्या ठसकेदार भाषणाला रोखठोक उत्तर देणारे शब्द काशिनाथपंतांच्या ओंठांवर कितीदां तरी आले; पण आधीं ती विहीण; तिच्या हातात आजच्या घटकेस तरी आपल्या मुलीचें सर्व जीवित; आणि त्यांत ती मुलाचें दुसरें लग्न करण्यास निघालेली तेव्हा रोख-ठोक उत्तर देऊन तिला आणखी चवताळविणें शक्यच नव्हतें. जवळ उभ्या असलेल्या गोदूकडे—आपल्या मुलीकडे—पाहून त्यांनीं तोंडांत आलेले शब्द तसेच मागे रेटले. विहिणीच्यापुढें सर्व युक्तिवाद व्यर्थ आहे हें जाणून त्यांनीं आपला मोर्चा व्याह्यांकडे वळविला. आणि काकुळतीनें म्हटलें,

" भाऊसाहेब, आपण तरी या गोष्टीचा विचार करा. पहिली बायको जिवंत असतां दुसरी करण्याची चाल पूर्वी असेल, पण आज तरी ती चांगल्या समाजांत त्याज्य मानली जाते. आपल्या श्रीमंतीला जर तें अवश्य असतं, तर आपण स्वतः तसं आचरण कां केलं नसतं ? दादासाहेबांचं दुसरं लग्न केलं तरी मुलीचं अहित होणार नाहीं असं आपण म्हणता; पण जन्मभर वीतभर पोटाची खांच भरली म्हणजे तिचं जिणं सुखाचं झालं असं होत नाहीं. भाऊसाहेब, मी आपल्याला या गोष्टी सांगाव्यात असं नाहीं, आपल्याला सर्व कांहीं कळतंच आहे; मुलगी कुरूप होती तर पहि-ल्यांदांच आपण कां नाकारली नाहीत ? माझ्याकडून असा हुंडा उकळून मुलीला आणि आम्हांलाहि असं कां फशीं पाडलं ? "

काशिनाथपंतांनीं आपली विनवणी भाऊसाहेबांना उद्देशून केली तरी पार्वतीबाईंना तें कुठलें सहन व्हायला ? त्या पुनः पहिल्याच आवाजांत म्हणाल्या, " हो, घेतले आम्हीं तुमचे पांच हज्जार रुपये; काय म्हणणं तुमचं ? हो, अगदीं तुमच्याकडून पांच हज्जार रुपये रोख मोजून घेऊन

हें ध्यान अगदीं उघड्या डोळ्यांनीं चांगलं पारखून घेऊन करून घेतलं. आतां तुमचा त्या मुलीशीं संबंध काय राह्यला? आतां आम्हीं तिला तारूं, नाहीं तर मारूं. आम्ही पांच हजार मागितले, तर तुम्हीं कां दिले? आपली मुलगी कुरूप आहे, आईबापांनीं करतों म्हटलं तरी जांवयाला पसंत पडेल कीं नाहीं, याचा विचार तुम्हीं कां नाहीं केला? तुम्हींच आपली पायरी ओळखून त्या वेळीं वागायला हवं होतं; पण स्वतःची उडी मोठी; आणि ती मारतांना पाय मोडला तर त्यांत दुसऱ्याला बोल काय म्हणून? पहिल्यांदा उडी मारतांनाच विचार करायला हवा होता!"

"माझी चूक झाली हें मी अगदीं प्रांजलपणानं कबूल करतों. आपल्यासारख्या श्रीमंतांच्या घरीं कुरूप मुलगी देऊं नये हें शहाणपण मला त्यावेळीं सुचलं नाहीं. पण पांच हजार हुंडा दिल्यास मुलगी करतों असं आपण म्हणालांत, मी म्हटलं इतका खर्च केला तर मुलगीहि सुस्थळीं पडते आहे, आणि केला हा अविचार. पण आपण ती उदारपणानं पदरांत घेतली, तशीच तिला वागवून घ्यावी. माझ्या हातून एक अविचार मुलीच्या खोट्या मायेनं झाला असेल; पण त्याचं प्रायश्चित्त त्या निरपराध गायीला भोगायला लावूं नका." काशिनाथपंतांनीं विनवून म्हटलें.

"पण आम्हीं तिला भोगायला लावींत नाहींच मुळीं." भाऊसाहेबांनीं शांतपणानें उत्तर दिलें, "तिला दुसरी सवत आणली म्हणजे तिचे हाल होतील हा तुमचा समजच मुळी चुकीचा आहे. आणखी—काय करावं? हाहि घाट आम्हीं घातला नसता; पण दादानं तर तिचं नांवच टाकलं. लग्न झाल्यापासून आज उभ्या वर्षांत तिचं त्यानं तोंडहि पाह्यलं नाहीं, आणखी तिला घरांत ठेवणार असाल तर मी घर सोडून जाईन अशीहि त्यानं धमकी घातली. मग काय करावं? त्याच्या सुखासाठीं त्याचं दुसरं लग्न करून देणं प्राप्तच झालं. तरी पण तसं झाल्यास मुलीचं अहित होईल अशी कल्पनाहि मनांत आणूं नका."

"भाऊसाहेब, यापेक्षां आणखी तिचं अहित दुसरं तें कसलं असायचं? मुलाची पसंती आपण आधीं पहायला हवी होतीत. केवळ पांच हजारांच्या

लोभांत आपण मुलावर ही सक्ती केली असं मी म्हणेन. बरं, आतां एकदां मुलगी जाणूनबुजून करून घेतली, तर तिला असेल तशी वागवून घ्यायला आपण मुलाचं मन वळवलं पाहिजे. त्यानं न ऐकलं तरी त्याला दुसरं लग्न करायला आपण प्रोत्साहन तरी देणं उचित नाहीं."

काशिनाथपंतांचा हा आरोप भाऊसाहेबांच्या जिव्हारीं लागलासा दिसला; कारण त्यांचा आवाज लागलींच जरा चढला व ते म्हणाले, "माझं कर्तव्य मला समजतं. तें मला तुम्ही शिकवायला नको. मुलीची जबाबदारी आम्ही तिच्या योग्यतेप्रमाणं पार पाडूं. पण तिच्यापेक्षां मुलाचं सुख आम्हांला प्रथम पाहिलं पाहिजे.–पण हा वाद आमच्याशीं कशाला? ज्याला आपण मुलगी दिली तो दादाच इथं उभा आहे. त्यालाच आपण विचारा म्हणजे झालं."

"लग्न ठरवून हुंडा घेतेवेळी मुलाच्या सुखाचा आणि त्याची संमति घेण्याचा विचार मनांत आला नाहीं; आणि आतां मात्र त्याच्या संमतीला व मतांना एकदम इतकं महत्त्व देणं रास्त वाटतं ना?" काशिनाथपंतांनीं विचारलें. "बरं, पण तसं का होईना. दादासाहेबांना विनंति करून पाहतों. दादासाहेब," आपल्या जांवयाकडे वळून काशिनाथपंत म्हणाले, "आपल्यासारख्या सुशिक्षिताला तरी हें करणं शोभतं का? आपल्याला ही बायको आवडत नव्हती तर भाऊसाहेबांना तसं आपण पहिल्यांदाच स्पष्ट सांगून, हें लग्न करायचं नाकारून, आपलं मनोधैर्य आपण कां नाहीं दाखवलं? बरं आतां पतकरली, तर तिच्या सुखाचा विचार न करितां, तिची आपल्यावरची जबाबदारी न ओळखतां, तिला टाकून देऊन तिच्या जन्माचा असा नाश करणं आपल्या शिक्षणाला योग्य दिसतं का? देवानं तिला रूप नाहीं दिलं, पण तिच्यांत असा कोणता दुर्गुण आपल्याला आढळला, कीं त्यामुळं तिच्याशीं संसार करणं आपल्याला अशक्य वाटावं? दादासाहेब, मी आपल्यापुढं पदर पसरतों, असा माझ्या गरीब मुलीचा नाश करूं नका. तिला आईबापांच्या भिडेनं पहिल्यांदा पदरांत घेतली, तशीच तिला त्यांच्यासाठींच यापुढंहि संभाळून घ्या; आणखी एका

निष्पाप, निरपराध मुलीचा तळतळाट असा नका घेऊं विनाकारण आपल्या माथ्यावर!"

दादासाहेब माजघराच्या दारांत आपल्या सासऱ्याकडे व मुळूमुळू रडणाऱ्या पत्नीकडे तिरस्कारपूर्वक पहात उभे होते. त्यांना या सगळ्याच प्रकाराचा अगदीं वीट आला होता; व काशिनाथपंतांच्या गयावया बोलण्यानें, आणि त्यांत पांच हजारांचा हुंडा उकळल्याबद्दलचा आपल्या वडिलांना त्यांनीं टोमणा मारल्याने त्यांचा आपल्या सासऱ्याबद्दलचा तिरस्कार अधिकच वाढला होता. त्यांनी आपल्या केंसाच्या भांगावरून हात फिरवीत म्हटलें, "आपलं हें म्हणणं मला मुळींच कांहीं समजत नाहीं; आणि आपली मुलगी कोण हेंही मी ओळखीत नाही! आमच्या वडिलांच्या आग्रहावरून एका १३।१४ वर्षांच्या अल्पवयी मुलीशीं लग्न म्हटला जाणारा कांहीं विधी झाला खरा, पण तो मला संमत नसल्यामुळं मजवर मुळींच बंधनकारक होत नाहीं; आणि त्याची जबाबदारीहि मजवर कांहीं नाहीं. ज्यांनीं त्या मुलीला या घरांत आणली असेल त्यांनीं या गोष्टीचा विचार करावा. माझा त्यांत मुळींच कांहीं संबंध नाहीं!"

जांवयाचें हें बोलणें ऐकून काशिनाथपंत चीतच झाले. आपल्या कानांवरहि त्यांचा विश्वास बसेना. आपले जामात पहिल्या एल्एल्. बी. चा अभ्यास करीत असले तरी त्यांचें कायद्याचें ज्ञान इतकें वाढवेल याची त्यांना कल्पना नव्हती. एका लहान तालुक्याच्या गांवीं झाले तरी तेहि वकीलच होते. आणि सासऱ्याच्या घरीं दिवाळसण खाऊन, व त्याच्याकडून मिळालेलें सोन्याचें रिस्टवॉच हातावर बांधून, लग्नाचा करार माझ्या संमतीशिवाय झाला असल्यानें मजवर बंधनकारक नाहीं असें कसें म्हणतां येईल, असा कायद्याचा प्रश्न त्यांनाहि जांवयाला उलट विचारतां आला असता; पण ते आज ज्या पक्षकाराचा कज्जा भांडत होते त्या पक्षकाराचें काम, हा प्रश्न ऐकतांच, कोर्टानें लागलीच काढूनच टाकलें असतें. प्रत्येक बाबतींत पड खाणें व गरीबीनें बोलणें, हेंच त्यांचें आज कर्तव्य होतें.

" दादासाहेब, आपल्यासारख्या सुशिक्षितांच्या तोंडून अशी भाषा येईल असं मला कदापिही वाटलं नव्हतं; परंतु गोदूचं जर सगळंच दैव उलटलं असेल तर त्याला आपण तरी काय करणार ? आपल्या वडिलांनीं आपल्यावर सक्ती केली असेल; व त्या वेळीं पुत्रधर्मास जागून आपण त्याला मानहि वांकवली. आतां त्याच पुत्रधर्मांला जागून त्यांनीं आपल्यावर जी जबाबदारी टाकली ती पार पाडा. " काशिनाथपंतांनीं आपल्या मुलीला ओढून जवळ घेतलें; आणि जांवयाच्यापुढें नेऊन म्हटलें, " दादासाहेब, ही पोर आम्ही कशा कां रीतीनं होईना, पण आपल्या पदरांत एकदां घातली खरी; पण आमच्या अपराधाकरितां तिला आपण अशी शिक्षा करूं नका. गोदू, पड, त्यांच्या पायांवर पड. " असें म्हणून त्यांनीं गोदूला खरोखरीच दादासाहेबांच्या पायांवर घातली, आणि गद्गद स्वरांत म्हटलें, " दादासाहेब, ही पहा, आपल्या पायांवर घातली आहे, आणि आपल्यावरच आमचा आतां सगळा विश्वास आहे. "

दादासाहेबांनीं एका क्षणाचाहि विचार न करितां गोदूला जोरानें दूर लाथाडून म्हटलें " अपल्या मुलीला मी मुळींच ओळखत नाहीं. माझ्याशीं मुलीचं लग्न लावतांना माझ्या संमतीचा व आवडीनिवडीचा विचार तुम्हांला सुचला नाही. तेव्हां आतां त्या बाबतींत मला दोष देण्याचा तुम्हांला मुळींच अधिकार नाहीं. आमच्या भाऊंनीं आणि तुम्हीं हा सगळा व्यवहार जसा ठरविला तसा त्यांच्याकडे जाऊनच तुम्हीं आपला विचार करा. " असें कायदेशीर उत्तर देऊन दादासाहेब तेथून बाहेर चालते झाले

आपल्याला नवऱ्यानें सर्वांसमक्ष अशा रितीनें लाथाडलेलें पाहून गोदूची स्थिति फारच केविलवाणी झाली. आतांपर्यंत दाबून ठेविलेला आवेग अनावर होऊन ती ओक्साबोक्शी रडूं लागली. मुलीची स्थिति पाहून काशिनाथपंतांचेंहि हृदय विदीर्ण झालें. त्यांनीं तिला उचलून पोटाशीं धरलें व म्हटलें, "गोदू, बाळे, मीच मूर्खपणा करून तुझा असा गळा गोंवला, तेव्हां मी तरी तुझं सांत्वन कोणत्या तोंडानं करूं ? पण कांहीं हरकत नाहीं. तुझ्या लग्नाच्या पायीं जरी मी दरिद्री झालों असतों, तरी तुला पोसण्याचं सामर्थ्य अजूनहि मला आहे. आपल्या रूपामळं तं नवऱ्याला व सासरच्या लोकांना किती

जरी अप्रिय झाली असलीस, तरी तुझा संभाळ करणं माझं कर्तव्य आहे. नवऱ्यानं एकदां लाथाडल्यावर तुझी या घरांत काय किंमत राहील हें दिसतंच आहे. सवत आल्यानंतर इथं केरपोतेच्यावारीं रहाण्यापेक्षां माझ्याबरोबर घरीं चल. माझ्याकडून शक्य होईल तें मी तुझ्यासाठीं करीन. ”

मुलीचें याप्रमाणें कसेंबसें समाधान करून काशिनाथपंत भाऊसाहेबांकडे वळून म्हणाले, “ भाऊसाहेब, मग माझ्या पोरीचं भवितव्य आतां ठरलंच ना ? आपणा कोणालाच नाहीं ना तिची दया येत ? ”

या प्रश्नाला उत्तर देण्याचें भाऊसाहेबांचें काम पार्वतीबाईनींच कांहीं हलकें केलें. काशिनाथपंतांनीं आपल्या मुलीचें सांत्वन करतांना उच्चारलेलीं कांहीं वाक्यें त्यांना झोंबलीं होतीं. म्हणून त्या एकदम पुढें होऊन म्हणाल्या, “ आतां कशाला आम्हांला हा प्रश्न विचारतां ? त्याचं उत्तर तुम्हीच आपल्या तोंडानं दिलं आहे. मुलाचा निश्चय खुद्द त्यानंच सांगितला; आतां काय राह्यलं ? तुम्ही आहांतच तिच्या मायेचे ? मग आतां कशाला आम्हांला विचारतां ? आणखी मीहि पण तुम्हांला सांगतें, जाच हिला घेऊन. नकोच घरांत ही आम्हांला—नवऱ्याच्या सुखांत बिब्बा घालायला, आणखी हेवादेवा वाढवायला. येऊन जाऊन पोटाची काळजी; पण ती तुम्हीं आपल्या अंगावर घेतलीच आहे. ”

चोहोंकडून सर्व आशा नष्ट झाल्यावर आतां आणखी नमून वागण्याचें काशिनाथपंतांना कांहींच कारण नव्हतें. मग त्यांनींहि आपलें तोंड यथास्थित सोडलें, आणि पांच हजार रुपये हुंडा, करणी वगैरे सर्व पुरेपूर उकळून शेवटीं आपल्याला असें वागविल्याबद्दल, त्यांनीं व्याह्यांची आणि बिहिणीची मनसोक्त हजेरी घेतली; व शेवटीं मुलीच्या दंडाला धरून म्हटलें, “ गोदू चल, तुझा आणि या घराचा संबंध संपला. या घरांत पाणी प्यायला सुद्धां आतां राह्यचं नाहीं. चागल्या स्थळाच्या नादीं लागून मी मात्र तुझ्या जन्माचं नुकसान केलं खरं; पण तुझ्या जन्माची सोय लावण्याची जबाबदारीहि मी तितक्या खुषीनं अंगावर घ्यायला तयार आहें. ”

" तयार आहे तर घ्या; नको कुणी म्हटलं आहे ? " पार्वतीबाई कडाडल्या. " अन् ती कारटीहि तसलीच ! तिला तरी माहेरींच रहायला हवं आहे. केलंन् नवऱ्यानं दुसरं लग्न म्हणून काय झालं ? बायकांच्या जातीला सगळं सहन करून घ्यायला पाहिजे. एवढी घोडी झाली, हिला आपलं हिताहित नको कळायला ? आपली बायकाची जात, एक नाहीं दोन सवती आल्या तरी नवऱ्याच्याच घरीं राबायला हवं. नवऱ्याशिवाय बायकांचा कधीं जन्म गेला आहे ? अग, ए–" पार्वतीबाई सुनेकडे वळून म्हणाल्या, " तुला जायचं असलं बापाबरोबर तर खुशाल जा; पण पुनः सासरीं मात्र पाऊल टाकूं देणार नाहीं ! "

बिचारी गोदू यावर काय उत्तर देणार ? आणखी तिला द्यावयाचें असतें तरी तिच्या बापानें तिला तशी संधीहि दिली नाहीं. काशिनाथपंतांनी तिचा हात धरून तिला बाहेर ओढलेंच; आणि किंकर्तव्यतामूढ होऊन तीहि त्यांच्याबरोबर मुकाट्यानें बाहेर पडली. कारण या स्थितींत आपल्या बापाच्या सांत्वनाचाच तिला विशेष आधार वाटणें साहजिक होतें.

काशिनाथपंत आणि गोदू घरांतून बाहेर पडताना ओटीवरच्या कारकुनानें व गड्यानें उठून खिन्नपणानें त्यांना वंदन केलें, व त्या दोघांच्याहि तोंडून " दैव बिचारीचं ! " असे उद्गार हळूंच बाहेर पडले. पण त्याच वेळीं आंत घरांत भाऊसाहेब एक हायसा निश्वास टाकून म्हणाले, " बरं झालं; हें केव्हां तरी व्हायचंच होतं ! "

" नी पोरगी गेली हेंहि ठीक झालं सुंठीवांचून खोकला गेला. आतां आपल्यावर तरी दोष नाहीं. " पार्वतीबाईनीं तितक्याच समाधानानें उत्तर दिलें.

[ २ ]

" **शोचनीय निधनः—**

**आम्हांस कळविण्यास अत्यंत दुःख वाटतें कीं येथील सुप्रसिद्ध वकील श्री. दादासाहेब जोशी यांच्या पत्नी सौ.**

यशोदाबाई यांस गेल्या रविवारीं सायंकाळीं प्रसूतिज्वराच्या विकारानें देवाज्ञा झाली. सौ. यशोदाबाईंचा स्वभाव अत्यंत प्रेमळ व मनमिळाऊ होता. त्यांच्यामागें त्यांचीं सहा अपत्यें असून त्यांपैकीं तीन तर अगदींच अल्पवयी आहेत! त्यांच्या अकालीं निधनानें श्री. दादासाहेब आणि अल्पवयी मुलें यांवर मोठाच प्रसंग गुदरला असून, श्री. दादासाहेबांच्याबद्दल आह्मी मनःपूर्वक सहानुभूति व्यक्त करितों. ईश्वर मृताच्या आत्म्यास शांति देवो."

नालगांवच्या स्थानिक वृत्तपत्रांतील वरील बातमी जेव्हां गोदूनें वाचली तेव्हां पंधरा वर्षांपूर्वीच्या प्रसंगाचें स्मरण होऊन तिचें चित्त एकदम व्यग्र झालें. या दीर्घ कालांत तिला आपल्या सासरची हकीकत अशी काय कळेल तेवढीच. यापलीकडे तिचा नवऱ्याशीं अगर त्याच्या घराशीं कसलाहि संबंध राहिला नव्हता. तिच्या वडिलांनीं तिला जेव्हां घरीं आणली, तेव्हां आतां तिचें काय करावें हा त्यांच्यापुढें खरोखरीच मोठा प्रश्न होता. त्यांची सांपात्तिक स्थिति म्हणजे विशेष उत्तम होती असें नव्हे. तालुक्याच्या गांवीं त्यांची वकिली बरी चालत असली तरी मुलाच्या शिक्षणापायीं, व पहिल्या दोन मुलींच्या लग्नापायीं त्यांनीं बराच खर्च केला होता. त्यानंतर गोदूच्या लग्नासाठींहि त्यांनीं आपला थोडासा जमीनजुमला गहाण टाकून खर्च केला. कारण नालगांवचे भाऊसाहेब जोशी म्हणजे एक मोठें सावकारी घराणें; त्यांनीं पांच हजार रुपये हुंडा द्याल तर तुमची मुलगी करूं असें म्हटल्यावर, "बरं आहे. एवढ्या खर्चानं आपली काळीसांवळी मुलगी मोठ्या ठिकाणीं पडते आहे, तर तिच्या हितासाठीं करावाच हा हुंडा कबूल." अशा विचारानें काशिनाथपंतांनीं तें कार्य केलें पण पुढें जेव्हां जांवयानें मुलगी कुरूप म्हणून टाकून दुसरें लग्न केलें, आणि पैशापरी पैसाहि गेला व मुलीला सुखहि नाहीं, अशी परिस्थिति झाली तेव्हां काशिनाथपंतांची स्थिति फारच विचित्र झाली. मुलीला घेऊन घरीं परत आल्यावर कांहीं दिवस ते आजारीच पडले. पण त्यांच्या एका स्नेह्याच्या सल्ल्यानें

व आपल्या मुलाच्या आग्रहानें त्यांनीं गोदूस पुण्यास सेवासदनांत ठेविलें. तिचें इंग्रजी शिक्षण करून तिला कॉलेजांत वगैरे पाठवावी अशी त्यांची तयारी नव्हती; पण मराठी शिक्षण पूर्ण करून तिला आपल्या गांवच्याच म्युनिसिपालिटीच्या मुलींच्या शाळेंत मास्तरणीची नोकरी मिळाल्यास ती आपल्याजवळ रांहील, आणि तिलाहि उद्योग मिळून तिच्या पोटाची सोय होईल इतकाच त्यांचा विचार होता. त्याप्रमाणें सेवासदनांत गोदूचें मराठी शिक्षण पूर्ण होऊन तिनें ट्रेनिंगची परीक्षाहि दिली; आणि तिच्या वडिलांच्याबद्दल गांवांत आदर असल्यामुळें, व त्यांचे स्नेहीहि म्युनिसिपालिटींत असल्यामुळें तिला लागलींच मुलींच्या शाळेंत नोकरी मिळाली. गोदू जरी अगदीं बुद्धिवान् नव्हती तरी मेहेनती व कामांत चोख असल्यामुळें, व मुलींच्याशीं ती प्रेमानें वागत असल्यामुळें, तिचें काम सर्वांसच फार पसंत पडलें; आणि थोडक्याच वर्षांत शाळेच्या हेडमिस्ट्रेसच्या जागेवर तिची नेमणूक झाली.

वृत्तपत्रांतील वरील बातमी वाचून गोदू बराच वेळ स्वस्थ बसली. तिच्या मनांत अनेक प्रकारचे विचार उद्भूत झाले. नवऱ्याच्या वर्तनांतला अन्याय त्यावेळीं जरी तिला विशेष समजला नाहीं, तरी ती जसजशी मोठी होत गेली, व तिचें शिक्षण आणि वाचन वाढलें, तसतशी तिला आपल्या स्थितीची जाणीव होऊं लागली. नवऱ्यानें तिला पहिल्यांदा लाथाडलें त्यांतहि तिला आरंभीं आपला भयंकर अपमान झाला असें वाटलें नाहीं. आपल्याला आपण केवळ काळी व रूपानें कमी म्हणून टाकून नवऱ्यानें दुसरें लग्न केलें, त्यांतहि आपल्यावर नवऱ्यानें कांहीं अन्याय केला असें तिला त्यावेळीं वाटलें नाहीं. नवऱ्याच्या वर्तनाकडे चिकित्सक दृष्टीनें पहाण्याची भावनाच तिला त्यावेळीं नव्हती. नवरा म्हणजे देव; तो आपल्याला वागवील त्याप्रमाणें वागवून घेणें, त्याच्या इच्छांना व कृत्यांना निमूटपणें मान तुकविणें, त्याच्या प्रत्येक गोष्टीकडे आदरबुद्धीनेंच पहाणें, एवढीच तिची मनोवृत्ति त्यावेळीं होती. नवऱ्यानें दुसरें लग्न केलें तरी आपण त्याजजवळ राहूं, तो करून घेईल तशी त्याची सेवा करून त्याची मर्जी सुप्रसन्न करून घेऊं, असेंच तिला त्यावेळीं वाटलें. लग्न

झाल्यानंतर आरंभीं तिला आपल्या नवऱ्याचें विलक्षण कौतुक वाटे. त्याच्या वागण्याकडे, बोलण्याकडे, चालण्याकडे, प्रत्येक गोष्टीकडे ती मोठ्या अभिमानानें व कौतुकानें पाही. त्याची हरएक प्रकारची सेवा करण्यांत तिला मोठी विलक्षण हौस वाटे. सुट्टीत नवरा कॉलेजांतून घरीं परत आला म्हणजे त्याजकडे चोरून पहात रहाण्याची संधि ती नेहमीं घेत असे. तिचें बालपणींचें मन नवऱ्यामध्यें इतकें गढून गेलें होतें कीं, तो आपल्याकडे कधींहि पहात नाहीं, आपल्याला तिरस्कारपूर्वक टाळतो हेंसुद्धां लक्षांत आलें नाहीं—तिच्या सासरीं येणारीं अनेक मंडळी तिच्या काळ्या रंगाबद्दल व सौंदर्याच्या अभावाबद्दल उद्गार काढून "दादाला अशी मुलगी कशी केलीत हो?" असा तिच्या सासूला किंवा सासऱ्याला प्रश्न विचारीत. त्यावेळी तिला नवऱ्याच्या प्रेमाबद्दल शंका वाटे; पण "मी रूपानं कमी असलें म्हणून काय झालं? माझ्या वागणुकीनं तिकडली मर्जी अशी प्रसन्न करून घेईन कीं सगळ्यानीं कौतुकच करावं." असें मनांत म्हणून ती स्वतःचें समाधान करून घेई. सासूनें नवऱ्याला दुसऱ्या लग्नाची जेव्हां भर दिली, आणि नवराहि त्याला तयार झाला; व पुढें बाप विनवणी करण्यास आला, तेव्हां त्याचा अव्हेर करून तिलाहि जेव्हां लाथाडलें; तेव्हां तिला दु:ख झालें तें हे कीं, आपल्याला आपले गुण व स्वभाव दाखवायला नवऱ्यानें संधि दिली नाहीं. तिनें आपल्या पुढील आयुष्याबद्दल मनांत किती तरी बेत केले होते. नवऱ्यानें संधि दिली असती तर त्यांची थोडी तरी रूपरेखा, स्वतःची सेवातत्परता व त्याजबद्दल मनांत असलेलें अपरंपार प्रेम नवऱ्याला दाखवून त्याचें मन आपण थोडें तरी अनुकूल करून घेऊं अशी तिला आशा होती; पण नवऱ्यानें आपल्याला तशी संधि दिली नाहीं याबद्दलच तिला दुःख झालें. आणि नवऱ्याचें करणें बरोबर होतें; आपण त्याच्या इच्छेप्रमाणें रूपवान नाहीं हा आपलाच दोष, तें आपलेंच दुर्दैव, अशीच तिच्या मनाची त्यावेळीं खरोखरी श्रद्धा होती.

ही तिची श्रद्धा सासरहून आल्यानंतरहि कांहीं दिवस कायम होती. नवऱ्यानें दुसरें लग्न केल्याचें तिला समजलें, तरी त्यानंतर जरी त्यानें

तिला पुनः घरीं बोलाविलें असतें, तरी ती मोठ्या आनंदानें गेली असती, आणि आपल्या सवतीसह त्याची सेवा करण्यांत तिनें धन्यता व आयुष्याचें साफल्य मानलें असते. परंतु दोन वर्षे झालीं, तीन वर्षें झालीं, नवऱ्याकडून किंवा सासरकडून तिची लवमात्रहि चौकशी झाली नाहीं; जणूं काय तिचें जगांत अस्तित्वच नाहीं अशी त्यांची वृत्ति असल्याचें तिला आढळून आलें, तेव्हां तिचें मन हळूं हळूं पालटावयास लागून नवऱ्याविषयींचा आदर व प्रेम कमी होऊं लागलें. त्यात बापानें आपल्यासाठी केवढा खर्च केला व स्वतःची कशी विपन्नावस्था करून घेतली हें माहेरीं राहिल्यामुळें तिच्या जों जो दृष्टीस पडूं लागलें, तों तों तिच्या मनांतील बदल अधिक झपाट्यानें होण्यास त्याचें अधिकच साह्य झालें. " भाऊसाहेबांनीं हुंड्याचे पांच हजार रुपये खाऊन आमची मुलगी जन्माची नागवून आम्हांला बुडवलं. " हे आईबापांचे उद्गार वारंवार तिच्या कानीं पडत; आणि त्यांची सत्यताहि तिला पटे. पुढें शिक्षणासाठीं पुण्यास गेल्यावर ती विचारांच्या एका नवीन जगांत येऊन पडली. स्त्रियांची प्रगति, स्त्रियांचे हक्क, स्त्रियांची अवनति, इत्यादि नवीन कल्पना तिला ऐकूं येऊं लागल्या. कित्येक प्रेमळ जोडपीं तिच्या दृष्टीस पडत, आणि स्वतःविषयींचे विचार तिच्या मनांत पुनः जोरानें सुरू होत. आपल्या नवऱ्यानें आपल्याला संधि दिली असती तर आपणहि त्याला असेंच सुख दिलें असतें, आपलाहि संसार आपण असाच सुखाचा केला असता असें तिला वारंवार वाटे. तिच्या वर्गात कांहीं विधवा स्त्रियाहि होत्या. पुढें विचार करतां करतां, आणि नवीन विचारांचें ग्रहण करतां करतां त्या विधवा स्त्रियांची स्थिति आपल्यापेक्षां शतपट बरी असें वाटण्यापर्यंत तिच्या मनाची तयारी गेली. त्यांचें नवऱ्याचें सुखच देवाने हिसकावून नेलें; मनांत आणलें आणि संधी मिळाली तर पुन्हां दुसरा संसार थाटण्याचा संभव तरी त्यांना आहे; पण आपल्याला? नवरा असून नाहीं, आणि सवाष्ण म्हणून जगांत मिरवून आयुष्य मात्र वैधव्याचें! "आपण असं नवऱ्याचं कोणतं घोडं मारलं होतं म्हणून त्यानं आपल्यावर असा अन्याय करावा? आपण नापसंत होतों, तर तसं प्रथमच सांगून लग्न करण्याचं त्यानं कां नाकारलं नाहीं? केवळ हुंड्याच्या लोभानंच त्यानं

आपल्याशीं लग्न केलं नाहीं का ? " असें ती आपल्या मनाला वारंवार विचारी; आणि मग तिला नवऱ्यानें आपल्याला लाथाडलें, व बापानें घरीं आणलें त्या प्रसंगाची आठवण होई.

" आमच्या वाडिलांच्या आग्रहावरून १३।१४ वर्षांच्या मुलीशीं लग्न म्हटला जाणारा माझा कांही विधी झाला खरा " हे तिच्या नवऱ्यानें उच्चारलेले शब्द तिला पुनः पुनः आठवत. तिचा नवरा त्यावेळीं लहान नव्हता. चागला बी. ए. होऊन एल्‌एल्. बीच्या टर्मूस भरीत होता. हा " लग्न म्हणून म्हटला जाणारा विधी " जर त्याला संमत नव्हता, तर मग पुढें त्यानें आपल्या बापाच्या घरीं येऊन दिवाळसण तरी कां घेतला ? दिवाळसण घेऊन, सासऱ्याकडून इतर देणग्या उपटून जो गृहस्थ पुढें " हें लग्न मला संमत नाहीं; मी तुमच्या मुलीला ओळखीत नाहीं " असें बिनदिक्कत म्हणतो, त्याला मनुष्य तरी कसें म्हणावें ? त्याच्याबद्दल आदर, प्रेम, तरी कां बाळगावें ? स्त्रीला स्वाभिमान, मनुष्यपणा कांहींच नाहीं का ? एखाद्या पुरुषाशीं लग्न झालें म्हणून, मग तो कसाहि असला तरी, त्याच्यामध्यें प्रामाणिकपणा, माणुसकी इत्यादि गुणांचा कितीहि अभाव असला तरी, त्यानें आपल्या बायकोला कितीहि निर्घृणपणें वागविलें तरी, तो केवळ नवरा म्हणून त्याच्याबद्दल स्त्रीनें पूज्यबुद्धि आजन्म बाळगलीच पाहिजे का ? असें तिला वाटूं लागलें. आणि होतां होतां नवऱ्याबद्दलचा आदर तिच्या मनांतून पार निघून जाऊन, त्याच्या आणि त्याच्या आईबापांच्याबद्दल अत्यंत तिरस्कार तिच्या मनांत उत्पन्न झाला. संसारसुखाची आशा अजीबात नष्ट झाल्यामुळें तिनें आपल्या आयुष्याचें ध्येय निश्चित केलें; आणि स्त्रियांच्या असहाय स्थितीची स्वतःच्या अनुभवावरून साक्ष पटून, स्त्रियांच्या शिक्षणाप्रीत्यर्थ आणि सेवेप्रीत्यर्थच आयुष्य खर्च करण्याचें तिनें ठरविलें. तिच्या नवऱ्याच्या समाजांतील दर्जाबद्दल कांहीं कांहीं हकीकती तिच्या कानीं येत, व त्या वेळीं अशा अन्यायी पुरुषाला त्याच्या वर्तनाबद्दल जाब न विचारतां समाज मान तरी कसा देतो याबद्दल तिला आश्चर्य वाटे. त्यामुळें " समाज असा

पुरुषांचाच पक्षपाती; बायका त्याच्या खिसगणतींतच नाहींत" असें ती म्हणे; आणि स्त्रियांची असहायता तिच्या अधिकच प्रत्ययाला येई.

आपल्या सवतीच्या निधनाची बातमी वृत्तपत्रांत वाचून गोदूबाईच्या मनांत मागल्या या सगळ्या आठवणी जागृत झाल्या; व आपल्या विचारांची क्रांति कशी कशी होत गेली, त्याचाहि सगळा इतिहास तिच्यापुढें उभा राहिला. आपल्या नवऱ्यानें आपल्या बाबतींत जो अन्याय केला; आणि आपल्याशीं जें अत्यंत निष्ठुरपणाचें वर्तन केलें त्याचें स्मरण होऊन तिचें मन पुनः उद्विग्न झालें. आपला व नवऱ्याचा आतां काय संबंध आहे, असें म्हणून तिनें सगळे विचार मनांतून दूर करण्याचा प्रयत्न केला, पण हट्टी मन थोडेंच राहतें? आपली सवत कशी असेल, तिचा आणि नवऱ्याचा संसार कसा झाला असेल, तिचीं मुलें कशीं असतील, आतां त्या मुलांचें कसें होईल, नवरा आतां पुन्हा तिसरें लग्न करील काय, इत्यादि कल्पना तिच्या मनांत राहून राहून येत. ती बातमी वाचल्यापासून पांचसहा दिवस तिच्या मनांत सारख्या याच गोष्टी घोळत. नवऱ्याची श्रीमंती व त्याच्या संसाराचा व्याप पाहिला, आणखी शिवाय त्याची सुखलोलुप वृत्ति लक्षांत घेतली, म्हणजे तो लग्न केल्याशिवाय राहणार नाहीं असें ती म्हणे; पण शेवटीं "मला आतां या गोष्टींशीं काय कर्तव्य आहे? कांहीं कां करीनात? माझं त्यांचं आतां काय नातं उरलं आहे? आज पंधरा वर्षांत ज्यांनीं मी जिवंत आहे का मेलें याची चौकशी केली नाहीं त्यांचा विचार मीं कां करावा?" असें म्हणून तिनें कसलाहि विचार न करण्याचा निश्चय केला; आणि तो अमलांत आणण्यासाठीं आपल्या शाळेच्या कामांत अधिक उत्साहानें लक्ष घातलें.

याप्रमाणें आणखीहि थोडे दिवस गेले. शनिवारची सकाळची शाळा असल्यामुळें दुपारीं गोदूबाई घरींच होती. सुट्टी असल्यामुळें जेवणें उशीरां झालीं होतीं; आणि आईला घरकामांत थोडी मदत करून व सर्व आंवरून ती नुकतीच वर येऊन पडली होती. जांवयानें मुलीला टाकल्यापासून काशिनाथपंतांना जें दुखणें जडलें तें जडलेंच. गोदूचें शिक्षण पुरें होऊन

तिला त्याच गांवीं मुलींच्या शाळेंत नोकरी मिळेपर्यंत ते जगले; पण त्यानंतर थोड्याच दिवसांत, आपलें कार्य झालें असें समजून, त्यांनीं इहलोकची यात्रा संपविली. तेव्हांपासून आज सहा सात वर्षें घराचा सगळा भार गोदूबाईनेंच संभाळला होता. तिचा थोरला भाऊ नोकरीनिमित्त दुसरीकडे असे; पण घरांत आईला व स्वतःला कांहीं तरी करमणूक व उद्योग हवा म्हणून भावाची दोन मुलें तिनें आपल्याजवळ ठेविलीं होतीं. तीं दोन मुलें, आई, आणि ती स्वतः, इतकींच माणसे त्या घरांत असत. गोदू याप्रमाणें वर येऊन पडल्याला थोडा वेळ झाला नाहीं तोंच तिचा ७।८ वर्षांचा भाचा बाळू वर धांवत आला, आणि तिला उठवून म्हणाला, " गोदूआत्या, तुला खालीं कुणी भेटायला आलं आहे. वर आणूं का ? "

" कोण आहे रे ? " गोदूनें विचारलें.

" कोण जाणे, आपल्या ओळखीचे दिसत नाहींत. " बाळूनें उत्तर दिलें. तेव्हां गोदू चट्‌दिशीं उठली व डोळ्यांस पाणी लावून खाली गेली. शाळेंतील मुलींचे पालक कारणपरत्वें तिच्याकडे येत; यामुळें कोणी भेटावयास आल्याबद्दल तिला विशेष वाटण्याचें कांहींच कारण नव्हतें. असेच कोणी तरी पालक आले असतील असें वाटून ती खालीं गेली. तेथें एक टोपी घातलेले—पण सुमारें ३५ व ४० च्या दरम्यानच्या वयाचे—गृहस्थ सडकेकडे तोंड करून उभे होते. मागें पावलें वाजलेलीं ऐकून त्यांनीं आपलें तोंड वळविलें; आणि त्याच सुमारास गोदू तेथें येऊन पोंचली. त्या गृहस्थाचा चेहरा तिनें पाहिला मात्र; आश्चर्य, तिरस्कार अशा अनेकविध विकारांनीं एकदम मूढ होऊन ती जागच्या जागींच खिळल्यासारखी उभी राहिली. कारण तो गृहस्थ म्हणजे ज्याच्याबद्दल आज पांच सहा दिवस ती सारखा विचार करीत होती, तो तिचा नवरा—दादासाहेबच—होता !

[ ३ ]

दादासाहेबांना पाहिल्यावर गोदू अल्पकाळ तशीच निश्चल उभी राहिली. पण दादासाहेब जेव्हां पुढें होऊन हास्यमुख करून " कां, कसं काय, बरं आहे ना ? " असें म्हणाले, तेव्हां ती त्या शब्दांनीं शुद्धीवर

आली, व कशीबशी म्हणाली, " चला, वरच जाऊं. " त्यांना तिनें बाहेरच्या जिन्यानें माडीवर नेलें; आणि त्यांना बैठकीवर बसवून ती तेथें भिंतीशींच उभी राहिली.

कांहीं वेळ कोणींच कांहीं बोललें नाहीं. आपल्या नवऱ्याला आज इतक्या वर्षांनीं इकडली आठवण कशी झाली याचें आश्चर्य करीत, आणि तो कां आला असावा याबद्दल स्वतःचा तर्क चालवीत गोदू स्वस्थ उभी होती; तर दादासाहेब आपल्या येण्याच्या हेतूचा व विषयाचा प्रस्ताव कसा करावा याचा विचार करीत होते. कोणीच कांहीं बोलेना. तेव्हां ज्या अर्थी आपण होऊन आलों आहोंत त्याअर्थी आपणच विषयास प्रारंभ करणे उचित, असें वाटून दादासाहेबांनींच बोलावयास सुरुवात केली—

" मी इतक्या वर्षांनीं असा अकस्मात आलों हें पाहून तुला फार आश्चर्य वाटलं असेल नाहीं ? वास्तविक प्रथम पत्र लिहावं असा विचार मनांत आला होता; पण मग म्हटलं एकदमच जाऊन तुला आश्चर्यचकित करून टाकूं. मी या इतक्या वर्षांत तुम्हां कोणाला कांहीं लिहिलं नाहीं, तुझी चौकशीसुद्धां केली नाहीं, म्हणून तुम्ही सर्वजण मला अगदीं क्रूर म्हणत असाल; पण माझी ती चूक झाली खरी. मी आतां जो आलों आहे, तो आजपर्यंतच्या सगळ्या चुकांचं अन् अन्यायांचं प्रायश्चित घेऊन, पुनः सगळ्या गोष्टी सुरळीत कराव्या अशा हेतूनं आलों आहे. मी दुसरं लग्न करून संसार केला हें खरं, पण त्याची हकीकत झाली ती तुला कळली असेलच. ती वारल्यानंतर मनाला उद्विग्नता आली, त्यांत माझ्या हातून तुझा जो अपराध घडला त्याचं स्मरण होऊन ती गोष्ट मनाला फारच खाऊं लागली; आणि मग विचार करतां करतां असं वाटूं लागलं की, या अन्यायाचं परिमार्जन केलंच पाहिजे; आणि तें हेंच कीं, इथं येऊन, त्या सगळ्या झाल्या गेल्या विसरून जा अशी तुला विनंति करून, तुला घरीं घेऊन जायचं. मग काय आतां सोडाल ना आमच्यावरचा राग ? झालं खरं—हातून होऊं नये तें झालं; तुझे मी फार हाल केले; पण तें आतां सगळं विसरून जा; आणि गुण्यागोविंदानं आपल्या घरीं येऊन रहा."

दादासाहेब इतकें बोलून थांबले व आपली बायको यावर काय उत्तर देते याची वाट पाहूं लागले. पण त्यांच्या शब्दांचा गोदूबाईच्या मुद्रेवर कांहींच परिणाम झालेला दिसेना. ती शून्य दृष्टीनें कोठेंतरी पहात होती.

आणखी थोडा वेळ थांबून दादासाहेब पुनः म्हणाले, "मी काय म्हटलं तें ऐकलं ना? करणार ना आमच्या म्हणण्याप्रमाणं?"

गोदूच्या चेहऱ्याचा निर्विकारपणा जाऊन तो लाल होऊं लागला. अंतःकरणांतील खळबळ व उद्वेग तिच्या मुद्रेवर आतां उमटूं लागला. ती आपल्याकडून आपलें मन ताब्यात ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होती हे स्पष्ट दिसलें. तरीपण तिच्या मनांत चाललेली खळबळच इतकी प्रचंड होती की ती कह्यात ठेवणें तिला अशक्य होतें. तिचे डोळे लाल झाले आणि मनांतल्या विचारांचा आवेग असह्य होऊन ती एकदम खाली बसली; आणि गुडघ्यांत मान घालून स्फुंदूनस्फुन्दून रडूं लागली.

दादासाहेबांना तें रडणें आनंदाचें वाटलें. कारण नवऱ्यानें टाकल्यानतर पुन्हां येऊन घरीं चल म्हणावें, याचा कोणत्याही स्त्रीस आनंदच वाटेल अशी त्यांची साहजिक समजूत होती! व ती अगदींच चुकीचीहि नव्हती. म्हणून आपलें कार्य इतक्या सहज झाल्याबद्दल समाधान वाटून ते तिच्या-जवळ गेले आणि म्हणाले, "असं काय बरं रडण्याचं कारण? मी म्हटलं ना, आतां पूर्वीचं कांहीं एक मनांत आणायचं नाहीं म्हणून? आतां माझ्या-बरोबर चलायचं, आणखी जसं कांहीं पूर्वी कांहीं झालंच नाहीं असं वागायचं!" दादासाहेबांना प्रेमाचा इतका उमाळा आला कीं त्यांनीं हें वाक्य बोलून पत्नीच्या पाठीवर आपला हातहि ठेविला.

पण त्या हातांचा स्पर्श होतांच तिच्या मनांतील सर्व खळबळ थांबली. या अनपेक्षित प्रकारामुळें तिचें मन चकित झालें होतें ते स्थिर झालें. तिनें नवऱ्याचा हात जोरानें झिडकारून टाकला, आणि म्हटले, "खबरदार माझ्या अंगाला हात लावाल तर! नवरा या नात्यानें माझ्याशीं वागण्याचा तुम्हांला मुळींच हक्क नाहीं." तिचे ओंठ थरथर कांपत होते; आणि या शब्दांबरोबर तिच्या अंतःकरणांतली सगळी खळबळच बाहेर पडली.

तिचें हें वर्तन पाहून दादासाहेब अगदीं थिजून गेले. आपण घरीं चल म्हणण्याचा अवकाश, की आपली बायको आनंदानें बेहोष होईल, अश्रूंनीं आपले पाय न्हाऊन काढील, तिला अगदीं कृतकृत्य वाटेल, आपल्या उपकारांचें तिला कितीतरी ओझें होईल, पण तसें तिनें म्हणून दाखविल्या-वर विनयानें आपण तो उपकार नाकबूल करून उलट आपल्या हातून झालेल्या अन्यायाचाच उच्चार करूं, अशा किती तरी अपेक्षा त्यांनीं केल्या होत्या; पण प्रत्यक्ष प्रकार तर अगदीं कल्पनातीत घडला! त्यांनीं आपला हात मागें घेऊन विचारलें,

"म्हणजे, माझा नवरेपणाचा हक्क कधींपासून नाहींसा झाला?"

"ज्या दिवशीं तुम्हीं मला लाथाडून घराबाहेर काढून लावली त्या दिवसापासून! आणखी आपलं लग्न झालं हें तरी तुम्हांला कुठं कबूल आहे? लग्न नव्हेच, पण लग्न म्हटला जाणारा काहीं तरी विधि तुमच्या इच्छेविरुद्ध झाला; आणि तो तुम्हांला कधींच संमत नव्हता! तो संमत नव्हता हें तुम्हीं प्रत्यक्ष कृतीनं दाखवलंत; कारण स्वतःला संमत अस-लेल्या विधीन तुम्ही दुसरं लग्न केलंत, आणखी या पंधरा वर्षांत आपली पहिली बायको—नव्हे लग्न म्हटला जाणारा विधि जिच्याशी झाला ती स्त्री—जिवंत आहे कीं मेली आहे, याची तुम्हांला कधी आठवणहि झाली नाहीं. असं असून मलाच पुनः विचारतां?"

"पण माझी ती चूक झाली, ती विसरून जा म्हणून मी म्हटलं ना?" दादासाहेब मोवाळकीच्या स्वरानें म्हणाले. "आपल्या नवऱ्याचे अपराध पोटांत घालून त्याच्यावर प्रेम करावं, आणि त्याच्या आज्ञेंत रहावं हा आर्यस्त्रियांचा धर्म आहे."

"आधीं पुरुषांनीं आपला धर्म पाळून आर्य व्हावं, आणि मग आर्य स्त्रियांना त्यांचा धर्म शिकवायला जावं." गोदू त्वेषानें म्हणाली.

"छे बुवा, तूं तर अगदीं बोलूंच देत नाहींस! या शिकण्यामुळं बायका अगदींच बेताल झाल्या अं!" तिचें भाषण थट्टेवारी नेण्याचा प्रयत्न करण्याच्या इच्छेनें दादासाहेब हंसून म्हणाले.

" स्वत:च्या उदाहरणावरून बायकांच्या बाबतींतहि तेंच अनुमान तुम्हीं काढावं हें साहजिक आहे. " गोदूनें उत्तर दिलें.

" पण आतां त्या चुकीची मी अंतःकरणपूर्वक क्षमा मागतों म्हणून म्हटलं ना ! तो माझ्या हातून तुझा फार मोठा अन्याय झाला; व त्याबद्दल तूं कितीहि बोललीस तरी तें रास्त आहे. मी त्याचा मुळींच राग मानीत नाहीं. तें सगळं विसरून तूं एकदां आपल्या घरीं आलीस म्हणजे त्यांत मला आनंद आहे. " दादासाहेब म्हणाले.

" माझ्या घरीं ? तुमचं घर तें एके काळीं माझं असेल; पण आज नाहीं; व तें माझं व्हावं अशी माझी इच्छाहि नाहीं. माझा न् त्या घराचा संबंध पंधरा वर्षांपूर्वीच संपला. "

" परंतु मी इतक्या काकुळतीनं इतकं म्हणतों आहे त्याची कांहींच कां किंमत नाहीं ? " दादासाहेबानीं विचारलें.

" पति या नात्यानं आपल्यावर असलेली जबाबदारी पार पाडण्याच्या बुद्धीनं तुमचं म्हणणं असतं, तर त्याला किंमत होती. "

" मग तसं तें नाहीं असं तुला वाटतं ? "

" यांत कांहीं संशय आहे काय ? पंधरा वर्षांत ज्या जबाबदारीची आठवण तुम्हांला झाली नाहीं, ती यशोदाबाई मरतांच पंधरा दिवसांच्या आंत कशी झाली ? माझ्या येण्याबद्दलची उत्सुकता तुम्हांला आतां कां झाली हें मला कळत नाहीं, असा का तुमचा समज आहे ? त्या बायकोच्या मागं, एवढा प्रपंच, लहान लहान मुलं सांभाळायला कुणीतरी हवं; आतां तिसरं लग्न करून लहान व नवखी मुलगी घरांत आणण्यापेक्षां, मी पहिल्यांदा घरांत असलेली, वयानं मोठी, अशी आलेली अधिक श्रेयस्कर ! तुमच्या परिस्थितीमुळं, आणि वयामुळंहि माझ्या रूपांतील दोषाबद्दल आतां तुमचं मन तितकं चिकित्सक राहणार नाहीं. कारण या वयांत पुनः लग्न करणाऱ्या दुसऱ्या पुरुषांचीसुद्धां दृष्टी स्त्रीच्या रूपापेक्षां तिच्या वयाकडे आणि उपयुक्ततेकडेच अधिक असते. "

दादासाहेबांचा अंतस्थ हेतु गोदूनें अचूक बोलून दाखविल्यामुळें तिला कांहीं उत्तर देण्यास त्यांना सुचेना. तथापि त्यांना आतां तिची खरोखरीच जरूर असल्यामुळें त्यांनीं पड खाण्याचेंच ठरविलें. तिचा प्रत्येक शब्द त्यांच्या मानी मनाला भाल्यासारखा टोंचत होता. तरी पण तूर्त आपला उद्दिष्ट हेतु साध्य करून घेण्याचेंच त्यांनीं धोरण ठेविलें होतें. म्हणून ते म्हणाले,

' तूं म्हणतेस हें जरी खरं धरून चाललं, तरी धार्मिक दृष्टीनं आणि जनदृष्टीनं आपलं जें लग्न लागलं आहे तें तर नाहींसें होत नाहीं ना? माझी अडचण आहे खरी. त्यासाठी कां होईना, पण तूं घरीं ये. आपण दोघांनीं नवराबायकोचं नातं विसरण्याचा किती जरी प्रयत्न केला, तरी माझं उद्यां कांहीं बरं वाईट झालं तर त्याचा तुझ्याशी कांहीच संबंध येणार नाहीं कां? पहा," दादासाहेब काकुळतीच्या स्वरानें म्हणाले, "मी तुला अगदी खरी, मनापासून विनंति करितों. माझे पूर्वीचे अपराध विसरून जा. निदान माझ्या त्या लहान मुलांबाळां-कडे पाहून तरी घरी ये. लोकांच्या मुलांवर शाळेंत तूं इतकं प्रेम करतेस, त्या तुला माझ्या या मुलांची अगदींच का कींव येणार नाहीं?"

"मुलांचीच काळजी असली तर त्यांचं संगोपन करायला मी केव्हांही तयार आहे. पण तें तुमच्या घरीं नाहीं. मुलं माझ्याकडे पाठवून द्या. त्यांच्याबद्दल तुम्हांला कांहींहि काळजी नको अशा रीतीनं मी त्यांचं सगळं करीन. या एका काळजींतून तरी तुम्हीं माझ्यामुळं मुक्त व्हाल. पण त्यांतसुद्धां हें मात्र लक्षांत ठेवा, तीं मुलं मी तुमचीं म्हणून सांभाळींत नाहीं; माझ्या बहिणीचीं समजून सांभाळीन."

"तुझं मत तर अगदीं निश्चितच झालेलं दिसतं." दादासाहेब खेदाचा एक सुस्कारा टाकून म्हणाले. "माझ्यावर तुझा विश्वासच बसत नाहीं. पण जर तूं आलीस तर माझ्याकडून तुला आजपर्यंत झालेल्या दुःखाचं मी खास परिमार्जन करीन!"

"परिमार्जन?" गोदू तीव्र स्वरांत म्हणाली, "तें या जन्मीं तरी शक्य दिसत नाहीं. आपल्या आवडीनं तुम्हीं दुसरी बायको केलीत,

तिच्याबरोबर १५ वर्षं संसार केलात, आणि ती मरून पुरते तीन वार झाले नाहींत तोंच तुम्हीं पहिल्यांदा टाकलेल्या बायकोकडे येऊन तिच्याशीं संसार थाटायच्या गप्पा मारूं लागलांत, तुमच्या शब्दांवर विश्वास बसावा कसा? स्वतःला सुख होईल तें करायचं, हा स्वार्थीपणा तुमच्या सगळ्या कृत्यांच्या बुडाशीं ओतप्रोत भरला आहे."

येथें गोदू जरा क्षणभर थांबली; मागल्या कांहीं आठवणींनीं तिचें हृदय भरून आल्यासारखें दिसलें. कारण ती गद्गदस्वर होऊन म्हणाली, "मला तुमच्याबद्दल आरंभी काय वाटत होतं याची तुम्हाला कल्पना नाही. तुमच्या सुखासाठीं मी काय हवं तें केलं असतं. मला लाथाडून घरांतून काढून लावण्यापूर्वी मला निदान काहीं संधी तरी द्यायला हवी होती. पण स्वतःच्या इच्छेपुढं आणि सुखापुढं तुम्हांला दुसऱ्याच्या मनाची पर्वा असेल तर ना? माझं मन आतां तुमच्याबद्दल अगदी निष्प्रेम व सहानुभूतीशून्य झालं आहे. मला तुमच्याबद्दल तिळमात्रसुद्धां आदर वाटत नाहीं. आपल्या कृत्यानं माझ्या बाबांची जी तुम्हीं स्थिती केलीत ती जोंपर्यंत माझ्या डोळ्यांपुढं आहे, तोंपर्यंत मला तुमच्याबद्दल आदर तर नाहींच, पण उलट तिरस्कारच वाटेल. अशा पुरुषाबरोबर संसार करायला मी तयार होईन अशी कल्पनासुद्धां तुम्हीं मनांत आणूं नका!"

हे शेवटचे शब्द गोदू फार आवेशाने बोलली. इतक्या कीं, तिचा श्वास कोंडून तिला दम लागला. तिच्या या भाषणानें ती फिरून घरीं येण्याची तिच्या नवऱ्याची आशा नाहींशींच झाली. तरी पण पुनः शेवटचा प्रयत्न करावा म्हणून ते म्हणाले, "बरं माझ्यासांठीं नाहीं तरी स्वतःसाठीं तर येशील? इथं म्युनिसिपल शाळेची मास्तरीण म्हणून तुझी जी स्थिति आहे, त्यापेक्षां घरीं किती तरी चांगली राहील. पुष्कळ पैसा, नोकर,—"

परंतु दादासाहेबांचें हें वाक्य अपुरेंतच राहिलें. कारण त्यांच्या या भाषणानें गोदूचें मन अधिकच संतप्त झालें. ती एकदम उसळून म्हणाली, "काय, पैसा न् नोकर? पैशाच्या लोभानं दुसऱ्यांचे गळे कापणाऱ्या

तुमच्यासारख्या लोकांनीं आपल्यावरून दुसऱ्याची पारख न करावी तर काय करावं ? तुमचा तो पैसा तुम्हांलाच लखलाभ असो ! माझ्या स्वतःच्या कष्टानं मिळणाऱ्या चाळीस रुपयांपुढं मला तुमची ती अन्यायानं मिळविलेली सगळी दौलत अगदीं—अगदीं त्याज्य वाटते."

गोदूचे डोळे संतापाच्या अश्रूंनी पुनः भरून आले. ती जाग्यावरून उठून नवऱ्यापुढें येऊन हात जोडून म्हणाली, "माझ्यावर आपण एवढी कृपा करा, कीं माझा आतां आणखी अंत पाहूं नका. तुमचं प्रेम आणि दया आतां मला नको. तुम्हीं आतां इथून जाच. तुमच्या मुलांची काळजी मात्र मी घेईन. तीं माझ्याकडे पाठवून द्या."

आतां मात्र दादासाहेबांत त्यांच्या मर्दानी वृत्तीचा संचार झाला. बायकोचें मन वळेल म्हणून त्यांनी एवढा वेळ आपलें मन आंवरलें होतें; पण ती यापुढें आपल्याजवळ रहावयास कबूल होणें शक्य नाहीं अशी त्यांची खात्री होतांच, तिनें आतांपर्यंत केलेल्या आपल्या मानहानीनें त्याचें मन संतप्त झालें. ते लागलींच उठले व म्हणाले, "जा, तर जातोंच. तूं नाहीं आलीस तर दुसरी येईल. पहा तर खरं; मागलं सारं विसरून घरीं चल म्हणून गौरवानं विचारायला आलों तर चढलाच तोरा ! बायकांची जात; तिला तिच्या पायरीनंच वागवलं पाहिजे. तुलाच भिकेची हौस असली तर त्याला कोण काय करणार ? आणखी शिवाय, मास्तरणीचं स्वतंत्र आयुष्य भोगून चटावलेल्या स्त्रीला एका पुरुषाच्या हुकमतींत राहून बांधलेलं आयुष्य तरी कसं आवडणार ?"

या शेवटच्या वाक्यानें आपण केवढा वर्मी लागणारा टोला मारून बायकोनें केलेल्या अपमानाचें उट्टें फेडलें, अशा विजयी मुद्रेनें दादासाहेब बैठकीवरून उठले; पण हे शब्द गोदूनें ऐकले मात्र; ती वाघिणीसारखी चवताळली; व एकदम ओरडून म्हणाली, "काय, काय म्हणतां ? हें बोलतांना नीट शुद्धीवर आहांत कां ? तुम्हीं या क्षणीं येथून चालते होतां, कां—का—" पण गोदू इतकी संतप्त झाली होती कीं तिच्या तोंडून पुढले शब्दच नीट बाहेर पडले नाहींत.

गोदूच्या शेवटच्या शेवटच्या आवाजानें तिची आई खालीं निजली होती ती जागी झाली, व उठून अर्ध्या जिन्यांत आली आणि तेथून " अग गोदे, काय झालं, कुणावर संतापली आहेस ?" असें मोठ्यानें बोलली. त्याबरोबर आतां येथें अधिक थांबण्यांत अर्थ नाहीं असें जाणून बाहेर जिन्यांत येऊन दादासाहेब खालीं उतरून चालते झाले. सासूपासून तोंड चुकविण्याचा त्यांनीं शक्य तो प्रयत्न केला; पण सासू आंतल्या जिन्याच्या तोंडाशींच उभी असल्यामुळें ओझरतें तरी तिनें त्यांना पाहिलें.

दादासाहेब खालीं जातांच गोदूची आई आंत आली व म्हणाली, " अग गोदे, झालं तरी काय ? तूं कां अशी ? जावई कां आले होते ?"

गोदूनें नुसतें मानेनेंच हो म्हणून उत्तर दिलें.

" त्यांना आतांशी आठवण झाली ? तुझे ग्रह बदललेसे दिसतात. परवा शास्त्रीबुवा म्हणतच होते, तुमच्या गोदूताईला ग्रह आतां बरे आले आहेत म्हणून ! घरीं कां न्यायला आले होते ?"

गोदूनें यालाहि मानेनेंच होय म्हणून उत्तर दिलें.

" मग तूं काय म्हणालीस ? केव्हां नेणार तुला ते ?" आईनें उत्सुकतेनें पुढें विचारलें.

गोदूला आतां बोलणें भागच पडलें. ती म्हणाली, " सांगितलं मी साफ येणार नाहीं. मला तुमचं तोंडहि दाखवूं नका."

" अग कार्टे !" तिची आई एकदम वैतागानें म्हणाली, " आतां काय म्हणावं तुला ? देवानं चांगला सोन्याचा दिवस दाखविला; नवऱ्यानं टाकलेली, तो चांगला घरीं येऊन चल म्हणून म्हणतो; आणखी तूं त्याला घालवून दिलास ! अग कांही झालं तरी आपली बायकांची जात ! आपल्या पायरीनंच आपण राहिलं पाहिजे. नवऱ्याच्या पुढं मान ठेऊन कसं चालेल ? पण तुझ्याच नशिबांत सुख नसलं तर त्याला देव तरी काय करील ?"

[ ४ ]

वरील प्रसंगानंतर थोड्याच आठवड्यांनीं एका सुप्रसिद्ध मराठी वृत्त-पत्रांत पुढील मजकूर गोदूच्या दृष्टीस पडला.

**अभिनंदनीय पुनर्विवाह:**—नालगांवचे सुप्रसिद्ध वकील श्री. दादासाहेब जोशी यांचा काल रोजी श्री. यमुनाबाई सरवटे यांच्याशीं पुनर्विवाह झाला, हें कळविण्यास आम्हांस फार आनंद वाटतो. वधूचें वय २४ वर्षांचें असून त्यांचा इंग्रजी सातव्या इयत्तेपर्यंत अभ्यास झाला आहे. एक पत्नी निवर्तल्यावर पुनः अल्पवयी कुमारिकेचें पाणिग्रहण न करतां प्रौढ गतभर्तृकेशी पुन-र्विवाह करून श्री. दादासाहेब यांनीं समाजसुधारणेच्या बाबतींत एक स्तुत्य उदाहरण घालून दिलें आहे; व त्याबद्दल आह्मीं त्यांचे अभिनंदन करितों. नूतन वधुवरांस दीर्घ आयुरारोग्य देण्याबद्दल आमची ईश्वराजवळ प्रार्थना आहे. "

ही बातमी वाचून गोदू स्वत:शीं तिरस्कारानें हंसली; आणि तिनें तें पत्र दूर फेंकून दिलें. पहिली बायको टाकून दुसरीशी, आणि ती मरतांच तिसरी बायको करणाऱ्याशीं लग्न करण्याला ही बाई तरी कशी तयार झाली याचें तिला क्षणभर आश्चर्य वाटलें. पण ती पुनः आपल्या-शींच म्हणाली,

"बायकांची जात; तिला इतकी समज कुठून असणार?"

## दीप ४ था

# बायकांची जात

[ उत्तरार्ध ]

" Women are not meant to judge us, but to forgive us when we need forgiveness. Pardon, not punishment, is their mission."

*Oscar Wilde.*

—१—

" बबी विषमानें अत्यवस्थ आहे; तुमचा सारखा ध्यास घेतला आहे; ताबडतोब या. "

वरील तार हातांत घेऊन गोदू किती तरी वेळ दिङ्मूढ होऊन बसली. तारेप्रमाणें आपल्या नवऱ्याकडे ताबडतोब जावें कीं जाऊं नये हें तिला कांहींच ठरवितां येईना. कारण तिची एकंदर परिस्थितिच तशी विचित्र होती. दादासाहेब तिला जेव्हां घरीं येण्याबद्दल पंधरा वर्षांनंतर विचारावयास आले, तेव्हां गोदूच्या जागीं जुन्या परंपरेचा पगडा मनावर असलेली दुसरी एखादी बाई असती तर, नवऱ्यानें आपल्यास आता तरी बोलावलें याचा अत्यंत आनंद होऊन, आणि सवतीचें मरण आपल्या फायद्याचेंच झालें असें वाटून, नवऱ्याबरोबर ती लागलीच गेली असती. पण गोदूचें तसें झालें नाहीं. शिक्षणामुळें ती स्वावलंबी बनली होती, व त्यामुळें तिच्या मनांत स्वाभिमानही उत्पन्न झाला होता. म्हणून



पवाचा साडा ट्रंकेत ठेवीत गोदू म्हणाली " उद्यां तुम्ही गेलांत म्हणजे मला अगदीं करमणार नाहीं ग ! "

—बायकांची जात ( उत्तरार्ध ) [ पृ. ८३ ]

तिनें त्यांनीं आपल्यावर आजपर्यंत केलेल्या अन्यायाचा दादासाहेबांना खडखडीत जाब विचारला; आणि असल्या स्वार्थी, व स्त्रियांबद्दल इतकी हीन वृत्ति बाळगणाऱ्या पुरुषाबद्दल आपल्या मनांत मुळींच प्रेम व आदर नसून, त्याजबरोबर संसार करण्याची आपली मुळीच इच्छा नाहीं असें स्वच्छ सांगून दादासाहेबांस परत लावून दिलें !

गोदूला दादासाहेबांचा याप्रमाणें अगदीं तिटकारा आला होता. तरी ते तिच्याकडे येऊन गेल्यावर त्यांनीं पुनर्विवाह केल्याची बातमी तिनें वर्तमानपत्रांत वाचली ती खोटी असल्याचें, आणि केवळ नामसादृश्यामुळें अशी चुकीची बातमी छापली गेली असल्याचें, तिला जेव्हां कळलें तेव्हां मात्र तिला पुष्कळ आनंद वाटल्याशिवाय राहिला नाहीं ! दादासाहेबांनीं पुनर्विवाह केल्याचें वर्तमानपत्रांत प्रथम वाचतांच तिचा त्यांच्याबद्दलचा तिटकारा जास्तच वाढला. पण त्यानंतर दोन दिवसांनीं खुद्द दादासाहेबांनीं तिला पत्र लिहून त्या लग्नांतल्या वराचें नांवही " दादासाहेब जोशी " हेंच असल्यामुळें ती बातमी आपल्याबद्दलची समजून वर्तमानपत्रांत चुकीनें प्रसिद्ध झाली असें तिला कळविलें. त्या वर्तमानपत्राच्या संपादकांनींही ताबडतोब आपली चूक प्रसिद्ध करून दादासाहेबांची माफी मागितली. तरी नांवाच्या सारखेपणानें झालेल्या या घोंटाळ्यामुळे महाराष्ट्रांतील वाचकांची आणि खुद्द दादासाहेबांच्या मित्रांची मात्र कांहीं दिवस खूप करमणूक झाली. कांहीं वर्षांपूर्वी पुण्यांतले एक प्रोफेसर आपल्याच आडनांवाच्या एका गृहस्थाच्या पुनर्विवाहाच्या प्रसंगीं पुरोहिताचें काम करण्यास गेले असतां, सदर पुनर्विवाह खुद्द या प्रोफेसरांचाच झाला, अशी पुण्यांतल्याच एका प्रमुख वृत्तपत्रानें चुकीनें बातमी प्रसिद्ध करून, एक दिवसभर प्रोफेसरमजकुरांच्या कौटुंबीयांत आणि विस्तृत मित्रपरिवारांत मोठीच खळबळ उडवून दिली होती, तिचें या प्रसंगानें सर्वांस स्मरण झालें.

तरी पण वाइटांतून चांगलें निघतें त्याप्रमाणें याचाही दादासाहेबांच्या बाबतींत एक चांगला परिणाम झाला. वर्तमानपत्रांतली बातमी चुकीची असल्याबद्दल त्यांनीं गोदूस मुद्दाम लिहिलेल्या पत्रांत " एक

पत्नी ह्यात असतां दुसरी करण्याच्या चुकीची पुनरावृत्ति यापुढें तरी माझ्या हातून होणार नाहीं अशी आपण खात्री बाळगावी, " असें एक वाक्य लिहिलें होतें. नवऱ्याबद्दल गोदूचें मत जरी अगदीं विटून गेलें होतें, आणि त्याच्याशीं कसलाही संबंध न ठेवण्याबद्दल तिचा जरी निश्चय झाला होता, तरी त्याला इतकें बोलल्यानंतरसुद्धां, वर्तमानपत्रांतल्या चुकीच्या बातमीनें आपला कांहीं गैरसमज होऊं नये म्हणून, नवऱ्यानें आपल्याला मुद्दाम पत्र लिहावें; आणि त्यांत पुनः लग्न न करण्याचा निश्चय आपण होऊन व्यक्त करावा यामुळें तिचें मन थोडेंसें तरी द्रवल्याशिवाय राहिलें नाहीं. लग्न झाल्यापासून उभ्या १६ वर्षांत नवऱ्यानें तें तिला पहिलेंच लिहिलेलें पत्र तिनें अनेक वेळां वाचलें; आणि तिनें नवऱ्याचा सर्व संबंध पूर्णपणें सोडला होता तरी, आणि म्हणून त्यानें पुनः तिसरें लग्न केल्यानें किंवा न केल्यानें तिच्या परिस्थितींत अथवा निश्चयांत कांहींही फरक पडणार नव्हता तरी, आपल्यास आतां आणखी तिसरी सवत येणार नाहीं या कल्पनेनें, बायकांच्या जातीस अनुसरून, तिला त्यांतल्या त्यांत बरेंच समाधानहि वाटलें !

" तुम्हांस केवळ लहान मुलांची काळजी घेण्यासाठींच मी घरांत हवी असेन तर मुलें मजकडे पाठवा; माझ्या बहिणीचीं मसजून मी तीं संभाळीन; पण मला तुमच्या घरीं यायला नको, " असें गोदूनें दादासाहेबांस सांगितलें होतें. दादासाहेबांच्या अनपेक्षित पत्रास उत्तर लिहितांना गोदूनें आपल्या या सूचेनचा उल्लेख करून आईच्या अभावीं लहान मुलांची आबाळ होत असेल तर त्यांना आपल्याकडे पाठविण्याची विनंती केली; आणि आश्चर्याची गोष्ट अशी कीं, दादासाहेबांनीं ती विनंती तत्काळ मान्य करून मुलांपैकीं तीन मुलें, दोन मुली, आणखी एक मुलगा, गोदूकडे पाठवून दिलीं ! बबी ही त्यांपैकींच दहा वर्षांची मुलगी. या गोष्टीस वर्ष झालें; मुलें या अवधींत दोनदां सुट्टींत घरीं बापाकडे जाऊन आलीं; पण गोदूनें त्यांची काळजी इतकी उत्तम घेतली, आणि त्यांना इतकें प्रेमानें वागविलें कीं, त्या मुलांना वर्षांतच तिचा अतिशय ळळा लागला.

—२—

वरील तार आली त्या वेळीं शाळेची सुट्टी होऊन मुलें घरीं गेलीं होती. बबी मोठी लाघवी मुलगी होती. ती सारखी गोदूताईच्या मागें मागें असे; तिनें आपल्या आर्जवी स्वभावानें आणि हुषारीनें गोदूचें चित्त व प्रेम आपल्याकडे आकृष्ट करून घेतलें. तिला गोदूबद्दलची माहिती खुद्द आपल्या बापाकडून जरी नाहीं तरी इकडे येतांना घरांतील दुसऱ्या माणसांकडून कळली होती. म्हणून तिनें गोदूकडे येतांच तिला " आई " म्हणून हांक मारण्याचा प्रघात ठेवला. हें नांव गोदूस प्रथम जरा चमत्कारिक लागलें; व तिनें "बबे, तुला कुणी सांगितलं मी तुझी आई म्हणून ? तुझी आई नाहीं म्हणून तर तूं इकडे आलीस ! " असें एकदां बबीला म्हटलेंही पण त्यावर बबी म्हणाली कीं, " वा:, आमच्या बाईनीं न् दाजीबांनीं आम्हांला सांगितलं कीं, तुम्हीही आमची आईच आहां म्हणून ! अन् ते कसं खोटं सांगतील ? अन् तुम्ही आई नसता तर दादांनीं आम्हांला इकडे कसं पाठवलं असतं ? आमचे दादा फार चांगले आहेत; ते आम्हाला लोकांच्या घरीं उगाच कध्धीं पाठवायचे नाहींत ! " यावर गोदू काय उत्तर देणार ? त्या गोड आणि निष्पाप मुलीनें दिलेलें मातृत्व तिला नाकारणें अशक्य झालें !

शाळेची सुट्टी जवळ आली; मुलांची नालगांवास घरीं जाण्याची तयारी सुरू झाली. गोदू तिघांही मुलांचे कपडे, साडया, परकर, आंवरून पेटीत भरण्याला त्यांना मदत करीत होती. बबीची नित्याप्रमाणें तिच्या-भोंवतीं गडबड चालूंच होती. तेव्हां कपडे भरतां भरतां, उद्यां बबी गेल्या-वर आपल्याला करमणार नाहीं असा मनांत विचार येऊन गोदूचें चित्त क्षणभर अस्थिर झालें. ट्रंकेचें उघडलेलें झांकण एका हातानें वर धरून आणि दुसऱ्या हातानें बबीची एक साडी ट्रंकेंत नीट ठेवीत ती म्हणाली " बबे, उद्यां तुम्हीं तिथं गेलांत म्हणजे मला अगदीं करमणार नाहीं ग ! "

"पण आम्हीं सुट्टी संपायच्या आधींच येऊं कीं ! मलाही तिथं लवकरच कंटाळा येईल. " बबीनें उत्तर केलें.

"तुम्ही याल पुनः हें खरं; पण उद्यां तुम्ही गेल्यावर परत येईपर्यंत मला करमणार नाहीं त्याची काय वाट? आणखी बबे, तूं तरी बरीच लबाड आहेस ग! घरी म्हणे तुला लवकरच कंटाळा येईल होय?"

"खरंच आई, इथली संवय झाल्यापासून घरीं पहिल्यांदाच कांही थोडे दिवस बरं वाटतं; पण मग पुढं कंटाळा येतो. कारण घरांत खेळायला, बोलायला कुणीच नाहीं; भाऊ, अप्पा, आपापल्या कामांत असतात. दादांची भेट फक्त दोनदां जेवायच्या वेळीं होते. अन् मग सगळा दिवस स्वतःच कांहीं तरी वाचण्यांत किंवा खेळण्यांत घालवावा लागतो, अन् त्याचाही मग पुढं कंटाळा येतो; मग असं वाटतं कीं इथं कधीं येतें."

"अन् इथं नाहीं येत कंटाळा?" गोदूनें विचारलें.

"छेः," बबी उत्साहानें म्हणाली, "इथं दिवसभर शाळा, शाळेंतलं खेळणं असतं; आणखी घरीं आल्यावर तुम्ही किती तरी गोष्टी सांगतां, नवीन गमती सांगतां, त्यामुळं वेळ कसा मजेंत जातो. नालगांवाला घरीं असं कांहीं नाहीं."

बबीचें हें निष्कपट व मनापासून निघालेलें बोलणें ऐकून गोदूला मनां तून समाधान वाटल्याशिवाय राहिलें नाहीं. बबी तिच्याजवळ उभी होती. गोदूनें ट्रंकेच्या झांकणाचा हात सोडून तिला जवळ घेऊन कुरवाळून म्हटलं, "खरंच बबे, मलाही उद्यां तूं गेलीस म्हणजे अगदीं करमायचं नाहीं."

गोदूनें प्रेमानें कुरवाळतांच त्या लहान मुलीचीही प्रेमळ वृत्ती लागलीच जागृत झाली. तिनें गोदूच्या गळयाभोंवतीं मिठी घालून विचारलें "मग आई, तुम्हींही सुट्टींत महिनाभर आमच्या घरीं कां चलत नाहीं?"

बबीनें हा प्रश्न अगदीं सहज विचारला; पण त्यामुळें गोदूच्या मनांत एकदम केवढी खळबळ उडाली! प्रश्न ऐकल्यावर दोन मिनिटें गोदू अगदीं स्तब्ध बसली; परंतु त्या दोन मिनिटांच्या आंत तिच्या मनश्चक्षूंपुढून किती गोष्टी गेल्या! तिच्या गतायुष्याचा सर्व चित्रपट अगदीं

तितक्याच ताजेपणानें तिच्या डोळ्यांपुढें उभा राहिला; आपला नवरा आपल्यास पुनः घरीं नेण्यासाठी आला, आपण त्याला काय बोललों, तो आपल्याला काय म्हणाला, शेवटी आपण संतापून, " मी साफ येत नाहीं तुम्हीं येथून चालते होतां कीं नाही, " असें निर्वाणीनें त्याला कसें सांगितलें, आणि नंतर आपण होऊनच या मुलांचा लळा कसा लावून घेतला याही गोष्टी तिला दिसल्या. आपल्यावर झालेले अन्याय, आणि निष्प्रेम जीवन याची आठवण होऊन तिच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले.

बबीच्या तें लक्षांत आलें; आणि आपलें कोणचें बोलणें लागून आपल्या या " आईच्या " डोळ्यांत पाणी आलें हें न समजून तीहि अस्वस्थ झाली. तिला गोदूचा खरोखरचि फार लळा लागला होता. तिचा स्वभाव जात्याच गोड व हुषार; आणि शिवाय आईविना पोरक्या झालेल्या मुलांना देवही जास्त शहाणपण देतो असें म्हणतात; त्यामुळेंही असेल, पण आपण कांहीं बोललों, आणि तें न आवडल्यामुळें आपल्या या " आईच्या " डोळ्यांला पाणी आलें असें दिसतांच बबीचा चिमुकला जीव जास्तच अस्वस्थ झाला. आपल्या शब्दांमुळें " आईला " झालेलें दु.ख कसे दूर करूं असें तिला होऊन गेलें. म्हणून त्या भरांत ती गोदूच्या गळ्याला अधिकच बिलगून तिच्या तोंडाजवळ तोंड आणून एकदम म्हणाली, "आई, कां ग, रडतेस ? माझ्यावर रागावलीस, होय ?" पण इतक्यांत आपण नेहमी 'अहो जाहो' म्हणत असतां आतां चुकून एकेरी बोलल्याचें लक्षांत येऊन ती पुनः गोंधळली; व ती चूक सांवरून घेण्यासाठी म्हणाली, " आई, का रडतां ? त्या आईला " अग जाग " म्हणण्याच्या संवयीमुळं मी आतां चुकून तसंच म्हणालें; पण तुम्हीं माझ्यावर रागावलां नाहीं ना ? "

छोट्या बबीचा उडालेला हा गोंधळ पाहून गोदूला मौज वाटली; आणि चुकून एकेरी संबोधल्याबद्दलचा तिचा खुलासा ऐकून तर गोदूच्या मनांतलें वात्सल्य दुप्पट जोरानें उचंबळलें. तिनें बबीस पोटाशीं घट्ट धरून व तिचा एक मुका घेऊन म्हटलें " बबे, मी तुझी आई ना ! "

"हो," बबीनें उत्तर दिलें.

"मग आईला कुणी अहो—जाहो म्हणतं का? तूं मला आतां म्हणालीस तसंच म्हणत जा."

"वा:, मला तें कित्ती कित्ती तरी आवडेल." बबी उल्हासानें म्हणाली; नुसती म्हणाली इतकेंच नव्हे, तर तिनें त्या परवानगीचा लागलीच उपयोगही केला. "आई, मग तूं आतां कां रडत होतीस? माझ्यावर रागावलीस होय?"

"नाहीं बरं बाळ; मुळींच नाहीं."

"मग कां रडलीस तर?" बबीनें पुन: विचारिलें.

"छे:, कुठं ट्रंकेंतून कांही तरी डोळ्यांत उडून पाणी आलं असेल." बबीचें या उत्तरानें फारसें समाधान झाल्याचें दिसलें नाहीं. तथापि तिच्या डोक्यांत गोदूला आपल्याबरोबर घरीं नेण्याचा उत्कट विचार असल्यामुळें तिनें पुन: पहिला प्रश्न विचारला.

"आई, मग तूं आमच्याबरोबर कां नाहीं येत?"

"नाही येत झालं; येईन कधीं तरी?"

पण याही उत्तरानें बबीचें समाधान झालें नाहीं. स्वत:ला पटेल असें उत्तर मिळाल्याशिवाय कोणत्याच मुलाचें समाधान होत नसते. म्हणून बबीनें फिरून विचारलें, "पण उद्यां आमच्याबरोबर कां नाहीं येत?"

"बबे, तें तुला कळायचं नाहीं; तूं लहान आहेस."

"मग मी मोठी झालें म्हणजे येशील होय? पण उद्यांच कां येत नाहींस? घरीं दाजिबा म्हणतात, की दादा तुझ्यावर रागावले म्हणून तूं येत नाहींस. खरं हें? पण दादा तुझ्यावर रागावले असते तर त्यांनीं आम्हांला तुझ्याकडे कसं पाठवलं असतं? मला वाटतं तूंच दादांवर रागावली आहेस! होय ना? पण दादा कित्ती कित्ती चांगले आहेत. आमच्यावर खूप प्रेम करितात. मग तूं सोडशील ना त्यांच्यावरचा राग?

बबीचें बोलणें निष्कपट असलें तरी तें पुढें असेंच चालू ठेवल्यास तें कोणत्या थराला जाईल, आणि आपल्याला तिच्या प्रश्नांचीं उत्तरे देणें किती अवघड होईल हें ओळखून तो विषय बदलणें गोदूस भागच पडलें; म्हणून ती म्हणाली, " बबे, पुरे आतां बोलणं. आपल्याला सामान लवकर आंवरून बाहेर जायचं आहे ना ? मग संपवू या तर तयारी लवकर. "

" हो; पण आई तुला आलंच पाहिजे अं या सुट्टींत. मी दादांना सांगून तुला आणवीनच. मग आपण बरोबरच इथं परत येऊं आं ? "

यानंतर संबंध दिवसभर गोदूचें चित्त अस्वस्थ होतें. कां तें तिचें तिलाच समजेना. पण बबीनें त्या दिवशीं तिला एकेरी हांक मारण्यास सुरुवात केल्यापासून, आणखी तिनें तिच्या गळ्यांत पडून आपल्याबरोबर घरीं चलण्याचा आग्रह केल्यापासून, बबीत आणि आपल्यांत कांहीं तरी नवीन पाश उत्पन्न झाला एवढे मात्र गोदूस वाटलें. त्या रात्रीं बबीस झोंप लागल्यावर तिला पोटाशीं धरून गोदू खूप रडली; व तिच्या तोंडावर हात फिरवून म्हणाली, " बबे, तूं किती गोड आहेस ! पण पुरुषांच्या स्वार्थीपणापायीं तुझंही असंच मातेरं होणार नाही ना ? आणि मी तरी या मोहांत कां गुंतावं ? आतां कांहीं झालं आणि कितीही केलं तरी पहिले अन्याय पुसले जाणं शक्य आहे का ? पहिलाच निश्चय पार पाडण्याचं, ईश्वरा मला सामर्थ्य दे ! "

—३—

बबीची प्रकृति आतां पुष्कळच बरी होती; म्हणजे काय, तर तिच्यावरील गंडांतर टळून ती हातीं लागली असें मानण्यास हरकत नव्हती. आजारांत तिनें गोदूचा सारखा ध्यास घेतला होता; गोदू आल्यामुळें आणि बबीच्या शुश्रूषेचें काम तिनें सर्वस्वीं आपल्याकडे घेऊन तें उत्तम केल्यामुळें बबीस उतार पडला हें उघड होतें. तरीसुद्धां ती हिंडू फिरूं लागून तिला पूर्ववत् शक्ति येण्यास आणखी महिना दीड महिना तरी सहज लागणार होता. इतके दिवस तेथें तिजजवळ राहणें गोदूस अर्थातच शक्य नव्हतें. कारण तिच्या शाळेची सुट्टी संपल्यामुळें

तिला आपल्या कामावर हजर होण्यासाठीं एक दोन दिवसांतच परत जाणे भाग होतें.

रात्री १२।-१२॥ चा सुमार असेल; बबीला स्वस्थ झोंप लागली होती. एकाच्या सुमारास ती जागी झाली तर तिला औषधाचा डोस देण्यास डॉक्टरांनीं सांगितलें असल्यामुळें गोदू जागत बसली होती. आजाऱ्याच्या अंथरुणापासून थोड्या अंतरावर टेबलावर दिवा ठेवून त्याच्या मंद प्रकाशांत आरामखुर्चीवर ती वाचीत पडली होती. तिच्या सोबतीला आणि मदतीला असलेली बाई खोलीच्या बाहेर गाढ झोंपीं गेलेली होती. इतक्यांत दारांत पावलें वाजल्याचे ऐकून तिने वर पाहिलें तों दादासाहेब आत येतांना तिला दिसले.

त्याबरोबर ती खुर्चीवरून उठून त्यांना कांहीं विचारणार तों दादासाहेबांनीच तिला विचारलें, " अं, अजून तुम्हीं जागयाच ?" गोदू बबीसाठीं घरात आल्यापासून तिला ' अहो जाहो ' असें संबोधण्याचाच दादासाहेबानी परिपाठ ठेविला होता.

" होय, " गोदूनें उत्तर दिलें. " बबीला स्वस्थ झोंप लागली आहे. आणि ती जागी झालीच तर तिला एक वाजतां औषध द्यायचं आहे. म्हणून बसलें आहें. उगाच बसायचं तें पडलें होतें वाचीत कांहीं तरी; पण आपणही अद्याप जागे कसे ?"

" मीही असाच कामांत होतों; उद्यांला तें एक वतनी अपील मोठं चालवायला जायचं आहे तानापूरला; त्याचे कागद बसलों होतों पाहात; ते पाहून झाल्यावर निजायला जातांना म्हटलं बबीची हालहवाल पाहून जावं, म्हणून वळलों इकडे. "

" उद्यां आपल्याला लवकरच जायचं आहे ना ? "

" हो, मी अगदी सकाळींच निघेन; म्हणजे काम आटपून लवकर संध्याकाळीं परत येतां येईल. "

" खरंच, पण भारीच बाई दगदग पडते आपल्याला; मी आतां पंधरा दिवस पाहातें आहें ना; घरांत निवांत स्वतःचा म्हणून एक क्षण दिखील

मिळत नाही." गोदू कळकळीच्या स्वरानें म्हणाली. "आधींच जाग्रण झालं आहे; अन् त्यांत उद्यां सकाळीं लवकर उठून आणखी परगांवीं जायचं आहे. तेव्हां आतां आणखी बसा म्हणतां येत नाहीं. पण १०-१५ मिनिटं बसल्यानं निजायला जास्त उशीर नाहीं ना होणार ?"

गोदू घरीं आल्यापासून दादासाहेब तिच्याशीं अगदीं दूर दूर पण आदरानें वागले. ज्या घरीं पुनः पाऊल टाकायचें नाहीं असा तिनें निश्चय केला होता, त्या घरीं बबीच्या आजारामुळें यावें लागल्यामुळें, आणि पूर्वीचा इतिहास आठवून, वागणें गोदूस किती अवघड वाटेल याची दादासाहेबांना कल्पना होती. म्हणून तिचा आजाऱ्यापलीकडे घरांत कसलाच संबंध येऊं नये अशी त्यांनी आपण होऊनच दक्षता बाळगिली. हक्कानें वास्तविक गोदू त्या घराची मालकीणच; पण प्रथम तिला तिच्या पदावरून स्थानभ्रष्ट करून नवीन मालकीण आणल्यामुळें, आणि ती मालकीण निवर्तल्यावर, आपली पहिली जागा पुनः घेण्याचें गोदूनें स्वाभिमानानें नाकारल्यामुळें, या वेळीं गोदूचा दर्जा घरांत एखाद्या पाहुण्यापेक्षां जास्त नव्हता. नोकरमाणसें तिला "वहिनीबाई" म्हणून संबोधून मालकिणीच्या आदरानें तिला मान देत; पण आपल्यास या घरांत राहावयाचें नाहीं, बबी बरी होतांच व शाळेची सुटी संपतांच आपण जाणार म्हणून गोदूच अत्यंत संकोचानें वागे. तोही संकोच तिला वाटूं नये, आणि तिची पाहुण्याचीच भूमिका कायम राहावी अशी दादासाहेब खबरदारी घेत; फार काय, स्वतः तेही तिच्या दृष्टीला फारसे पडत नसत.

त्यांच्यामागें वकिली आणि त्याशिवाय इतरही अनेक सार्वजनिक व्यवसाय पुष्कळ होते, व त्यामुळें त्यांना घरांत पाहणें शक्यही नसे हे खरें. परन्तु गोदू आल्यापासून आपला व तिचा वारंवार संबंध येऊन तिला अडचण वाटूं नये, अशाबद्दलही ते मुद्दाम काळजी घेत आहेत हें गोदूच्या लक्षांत आलें होतें. ते बबीजवळ येऊन बसावयाचे म्हणजे सकाळ-संध्याकाळ डॉक्टर येतील त्यांजबरोबर, किंवा गोदू अंगधुणें, जेवणखाण इत्यादि आवश्यक कार्यासाठीं बाहेर जाई त्या वेळीं; आणि याखेरीज जेव्हां जेव्हां

गोदूशीं जरूरीपुरते चारदोन शब्द बोलण्याचा त्यांना प्रसंग येई तेव्हांही ते तिच्याशी आदरानेंच वागत. वर्षापूर्वी आपण इतकें टाकून बोलून घरी येण्याचें साफ नाकारलें तरी, त्याबद्दल मनांत राग किंवा अढी न बाळगतां नवरा आपल्याशीं इतका आदरानें वागतो, आणि आपल्यास घरांत वागणें अवघड होऊं नये म्हणून शक्य ती खबरदारी घेतो याचा गोदूच्याही मनावर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं.

त्यांतून गोदू आतां परवांच्याच दिवशीं आपल्या गांवीं परत जाणार होती. त्यामुळें दादासाहेबांची व तिची पुनः गांठ पडण्याचा संभव फारसा नव्हताच. शिवाय दादासाहेबांच्या बदललेल्या वर्तनामुळें तिच्या त्यांज-विषयींच्या ग्रहांतही थोडाफार फरक पडला होता म्हणून या वेळीं, 'थोडा वेळ बसा' म्हणून त्यांना औपचारिक रीत्या तरी म्हणणें तिला अवश्य वाटलें.

गोदूनें आपण होऊन खोलींत बसण्याची आपल्याला विनंति केली, त्यामुळें दादासाहेबांनाही समाधान वाटल्यासारखें दिसलें; कारण गोदूच्या वरील प्रश्नास "छे, छे, उशीर कसला त्यांत?" असे उत्तर देऊन ते खोलींत शिरले; आणि तितक्यांत गोदूनें दुसरी खुर्ची आपल्याकडे ओढून घेऊन त्यांना बसण्यासाठी आरामखुर्चीच मोकळी ठेवल्यामुळें, आराम-खुर्चीवरच ते बसले.

गोदूही आपली खुर्ची अंतरावर ओढून घेऊन बसली. थोडा वेळ कोणीच कांहीं बोललें नाहीं. रात्रीच्या शांततेंत टेबलावरील बारक्या घड्याळाची टिक् टिक् स्पष्ट ऐकूं येत होती.

"मग काय तुम्हीं परवांच्याच दिवशीं नक्की जाणार म्हणतां?" दादासाहेबांनीच बोलायला आरंभ करून विचारलें.

"हो, गेलंच पाहिजे; त्याला इलाज नाहीं. शाळा सुरू व्हायच्या आधीं निदान दोन दिवस तरी मला तिथं असायला नको का?"

"तें खरं आहे, पण तुम्ही गेल्याबर बबीचं कसं होईल याची मला फार काळजी वाटते. अजून ती दुखण्यांतून पूर्णपणानं बाहेर पडली असं म्हणतां येणार नाहीं." दादासाहेब चिंतायुक्त स्वरांत म्हणाले.

"तिला पुरतं बरं व्हायला दिवसगत लागेल हें खरं; पण आतां तिची तशी कांहीं काळजी राहिली नाहीं. मला आणखी कांहीं दिवस राहातां आलं असतं तर मी खचित तिच्याकरितां राहिले असते. जायचं म्हणजे काय, मन घट्ट करून जायचं! मी जाणार म्हणतांच पोरीनंही लहान तोंड केलंन्. पण शाळेच्या कामामुळं माझा अगदीं नाइलाज आहे." गोदू कष्टानें म्हणाली.

"पण तुम्हीं गेल्यानंतर तुमची खंत घेऊन बबी पुनः आजारी तर नाही ना पडणार?"

"छे, तसं नाहीं ती करायची. ती मोठी समजूतदार पोर आहे. मला शाळेसाठीं परत जायलाच पाहिजे असं मी म्हटल्यावर तिला तें पटलं. अन् मीं तिला कबूल केलं आहे कीं, आणखी १५–२० दिवसांत जर तिला जास्त बरं वाटलं, अन् डाक्टरांनीं हलवायची परवानगी दिली तर मी तिला तिकडेच माझ्याकडे घेऊन जाईन म्हणून. तें ऐकून तिला फारच बरं वाटलं. आपण मात्र तिला पाठवायची व्यवस्था करावी. घरची आहेच मोटार; नीट बंदोबस्तानं येईल."

"हो, न पाठवायला काय झालं? कारण इथं तरी घरांत तिची इतकी काळजी घ्यायला कोण आहे? उद्यां तुम्ही गेल्यावर थोडे दिवस तरी तिचं कसं जमेल याचीच भीति वाटते मला." दादासाहेब म्हणाले.

"तशी भीति वाटायचं कांहींच कारण नाहीं; बाई आहेत, दाजीबा आहेत, ते सगळं अगदीं उत्तम करतील. आपण मधून मधून नुसतं पाहिलं–विचारलं म्हणजे झालं."

"बाई न् दाजिबा असले तरी तुमची सर कांहीं येणार नाहीं. तीं दोघंही फार चागलीं, विश्वासू, जुनीं माणसं आहेत हें खरं; पण मी तुम्हांला खरंच सांगतों; केवळ तुम्हीं होतांत म्हणूनच बबी वांचली. अन् मलाही मोठं कौतुक वाटतं, त्या पोरीची तुमच्यावर भक्ति आहे त्याचं. खरंच," दादासाहेब येथें जरा थांबून किंचित् कंपित स्वरांत म्हणाले,

" तुम्हीं आपला निश्चय मोडून या वेळीं मजवर जे उपकार केले ते मल कधींही फेडतां येणार नाहींत. "

दादासाहेबांच्या या कृतज्ञतेच्या शब्दांनीं गोदूस गोंधळल्यासारखें झालें. तिच्या मनांतून कांहीं तरी औपचारिक बोलण्याचें होतें; पण तिला बोलवेचना. तथापि दादासाहेबांच्या लक्षांत तिची स्थिति आली असें दिसलें. कारण ते लागलीच म्हणाले, " माझ्या बोलण्याचा तुम्हांला राग नाहीं ना आला ? मला अगदी अंतःकरणापासून वाटलं तेंच मी बोललों. त्यांत तुमचा अपमान करावा किंवा तुम्हांला वाईट वाटावं, अशी माझी बिलकुल इच्छा नव्हती. "

आतां गोदूस बोलणें भाग पडलें. " छे, छे, राग कसला त्यांत ? बबीसाठीं मी इथं आलें, आणि तिची शुश्रूषा केली यांत विशेष तें काय केलं ? आपण त्याचं इतकं मानून घेता याचंच मला अवघड वाटतं. "

" वाः विशेष नाहीं तर काय ? " दादासाहेबांनीं जरा आवेशानें उत्तर दिलें, " माझ्या हातून तुमच्या बाबतींत जो अन्याय झाला आहे तो पाहिला म्हणजे, इथं येऊन, एकदां अपमानानं घालवून दिलेल्या घरांत येऊन, बबीच्या तुम्हीं खस्ता खाव्या, तिच्या जन्मदात्या आई-पेक्षांही जास्त कष्ट सोसून, तिला मरणाच्या दारांतून ओढून काढावी, हें तुमचं कर्तव्य होतं असं कोण म्हणेल ? वर्षापूर्वी माझ्या डोळ्यांत तुम्हीं अंजन घातलं तें त्यावेळीं जरी बरंच चरचरलं, तरी त्यानंतर शांतपणानें सर्व परिस्थितीचा विचार करतांना, त्याचा सुपरिणाम मला दिसून आला. माझ्या हातून तुमच्या बाबतींत घडलेला अन्याय मला पूर्वी दिसला नव्हता तो आतां ढळढळीत दिसला; आणि त्यामुळं तुम्हांला वाटणारा उद्वेग व तुम्हीं केलेला निश्चयही मला पटला. त्या अन्यायाची भरपायी माझ्या हातून या जन्मीं तरी होणं खरोखरीच शक्य नाहीं. पुरुषांच्या हातून स्वार्थीपणानं स्त्रियांवर प्रसंगीं कसा जुलुम होतो, आणि बाय-कांना त्याचा प्रतिकार करणं कसं अशक्य असतं हें तुम्हीं मला फार उत्तम रीतीनं दाखवून दिलंत. तुम्हीं मला, तुमच्या घरीं मी आलों असतां,

ज्या रीतीनं वागवलेत त्याचा मला राग तर नाहींच आला, पण उलट त्यामुळं माझ्यांत परिवर्तन कसं झालं हें दाखवण्यासाठींच मीं तुम्हांला माझ्या पुनर्लग्नाच्या खोट्या बातमीचा इन्कार करणारं पत्र मुद्दाम लिहिलं; आणखी मुलांच्याबद्दलची तुमची सूचना मान्य करून मुलं लागलीच तुमच्याकडे पाठवून दिलीं. मजबद्दल कळकळ दाखवण्याला तुम्हांला वास्तविक कांहीं एक कारण नसतां तुम्हीं ती दाखविली, आणि मुलांची माझ्यावरची जबाबदारी तुम्ही उचलली, यांत माझ्यावर कांहीं एक उपकार नाहीं असं तुम्हांला सौजन्यानं खुशाल वाटो ! मी मात्र तसं म्हणणार नाहीं. माझं गैरवर्तन मला दाखवून, आणखी माझ्या मुलांची काळजी घेऊन तुम्ही माझ्या अपकारांची जी उपकारांनीं फेड केली ती मात्र मी कधींही विसरणार नाहीं."

दादासाहेब जरा थांबले; पण त्यांच्या या आवेशाच्या आणि मनापासूनच्या बोलण्याचा गोदूवर मात्र फारच परिणाम झाला. तिला इतकें गोंधळल्यासारखें झालें कीं, यावर काय बोलावें व काय करावें हें तिला कांहींच सुचेना. आपल्या नवऱ्याचा पूर्वी आपण धिक्कार केला त्याचा परिणाम वाईट न होतां चांगला झाला हें तिला नवऱ्याच्या त्यानंतरच्या वर्तनावरून दिसून आलेंच होतें; पण आतां प्रत्यक्ष नवऱ्यानें तशी समक्ष कबूली देऊन, आपली चूक कबूल केल्यावर तिच्या मनांत विचारांचें द्वंद्व सुरू होऊन तिचा गोंधळ होणें साहजिक होतें. या मनांतल्या गोंधळामुळे तोंडांतून शब्द बाहेर पडण्याऐवजीं तिच्या डोळ्यांतून दोन अश्रू मात्र बाहेर पडले, आणि तें रास्तच झालें. कारण स्त्रियांच्या बाबतींत त्यांच्या शब्दांचें काम पुष्कळदां अश्रूच करीत नाहींत काय ?

दादासाहेबांच्या दृष्टीस ते अश्रू पडले व ते म्हणाले, "मला माफ करा; हा विषय तुम्हांला तितकासा सुखकारक नाहीं हें मला ठाऊक आहे; पण मला एकदां केव्हां तरी हें बोलायचंच होतं म्हणून बोललों. माझं आयुष्य हल्लीं किती एकाकी झालं आहे हें तुम्हीं पाहिलंच आहे. जो कांहीं थोडाबहुत पाश वाटतो तो या मुलांच्यामुळंच. पण तोही भार तुम्हीं

हलका केला आहे. हा एकटेपणा वाटूं नये म्हणूनच मी सारखीं कामं मागं लावून घेतों, आणि त्यांतच रमतों. माझ्याकडून घडलेल्या अन्यायाचं थोडं तरी प्रायश्चित्त म्हणून हा एकटेपणा मला भोगणं प्राप्तच आहे; व तो मी आनंदानं भोगीन. पण माझ्या स्वार्थी सुखासाठीं तुमच्या स्वाभिमानाच्या व तत्वांच्या आड मात्र मी येणार नाहीं. तुमच्या खऱ्या सहानुभूतीचा मला थोडा भाग जरी मिळाला, आणि तुमचं जें मी कधींही भरून न येणारं नुकसान केलं त्याबद्दल केव्हां तरी एकदां मला तुम्ही क्षमा केलीत, म्हणजे माझ्या उरलेल्या आयुष्यांतलं कार्य झालं!"

दादासाहेबांचा प्रत्येक शब्द गोदूच्या अंतःकरणाच्या मुळाशीं जाऊन भिडला इतकेंच नव्हे, तर प्रत्येक हिंदु स्त्रीच्या हृदयांत ज्या धार्मिक भावना परंपरेच्या जोरावर बद्धमूल झालेल्या असतात, त्या भावनांचीं मुळें उकललीं जाऊन त्यांना दादासाहेबांच्या प्रत्येक शब्दागणिक धक्का बसला. दादासाहेबांचा पश्चात्ताप पाहून तिला समाधान वाटलें, आणि तिचा त्यांच्याबद्दलचा राग व उद्वेग पुष्कळच कमी झाला हें खरें; तरी पण त्यामुळें आपला निश्चय मोडून एकदां निश्चयपूर्वक हातीं घेतलेलें काम सोडावें कीं काय, याचा तिला मोठा विचार पडला. दादासाहेबांच्या समोर आपले मनोविकार दाबण्याला, आणि मनांतील खळबळ बाहेर दिसूं न देण्याला तिला फारच प्रयास पडले; या वेळीं दादासाहेब जाऊन आल्यास जरासा एकांत मिळेल तर किती बरें होईल असें तिला वाटलें. कारण सध्यांच्या मनःस्थितीत दादासाहेबांच्या बोलण्यावर कांहींच उत्तर देणें तिला शक्य नव्हतें.

तिची ही अडचण दैवयोगानें आपोआपच दूर झाली. दादासाहेब वरील शब्द बोलून दोन क्षण झाले नाहींत तोंच, आवेशांत त्यांचा आवाज मोठा झाल्यानें असो, किंवा तिची झोंप पुरी झाल्यामुळें असो, बबीनें डोळे उघडले, आणि "आई" म्हणून हांक मारली.

बबी जागी झाल्याबरोबर, दादासाहेब उठून बबीजवळ गेले व तिच्या गालाला हात लावून प्रेमानें म्हणाले, "कां बाळ, झाली का झोंप? आतां

औषध घ्यायचं ना ? " इतक्यांत गोदूनें औषधाचा भाग ग्लासांत ओतून आणून तिला पाजून तिचें तोंड पुसलें. तेव्हां दादासाहेब बबीला कुरवाळून म्हणाले, "बबे, आतां उद्यां आई गेल्यावर मग कोण देईल औषध ? "

" कां बरं ? " बबी क्षीण आवाजांत म्हणाली, " मला थोडंसं बरं वाटतांच आई आपल्या घरीं घेऊन जाणार आहे; दादा, मला पाठवाल ना तिच्याकडे ? "

" पाठवीन बरं, पण आतां तूं पुनः स्वस्थ निज पाहूं. " दादासाहेब म्हणाले. बबीनें गोदूचा हात धरून म्हटले, " आई तूं मला थापट म्हणजे मला लवकर झोंप येईल. "

बबी जागी झाल्यामुळें दादासाहेबांच्या विषयांत खंड पडला; त्याचा फायदा घेऊन गोदू त्यांना म्हणाली, " दीड वाजला; मला वाटतं आपण निजावं आतां; पुनः आणखी लवकर उठायचंय् सकाळीं. "

—४—

दुसरे दिवशीं सकाळीं दादासाहेब तानापूरला जाण्यापूर्वी गोदूनें त्यांना पुढल्या दिवशीं आपल्या गांवीं जाण्याचा निश्चय सांगितला; व त्याला दादासाहेबांनींही कांहीं हरकत न घेतल्यामुळें, ते सायंकाळीं परत आल्यानंतर त्यांच्याच घरच्या मोटारींतून गोदूने दुसरे दिवशीं सकाळीं आपल्या गांवीं जावें असें ठरलें. गोदूचें गांव नालगांवाहून सडकेनें सुमारें ८० मैल असून तेथें आगगाडीनेंही जातां येई. गोदूची इच्छा वास्तविक दादासाहेबांच्या मोटारींतून जाण्यापेक्षां आगगाडीनेंच जाण्याची होती. पण दादासाहेब तें मुळींच ऐकेनात. " घरची मोटार असतांना, आणखी तिच्यांतून तुम्ही तीन चार तासांत घरीं सुखानें पोंचूं शकत असतांना आगगाडीचा कंटाळवाणा प्रवास कशाला ? शिवाय तुम्हीं इथं आलांत त्याच वेळीं तुम्हांला मोटार पाठवायची; पण त्या वेळीं बबी अत्यवस्थ असल्यामुळं, डॉक्टरांच्यासाठीं मोटार लागे, म्हणून तुम्हांला आगगाडीनं यायचा

त्रास पडला; आतां तर मी तुम्हांला आगगाडीनं मुळींच जाऊं देणार नाहीं. " असें दादासाहेबांनीं निक्षून सांगितल्यावर तिचा नाइलाज झाला.

तो सगळा दिवस गोदूस फारच अस्वस्थतेंत गेला; दादासाहेबांचें काल रात्रीचें बोलणें झाल्यापासूनच तिच्या या मानसिक अस्वस्थतेला आरंभ झाला. दादासाहेबांना आतां आपली जरूर आहे, पण ती पूर्वीप्रमाणें केवळ घर व मुलें सांभाळावयाला, पत्नी म्हणविली जाणारी, कोणी तरी एक स्त्री असावी म्हणून नव्हे, तर आयुष्यांतील खरी सोबतीण, खरीखुरी सहधर्मचारिणी म्हणून, हें येथें पंधरा दिवसांच्या राहण्यानें तिच्या लक्षांत आलें होतें. त्याचप्रमाणें आपल्या तरुणपणाच्या वर्तनाचाही त्यांना खरा पश्चात्ताप झाला असून त्याची भरपाई करून आपल्यास सुखी करण्याची त्यांची खरी च अंतःकरणपूर्वक इच्छा आहे हेंही तिला दिसून आलें. त्यांची तिच्याशीं असलेली वर्तणूक इतकी आदराची आणि प्रच्छन्न प्रेमळपणाची होती कीं, दीड वर्षापूर्वी तिच्या गांवीं येऊन तिला पुनः घरीं चल म्हणून आपल्या जन्मसिद्ध पुरुषी हक्कानें सांगणारे आणि स्त्रियांबद्दल तुच्छता दाखविणारे दादासाहेब ते हेच, असें एखाद्यास सांगूनसुद्धां खरें वाटलें नसतें. तेव्हां त्यांच्यांत इतका बदल झाल्यानंतर, आणि त्यांना खरोखरीच आपल्या सहवासाची जरूर असेल तर, आपलें कर्तव्य काय ? प्रथम ठरविलेलें ध्येय अर्धें सोडून येथें येऊन संसारांत पडणें, किंवा एकदां जो निश्चय केला तो पाळणें ? दादासाहेब सुधारले असतील, त्यांना आपल्या चुकीबद्दल खरा पश्चात्तापही वाटत असेल; पण जर एखाद्या स्त्रीनें पतीचा त्याग केला आणि पुढें तिला पश्चात्ताप झाला, तर तितक्याच सदय अंतःकरणानें तिचा नवरा तिला क्षमा करील काय ? मग स्त्रियांनीं तरी बायको टाकणाऱ्या पुरुषांबद्दल जास्त सदयता व क्षमाशीलता कां दाखवावी ? अशा अनेक परस्परविरोधी विचारांनीं तिचें मन अगदीं त्रासून गेलें होतें. शेवटीं आपण जातों आहों हेंच बरोबर आहे, सावत्र मुलांची जबाबदारी अंगावर घेऊन नवऱ्याबद्दलची सदयता व सहानुभूति आपण दाखविली आहेच; फार झालें तर त्याला जास्त वारंवार लिहून त्याची अधिक कळ

कळीनें चौकशी करूं म्हणजे झालें; यापेक्षां जास्त करण्याचें कांहींच कारण नाहीं, असें तिनें मनाशीं ठरविलें. तरी त्यानंतरसुद्धां तिला समाधान लाभलें असें मात्र नाहीं.

तिच्या अस्वस्थतेंत बबीनेंही आणखी भर टाकली. कारण ती पोरगी, गोदू उद्यां जाणार म्हणून तिला त्या दिवशीं मुळींच सोडीना. आणखी प्रत्येक वेळीं, " आई, तूं मला टाकून उद्यां जाणारच ना ? " असें केविलवाणें विचारून तोंड अगदीं लहान करी. आणि हे शब्द ऐकून गोदूला भडभडून येई. बबीस जवळ घेऊन ती म्हणे " बबे, असं काय बरं बाळ वेड्यासारखं करावं ? शाळा सुरू होणार तेव्हां मला नको का जायला ? आणखी तूंही पण बरी झाल्याबरोबर येणारच आहेस ना ? मग असं नाही वाटून घ्यायचं उगच ! काल रात्रीं तुला सांगितलं आहे ना माझ्याकडे पाठवीन म्हणून ? "

बबी म्हणे, " आई, तें खरं ग; पण मला कीं नाहीं तूं इथून जाऊंच नयेस असं वाटतं. तूं गेल्यावर मला अगदीं करमायचं नाहीं. थांब, तूं गेल्यावर मी जास्तच आजारी पडतें, म्हणजे तूं आपसुकच येशील. या सुट्टींत तरी तूं कुठं येणार होतीस ? पण आलीस कीं नाहीं मी आजारी पडतांच ! "

बबीचें हें वाक्य ऐकून गोदूस जास्तच भडभडून आलें. ती तिच्या तोंडावर हात ठेवून म्हणाली, ' बबे, असं बोलूं नये अं वेड्यासारखं ! तुला माझ्याजवळ राहावयाचं आहे ना ? मग त्याला लवकर बरंच व्हायला हवं. "

बबीच्या कष्टीपणामुळें अर्थात् गोदूचाही कष्टीपणा वाढला; आणि आजचा दिवस व रात्र कशी तरी संपून उद्यांची सकाळ उगवते कधीं, आणि आपण या घराच्या बाहेर पडतों कधीं असें तिला झालें.

कसाबसा दिवस गेला; दुपार जाऊन संध्याकाळ झाली. तानापुरास दादासाहेब धंद्यानिमित्त अनेकदां जात; ते बहुधा ६ च्या सुमारास परत येत. पण आज सहा वाजले, साडेसहा झाले, सात झाले, आठही झाले तरीसुद्धां दादासाहेबांचा पत्ता नाहीं ! काम कदाचित् उशिरां निघून लव-

कर संपलें नसेल; वाटेंत मोटारला पंक्चर वगैरे झालें असेल; त्यामुळें त्यांना उशीर लागला अशी घरांतील माणसांनीं समजूत करून घेतली. पण गोदूचें त्यानें समाधान होईना. तिची हुरहूर जास्तच वाढली. तों साडेआठ वाजले. घराबाहेर मोटारीचा हॉर्न ऐकूं आला, व घरापुढें मोटारचीं चाकें थांबल्याचाही आवाज झाला. गोदू व एक गडी दादासाहेबच कीं काय हें पाहण्यास उत्सुकतेनें बाहेर आले. होय, ते दादासाहेबच होते; पण त्यांना पाहतांच गोदू व गडी या दोघांच्या तोंडून दुःखाचा एकदम मोठा उद्गार निघाला !

दादासाहेब बेशुद्ध असून त्यांना चौघांनीं स्ट्रेचरवरून, फाटलेले व रक्तानें भरलेले कपडे, कपाळाला व एका डोळ्याला बांधलेल्या पट्टया, आणि दोन लांकडी फळ्यांत बांधलेला पाय, अशा स्थितींत एक मोटार लॉरींतून बाहेर काढलें. परत येतांना दादासाहेबांच्या मोटारीला भयंकर अपघात होऊन त्यांत ते सांपडले होते !

—५—

तो देखावा खरोखरीच भयंकर होता. घरांतील सर्व मंडळी घाबरून नुसती रडतच बसली. पण गोदूनें धैर्य धरून व प्रसंगावधान दाखवून दादासाहेबांना घरांत नेऊन त्यांच्या बिछान्याची वगैरे व्यवस्था केली. अपघाताच्या जागेवरून दादासाहेबांना मंडळींनीं दवाखान्यांत नेऊन जखमा वगैरे बांधूनच घरीं आणलें होतें. दादासाहेब गांवातले एक प्रमुख वकील, आणि सधन व पुढारी गृहस्थ असल्यामुळें त्यांची व्यवस्था ताबडतोब व उत्तम झाली; इतकेंच नव्हे तर, त्यांचे नेहमीचे डॉक्टरही अपघाताची बातमी कळतांच दवाखान्यांत जाऊन त्यांच्या ड्रेसिंगची वगैरे व्यवस्था पाहून त्यांच्याबरोबर घरीं आले. त्यांनीं गोदूस अपघाताची सर्व हकीकत सांगितली; व दादासाहेबांच्या स्थितीचीही खरी कल्पना त्यांनी तिला दिली. ते म्हणाले, "देवाची मोठी कृपा म्हणूनच दादासाहेब या अपघातांतून निभावले; आणि जिवावचं शेंपटीवरच भागलं तथापि अजून ते शुद्धीवर येईपर्यंत काळजी करण्यासारखी स्थिति

आहे. त्यांच्या डोक्याला फार भयंकर मार लागला असून त्यामुळें मेंदूंत रक्तस्राव होण्याचें भय आहे. डोळ्यांच्यावर फुटकी कांच लागून मोठी जखम झाली असून, तीमुळें डोळ्याला कदाचित् कायमचीही इजा होईल. पायालाही जबर दुखापत झाली आहे; व ती कदाचित् सेप्टिक झाल्यास गुडघ्याखालचा पाय कापून टाकावा लागेल. ईश्वराची कृपा असेल तर सर्व चांगलंही होईल. पण अत्यंत काळजी घेतली पाहिजे हें मात्र खरं. सर्वांत मुख्य म्हणजे ते जेव्हां शुद्धीवर येतील तेव्हां सर्व पुढल्या गोष्टी!"

मृत्यूशीं दादासाहेबांचा तीन दिवस सारखा जोराचा झगडा चालला. पण डॉक्टरांचे निकराचे उपचार, आणि गोदूची अविश्रांत शुश्रूषा याच्या साहाय्यानें त्यांनीं शेवटीं मृत्यूवर जय मिळविला. मध्यंतरीं बेसावध स्थितींत ते बडबडत; त्यांत सारखें गोदूचें नांव घेऊन तिजवर केलेल्या अन्यायाबदल तिची क्षमा मागत. चौथ्या दिवशीं त्यांची प्रकृती पुष्कळच बरी होती. डोक्यांतील वेदना कमी होऊन डोक्याची जखमही बरी होती. त्या दिवशीं दुपारीं दूध घेऊन ते जे निजले ते चार वाजतां जागे झाले. गोदू जवळच बसली होती. तिच्याकडे त्यांनीं करुण दृष्टीनें कांहीं वेळ पाहून तिला "गोदू" म्हणून हांक मारली.

नवऱ्यानें इतक्या दिवसांत प्रथमच "गोदू" म्हणून नांवानें हांक मारलेली ऐकून गोदू आनंदूनच पुढें गेली. तिचा हात दादासाहेबांनीं प्रेमानें आपल्या हातांत घेऊन गद्गद स्वरांत म्हटलें, "गोदू, तुझे माझ्यावर फार फार उपकार झाले. मी तुझ्या आयुष्याचा नाश केला, पण तूं मला वं माझ्या मुलीला जीवदान दिलंस. मी तुझी आणखी किती सेवा घेऊं? तुझी शाळा सुरूसुद्धां झाली असेल; तूं जा, माझं इथं आतां सर्व सुरळीत चालेल. तुझ्या इतक्या स्वार्थत्यागाला मी पात्र नाही."

गोदूचाही कंठ दाटून आला; ती दादासाहेबांच्या जवळ बिछान्यावर बसून म्हणाली, "माझी शाळा आतां कायमची बंद झाली आहे; कारण मी माझ्या जागेचा दोन दिवसांपूर्वीच राजिनामा धाडून दिला. शाळेपेक्षां आपल्यालाच माझी आतां जास्त जरूरी आहे."

" आं, म्हणजे ? " दादासाहेब आश्चर्यानें म्हणाले, " खरं का हें ? गोदू, खरंच का तूं मला क्षमा केलीस ? "

दादासाहेबांचे हात आपोआप पुढें झाले; आणि दैवयोगानें गोदूही त्याच वेळीं पुढें वांकल्यामुळें त्यांच्या पुढें आलल्या बाहूत सांपडण्या-शिवाय तिला मार्गच राहिला नाहीं.

"क्षमा ?" ती अस्फुट स्वरांत म्हणाली, "अन् ती मी कोण करणार ? आमची कशी झाली तरी बायकांची जात, पुरुषांना ज्या वेळीं आमची खरी जरूर व मदत लागेल त्या वेळीं ती न करून आमचं कसं चालेल ? पण खरंच आतां—"

पण याच वेळीं दादासाहेबांनीं आपले हात खालीं आणल्यामुळें त्यांत सांपडलेल्या गोदूचे ओठ आपोआपच त्यांच्या तोंडाजवळ आले; आणि त्यामुळेंच कीं काय, तिचे पुढील शब्द तेथल्या तेथेंच राहिले !

## दीप ५ वा

# संरक्षक देवता

" But we want women, strong of soul

*  *  *  *

Oh, these are they who mould the men of story."

*Ella Wilcox.*

" सरदारसाहेब, " गव्हर्नरसाहेब शेवटीं म्हणाले " तुमच्या ह्मणण्यांत कांहीं सत्यांश आहे असें घेऊन चाललें तरी, या ठरावाच्या बाबतींत तुमचा पाठिंबा मिळण्याचा सरकारला हक्क आहे हें तुह्मी लक्षांत ठेविले पाहिजे. यांत सरकारी अधिकाऱ्यांच्या, ह्मणजे पर्यायानें सरकारच्या, इज्जतीचा प्रश्न आहे; आणि तुमचा सरंजाम व योगक्षेम सर्वस्वी सरकारच्या मर्जीनें चालत असल्यामुळें यावेळीं सरकारचा पाठपुरावा करणें हें तुमचें व तुमच्या वर्गाचें कर्तव्य आहे. "

" या कर्तव्याचा मला किंवा माझ्या वर्गाला केव्हांच विसर पडणार नाहीं. " सरदार भय्यासाहेबांनीं आदबीनें उत्तर दिलें. "पण या ठिकाणीं सरकारच्या इज्जतीचा प्रश्न कसा उत्पन्न होतो, हेंच मला कळत नाहीं. माधवपुरच्या कलेक्टरांनीं जाणूनबुजून जुलमाची कृत्यें केलीं हें मला

ठाऊक आहे. त्याबद्दल त्या जिल्ह्यांतील रयतेकडून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पुष्कळ तक्रारी अर्ज आले असतां त्यापैकीं एकाचाहि विचार झाला नाहीं. तेव्हां कलेक्टरांविरुद्ध कौंसिलांत निंदाव्यंजक ठराव आणून त्यांना शिक्षा करणें सरकारला भाग पाडण्याशिवाय रयतेला दुसरा काय उपाय आहे ? अशा न्याय्य गोष्टींत मला लोकांच्या विरुद्ध जाणें फार अवघड आहे."

"पण कलेक्टरनीं जुलूम केला असें मानलें तरी, तो वाढलेला जमीन-सारा सक्तीनें वसूल करण्याच्या बाबतींत सरकारनें जें धोरण ठरविलें आहे तें अमलांत आणण्यासाठींच केला; व यासाठीं त्यांचें रक्षण करणें आम्हांस जरूर आहे. मला वाटतें या सारावाढीचा तुम्हीं इतर लोकांप्रमाणें कधीं निषेध केला नाहीं ?"

"नाहीं."

"कारण त्यांत तुमचा फायदा होता." गव्हर्नरसाहेब हंसून म्हणाले. "नाहींतर तुम्हां इनामदारांचें उत्पन्न कसें वाढलें असतें ? मग आतां तुम्हींच विचार करा, तुमच्या फायद्याची गोष्ट अमलांत आणण्यासाठींच मि. ब्रूक्स यांनीं सक्ती केली ना ! आणि तुमचा फायदा करणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध तुम्हीं आतां निंदाव्यंजक ठराव पास करावा हें खास कृतज्ञपणाचें नाहीं !"

"पण सारावाढीचा निषेध केला नसला म्हणून त्या कामीं रयतेवर जो जो जुलूम होईल त्यालाहि संमति दिली पाहिजे असा त्याचा अर्थ नाहीं. सारावाढ करावी म्हटल्यानें ती हवी तशी करावी आणि त्या कामीं रयतेवर अधिकाऱ्यांनीं हवा तसा जुलूम करावा—"

"नो, नो," गव्हर्नरसाहेब अधीरपणानें म्हणाले "त्या सर्व मुद्यांवर आपण आधींच बोललों आहोंत. तुमचें सर्व म्हणणें शांतपणें ऐकूनच मी तुम्हांला हा सल्ला दिला आहे. पुनः त्याच गोष्टी ऐकून माझें मत बदलणार आहे असें नाहीं. आपण या प्रश्नावर बराच वेळ वाटाघाट केली नाहीं बरें ? म्हणून त्या त्या गोष्टी आणखी बोलून काय फायदा आहे ? मी तुमचा

आणखी वेळ घेऊं इच्छित नाहीं, पण मित्रत्वाच्या नात्यानें मी तुम्हांला शेवटची एवढीच सल्ला देऊं इच्छितों. तुम्हीं रयतेचे प्रतिनिधी नसून इनामदारांचे प्रतिनिधि आहां हें विसरूं नका. म्हणून उद्यांच्या ठरावावर लोकपक्षाच्या बाजूनें मत देण्यापेक्षां सरकारच्या बाजूनें मत देणेंच तुमच्या स्वतःच्या व तुमच्या वर्गाच्या हिताचें आहे. नव्हे, अशा प्रसंगीं सरकारला पाठिंबा देणें हेंच तुमचें कर्तव्य आहे. "

गव्हर्नरसाहेबांनीं यानंतर औपचारिक दरबारी पद्धतीनें भय्यासाहेबांशी आदरपूर्वक हस्तांदोलन करून त्यांना निरोप दिला; आणि भय्यासाहेबहि त्रस्त मनानें बाहेर येऊन आपल्या मोटारींत बसून गणेशखिंडीच्या बंगल्यातून निघाले. गव्हर्नरांची मुलाखत आटोपल्यावर आपल्याकडे येऊन जाण्याबद्दल होम मेंबर ना. आर्मस्ट्राँग यांनीं त्यांना चिठ्ठी पाठविली होती. त्याप्रमाणें त्यांनीं आपली मोटार आर्मस्टाँगसाहेबांच्या बंगल्याकडे नेली. भय्यासाहेबांचें मन यावेळी फारच उद्विग्न झालें होतें. गव्हर्नरसाहेबांनीं त्यांना खऱ्या इंग्रज गृहस्थास शोभेशा आदरानें व सन्मानानें वागविलें हें खरें; पण त्याबरोबरच तुम्हीं आमच्या बाजूनेंच मत दिलें पाहिजे हेंहि त्यांना तितक्या स्पष्टपणानेंच कळविलें होतें. या अडचणींतून मार्ग कसा काढावा याबद्दल भय्यासाहेबांच्या डोक्यांत विचार चालले आहेत तोंच त्यांची मोटार आर्मस्ट्राँगसाहेबांच्या बंगल्यांत येऊन पोंचली. आर्मस्ट्राँग त्यांची वाटच पहात होते. पट्टेवाल्यानें त्यांच्या खोलींत भय्यासाहेबांना नेऊन सोडतांच साहेब उठून स्वागत करून म्हणाले "काय, सरदारसाहेब, गव्हर्नरसाहेबांनीं आपल्याला सगळी परिस्थिति समजावून दिली असेलच! मग त्यांच्याकडून तरी आपली खात्री पटली कां?"

"सरकारच्या बाजूनें मत दिलें पाहिजे, अशी तुम्हांला सक्तीच करावयाची असली तर मग माझी खात्री पटली काय किंवा न पटली काय सारखेंच!" भय्यासाहेबांनीं खुर्चीवर बसतां बसतां स्मित करून उत्तर दिलें.

हें उत्तर ऐकून ना. आर्मस्ट्रॉंग मनांत जरा चमकले; पण चेहऱ्यावर हास्य आणून स्नेहाच्या आवाजानें ते ह्मणाले, "हे पहा, सरदारसाहेब, आपण जरा समंजसपणानें विचार करा. मि. ब्रूक्ससारख्या आमच्या सर्व्हिसमधल्या नाणावलेल्या अधिकाऱ्याविरुद्ध भर कौन्सिलांत निंदाव्यंजक ठराव आला असतांना स्वस्थ कसें बसवेल? सिव्हिलियनांची किंबहुना सरकारची इभ्रत या गोष्टीवर अवलंबून आहे. ब्रूक्स याच्या हातून कांहीं अनुचित वर्तन घडलें असेल; पण तें सरकारी धोरण अमलांत आणण्याच्या सद्धेतूनें घडलें आहे. तेव्हां त्यांचें या हल्ल्यापासून संरक्षण करणें हें सरकारचें कर्तव्य नाहीं काय? सरकारी अधिकाऱ्याचा तुम्हां सरदार इनामदार लोकांना हरहमेश उपयोग होतो; तेव्हां तुह्मीहि अशा प्रसंगीं त्यांचा बचाव करणे तुमचें कर्तव्य आहे असें नाहीं कां तुह्मांला वाटत?"

"मि. ब्रूक्स यांच्याशीं माझें व्यक्तिशः भांडण कांहीच नाहीं. ते हुशार अधिकारी असतील; पण लोकांबद्दल ते तितकेच बेपर्वा आहेत हेंहि खरें आहे. सरकारचें धोरण अमलात आणणें त्यांचें कर्तव्य होतें, व तें त्यांनी केलें याबद्दलहि त्यांना कोणी दोष देणार नाहीं. पण तें कामसुद्धां शक्य तितकी माणुसकी आणि सौजन्य दाखवून त्यांना करतां आलें नसतें काय? मी त्याच जिल्ह्यांतला असल्यामुळें मला सर्व गोष्टी प्रत्यक्ष ठाऊक आहेत. कित्येक गोष्टींची समक्ष चौकशी करून त्यांची दाद मागण्यासाठीं मी त्यांजकडे स्वतः गेलों; पण त्यांनीं माझ्या विनंतीचा बेगुमानपणें अनादर केला. या सगळ्या हकीकती मला ठाऊक असतां मी उद्यां त्यांच्याविरुद्ध येणाऱ्या ठरावास विरोध करावा, आणि सरकारच्या बाजूनें मत देऊन त्यांचा बचाव करावा हें मला, माझ्या सदसद्विवेक बुद्धीचा खून केल्याशिवाय तरी, शक्य नाहीं. माझे सहकारी, आणि माझ्या जिल्ह्यांतील लोक मला काय म्हणतील? मला उद्यां लोकांत तोंड काढायला सुद्धां जागा रहाणार नाहीं!"

"उं:! येवढीच कां तुमची भीति?" ना. आर्मस्ट्रॉंग ह्मणाले. "अहो, आम्ही सबंध सरकार तुमच्या पाठीशीं असतां मग कशाला हो

तुह्माला इतर लोकांची भीति ? सरदारसाहेब, आपली यावेळची मदत सरकार विसरणार नाहीं, हें मी आपल्याला आश्वासन देतों. अहो, लोकांना कां उगीच भितां ? तुमचा संबंध काय लोकांशीं ? आणखी शिवाय तुम्हीं कांहीं लोकांचे प्रतिनिधी नव्हेत ! त्यांच्या हिताहिताचा विचार तुम्हांला कशाला ? तुह्मीं इनामदार वर्गाचे प्रतिनिधी आहांत, आणखी म्हणून तुम्हांला आपल्या वर्गाच्या हिताचाच विचार प्रथम केला पाहिजे."

"पण आम्हीं आणखी इतर लोक सर्वजण एकाच देशातले हिंदी आहोंत ना ? त्यांचे आणखी आमचे हितसंबंध वेगळे कां आहेत ?" भय्यासाहेबांनीं उत्तर केलें.

"ओ ! हो !" ना. आर्मस्ट्राँग मोठ्यांदां हंसून म्हणाले. "सरदार-साहेब, तुमच्यांतील इतर राजकीय बेजबाबदार पुढाऱ्यांप्रमाणें तुह्मीहि भावनावश होऊन विचार करूं लागलां तर ! अहो, तुम्हांला सांगितलं कोणी कीं, तुमचे आणखी इतर लोकांचे हितसंबंध एक आहेत म्हणून ? ते तसे असते तर तुम्ही इनामदारांनीं कौंसिलांत असा सवता सुभा मागितला असता कशाला ? फार लांब कशाला, या सारावाढीच्या प्रश्नाचेंच उदाहरण घ्या ना ? सारा वाढण्यांत तुमचं हित आहे ना ! पण लोकांची इच्छा काय आहे ? ओ, नो, सरदारसाहेब असले भलते गैरस-मज करून घेऊं नका. उद्यां ब्रिटिश सरकार या देशांतून गेलं तर तुमचं अस्तित्व हे लोक डिमॉक्रसीच्या तत्त्वावर एक क्षणभरसुद्धां टिकूं देणार नाहींत. तुम्हां सरदार इनामदारांचे हितसंबंध रयतेशीं निगडित नसून सरकारशीं निगडित आहेत."

"आपण म्हणतां हें कांहीं अंशीं खरं, पण लोकांच्यांत राहून त्यांच्या-विरुद्ध वागून आम्हांला कसं चालेल ? तुम्ही सरकारी अधिकारी तरी आमच्या जन्माला पुरणार आहांत थोडेच ?"

"पण तुम्हीं आपल्या इनामदार बंधूंचा तरी विचार कराल कीं नाहीं ? तुम्हीं उद्यां सरकारच्या विरुद्ध मत दिलें तर तें तुमच्या वर्गांतील तुमच्या

किती लोकांना पसंत पडेल ? मि. ब्रूक्स यांनीं, जुलमानं का होईना पण, वाढलेला सारा वसूल केल्यामुळं इनामदार वर्गाचा फायदाच झालेला आहे. तेव्हां त्यांच्याविरुद्ध तुह्मीं मत देऊन सरकारचं मत इनामदारवर्गाविरुद्ध कलुषित होऊं देणं हें तुमच्यापैकींच पुष्कळ लोकांना खास आवडणार नाहीं. पहा बुवा, तुह्मीं उच्चविद्याविभूषित आहांत, अनेक वर्षें सार्वजनिक कार्यांत पडलेले आहांत. तुमचं हिताहित तुम्हांला कळतंच आहे तेव्हां मी तुमच्यावर सक्ती करितों असं नाहीं. पण आपली खरी वस्तुस्थिति तुमच्यापुढं मित्रत्वाच्या नात्यानं मांडली इतकंच !"

भय्यासाहेब यावर काय उत्तर द्यावें याचा विचार करीत होते. त्यांची स्थिति फारच विचित्र झाली.मि. ब्रूक्स यांच्या वर्तनाचा त्यांना खरोखरीच अतिशय संताप आला होता; आणि त्यामुळें त्यांजविरुद्ध येणाऱ्या ठरावाला आपला दुजोरा देण्याचें त्यांनीं आपल्या सहकाऱ्यांना अभिवचनहि दिलें होतें. पण इकडे खुद्द गव्हर्नरांसह सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची ही अशी भीड. यांतून कसा मार्ग काढावा याचा त्यांच्यापुढें खरोखरीच मोठाच पेंच पडला.

भय्यासाहेबांची मनस्थिती आर्मस्ट्राँग यांनीं बरोबर ओळखली. ते गोंधळले यांतच साहेबांनीं आपला निम्मा डाव जिंकला; आतां आपला शेवटचा रामबाण काढण्याला योग्य संधी आहे असें पाहून ते म्हणाले, "जाऊंद्या, सरदारसाहेब, आपण हा विषय आतां सोडून देऊं. तुम्हीं ठरावाला अनुकूल मत दिल्यानं आमचें म्हणजे विशेष नुकसान होणार आहे असें नाहीं; पण तुमच्यासारख्या जनतेच्या अभिजात पुढाऱ्यांचा आम्हांला पाठिंबा असावा इतकीच आमची इच्छा. पण तें असो, आज हिज् एक्सेलेन्सी आपल्याशीं दुसऱ्या एखाद्या गोष्टीबद्दल कांहीं बोलले का ?"

"नाहीं बुवा ! आमचें फक्त उद्यांच्या ठरावाबद्दलच बोलणें झालें. दुसऱ्या कोणत्या गोष्टीबद्दल ते बोलणार होते ?"

ना. आर्मस्ट्रॉंग यांनीं आपला आवाज जरा हळूं केला, आणि गूढार्थाच्या स्वरानें म्हटलें, " विशेष कांहीं नाहीं; अझून त्यांत नक्की कांहींच नाहीं; मला वाटतं मी इतक्यांत तुमच्याशीं तें बोलणं हेंहि रास्त नाही. पण तुमचा स्नेही या नात्यानं मला बोलल्याशिवाय राहवत नाहीं."

भय्यासाहेबांच्या मनांत साहेबांच्या या बोलण्यानें अर्थातच एक प्रकारची उत्सुकता उत्पन्न झाली. तथापि ती बाहेर दिसूं न देतां ते म्हणाले, " मला ती गोष्ट सांगणें शक्य नसलें तर माझा आग्रह नाहीं. पण मजवरचा विश्वास आपल्या पश्चात्तापास कारण होणार नाहीं, एवढें मात्र मी आपणांस अभिवचन देतों."

" वा! त्याबद्दल तर माझी खात्रीच आहे; आणि म्हणूनच मी तुम्हांस विचारलें आपले रेव्हेन्यू मेंबर सर वुइल्यम पुढल्या मार्चमध्यें रिटायर होणार आहेत; हें तुम्हास ठाऊक आहेच. त्यांच्या जागीं दुसरा कोण नेमावा याबद्दल स्टेटसेक्रेटरींकडे शिफारस करावयाची आहे. त्यांच्या जागीं आतां एखाद्या हिंदी गृहस्थाची नेमणूक करावी असें हिज एक्सेलेन्सी म्हणत होते; आणखी त्या बाबतीत त्यांनी तुमचंहि नांव मजजवळ एकदां काढलं होतं. तेव्हां आपलं सहज विचारलं, कीं त्याबद्दल ते तुम्हांला कांहीं म्हणाले कां? कांहीं हरकत नाहीं. विचारतील पुनः केव्हां तरी. बरं. असो; मी आपला बराच वेळ घेतला, नाही? आपण गव्हर्मेंट हौसमधून मुद्दाम इकडे आलांत याबद्दल मी आपला फार आभारी आहें. उद्यां कौन्सिलहॉलमध्यें आपली गाठ पडेलच!" इतकें बोलून साहेब उठलेच, आणि त्यांनीं भय्यासाहेबांना निरोप दिला.

—२—

ना. आर्मस्ट्रॉंग यांनीं आपला डाव मोठ्या कुशलतेनें टाकला, यांत संशय नाहीं. सरदार भय्यासाहेब तेथून फारच वेगळ्या मनस्थितींत बाहेर पडले. त्यांच्या जिल्ह्याचे कलेक्टर मि. ब्रूक्स यांच्या जुलमी व अरेरावी कारकीर्दीचा त्यांना खरोखरीच संताप आला होता; आणि रयतेच्या त्यांच्याविरुद्ध ज्या तक्रारी होत्या त्यांत त्यांना रयतेबद्दल अंतःकरणपूर्वक सहानुभूति वाटत होती. म्हणूनच त्यांच्या जिल्ह्यातर्फे निवडून

आलेले कौन्सिलांतील प्रतिनिधी बाळासाहेब साने यांनीं, मि. ब्रूक्स यांच्या विरुद्ध निंदाव्यंजक मत व्यक्त करून त्यांच्या कृत्यांची चौकशी करण्याचा ठराव कौन्सिलांत आणण्याचें ठर- लें, तेव्हां, भय्यासाहेबांनीं त्यांना आपला जोराचा पाठिंबा देण्याचें वचन दिलें; व भय्यासाहेबांचा या ठरावास दुजोरा मिळणार आहे हें समजतांच त्याला बरेंच महत्व येऊन त्याबद्दल चहूंकडे चळवळहि झाली.

एका सिव्हिलिअनाविरुद्ध निंदाव्यंजक ठराव पास होऊन त्याच्या कृत्यांची कमिटीमार्फत चौकशी व्हावी ही गोष्ट नोकरशाहीस केव्हांहि अप्रियच असणार; आणि त्यासाठीं त्या ठरावास तोंड देण्याची सरकारपक्षानेंहि कसून तयारी चालविली. खुद्द गव्हर्नरांनी भीड घातली तरी तिला दाद न देण्याचा भय्यासाहेबांचा निश्चय होता; व तो त्यांनी कदाचित् पार पाडलाहि असता, परंतु सर वुइल्यम स्मिथ यांच्या जागीं एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलर होण्याचा मोह खरोखरीच मोठा होता आर्मस्ट्रॉंग साहेबांच्या बोलण्याचा रोख त्यांच्या ताबडतोब लक्षांत आला. आपण उद्यांच्या ठरावाच्या बाबतींत सरकारला मदत केली तरच आपणांस ती जागा मिळणार असा त्यांत स्पष्ट ध्वनि होता; व हें आमिष एकदां लागल्यावर त्यांचें मन डळमळूं लागलें. त्यांना वाटलें "उद्यांच्या एका ठरावावर लोकपक्षाच्या बाजूनें मत देऊन जें राष्ट्रहित होईल, त्यापेक्षा कितीतरी अधिक राष्ट्रहित एक्झिक्यूटिव्ह कौंसिलर होऊन करितां येईल. मग मोठ्या फायद्यासाठीं या बारिकशा गोष्टींचें महत्त्व कां मानावें? आतां उद्यां आपलें पहिलें अभिवचन मोडून सरकारपक्षास मिळाल्याबद्दल लोकांत आपली नापत होईल हें खरें, पण एकदां आपण रेव्हेन्यू मेंबर झालों, की आपला बाणेदारपणा आणखी लोकहिततत्परता दाखवून लोकमत तेव्हांच बदलून टाकूं. लोकमत काय नेहमींच अस्थिर असतें. अशा अस्थिर गोष्टीला महत्त्व देऊन अधिक टिकाऊ राष्ट्रहित करतां येण्याची संधी कां घालवावी?" अशा प्रकारचे अनेक विचार भय्यासाहेबांच्या डोक्यांत येऊं लागले.

पण---पण सर्वांच्या मार्गांत एकच मोठी अडचण होती; आणि ती म्हणजे सरलाबाईची-त्यांच्या पत्नीची-होय. या विचारांत आपल्या

पत्नीचें स्मरण होतांच लोकपक्षास फशीं पाडून एक्झिक्यूटिव्ह कौंसिलर होण्याचे त्यांचे विचार एकदम थबकले. कौटुंबिक प्रपंचांतल्याप्रमाणें त्यांच्या सार्वजनिक प्रपंचांतहि सरलाबाई या त्यांच्या खऱ्या सहचारिणी होत्या. त्या एका प्रसिद्ध पुढाऱ्याची कन्या असून त्यांचें युनिव्हर्सिटीचें शिक्षण भय्यासाहेबांइतकेंच झालें होतें. आपल्या वडिलांच्या उदाहरणानें आणि प्रेरणेनें त्यांच्यांत सार्वजनिक कार्यांची खरी आवड उत्पन्न झाली होती; आणि भय्यासाहेबांसारख्या सुशिक्षित व संपन्न गृहस्थाशीं लग्न झाल्यामुळे मनाप्रमाणें सार्वजनिक कार्यांत भाग घेण्यास त्यांना संधीहि चांगली मिळाली. सरलाबाईसारखी पत्नी मिळाली नसती तर, इतकी विद्या संपादन करूनहि आपल्या सरदारी बाण्यामुळें भय्यासाहेब आपला कूपमंडूक आयुष्यक्रमच कंठित राहिले असते; पण सरलाबाईनीं त्यांना अनेक कार्यांत भाग घ्यावयास लावून लोकांपुढें आणलें. त्यांच्या आजच्या परिस्थितीचें आणि लोकांत इतकें वजन मिळण्याचें मुख्य कारण सरलाबाई होत्या, ही गोष्ट भय्यासाहेब जाणून होते. गेल्या चुरशीच्या निवडणुकीत मिळालेला विजय हाहि पुष्कळ अंशीं त्यांच्या पत्नीच्या अविश्रांत परिश्रमाचाच परिणाम होता. आपल्या पत्नीच्या कर्तृत्वाबद्दल आणि अशा स्त्रीचें आपल्यावर प्रेम असावें याबद्दल त्यांना नेहमी अभिमान वाटे; व हें तिचें आपल्याविषयींचें प्रेम आणि आदर कायम टिकावा अशाबद्दल त्यांचा अहर्निश प्रयत्न असे.

त्यांची स्वतःची परिस्थिति अशी असल्यामुळें सरलाबाईच्या सल्ल्या-शिवाय कोणताच निर्णय करणें त्यांना शक्य नव्हतें; आणि इतका वाद-विवाद व सर्व बाजूंनीं विचार करून सान्यांच्या उद्यां येणाऱ्या ठरावाला दुजोरा देण्याचें एकदां ठरल्यावर त्यांत पुनः बदल करण्यास आपल्या पत्नीची संमति मिळेल ही गोष्ट अगदीं अशक्य, हें तर भय्यासाहेबांस दिसतच होतें. कारण गव्हर्नर साहेबांनीं मुलाखतीस बोलाविलें तेव्हां त्यांचा हेतु काय हें ओळखून त्यांचें आणि सरलाबाईचें बोलणें झालें, तेव्हांच गव्हर्नरांच्या भिडेस बळी पडून लोकपक्षालें फशीं न पाडण्याबद्दल सरलाबाईनीं त्यांना स्पष्ट बजावलें होतें. म्हणून आतां

जर आपण उद्यांच्या ठरावाविरुद्ध मत देऊन सरकारपक्षास मिळालों, तर गव्हर्नरांचा रोष सहन करण्याचें आपल्या अंगांत धैर्य नाहीं असा त्याचा उघड अर्थ होऊन, आपल्या बायकोस आपल्याबद्दल अनादर वाटावा ही कल्पनाहि त्यांस सहन होईना.

भय्यासाहेबांनीं घड्याळांत पाहिलें तों पावणेचार वाजण्याचा सुमार झाला होता. गव्हर्नरांच्या मुलाखतींत काय झालें हें समजण्यासाठीं, आणि उद्यांच्या ठरावासंबंधी वाटाघाट करण्यासाठीं साने आणि इतर कांहीं सभासद स्नेही त्यांच्या घरीं चार वाजतां येणार होते. पण इतक्यांत घरीं जाऊन त्या मंडळीशीं बोलण्यासारखी भय्यासाहेबांची मनस्थिति नव्हती. काय करावें याचा विचार करण्यासाठीं त्यांना वेळ हवा होता. आपण घरीं वेळेवर न गेलों तरी, येणाऱ्या पाहुण्याचें आदरातिथ्य बायको करील-च हें त्यांस ठाऊक होतें; आणि आपल्यास उशीर झाला तो कांहीं मह-त्त्वाच्या कामांत अडकल्यामुळेंच झाला असेल अशीहि मंडळींची समजूत होईल. म्हणून त्यांनीं घरीं न जातां आपले स्नेही हत्तीपूरचे चीफसाहेब यांच्या बंगल्यावर जाऊन त्यांची सल्ला घेण्याचें ठरविलें.

चीफसाहेब घरींच होते; त्यांचा आणि भय्यासाहेबांचा कॉलेज-पासून फार स्नेह जडला होता; त्यामुळें त्यांच्याजवळ आपली सर्व अडचण मोकळेपणानें सांगण्यास भय्यासाहेबांस मुळींच संकोच वाटला नाहीं भय्यासाहेबांची हकीकत ऐकून चीफसाहेब म्हणाले " तुमचा मार्ग स्पष्ट आहे. रेव्हेन्यू मेंबरची जागा मिळण्याची संधी तुम्ही मुळींच वांया घालवूं नये. असली जबाबदारीची व महत्त्वाची जागा मिळवून तुम्हांला जे भरीव कार्य करितां येईल त्यापुढें उद्यांच्या ठरावाचें कांहींच महत्त्व नाहीं! शिवाय ज्या ब्रूक्सवर तुमचा राग आहे त्याच्यावर उद्यां रेव्हेन्यू मेंबर होऊन तुह्मांस अधिकार चालवितां येईल ही गोष्टहि महत्त्वाची नाहीं काय?"

" तें मलाहि पटतें " भय्यासाहेब म्हणाले. " पण माझी अडचण मी आपल्याला सांगितलीच आहे. ती आपल्याला कदाचित् इतक्या मह त्त्वाची वाटणार नाहीं; पण माझ्या दृष्टीनें ती फारच महत्त्वाची आहे. "

"पण सरलाबाईना या तुमच्या मेंबरच्या जागेबद्दलची हकीगत कळविली तर ? या दोन गोष्टींमधील कमी अधिक महत्त्व त्यांना तेव्हांच पटेल ?" चीफसाहेबांनीं विचारलें.

"छे, छे, त्याचें नांवसुद्धां काढूं नका. माझ्या बायकोचा स्वभाव मी चांगला ओळखतों. लोकपक्षापासून मला फोडण्यासाठीं सरकारची ही एक हुलकावणी आहे, असाच ती त्याचा अर्थ करील आणि तें तसें नसेलच असें म्हणायला आपल्याजवळ तरी काय साधन आहे? कारण आर्मस्ट्रॉंग यांचे उद्गार अगदींच अनिश्चित होते!"

"तरी पण बुडाशी कांहीं तरी असल्याशिवाय जबाबदार अधिकारी उगीच कांहींतरी बोलणार नाहीं." चीफसाहेब म्हणाले.

"तें खरें" भय्यासाहेबांनी उत्तर दिलें; "पण एक्झिक्यूटिव्ह कौंसिलर होण्याच्या लालसेनें मी सरकार पक्षाच्या बाजूस मत द्यावें हें माझ्या बायकोस कधींहि आवडणार नाहीं. ती मग माझा इतका तिरस्कार करील कीं त्यानंतर मला एक्झिक्यूटिव्ह कौंसिलरची जागाच काय, पण प्रत्यक्ष राज्यपद जरी कोणी दिलें तरी त्यांत मला आनंद वाटणार नाहीं. तिच्याकडून तिरस्कृत होऊन राज्यपद भोगण्यापेक्षां, तिचा मजबद्दलचा आदर व प्रेम कायम राखून भिकारी होणं मी अधिक आनंदानं पत्करीन."

भय्यासाहेबांचे हे उद्गार इतक्या मन:पूर्वक निघाले कीं, त्यांच्या खरेपणाबद्दल कोणासहि संशय राहिला नसता. चीफसाहेबांवरहि त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहीं. त्यांनीं कांहीं वेळ भय्यासाहेबांकडे कौतुकानें पाहिलें; आणि डोक्यांत कांहीं विचार करून म्हटलें,

"भय्यासाहेब, मी एक युक्ति काढली आहे. तुम्हीं प्रथम सरकारपक्षाला मत तर द्या; सरलाबाईचा गैरसमज मागाहून दूर करण्याची मी हमी घेतों."

"पण मला तिच्यासमोर कौंसिलांत सरकारच्या लॉबींत शिरणेंच शक्य नाहीं." भय्यासाहेबांनीं उत्तर दिलें.


" त्या उद्यां कौंसिलच्या बैठकीला हजर राहूं शकणार नाहींत अशी मी तजवीज केली तर ? मग तुह्मी सरकारच्या बाजूला मत देऊं शकाल ? तुमच्या इतर मित्रांची भीड तुह्मांला तोडवेल ?" चीफसाहेबांनीं विचारलें.

" ओ यस्. त्या लोकांची मी समजूत काढीन; आणि त्यांचा गैर-समज झाला तरी त्याची मी फिकीरहि करीत नाहीं. पण सरलेला तुह्मीं उद्यां कौंसिलच्या बैठकीला गैरहजर कसे ठेवणार ? माझ्याबरोबर येऊन ती रोज प्रेक्षकांच्या गॅलरींत हजर असते. आणखी उद्यां मोठा कडाक्याचा वाद होणार असल्यामुळं तो तर ती खास बुडविणार नाहीं."

" तें कांहीं अवघड नाहीं. उद्यां धाकट्या राजकन्येचा वाढदिवस आहे त्यासाठीं त्यांना मी राणीसाहेबांकडून भोजनाचें आमंत्रण पाठवितों; आणखी त्या आल्या म्हणजे संध्याकाळपर्यंत त्यांना ठेवून घेतों. तुम्हीं मात्र यापैकीं अक्षरहि त्यांच्याजवळ इतक्यांत बोलूं नका. संध्याकाळीं बैठक संपतांच तुम्हीं थेट इकडेच या. म्हणजे सरलाबाईच्या समोर सगळी चर्चा करून त्यांचा तुमच्याबद्दल गैरसमज होईल तो मी खास दूर करीन. एक्झिक्यूटिव्ह कौन्सिलरची महत्त्वाची जागा आपल्या माणसाच्या पद-रांत पडण्यासाठीं सरकारपक्षाशीं इतकी तडजोड करायला मुळींच हरकत नाहीं !"

— ३ —

चीफसाहेबांशीं याप्रमाणें बेत करून भय्यासाहेब घरी आले खरे, पण त्यांचें मन त्यांना सारखें खात होतें. परंतु एक्झिक्यूटिव्ह कौंसिलरच्या जागेचा मोहहि त्यांना तितकाच अनावर वाटत होता; आणि ही जागा आपण लोकहित साधण्यासाठींच पत्करणार आहोंत, व ती एकदां मिळा-ल्यावर आपल्याबद्दलचे सर्व गैरसमज आपल्या कामानें आपण दूर करून शकूं असें त्यांना वाटत असल्यामुळें, आरंभीं थोडीशी लबाडी किंवा मुत्स-द्देगिरी लढवावी लागली तरी हरकत नाहीं, असा त्यांनीं आपल्या मनाचा समज करून घेतला. त्यामुळें घरीं सहा वाजतां परत येऊन सरलाबाईची गांठ पडल्यावर आपल्या मुद्रेवर त्यांनीं कसलाहि फेरबदल दिसूं दिला



बाळासाहेबांनीं पेला खालीं ठेवून म्हटलें “ मला ही शंका काल......तेव्हांच आली होती ! ”

—संरक्षक देवता [ पृ. ११४ ]

नाहीं. गव्हर्नेरांनीं आपल्या उद्यांच्या ठरावाविरुद्ध मत देण्यास खूप भीड घातली; पण आपण केवळ औपचारिक उत्तरें देऊन वेळ मारून नेली इतकीच हकीकत त्यांनीं आपल्या पत्नीस सांगितली. सरलाबाईनींहि बाळासाहेब साने व दुसरे सभासद चार वाजतां येऊन तास दीडतास वाट पाहून कसे गेले, त्यांचें व आपलें काय बोलणें झालें, इत्यादि हकीकत सांगितली; व म्हणाल्या " साने आणखी सांगत होते कीं, सरकारकडून म्हणे उद्यांचा ठराव हाणून पाडण्यासाठी भगीरथ प्रयत्न चालले आहेत. सिंधचे सगळे सभासद ऐकेनात म्हणून त्यांना उद्यां बैठकीला हजर न रहातां रेसेस्‌ला तरी जाऊन बसा, म्हणजे तुमची मतं इकडेहि नकोत नि तिकडेहि नकोत असं कमिशनरनं निकरानं सांगून पाठविलें आहे. ब्राह्मणेतरांना फोडण्याबद्दलहि असेच जारीचे प्रयत्न चालले आहेत. तुम्हांला जेव्हां गव्हर्नमेंट हौसमधून यायला उशीर लागला, तेव्हां बाळासाहेब आणखी त्यांच्या बरोबरची दुसरी मंडळी तुमच्याबद्दलहि साशंक होऊं लागली. पण जेव्हां मी त्यांची खात्री पटवली, आणखी तुमच्या उद्यांच्या भाषणाचीं टिपणं केलीं होतीं तीं दाखविलीं तेव्हां त्यांचं समाधान झालं. तरीसुद्धां ते म्हणालेच, कीं गव्हर्नर आयत्या वेळीं काय आमिष दाखवील अन् काय नाहीं तें कांहीं सांगतां येत नाहीं ! कलेक्टरच्या जुलमी वर्तनावर पांघरूण घालून त्याचं समर्थन करण्यासाठीं जर सरकारचा इतका प्रयत्न चालला आहे, तर उद्यांचा ठराव पास होऊन त्यांचं नाक खालीं झालंच पाहिजे. नाहीं ? "

सरलाबाईचें हें भाषण ऐकून भय्यासाहेबांस कसेसेंच झालें. त्यांनीं कंटाळवाण्या स्वरानें म्हटलें " पुरे बुवा, या गोष्टी आतां. त्याच त्या दिवसभर बोलून वीट आला आहे. आतां उद्यांपर्यंत नांव नको त्या विषयाचं. मला तर फार थकल्यासारखं झालं आहे. "

भय्यासाहेबांच्या उद्गारांची सत्यता त्यांच्या मुद्रेनें पटविली. तिकडे सरलाबाईचें लक्ष जातांच त्या त्यांच्याजवळ जाऊन व त्यांच्या केसांवरून वात्सल्यानें हात फिरवीत म्हणाल्या " खरंच, येईल कंटाळा, नाहीं तर

काय ? मनाला दगदग न् त्रास थोडा का आहे ? मग बाहेर चलतां का फिरायला. चला, कँपांतल्या एखाद्या सिनेमाला जाऊन येऊं. तितकाच तुमच्या मनाला बदल होईल. "

" नको बुवा त्या गर्दींत आणि कोंदट जागेंत." भय्यासाहेब म्हणाले. " त्यापेक्षां डेक्कन कॉलेजच्या बाजूला मोकळ्या हवेंत जाऊं. विद्यार्थीदशेंत आनंदानं दिवस घालविलेल्या त्या जागेकडं पाहिलं, म्हणजे पूर्वीच्या सगळ्या गोड आठवणी होऊन मन कसं पुनः तरुण होतं ! "

४

कौन्सिलच्या मधल्या उपहाराच्या सुटींत सरदार भय्यासाहेब आणि बाळासाहेब साने उपहाराच्या खोलींत एका बाजूच्या टेबलावर दोघेच चहा घेत बसले होते. त्या दोघांच्याहि मुद्रेवरून त्यांच्यामधील संभाषणाचा विषय आल्हादकारक नसल्याचें सहज दिसून येत होतें. बाळासाहेबांनीं हातांतील पेला खालीं ठेवून म्हटलें,

" मला ही शंका काल तुम्हांला गव्हर्मेंट हौसमधून परत यायला उशीर लागला तेव्हांच आली होती. तुम्ही कोणाचीहि भीड ऐकणार नाहीं असें वहिनीसाहेबांनीं मला खात्रीपूर्वक सांगितलें; पण अर्थातच त्यांना तसें साहाजिकपणेंच वाटणार. एकंदरींत सरकारनें आपला डाव चांगलाच टाकला. ज्यांच्या पाठिंब्याची आम्हांस खात्री होती त्यांपैकीं कित्येकांना आज गैरहजर ठेवण्यांत सरकारी अधिकाऱ्यांनीं यश मिळविलें आहे. तुमची ही स्थिति ! मग काय, आजच्या ठरावाचं भवितव्य दिसतंच आहे ! " साने एक दीर्घ सुस्कारा सोडून म्हणाले.

" बाळासाहेब, तुह्मी मला आजच नव्यानें ओळखत नाहीं. आजचा ठराव नापास होऊन सरकारपक्षाचा जय झाला तर मला खरोखरीच अतिशय वाईट वाटेल. असें असतां मी केवळ गव्हर्नरसाहेबांच्या भिडेला बळी पडून असें वर्तन करीन असें आपल्याला वाटतें कां ? त्याला खरोखरीच अशीं दुसरीं कांहीं कारणें आहेत, कीं जीं मला यावेळीं आपल्यास सांगतां येत नाहींत. तीं तशीं आहेत, आणि आपल्या सर्वांच्या हिताच्या

दृष्टीनेंच मला असें करावें लागत आहे, या माझ्या शब्दांवर विश्वास ठेवून आपण मला माझ्या वचनांतून मुक्त करा, अशी मी आपल्याजवळ याचना करितों आहे. माझ्या शब्दांवर आपला विश्वास नाहीं का बसत ?"

भय्यासाहेबांचा आवाज इतका काकुळतीचा होता कीं, त्यांच्या वर्तनाच्या आड खरोखरीच कांहीं तरी गुपितं आहे, आणि त्यामुळें त्यांचा नाइलाज झाला आहे याबद्दल साऱ्यांची खात्री झाल्याशिवाय राहिली नाहीं. ते म्हणाले, "भय्यासाहेब, आपला इतकाच आग्रह आहे तर मी आपल्या वचनांतून आपल्याला मुक्त करितों. पण या आपल्या परिवर्तनाचा नैतिक परिणाम किती अनिष्ट होणार आहे याचा आपणच विचार करा म्हणजे झालें. आतां इतकी आणीबाणीची वेळ आहे कीं, कदाचित् तुमच्या एकट्याच्या मतावर ठरावाचं भवितव्य अवलंबून राहील. माझा स्वतःचा आपल्याबद्दल कांहीं गैरसमज होणार नाहीं हें मी आपल्याला आश्वासन देतों; पण इतर सर्वांचा आपल्याबद्दल आणि त्याबरोबरच सर्व इनामदार वर्गाबद्दल किती गैरसमज होईल हें आपल्या लक्षांत आहे का ? सरकाराविरुद्ध झगडतांना ऐन आणीबाणीच्या वेळीं सरदारइनामदारांचा विश्वास यापुढं कोणालाहि धरतां येणार नाहीं; आणि तुमच्या वर्गासंबंधींचीं बिलें किंवा प्रश्न कौन्सिलपुढं येतील त्यावेळीं लोकप्रतिनिधींचीहि इतकी सहानुभूति तुम्हांस मिळणं अवघड जाईल."

"या गोष्टी माझ्या लक्षांत आहेत पण मी हें माझ्या किंवा माझ्या वर्गाच्या कोणत्याहि स्वार्थाच्या हेतूनं करीत नसून एका सार्वजनिक हिताच्या दृष्टीनंच करीत आहे. हा गैरसमज पुढें मी धुवून काढीन अशी मला उमेद आहे." भय्यासाहेब म्हणाले.

"मीहि तीच आशा करितों. पण आजच्या ठरावावर तुम्ही सरकारपक्षातर्फे मत दिल्यानं दुसरंहि एक मोठं नुकसान होणार आहे; आणि त्याचेंच तर मला राहून राहून दु:ख होतं. तें नुकसान असं कीं, अधिकाऱ्यांच्या जुलमी वर्तनाला तुमचा नैतिक पाठिंबा आहे असा तुमच्या मताचा स्पष्ट अर्थ होईल. भय्यासाहेब, तुमचं एक मत सरकारच्या बाजूला गेल्यानं आमचा

ठराव नापास झाला, तरी त्याची मला फिकीर नाहीं. पण तुमच्या मताला जे सामाजिक आणि राजकीय महत्त्व आहे, त्यामुळेंच तें सरकारच्या बाजूनं पडावं ही गोष्ट मला अत्यंत अपमानास्पद वाटते. हाच सरकारचा आमच्यावरील मोठा विजय होय. तुम्ही लोकपक्षाच्या या ठरावाच्या विरुद्ध मत दिलं हें पाहून स्वतः ब्रूक्स आणखी इतर अधिकारी किती शेफारतील याची तुह्मांस कल्पना आहे काय ?"

सान्यांचें हें वाक्य संपतें न संपतें तोंच बैठक सुरूं झाल्याची घंटा झाली व दोघांना उठावेंच लागलें. बैठकीच्या दिवाणखान्याकडे जाताना भय्यासाहेब ह्मणाले, "बाळासाहेब, या सगळ्या गोष्टी मी जाणतों. पण या वर्तनाबद्दल मला आपण क्षमा करा, आणखी मजबद्दल कांहीं गैरसमज करून घेऊं नका हेंच माझं तुम्हांला शेवटचं सांगणं आहे."

ते दिवाणखान्याच्या दाराशी पोंचले. आंत पाऊल टाकण्यापूर्वी बाळासाहेबांनीं उत्तरादाखल एक खेदपूर्ण उसासा सोडला, या सुस्काऱ्याचा अर्थ भय्यासाहेबांस कळला, आणि तो त्यांच्या मनाला किती लागला हें सांगितलेंच पाहिजे काय ?

—५—

बाळासाहेब सान्यांच्या ठरावावर मोठा कडाक्याचा वाद झाला. ठरावास अनुकूल असणाऱ्या सभासदांपैकीं कित्येकांना कांहींनाकांहीं आमिषांनीं आपल्याकडे वळवून घेण्यांत, व कित्येकांना गैरहजर ठेवण्यांत सरकारी अधिकाऱ्यांनीं बरेंच यश मिळविलें होतें, व त्यामुळें हा ठराव कदाचित नापास होण्याचेंहि भय वाटत होतें. तथापि ठराव पुढें मांडतांना बाळासाहेबांनीं फारच परिणामकारक भाषण करून ब्रूक्स् साहेबांच्या अरेरावीचीं अनेक नांवनिशीवार उदाहरणें दिलीं; व त्यांच्या उद्दाम, उद्धट व बेजबाबदार स्वभावाचें चित्र श्रोत्यांच्या पुढें उभें केलें. त्यांचें भाषण चालूं असतां कित्येक ठिकाणी इतर सभासदांनीं "शेम शेमचा" वर्षाव करून ब्रूक्स् यांच्या कृत्याचा निषेध व्यक्त केला. बाळासाहेबांनंतर लोकपक्षीय इतरहि प्रतिनिधी उठले; आणि त्यांनीं ब्रूक्स्

आपापल्या जिल्ह्यांत असतांना त्याजकडून ज्या लीला झाल्या त्यांचें रसभरित वर्णन करून ठरावास दुजोरा दिला. सरकारच्या सारावाढीच्या धोरणाविरुद्धहि कित्येकांनीं टीका केली; आणि त्यामुळें रयतेवर कसा जुलूम होतो हें मि. ब्रूक्स यांच्या उदाहरणावरून दाखविलें. एक वक्ता खालीं बसला कीं आतां भय्यासाहेब उठतील म्हणून सर्व सभासद त्यांजकडे पहात; कारण ते या ठरावास दुजोरा देणार आहेत हें सर्वांस ठाऊक होतें. पण खुर्चीवर बसल्यापासून त्यांनीं आपली मान खालीं घातली ती शेवटपर्यंत वर केलीच नाहीं. फक्त मधून मधून ते प्रेक्षकांच्या गॅलरींतील स्त्रियांच्या सज्जाकडे पहात. गव्हर्नरांच्या गॅलरींत गव्हर्नर असून त्यांचें आपल्याकडे लक्ष आहे, व इतर एक्झिक्यूटिव्ह कौंसिलर्स आपल्याकडे वारंवार पहात आहेत हें त्यांच्या लक्षांत आलें होतें.

सरकारतर्फेहि पांच सहा भाषणें झालीं. ना. आर्मस्ट्रॉंग यांनीं आपल्या भाषणांत मि. ब्रूक्स यांजवरील आरोपांस उत्तरें देण्याचा प्रयत्न करून त्यांच्या-तर्फेची म्हणून कांहीं माहिती कौंसिलास सांगितली. पण त्यापैकीं प्रत्येक अक्षर खोटें व विपर्यस्त आहे हें भय्यासाहेबांस समक्ष ठाऊक होतें. शेवटीं ब्रूक्स यांच्यासारखा सरळ, कार्यक्षम, दयाळू, कर्तव्यदक्ष असा संबंध सिव्हिल सर्व्हिसमध्यें अधिकारी नाहीं असेंहि सर्टीफिकीट त्यांना देण्या-पर्यंत जेव्हां आर्मस्ट्रॉंग यांची पाळी आली, तेव्हां भय्यासाहेबांच्याहि मनाला तें टोंचल्यावांचून राहिलें नाहीं; आणि एक्झिक्यूटिव्ह कौंसिलरची जागा मिळविण्याच्या आशेनें या सर्व खोट्या गोष्टी मुकाट्यानें ऐकून घेण्या-पेक्षां, जळो ती जागा, असाहि वैतागाचा विचार त्यांच्या मनांत अनेकदां येऊन गेला.

सुमारें साडेपांचाच्या सुमाराला वाद संपला; आणि ठरावावर मतें देण्यासाठीं सभासदांस लॉबींत जाण्याची सूचना देणारी घंटा वाजली. सर्व सभासद भराभर उठूं लागले. भय्यासाहेबांस मात्र जागचें उठवेना. त्यांनीं पुनः एकवार वर स्त्रियांच्या सज्जाकडे पाहिलें, व अपेक्षित व्यक्ति तेथें न दिसल्यानें त्यांना धीर आला. इतक्यांत आर्मस्ट्रॉंग यांनीं त्यांच्याजवळ-येऊन म्हटलें, " सरदारसाहेब, आपल्या आजच्या धैर्यानें व समंजसप

णाचें मला फार कौतुक वाटलें. अधिकाराची जबाबदारी आपणांस समजते, व कोणताहि अधिकार उत्तम तऱ्हेनें चालविण्यास आपण लायक आहों हें आपण आज सिद्ध केलें. चला, आपण सरकारी लॉबींत जाऊन आपलीं मतें देऊन टाकूं."

आर्मस्ट्रॉंग यांनीं आपल्या बळकट हातांत त्यांचा हात पकडलाच आणि भय्यासाहेब त्यांच्याबरोबर निर्जीव यंत्राप्रमाणें उठले. ते दोघेहि खुर्च्यांच्या रांगांच्या शेवटीं लॉबींत जाण्याचे दोन वेगळे मार्ग विभागतात तेथें येऊन पोंचले. तेथे येतांच भय्यासाहेब क्षणमात्र थबकले; सर्व लोक-पक्षीय सभासदांचे त्यांच्याकडे डोळे लागले होते; कारण आतांपर्यंत दोन्हीं बाजूला सारखीं मतें पडणार असें दिसून आल्यामुळें भय्यासाहेबांच्या एका मतानेंच सर्व पारडें फिरणार होतें. पण भय्यासाहेब आर्मस्ट्रॉंग साहेबांच्या पकडींत सांपडल्यामुळें त्यांच्या मतांबद्दल आतां शंकाच उरली नाहीं. साने आणि त्यांचे स्नेही सभासद खेदपूर्ण मुद्रेनें भय्यासायेबांकडे पाहूं लागले. भय्यासाहेबांनीं खाली मान घातली; त्यांचा पाय उचलेना; आर्मस्ट्रॉंग यांनीं त्यांच्या हातांत हात घालून त्यांना "कम् ऑन्" म्हणून खेंचलें; भय्यासाहेबांचें पहिलें पाऊल सरकारी लॉबीच्या दिशेला पडलें, इतक्यांत मागें वरच्या प्रेक्षकांच्या सज्जांतून कांहींतरी खालीं दिवाणखान्यांत धाड्दिशीं पडल्याचा आवाज झाला! सर्वांनीं मागें वळून पाहिलें तों पडलेला पदार्थ म्हणजे एक पुस्तक असून तें जिच्या हातून पडलें ती व्यक्ती म्हणजे, सज्जाचे कठडे दोन्ही हातांनीं घट्ट आवळून उभी असलेली, आणि जिचा चेहरा शरमेनें लाल झाला असून, त्याजवर खेद आणि तिरस्कार हे विकार उत्कट रीतीनें व्यक्त झालेले दिसत होते, अशी एक स्त्री होती!

भय्यासाहेबांची दृष्टी त्या स्त्रीकडे गेली मात्र, त्यांचा चेहेरा क्षणमात्र पांढरा फटफटीत पडला; पण लागलीच त्याच्या अंगात नवीन चैतन्य उत्पन्न झालें. त्यांच्या मनावरचें मोहपटल निमिषांत दूर झालें! त्यांनीं आर्मस्ट्रॉंग यांच्या हातून आपला हात जोरानें हिसकावून घेतला. आर्म-स्ट्रॉंग चकित होऊन त्यांचा हात पुनः धरणार तोंच भय्यासाहेब त्यांना

झिटकारून आवेशानें म्हणाले, " नो, नो आर्मस्ट्रॉंग, यू कान्ट टेम्प्ट् मी. आय् व्होट् वुइथ् **माय** पीपल " ( छे, छे, आर्मस्ट्रॉंग, तुम्हीं मला मोहांत पाडूं शकणार नाहीं ! माझें मत मीं **माझ्या** लोकाच्या बाजूनें देणार ! ) त्यांनीं आर्मस्ट्रॉग यांजकडे ताबडतोब पाठ फिरविली आणि ते तडक लोकपक्षाच्या लॉबीत शिरले !

कौंसिलहॉलमध्यें आणि प्रेक्षकांच्या गॅलरींत टाळ्यांचा प्रचंड असा एकच कडकडाट झाला ! सान्यांचा ठराव ४१ वि. ४० अशीं मतें पडून भय्यासाहेबांच्या एका मतामुळेंच पास झाला !

६

त्या रात्री जेवणेंखाणें झालीं. तरी सरलाबाईच्याशी बोलण्याचा भय्यासाहेबांस धीर होईना. घरांतली सर्व देखरेख आटोपून सरलाबाई वर आल्या तों ते दिवाणखान्यांत आरामखुर्चीवर विमनस्कपणें स्वस्थ पडले होते. त्याची ती स्थिति पाहून सरलाबाईस फारच वाईट वाटलें. त्या त्याच्याजवळ खुर्ची ओढून बसल्या आणि त्याच्या डोक्यावर हात ठेवून प्रेमानें म्हणाल्या, " असं कां बरं उगीच वाईट वाटून घेतां ? "

त्यांच्या या प्रेमाच्या शब्दांनीं भय्यासाहेबांस धीर आला व ते म्हणाले, " सरल, तुझी दया अस्थानीं आहे. मनाच्या कमकुवतपणानें मी कोणत्या मोहाला बळी पडत होतों, याची तुला कल्पना आहे का ? "

" होय; पण मी त्यांत तुम्हांला फारसा दोष देत नाहीं. मला ती सगळी हकीकत माझं मन वळवण्याच्या हेतूनं खुद्द चीफसाहेबांनींच दुपारीं चहाच्या वेळेळा सांगितली. माझा त्यांचा त्यावर बराच वादहि झाला. त्यानंतर लागलींच कौंसिलहॉलकडे येण्याचा मी प्रयत्न केला, पण त्यांची मोटार बाहेर गेली होती. शेवटीं मग राणिसाहेबांना सांगून गाडी आणवून मी घाईघाईनं निघून आलें, आणि वर गॅलरींत येऊन पहातें तों दैवयोगानं अगदीं ऐनवेळींच आलें ! "

" मग सरकारनं दाखविलेल्या या आमिषाला भुलून मी तुला दिलेलं वचन मोडल्याबद्दल तुला माझा राग नाहीं आला ? त्यावेळीं तुझ्या मुद्रेवर तिरस्काराची छटा दिसत होती ! "

" त्या वेळेला मला खरोखरीच फार वाईट वाटलं. लोकपक्षाचा हा ठराव आपल्या एकट्याच्या मतानं नापास होऊन लोकांची मान खालीं होणार हें धडधडीत दिसत असतांनासुद्धां, आर्मस्ट्रॉंगबरोबर लॉबीकडे तुम्हीं एकाद्या निर्जीव यंत्राप्रमाणं चाललेले पाहून मला अत्यंत खेद वाटला. त्या भरांत स्वतःचं विस्मरण होऊन मी एकदम उभी राहिलें, आणि त्या झटक्यांत माझ्या मांडीवरचं पुस्तक एकदम खालीं हॉलात पडलं! पण त्यानंच आपल्या दोघांना वाचवलं. मला तुमचा तिरस्कार वाटला असता; पण समोर गव्हर्नरसाहेब आणि जवळ आर्मस्ट्रॉंग असे दोघे तुमच्यापुढें असतां, केवळ माझ्यासाठीं त्या दोघांना तुह्मीं झुगारून दिलं, आणि एक्झिक्यूटिव्ह कौंसिलरच्या जागेचा मोह एका क्षणांत लाथाडून तुम्हीं आर्मस्ट्रॉंगचा हात झिडकारून लोकपक्षाच्या लॉबींत शिरलां हें मी कसं विसरेन!"

सरलाबाईचा आवाज गद्गद झाला. त्यांनीं भय्यासाहेबांच्या जवळ येऊन त्यांच्या खांद्यावर मान टाकली आणि म्हटलें, "मजवरच्या तुमच्या प्रेमाचा आणखी दुसरा कोणता पुरावा पाहिजे? अशा प्रेमळ पतीबद्दल कोणत्या स्त्रीला अभिमान वाटणार नाहीं? तुमच्या प्रेमास मी सदैव असंच पात्र रहावं एवढीच माझी देवाजवळ प्रार्थना आहे."

सरलाबाईच्या उष्ण अश्रूंचा त्यांच्या खांद्याला स्पर्श झाला. भय्यासाहेबांनीं लागलींच त्यांना जवळ ओढलें, व त्यांचें मुख वर करून म्हटलें,

" सरल, काय हें? आपल्याकडे नसता लीनपणा घेऊन मला असं कां लाजवतेस? मला तुझी योग्यता समजत नाहीं? ज्या संरक्षक देवतेनं ऐन-वेळीं येऊन मोहापासून माझं संरक्षण केलं, त्या माझ्या या देवतेला फसविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल मलाच तिची क्षमा मागितली पाहिजे. या देशांत प्रत्येक पुरुषाला जर अशी संरक्षक देवता मिळेल, तर खरो-खरच देशाच्या भाग्योदयाला काय उशीर?"

---

## दीप ६ वा

# ऐक्याच्या दारांत

### ( १९२६ च्या कौंसिल-निवडणुकीची एक गोष्ट )

१

"यमू," आप्पासाहेब निकराच्या स्वरानें म्हणाले, "तूं म्हणतेस तें शक्य नाहीं. मग पुनः पुनः त्याच गोष्टी बोलण्यांत काय अर्थ आहे? राष्ट्राचं हित तुला एकटीला कळतं आणि मला कळत नाहीं? या मवाळ पक्षाचं डोकं वर होऊं न देण्यांतच राष्ट्राचं हित आहे; आणि म्हणूनच मला या निवडणुकींत उभं राहिलं पाहिजे."

"पण आप्पा", आपल्या प्रेमळ व गोड आवाजांत यमूनें विचारिले, "कालाच्या आणि परिस्थितीच्या ओघाबरोबर मवाळही बदलले नाहींत का? तुम्ही म्हणतां तसे आजचे मवाळ असते, तर त्यांच्याशीं सहकार्य करा असं मींही म्हटलं नसतं. पण आतां आज सर्वच बदलले, त्याप्रमाणं पूर्वीचे मवाळही बदलले आहेत. ते तसे बदलले नसते तर * नव्या राष्ट्रीय पक्षांत ते कसे सामील झाले असते? या राष्ट्रीय

* १९२६ च्या एप्रिलमध्यें मुंबईस देशांतील सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांनीं जमून या संयुक्त पक्षाची स्थापना केली; पण मनांत जुने पक्षभेद कायमच असल्यानें हा संयुक्त पक्ष कागदावरच राहिला!

पक्षाच्या व तुमच्या तत्त्वांत व कार्यक्रमांत आतां फरक उरला नाहीं म्हणून तुमचेच पुढारी म्हणतात; इतकंच नव्हे, तर त्यांपैकीं कांहींजण या नव्या पक्षालाही मिळाले आहेत. त्याचप्रमाणं राष्ट्रीय पक्षाला मिळालेल्या मवाळां-पैकीं कांहींजण तुमच्या प्रतिसहकार पक्षाचेही सभासद झाले आहेत. असं असतां पूर्वीच्या पक्षभेदांचा पुनः पुनः उच्चार करून पहिलीच दुही कायम ठेवण्यांत काय अर्थ आहे ? ”

यमूचें हें भाषण ऐकून आप्पासाहेब तिरस्कारानें हंसले, व म्हणाले, “ यमू, नुसतं बी. ए. झालं, व एम्. ए. साठीं राजकारण हा विषय घेतला, म्हणजे राजकारण कळलं असं होत नाहीं. तूं अझून पोर आहेस. अग, या आमच्या पुढाऱ्यांच्या नुसत्या टॅक्टिक्स ( डावपेंच ) आहेत. आपलं देशाच्या राजकारणांत कांहीं वजन पडत नाहीं, आपल्याला कांहीं ‘फॉलोइंग’ नाहीं असं या मवाळांनीं पाहिलं, अन् लागले एकीच्या गप्पा मारायला. त्याच्या आड कशाला या ! नुसत्या तोंडानंच बोलायचं मग एकीच्या गप्पा मारायला व ऐकायला कमी कां करा ? संयुक्त राष्ट्रीय पक्ष काढतां ? काढा ! त्याचे सभासद व्हा म्हणतां ? व्हा ! यापेक्षां यांत जास्त कांहीं नाही. खरं म्हणशील, तर आमच्या पुढाऱ्यांचं हें करणंसुद्धां मला पसंत नाहीं. पण जाऊं द्या, जोंपर्यंत त्यांच्या या करण्यानं आमचं प्रत्यक्ष कांहीं नुकसान होत नाहीं, तोंपर्यंत कशाला त्यांना विरोध करा ? पण कांहीं जरी झालं, या मवाळांनीं किती जरी सोंगं केलीं, तरी मवाळ तो मवाळ, व जहाल तो जहाल ! त्या दोघातील भेद केव्हांहि नाहींसा होऊं शकणार नाहीं ! ”

आप्पासाहेबांचें अशा प्रकारचें भाषण यमूनें अनेकदां ऐकिलें होतें; व त्या मुद्यावर कितीही वाद केला तरी त्यांचें मत बदलणें शक्य नाही हें तिला ठाऊक होतें. म्हणून येत्या निवडणुकींत आप्पासाहेबांनीं उमेदवार म्हणून उभे न राहण्याबद्दल त्यांचें मन वळविण्यासाठीं तिनें दुसरा मुद्दा उपस्थित केला. ती म्हणाली, “ बरं, तसं कां होईना. मवाळ जहालांतील हा अक्षय भेद आपण घटकाभर कबूल करूं. भिन्न देशांनीं वाहणारे प्रवाह जसे

एखादे वेळीं कांहीं काळ एकत्र येतात, त्याप्रमाणें हे दोन्ही पक्ष आज अल्पकाळ एका कार्यक्षेत्रावर आले आहेत इतकंच, हेंही तुमचं म्हणणं मी क्षणभर कबूल करतें. पण जोंपर्यंत ते एकत्र आहेत तोंपर्यंत तरी राष्ट्रांतील परिस्थिति पाहून त्यांनीं तेवढ्यापुरतं सहकार्य कां करूं नये? मनुष्य जहाल किंवा मवाळ कसाही असला तरी कौंसिलांत सर्वांना एकाच पद्धतीनं कार्य करावं लागतं, आणि त्यांत सहसा दोघांचं दुमत होत नाहीं, हें तर तुम्हांला कबूल आहे ना?"

"हो, सामान्यतः हें मी कबूल करीन. पण राष्ट्राच्या भावनेला धक्का बसणारे प्रश्न जेव्हां येतात, तेव्हां तिथं मात्र या दोघांतील फरक दिसून आल्याशिवाय राहात नाहीं." आप्पासाहेब म्हणाले.

"परंतु मवाळ लोक आज जरी कौंसिलांत गेले, तरी ते पूर्वींपेक्षां लोकमतास आज अधिक जबाबदार असल्यामुळं त्यांना जर पुनः निवडून यायचं असेल, तर लोकांच्या भावनेकडे दुर्लक्ष करतां येणार नाही, असं नाहीं का तुम्हांला वाटत?" यमूनें विचारलें.

"होय, तें कांहीं अंशी खरं आहे. पहिल्या कौंसिलांत राजकीय कैद्यांबद्दल पूर्ण सहानुभूति वाटत असतांही कैद्यांची फटक्यांची शिक्षा बंद करण्याच्या ठरावाविरुद्ध कांहीं मवाळांनीं मत दिलंच कीं नाहीं? या एकाच गोष्टीमुळें लोकमत त्यांच्याविरुद्ध झालं, व ते लोक पुढल्या निवडणुकींत निवडून येऊं शकले नाहींत."

"पण आप्पा," यमू म्हणाली, "तो प्रश्न सगळ्या कैद्यांच्या बद्दलचा होता. सगळ्याच कैद्यांची फटक्याची शिक्षा बंद केली तर तुरुंगांत शिस्त कशी राहील?"

"तें खरं," आप्पासाहेबांनीं उत्तर दिलें, "पण यात राजकीय कैद्यांचाही संबंध येत असल्यामुळं तो प्रश्न लोकांच्या भावनेचा होता, हें मवाळांनीं ओळखलं नाहीं. हीच त्यांची चूक त्यांना प्रत्येक ठिकाणीं नडते."

"तें असो. त्याचा प्रश्न आतां कशाला? माझं म्हणणं एवढंच आहे कीं, आपल्या जिल्ह्याची परिस्थिति पाहातां, तुम्हीं आणि बाबासाहेबांनीं

दोघांनीं उभं राहून ऐकमेकांविरुद्ध लढणं इष्ट नाहीं. कारण तुमच्या दोघांच्या लढ्यांत जातिविशिष्ट लोकांचं मात्र फावणार आहे. शिवाय काँग्रेसचं लोढणं तुम्हीं एकदां गळयांत बांधून घेतल्यामुळं तुम्ही जरी प्रतिसहकार-पक्षांत असलां, तरी खरं म्हटलं तर तुम्हांला दोन धन्यांची नोकरी करावी लागणार. राष्ट्रीय पक्षाचा कौन्सिलांतला कार्यक्रम तुम्हांला पसंत आहे; मग हा कार्यक्रम ज्याला कॉंग्रेसच्या बंधनाशिवाय स्वतंत्रपणानं व एकनिष्ठेनं चालवितां येईल अशालाच तुम्ही पाठिंबा कां देऊं नये ? शिवाय बाबासाहेबाचा कौन्सिलच्या कामाचा दीर्घ अनुभव, त्यांचा राजकारणावरचा खोल व्यासंग या गोष्टीमुळं तुमच्या दोघांत आजच्या घटकेस तेच कौंसिलांत जाणं अधिक इष्ट आहे असं मला तरी वाटतं. तुम्ही बाहेर राहून लोकजागृतीचं व मतदारसंघास सुशिक्षित करण्याचं काम केलं, तर तीही राष्ट्राची तितकीच, किंबहुना अधिक महत्त्वाची, सेवा नाहीं का ? खरं म्हटलं तर याच कामाला तुम्हीं अधिक योग्य आहां. म्हणून कौंसिलांतलं काम बाबासाहेबांनी, आणि बाहेरचं काम तुम्हीं करायचं अशी दोघांनी वांटणी केली तर त्या सहकार्याचा किती तरी फायदा होईल. पण तुम्हीं दोघांनी तसं मनांत मात्र आणलं पाहिजे."

"हें तुझं म्हणणं बरोबर आहे. कार्यकर्त्यांत किंवा पुढाऱ्यांत असा श्रमविभाग होणं कांहीं अनिष्ट नाहीं. उलट तें इष्टच आहे. तसा दुसरा माझ्या खात्रीचा माणूस असता तर कामाची अशींच वांटणी मी केली असती. पण असा माणूस तरी आहे कोण ? बाबासाहेबच की नाहींत ? त्यांच्या बाबतीत तें अशक्य आहे. माझा त्यांच्यावर काडीइतकासुद्धां विश्वास नाहीं." आप्पासाहेब जोरांत म्हणाले.

"तें मला ठाऊक आहे. पण हा विश्वास आतां टाकून पाहा, एवढंच माझं म्हणणं आहे. तुमच्या मनाला जी गोष्ट लागून राहिली आहे तिला आतां पंधरा वर्षांवर दिवस होऊन गेले. त्या एका गोष्टीखेरीज लोकहिताविरुद्ध बाबासाहेबांच्या हातून या इतक्या वर्षांत कोणतं कृत्य घडलं आहे ? उलट म्युनिसिपालिटींत, लोकलबोर्डांत, व खुद्द कौंसिलांतही त्यांनीं लोकपक्षाची किती तरी कामगिरी केली आहे."

" यमे, तुला काय म्हणावं हेंच मला कळत नाहीं. " आप्पासाहेब चिडून म्हणाले. " बाबासाहेबांनीं राजद्रोहाच्या खटल्यांत सरकारी वकील म्हणून काम केलं, व मला आणखी इतर कांहीं देशभक्तांना तुरुंगांत धाडण्याच्या सरकारच्या प्रयत्नाला मदत केली, ही गोष्ट, तिला आतां पंधरा वर्षें झालीं म्हणून तुला कमी महत्त्वाची वाटते अं ? यमे, तुझ्या दृष्टीला बाबासाहेबांच्या इतर कार्यापुढं त्यांचं हें कृत्य क्षुल्लक व क्षम्य वाटत असेल; पण माझ्या मनांतून तें कधींही जाणार नाही. त्याची नुसती आठवण झाली कीं अंगाची आग होते. कांहीं पुढारी जरा कडक भाषणं करतात काय, आणि हा गृहस्थ खुशाल सरकारी वकील म्हणून सरकारचा हुकूम होतांच त्यांच्याविरुद्ध, आपल्या देशबांधवांविरुद्ध, खटले चालवून त्यांना तुरुंगांत पाठवायला तयार होतो ! मला त्या वेळची पक्की आठवण आहे. ज्याच्या बरोबर आपण वीस वर्षें वकीली केली, मांडीला मांडी लावून बसलों, खानपान केलं, त्या व्यवसायबंधूच्या विरुद्ध सरकारचं वकीलपत्र घेऊन काम चालवायला, देशाभिमानाची क्षिति नसली, तरी मनाची शरम वाटायला हवी होती त्या गृहस्थाला. पण स्वतःच्या पोटापुढं व सरकारच्या समोर लाळ घोटण्यापुढं इतर कशाची चाड असेल तर कीं नाहीं ? " शेवटचीं वाक्यें बोलतांना आप्पासाहेबांचा आवाज बराच चढला, ते संतप्त झाले, आणि शेवटचें वाक्य तर त्यांनीं टेबलावर आपल्या हाताची जोरानें मूठ आपटूनच उच्चारलें.

बोलण्याच्या भरांत आपला पाय जरा नाजुक जागेवर पडला हें यमूच्या लक्षांत आलें; पण हातीं घेतलेल्या कामाचा एकदां सोक्षमोक्ष लावण्याचा तिनें आज निश्चय केलेला असल्यामुळें तिला हा विषय येथें थांबविणें शक्य नव्हतें. कारण दुपारीं आप्पासाहेब जिल्ह्यांत निवडणुकीच्या दौऱ्यावर निघणार होते; ते चार दिवसांनीं उमेदवारीचा अर्ज देण्याच्या शेवटच्या तारखेच्या दिवशीं सकाळीं स्वतःचा अर्ज देण्यासाठींच परत येणार होते. यामुळें तसें न करण्याबद्दल त्यांचें मन वळविण्याचा शेवटचा प्रयत्न करण्यास तिला एवढीच संधी होती. म्हणून ती अत्यंत मृदु व प्रेमळ आवाजानें म्हणाली,

" पण आप्पा, त्या खटल्यांत तुम्हीं सुटलांत, इतकंच नव्हे तर त्यावेळीं आपल्या जिल्ह्यांत झालेल्या बहुतेक खटल्यांत फारच थोड्यांना शिक्षा झाल्या. तसंच तुम्हांला चौकशीच्या वेळीं शक्य तितक्या अदबीनं वागविण्याबद्दल बाबासाहेबांनींच खटपट केली असं तुम्हींच म्हणत होतां. मग त्याप्रमाणं तुमच्या सुटण्यांतही त्यांचं अंग नसेल हें कशावरून ? आतां सरकारतर्फे काम चालविल्याबद्दल म्हणाल, तर एकदां वकीलीच पतकरल्यावर येईल तें काम चालविणं हें वकीलाचं कर्तव्यच आहे, नव्हे का ? "

परंतु यमूच्या या समर्थनात्मक भाषणाचा आगींत तेल ओतण्याला मात्र उपयोग झाला. कारण आप्पासाहेब त्यामुळे अधिकच संतापले; व खुर्चीवरून एकदम उठून म्हणाले, " बस्स्, मला तुझं समर्थन नको आहे. मला तुझ्यापेक्षां या गोष्टी अधिक माहित आहेत, समजलीस ? मला आश्चर्य वाटतं, नव्हे, अत्यंत खेद वाटतो, कीं तूं हें समर्थन शांतपणें करतेस तरी कसं ? ज्यानं तुझ्या बापाला तुरुंगांत घालण्याचा प्रयत्न केला त्याच्याबद्दल तुला त्वेष तर वाटत नाहींच, पण उलट त्याची तरफदारी करून त्याच्याकरतां मी आपली उमेदवारी मागं घ्यावी असं सुद्धां वाटतं आं ? त्यांच्या करण्यांत तुला कांहींच देशद्रोह दिसत नाही ? लाज वाटली पाहिजे तुला, मला असला उपदेश करायला. माझ्या घरांत, माझ्या शिक्षणाखालीं, इतकीं वर्षं वाढून तुला असल्या देशद्रोह्यांचा अजून तिटकारा येत नाहीं ? आणि उलट त्यांची बाजू घेऊन त्यांच्याशी सहकार्य करायला मला सांगतेस ? "

" आप्पा, आप्पा, तुमचा गैरसमज झाला. " त्यांचा राग थांबविण्याच्या उद्देशानें यमू मध्येंच म्हणाली. " मीं हा वाद तुम्हांला उपदेश करण्याच्या किंवा तुमच्या मनाला दुःख देण्याच्या हेतूनं मुळींच घातला नाहीं. केवळ—"

" Shut Up ! " आप्पासाहेब चवताळून म्हणाले. " माझी या बाबतींतील मनोवृत्ति जर तुला ठाऊक आहे, तर बाबासाहेबांकरितां तुम्हीं

मागं घ्या हें तुला म्हणवलं तरी कसं? आणि हें तुझं आजचंच नाहीं! मीं आज दोन तीन वर्षें पाहातों आहें, तुझा माझ्याशी नेहेमीं याच मुद्यावर वाद! केव्हांही पहा, मवाळांची बाजू पुढं मांडायला तयार! इतके दिवस त्यांच्या पक्षाचं समर्थन करतां करतां आज बाबासाहेबांसारख्या कट्टया मवाळाचं, नव्हे, सरकार पुढं लाळ घोंटणाऱ्या एका लाळघोट्टयाचं समर्थन करण्यापर्यंत तुझी पाळी आली. त्यांचं तुला आतां तर इतकं प्रेम फुटलं आहे कीं, प्रत्यक्ष आपल्या बापाबद्दलचा आदर आणि अभिमान सर्व पार विसरून जाऊन त्यांच्यासाठीं आपल्या बापानं निवडणुकींत माघार घ्यावी असं तुला वाटूं लागलं आहे. वा! काय पण मला आनंद व समाधान वाटतं आहे! आतां या आनंदावर एकच कळस चढायचा राहिला आहे; आणि तो म्हणजे, पक्का देशद्रोही, व सरकारचा लांगूलचालक समजून ज्याचा मी आजपर्यंत इतका तिरस्कार करीत आलों, त्याच्याच मुलाशी तूं लग्न लावणं! यशवंताचा आणि तुझा आहेच स्नेह, मग उशीर कशाला! हं टाक तें उरकून एकदां, आणखी होऊं दे माझ्या आयुष्याचं सार्थक! मवाळ जहालांची एकी करण्याचा तुझा प्रयत्न सिद्धीस जायला, यापेक्षां अधिक उत्तम असा दुसरा मार्ग तो कोणता?"

आप्पासाहेबांचा हा संताप व चिडून बोलणें यमूस नवीन नव्हतें; पण आपल्या मवाळांबद्दलच्या पालटत चाललेल्या मनोवृत्तीचें असे चित्र काढून, आप्पासाहेब त्याचा शेवट कल्पनेंत यशवंतरावांचें आणि आपलें लग्न लावण्यांत करतील असें मात्र तिला कधीं वाटलें नव्हते, व यामुळेंच आपल्या वडिलांच्या शेवटच्या उद्गारांनी ती चकित होऊन गेली. दुसरें असें कीं, आप्पासाहेबांनीं रागाच्या भरांत जी गोष्ट केवळ कल्पना म्हणून उच्चारली तिच्यांत बराचसा सत्यांश असल्यामुळें तिचें मन अधिकच गोंधळलें. आप्पासाहेबांनीं वरील उद्गार त्वेषानें काढल्यावर यमू कांहींच बोलली नाहीं. टेबलावरील एक पुस्तक उचलून त्यांतील पानें चाळीत त्यांकडे ती पाहात बसली.

आप्पासाहेबांनीं आपलें डोकें शांत करण्याकरितां टेबलावरील सिगारेट पेटविली, व आपल्या भाषणाचा यमूवर काय परिणाम झाला हें

पाहण्यासाठीं तिच्या तोंडाकडे दृष्टि लाविली. इकडे यमूच्या डोक्यांत त्यांच्या शेवटच्या वाक्यांनीं विचारांची एकच गर्दी उडवून दिली. आपल्याला भय वाटल्याप्रमाणें आप्पांना आपला व यशवंतरावांचा विवाह किती अप्रिय आहे हें तिला अनायासेंच समजून आलें; आणि हें आधींच जाणून आपण तो करणें नाकारलें असतांही, बाबासाहेबांसारख्या कर्तृत्ववान् प्रागतिकाशीं सहकार्य करूं असें केवळ राष्ट्रहिताच्या बुद्धीनें म्हणतांच, आपल्या वडिलांनीं आपल्यावर बापाबद्दल अभिमान व आदर वाटत नसल्याचा आरोप करावा याचें तिला फार वाईट वाटलें. आतां तिनें यशवंतरावांची मागणी नाकारल्याची गोष्ट आप्पासाहेबांस ठाऊक नव्हती हें खरें; परंतु एखादे वेळीं स्वतःचा स्वार्थत्याग बाजूस राहून उलट आपल्याबद्दल गैरसमज कसा होतो हें मात्र तिला स्वतःच्या उदाहरणानेंच समजून आलें. हे सर्व विचार मनांत येऊन, व यशवंतरावांच्या आणि आपल्या विवाहाची अशक्यता दिसून येऊन तिचे डोळे पाण्यानें भरून आले, आणि आप्पासाहेब पुढें आहेत हें लक्षांत न राहून तिचे अश्रु झराझर खालीं वाहूं लागले; व ते पुसण्यासाठीं तिनें डोळ्यांस पदर लाविला.

यमूच्या डोळ्यांतील अश्रू पाहतांच आप्पासाहेबांचें सर्व वात्सल्य एकदम जागृत झालें. त्यांना यमूच्या बुद्धिमत्तेबद्दल व कर्तृत्वाबद्दल फार अभिमान वाटत असल्यामुळें त्यांचा तिच्यावर फारच जीव होता. स्वतः इतक्या धडाडीचे सुधारक नसतांही केवळ यमूच्या इच्छेवरून त्यांनीं तिचें लग्न प्रथम लांबविलें; व पुढें जशी ती मॅट्रिकमध्यें वर येऊन कॉलेजमध्यें गेली, व तेथें तिनें आपल्या बुद्धीचा प्रभाव दाखविला, तशी, तिचें शिक्षण पूर्ण करून जगांत नांव काढण्याची तिला संधि देण्याची ईर्षा त्यांनाही उत्पन्न झाली. बी. ए. ला इतिहास व अर्थशास्त्र हा ऐच्छिक विषय घेऊन ती पहिल्या वर्गात आली; व म्हणून एम्. ए. ला इतिहास व राजकारण हे विषय घेऊन बसण्याची तिनें इच्छा दर्शवितांच त्यांनीं खुषीनें आपली संमति दिली. कारण यमूच्या शिक्षणाची त्यांना स्वतःलाहि आपल्या सार्वजनिक कार्यांत चांगलीच मदत होऊं लागली होती. आपल्या भाषणानें यमूच्या मनाला दुःख झालेलें दिसतांच त्यांचा राग एका क्षणांत शांत

झाला; त्यांनीं आपल्या हातांतली सिगारेट तशीच फेंकून दिली, व यमू-जवळ जाऊन तिच्या पाठीवर हात फिरवून इंग्रजींत म्हटलें, " यमू, आय् बेग् युअर पार्डन्. तुझ्या मनाला दुःख यावं या हेतूनं मीं मुळींच बोललों नाहीं. आवेशाच्या भरांत तुला लागण्यासारखं मीं बोलून गेलों खरा, पण मला त्याबद्दल फार वाईट वाटतं. आधीं डोळे पूस बघूं "

आपल्या डोळ्यांतील अश्रु दृष्टीस पडतांच सर्व राग व आवेश जाऊन आप्पासाहेबांच्या हृदयांत एकदम वात्सल्याचा उमाळा यावा, व आपल्या मनाला वाईट वाटलें हें पाहून त्यांना आपल्या भाषणाचा पश्चाताप व्हावा, यामुळें यमूचें हृदय पितृभक्तीनें भरून आलें. तिनें आपले डोळे पुसले व वडिलांकडे पाहून म्हटलें,

" आप्पा, मला वाईट वाटलं तें तुमच्या रागाचं नाहीं. मवाळ पक्षाबद्दलचा माझा दुराग्रह नाहींसा झाला याचं कारण, कालाच्या प्रवाहानं ते आणि आपण दोघेही एका भूमिकेवर आलों असल्या-मुळं, आतां दोघांनीं पूर्वग्रह सोडून एक झालं पाहिजे असं मला निश्चयानं वाटूं लागलं आहे म्हणून; व बाबासाहेबांसाठीं तुम्हीं माघार घ्यावी असं मीं म्हटलं त्याचं तरी कारण तेंच. पण हे लक्षांत न घेतां, त्याचं कारण तुमच्या-बद्दलचा माझा आदर व अभिमान कमी झाला आहे हें होय असं तुम्ही म्हणालां, तें मला फार लागलं. आणि तसंच तुमच्या या दुःखावर कळस मी यशवंतरावांशीं लग्न लावून चढवीन, हें तुमचं वाक्यही मला फार झोंबलं. केवळ तुमच्या मनाला दुःख होईल म्हणूनच मी त्यांच्याशीं लग्न करण्याचं नाकारलं हें जर तुम्हांला ठाऊक असतं, तर तुम्ही मला असं कधींही म्हणालां नसतां ! "

" काय ? " आप्पासाहेब एकदम आश्चर्यानें म्हणाले, " यशवंताशीं लग्न करण्याचं तूं नाकारलंस ! म्हणजे ! हा प्रकार तरी काय ? तुझ्या व त्याच्या स्नेहाचं हें रूपांतर होईल ही मला कल्पनाही नव्हती. त्यानं तुला मागणी घातली आणि तूं ती केवळ माझ्यासाठीं नाकारलीस ? "

आवेशाच्या भरांत आपण काय बोलून गेलों हें यमूच्या आतां लक्षांत आलें; पण मग काय उपयोग ? जी गोष्ट आप्पासाहेबांना ती इतक्यांत मुळींच

करूं देणार नव्हती, ती मनाच्या उद्वेगाच्या भरांत नकळत एकदां बोलून गेल्यानंतर तिला कांहीं लपविणे शक्यच नव्हतें. म्हणून मुंबईला यशवंतरावांनीं घातलेली मागणी, व त्यांचें आपलें झालेलें बोलणें, ही सर्व हकीगत तिनें आपल्या वडिलांस सांगितली.

आप्पासाहेबांनीं ती शांतपणें ऐकून घेतली, व कांहीं वेळ थांबून ते म्हणाले "अस्सं ? मग मी तुला एक स्पष्ट प्रश्न विचारूं कां ? त्याचं असंच मनमोकळेपणानं उत्तर दे. तुला ठाऊकच आहे कीं, मी तुझ्याशी आजपर्यंत बापाच्या नात्यानं न वागतां मित्राच्या नात्यानं वागत आलों आहें; तुझ्या सुखापलीकडे माझी दृष्टि नाहीं. त्या हेतूनंच मी तुला हा प्रश्न विचारतों आहें. तुझं यशवंतावर खरोखरीच प्रेम आहे का ? कां त्याला नाहीं म्हणून स्पष्ट सांगण्याऐवजीं नकारात्मक उत्तर देण्यासाठीं तूं हा पर्याय काढलास ? तुमच्या स्नेहाचं हें रूपांतर होण्याइतका तुझा त्याचा निकट संबंध तरी केव्हां आला ?"

आप्पासाहेबांना सर्व गोष्टी मोकळेपणानें सांगणेंच इष्ट होय असा विचार करून यमू म्हणाली, " आप्पा, मी फर्ग्युसन कॉलेजांत बी. ए. च्या वर्गांत असतेवेळीं एकॉनमिक्स्चीं कांहीं पुस्तकं सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीच्या लायब्ररींतून आमच्या प्रोफेसरांच्या शिफारशीनें मीं आणलीं होती. त्या वेळीं यशवंतरावांच्या हातांत लायब्ररीची व्यवस्था असल्यामुळं त्यांची माझी विशेष ओळख झाली. पुढं त्यांच्याकडून मला माझ्या एकॉनमिक्स्च्या अभ्यासांत पुष्कळ मदत झाली;आणि त्यामुळं आमचा स्नेह वाढला.या स्नेहाला तुम्हींही कांहीं हरकत न घेतल्यानं तो लवकरच दृढ झाला. त्यानंतर मी बी. ए. होऊन मुंबईला गेलें, तों यशवंतरावांची नेमणूकही सोसायटीच्या मुंबईच्या शाखेंत झाली. तिथंही एकॉनमिक्स् व पॉलिटिक्स्चा अभ्यास करण्यासाठीं युनिव्हर्सिटीच्या व एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररींतून पुस्तकं आणून देऊन, व इतर अनेक तऱ्हेनं, त्यांनीं मला साह्य केलं. त्यांच्याही तिथल्या कार्यांत स्नेहाच्या नात्यानं मीं थोडंबहुत लक्ष घालूं लागलें. अशा रीतीनं आज तीन साडेतीन वर्षं आम्हांला एकमेकांची चांगलीच माहिती झाली आहे; याच्या पुढील हकीगत मीं मघांशींच

सांगितलीच त्यांना मुंबईस परवां मी जें उत्तर दिलं तें त्यांना ही सगळी हकीकत व तुमची मनोभावना सांगून अगदी खरं खरं असंच दिलं. ”

यावर आप्पासाहेब बराच वेळ कांहीं बोलले नाहींत. नवी सिगारेट पेटवून तिच्या धुराकडे पाहात ते विचारांत गढले होते. तो काळ यमूला मात्र अत्यंत अस्वस्थतेचा गेला; ती वारंवार वडिलांच्या तोंडाकडे पाहात होती. पण यापेक्षां अधिक असें तिला कांहींच बोलणें शक्य नव्हतें. आप्पासाहेबांची सिगारेट निम्मे अधिक संपल्यावर त्यांनीं ती फेंकून दिली व म्हटलें,

“ यमू , झाल्या गोष्टींत तुझ्यावर रागावण्यासारखं मला कांहीं दिसत नाहीं. तुम्हीं दोघंही तरुण आहां, व त्यांत आचारविचार समान झाल्या-वर तुमचीं मनं एकमेकांकडं ओढलीं जाणं साहजिक होतं. यशवंताबद्दल वैयक्तिक दृष्टीनं कांहींच हरकत घेण्यासारखं नाहीं. तो विद्वान् आहे, सुशील आहे, आणि गोखल्यांच्या सोसायटीला स्वार्थत्यागपूर्वक मिळून आपल्या बुद्धीप्रमाणं तो लोकसेवाही करीत आहे. पण मीं मघांशी बोलल्या प्रमाणं, ज्यांचा माझा आज पंचवीस वर्षं सारखा व अटीचा विरोध राहिला, त्या बाबासाहेबांचा तो मुलगा असल्यामुळं त्याच्याशी तुझं लग्न व्हावं ही गोष्ट मला अर्थातच कशीशी वाटणार हें उघड आहे. परंतु हा प्रश्न माझ्या सुखाचा नसून तुझ्या सुखाचा आहे; आणि त्यांत मी स्वतःबद्दलचा विचार करणं अत्यंत अयोग्य होईल. माझ्या तुझ्याबद्दल वेगळ्या आकांक्षा होत्या, व ही संभवनीयता माझ्या मनांत कधीच आली नाहीं. किंबहुना माझे आणि बाबासाहेबांचे संबंध तुला ठाऊक असल्यामुळं तुझं यशवंता-वर प्रेम जडेल ही शक्यताच मला कधीं वाटली नाहीं. ”

आप्पासाहेब जरा थांबले; व कांहीं वेळानें आपल्या खुर्चीवरून उठून ते यमूजवळ गेले, व गाहिंवरून तिला कुरवाळून म्हणाले, “ यमू, my dear child, माझीं स्वतःचीं या बाबतींतलीं फीलिंग्ज् ( भावना ) कशींही असलीं तरी मी तुझ्या सुखाच्या आड येणार नाहीं. यशवंताशी लग्न करायला तुला माझी परवानगी आहे. ”

अप्पासाहेबांचें हें वाक्य अत्यंत अनपेक्षित होतें; शिवाय तें त्यांनीं ज्या स्वरानें उच्चारलें त्यावरून त्यांच्या मनांत परस्परविरुद्ध विचारांचें किती तुमुल युद्ध चाललें होतें, व आपल्या मानहानीस केवळ अपत्यप्रेमानें तयार होऊनच त्यांनीं ही संमति दिली, हें स्पष्ट दिसलें आप्पा-साहेबांचा हा स्वार्थत्याग व आपल्यावरील प्रेम पाहून यमूचाही कंठ दाटून आला, व ती त्यांच्या गळ्यास मिठी मारून स्फुंदत स्फुंदत म्हणाली,

" आप्पा, मी तुमच्या प्रेमाचा असा फायदा घेणार नाहीं. या गोष्टीनं तुमच्या मनाला बरं वाटणार नाहीं हें जाणून मी तुमच्याजवळ यांतलं एक अक्षरही बोलणार नव्हतें. पण मघाशीं आवेशाच्या भरांत मी अगदीं चुकून बोलून गेल्यामुळं मग मला सगळंच सांगणं भाग पडलं. आप्पा, तुम्हीं कांहींही म्हटलंत तरी जोंपर्यंत तुमच्या मनाला ही गोष्ट खरोखरी समाधानकारक वाटणार नाहीं, तोंपर्यंत तुम्हीं मला जरी अशी परवानगी दिलींत, तरी मी तिचा फायदा घेणार नाहीं. तुमच्या मनाला अल्पसुद्धां दुःख होऊं नये ही माझी इच्छा आहे व त्याकरितां हा स्वार्थत्याग मी करणारच. माझं म्हणणं यशवंतरावांनासुद्धां पसंत आहे. माझा हा निश्चय ठरला आहे, आणि माझी तुम्हांला हीच विनंती आहे कीं, तुम्ही ही सर्व हकीगत ताबडतोब विसरून जा. "

" पण माझ्या आवडत्या मुलीनं माझ्या हेक्यासाठीं जन्मभर आपल्या प्रेमाचा त्याग करावा याचंसुद्धां मला सुखच वाटेल नाहीं ?" आप्पासाहेबांनी विचारलें.

" आप्पा, माझ्या कृत्याचं मी स्वत. जर कांहींच वाटून घेत नाहीं, तर मग तुमची मला अविवाहित राहाण्याला कां हरकत असावी ? आप्पा, मला सुख व्हावं अशी तुमची इच्छा असेल, तर माझ्या इच्छेप्रमाणंच या सर्व गोष्टी होऊं द्या. "

आप्पासाहेब यावर कांहीं बोलणार तोंच खालून " अग यमे, म्हणावं चहाची तयारी झाली आहे; अन् मोटारही सामान भरून तयार आहे, " असे यमूच्या आईचे शब्द ऐकूं आले. तेव्हां आप्पासाहेब म्हणाले, " बरं, या गोष्टीचा विचार आपण मागाहून करूं. चहा घेऊन मला आतां निघा-

ळचें पाहिजे. मी १८ तारखेला नॉमिनेशन्च्या दिवशीं परत येईन. तों-पर्यंत विनंतीपत्रं सर्व मतदारांकडे रवाना करून ठेव."

२

१८ तारखेस दुपारीं जेवण झाल्यावर बाबासाहेब आपल्या दिवाण-खान्यांत पोषाख चढवीत होते, व जवळच यशवंतराव सकाळीं आलेला टाइम्स पाहात खुर्चीवर बसले होते. बाबासाहेबांची मुद्रा सका-ळचें टपाल आल्यापासून चिडल्यासारखी व त्रासल्यासारखी दिसत असल्या-मुळे, व त्याचें कारणही त्यांना ठाऊक असल्यामुळें यशवंतरावांनीं आपण होऊन कांहीच न बोलण्याचें ठरविलें होतें. कारण कानगांवास आदले दिवशीं झालेल्या आप्पासाहेबांच्या भाषणाची हकीगत तेथल्या एका वकी-लांनीं त्यांना पत्रांतून कळविली होती; ती वाचल्यापासून त्या दोघांत समेटाची भाषा पुन: बोलण्यास त्यांना जागाच उरली नव्हती. ते विषण्ण मनानें टाइम्सकडे पाहात बसले होते. बुटाचे बंद बांधून झाल्यावर गड्यानें दिलेलें जाकीट चढवीत बाबासाहेब म्हणाले,

"पाहिलंस यशवंत, तुझी समेटाची आशा किती व्यर्थ आहे ती! अरे हीं माणसं मला आज तीस वर्षं ठाऊक आहेत. प्रतिपक्षाला हव्या त्या शिव्या देऊन त्यांच्याबद्दल खोटेनाटे गैरसमज प्रसृत करून सवंग लोक-प्रियता मिळवायची, आणि त्यावर आपला राजकीय चरितार्थ चालवायचा हा त्यांचा धंदा. आणखी म्हणे त्यांच्याशी समेट करा, अन् ते तुमच्या प्रयत्नाला रिस्पॉन्स (प्रत्युत्तर) देणार! आता हेच आप्पासाहेबांचं पाहा ना! काय यांनीं आज तीस वर्षांत मोठी विधायक कामगिरी केली आहे, म्हणून मीं त्यांना किंमत द्यावी? लोकांत जावं, सभा कराव्या, लंबीं लंबी व्याख्यानं द्यावीं, सरकारला आणि कार्यकर्त्या पुढाऱ्यांना हव्या त्या शिव्या देऊन टाळ्या मिळवाव्या, म्हणजे झाले हे पुढारी! कां, बोलत कां नाहीस?"

"बाबा, मी त्यांचं सगळंच 'ॲप्रूव्ह' (पसंत) करतों असं नाहीं. पण लोकांत मिळून मिसळून, राज्यकारभाराच्या वैगुण्यांचं ज्ञान जनतेला

करून देऊन, त्यांनीं प्रस्तुत परिस्थितीबद्दल लोकांत असमाधान उत्पन्न करण्याचं मोठं कार्य केलं आहे. यामुळं सरकारविरुद्ध जें लोकमत तयार झालं आहे त्याचा आपण फायदा घेतला पाहिजे; आणि यासाठींच या पुढाऱ्यांशीं आपण सहकार्य केलं पाहिजे. ”

“ पुनः तुझं तेंच ! ” बाबासाहेब त्रासून म्हणाले. “ मी नको का म्हणतों आहे ? पण या लोकांना कुठं हवं आहे तें ? मला यांचा संताप येतो तो हाच. आजपर्यंत आम्हाला हव्या त्या शिव्या देऊन पुढारीपणा मिळवला. अन् आतां तेंच त्यांच्या आड येतं आहे. मीं तुला सांगितलं ना, या आप्पासाहेबांशीं समेट करण्याकरतां काय काय केलं तें ! पण नाहीं. या ना त्या, त्या ना या, सबबीवर त्यांनी तें सगळं फेटाळून लावलं. मला तुझं पत्र यायच्या आधींच मी त्यांना मोकळेपणानं कळवळं होतं कीं, जरी तुम्ही नव्या राष्ट्रीय पक्षाला मिळालां नाहीं, तरी शुद्ध प्रतिसहकाराच्या तत्त्वावर उभे रहा, मी तुम्हांला मदत करतों; पण त्यांना कुठं आमच्या मदतीची किंमत न् जरूर आहे ? त्यांना कॉंग्रेसच्या मॅन्डेटचं अधिक प्रेम ! मग त्यामुळं राष्ट्राचं वाटोळं झालं तरी फिकीर नाहीं ! बरं, कॉंग्रेसच्या मॅंडेटला न गोंजारावं तर कॉंग्रेसवाल्यांची सहानुभूति कशी मिळावी ? जोंपर्यंत कॉंग्रेस यांच्या बाजूची होती, तोंपर्यंत प्रागतिकांस विरोध करण्यासाठीं काय तिचा बडेजाव ! आतां ती उलटल्यावर पडले तोंडघशीं. मॅंडेट नको म्हणावं तर तिकडून पंचाईत, हवं म्हणावं तर तीही पंचाईत ! बरं प्रागतिकांशी सहकार्य करून कॉंग्रेस मॅंडेट् बदलून घ्यावं, तर त्यांत ज्यांना मवाळ म्हणून शिव्या दिल्या त्यांच्याशीं समेट करावा लागतो, आणि त्यांना कॉंग्रेसमध्यें घ्यावं लागतं ! त्यांत कदाचित् आपल्या लोकप्रियतेला बाध येईल ! म्हणजे काय, चोहोंकडून लुच्चेगिरी आणि स्वार्थ ! व्यापक राष्ट्रहिताचा एक विचार असेल तर शपथ ! ”

“ मी म्हणतों त्यांना नाहीं विचार ! आपल्याला तर आहे ना ? मग आपण तरी पड कां घेऊं नये ? आतां इथंच पहा, कॉंग्रेसचं नांव आपल्या पक्षाला चिकटवून आप्पासाहेब जरी कौन्सिलांत गेले, तरी त्यांचं धोरण


आपल्याच तत्त्वांप्रमाणं राहाणार हें तर खास ना ? आपल्याला त्याच्याशीं कारण. मग घेईनात, हवं ते नांव ! त्यांचं कौन्सिलांतलं धोरण कॉंग्रेस मँडेटप्रमाणं राहणारं असतं तर मग त्यांना विरोध करणं भाग होतं; पण आतां जिल्ह्यांतली परिस्थिति पाहून, आपल्यापैकी एकच उमेदवार उभा राहणं इष्ट आहे हें ध्यानांत आणून, आपण मागं घेतलं तर त्यांत मोठे-पणा कोणाचा होईल ? मार्गापेक्षां तत्त्वावर, किंवा साधनापेक्षां साध्यावर दृष्टि, हा जर प्रागतिकांचा बाणा, तर मग तो या बाबतींतही त्यांनीं कां दाखवूं नये ? त्यांनीं आम्हांला शिव्या दिल्या म्हणून इरेला पडून स्पर्धा करण्यांत आपला शहाणपणा तो कोणता ? ”

“ यशवंत, ” बाबासाहेब म्हणाले “ मी यालाही तयार झालों असतों. पण काल कानगावास आप्पासाहेबांनीं केलेल्या खुनशीपणाच्या भाषणाची हकीगत आजच्या टपालानं आली ती वाचल्यापासून माझंहि मन उलटलं आहे. होऊंच दे तर एकदां. आप्पासाहेबांना घमेंड वाटते आहे, कीं मी मोठा लोकप्रिय, बाबासाहेब कोण ? त्यांची हवी ती टवाळी व निंदा करावी. आप्पासाहेबांनीं कांही जरी म्हटलं तरी माझ्या हातून जिल्ह्याची सेवा त्यांच्या-पेक्षां कितीतरी पट अधिक घडली आहे. लोकलबोर्डाचा प्रेसिडेंट असतां सर-कारकडून नवे रस्ते तयार करण्यासाठीं पैसे मिळवून कैक गांवांना मी रस्ते बांधून दिले. इंजिनिअरिंग खातं लोकलबोर्डाच्या ताब्यांत आणून दिलं. शाळांसाठीं भांडून ग्रँट मिळवून चाळीस शाळा वाढविल्या, खेडेगांवांना बाजारासाठी जागा मिळवून दिल्या. इथल्या म्युनिसिपालिटीचं तसंच. सर-कारशीं वॉटरस्कीमबद्दल अनेक वर्षं वांधा पडला होता; पण अध्यक्ष झाल्याबरोबर थेट वरपर्यंत भांडून मींच तो सोडवला. या कामीं मला मदत करायला यांच्यांतला एक तरी मायेचा पूत आला होता का ? कौन्सिलांतही तेंच. पळसगांवच्या डॅमूची आणखी इरिगेशनूची स्कीम मी मंजूर करून घेतली. शहापूर तालुक्यातल्या दुष्काळांतल्या वेळीं तिथली सारातहकुबी भांडून मीं मिळाविली. खुद्द कानगांव तालुक्यांतली सारावाढ मीं तेथल्या लोकांत चळवळ करून, रिप्रेझेंटेशनं पाठवून, कौन्सिलांत ठराव मांडून, व भांडून मींच फिरवून घेतली. अशा एक ना दोन, ज्या

ज्या ठिकाणीं सरकारशी भांडून रयतेचं हित मला करतां आलं, त्या त्या ठिकाणी मी तें कायावाचामनानं, त्यांत कसलाहि स्वार्थ न साधितां, केलं. अन् इतकं असून मी सरकारचा बगलबच्चा, अन् रयतेचा शत्रु; आणि ज्यांनीं या संस्थांचं तोंडही न पाहतां केवळ शिव्या देण्यांत, आणखी लांब लांब भाषणं करण्यांत मात्र प्राविण्य मिळविलं, ते हे लोकांचे खुष-मस्केर, रयतेचे मित्र ? माझ्या या कामगिरीबद्दल आप्पासाहेबांनी आजपर्यंत एक तरी बरा शब्द काढला असेल तर शपथ ! ”

“ पण बाबा, आप्पासाहेबांनीं तें मान्य वा अमान्य केलं तरी तुमच्या योग्यतेबद्दल व कामगिरीबद्दल सबंध जिल्ह्यांत कोणाचंच दुमत नाहीं. आतां खुद्द आप्पासाहेबांच्या तरी या कालच्याच भाषणांत पाहा, त्यांनीं तुमच्या लायकीविषयीं किंवा योग्यतेविषयीं एक शब्दसुद्धां विरुद्ध काढलेला नाहीं. तुम्हीं प्रागतिक पक्षाचे आहां, आणि–आणि–पूर्वीं एकदां एका राजद्रोहाच्या खटल्यांत सरकारी वकील होतां याच दोन गोष्टींचा त्यांनीं तुमच्याविरुद्ध फायदा घेतला आहे. ” यशवंतराव म्हणाले.

यशवंतरावांच्या या वाक्याने मात्र बाबासाहेब खरे उसळले. “ हां तिथंच तर, सारी “ स्टिंग ” आहे. यापेक्षां माझ्या तत्त्वांवर किंवा कामगिरीवर उघड हल्ला केलेला मला पुरवेल. परंतु अशा गोष्टींनीं गैरसमज उत्पन्न करण्याचाच तर मला संताप येतो, आणि या लोकांचं तोंड पाहूं नये असं वाटूं लागतं. आप्पासाहेबांच्या कालच्या भाषणाचा रिपोर्ट खरा असेल तर, त्यांनीं त्यांत मजबद्दलच्या द्वेषाची आणि दुष्टपणाची अगदीं कमाल केली असं म्हटलं पाहिजे. आणखी म्हणूनच मी आतां साफ माघार घेणार नाहीं. मीं मागं घेतलं, तर कालच्या भाषणाला भिऊन मागं घेतलं, असा लोक त्याचा अर्थ करतील; निदान आप्पासाहेब किंवा त्यांची मंडळी तरी लोकांना तसं भासवायला बिलकुल कमी करणार नाहींत. मीं मागं घेतलं तें सद्‌बुद्धीनं, दुही न वाढण्यासाठीं, घेतलं असं त्यांना चुकूनसुद्धां वाटणार नाहीं; किंवा मनांत वाटलं तरी ते बाहेर तें बोलून दाखवणार नाहींत; उलट या भाषणानं मी भ्यालों, आणि माघार



बाबासाहेब, यमू, व यशवंतराव तिघेहि नकळत उठून उभे राहिले, आणि एकदम म्हणाले, " काय ? तुम्हीं उभे रहात नाहीं ! " —**ऐक्याच्या दारांत** [ पृ. १४१

घेतली असा त्याचा अर्थ या लोकांनीं नाहीं केला तर कशाला ? वाघ्या म्हटलं तरी खाणार, वाघोबा म्हटलं तरी खाणार. मग वाघ्याच कां नाहीं म्हटलं ? तें कांहीं नाहीं. काय व्हायचं असेल तें होईल. माझ्यांत आतां ' फाइटिंग स्पिरिट ' ( युद्धाचें वारें ) शिरलं आहे; आणि मी फाइट ( युद्ध ) करणारच. माझ्यांतही कांहीं सामर्थ्य आहे, माझीही कांहीं काम-गिरी आहे, हें या लोकांना दाखवलंच पाहिजे. "

" आप्पासाहेबांचं कालचं आपल्याविरुद्ध अतिशय विषारी भाषण पाहि-ल्यावर मीं तरी आपल्याला अधिक काय म्हणूं ? " यशवंतराव विषण्ण चित्तानें म्हणाले. " त्या भाषणांत त्यांनीं आपल्यावर केलेले आरोप अगदीं निराधार व चीड आणणारे आहेत हें मलाही कबूल केलं पाहिजे. मला अत्यंत खेद होतो तो एवढाच कीं, प्रागतिक आणि पूर्वीचे जहाल हे आतां समानभूमिकेवर आले असतांना आमच्या पुढाऱ्यांनीं ते भेद घालविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी पक्षभेदांचा काळा कोळसा पुनः पुनः उगाळीत बसावं ! आमच्यासारख्यांनीं तरी मोठ्या पुढाऱ्यांना काय म्हणावं ? बाबा, मला ही परिस्थिति पाहून खरोखरीच अति अति वाईट वाटतं "

बाबासाहेबांचा पोषाख आटोपला होता. परंतु अझून बाहेर जाण्यास थोडा अवकाश असल्यामुळें ते आरामखुर्चीवर बसले आणि म्हणाले, " अरे नुसतं वाईट वाटून आतां उपयोग नाहीं. ऐक्याच्या मार्गांत आडवे पडलेले हे कांटे काठीनं झोडपून मोडूनच टाकले पाहिजेत. लोकप्रियतेच्या वाऱ्या-वर सोडलेली यांच्या धोरणाची वावडी आपोआपच खालीं येईल. पहिल्या इलेक्शनच्या वेळीं केवळ कौन्सिलप्रवेशाबद्दलच आम्हांला शिव्या ! मागल्या इलेक्शनच्या वेळीं यांचा आमच्याविरुद्ध मुख्य ' प्रोपोगांडा ' सुधारणांचा उपयोग करून घेण्याच्या बाबतींतील भेदाबद्दलचा. काय त्या वेळेला अडवणुकीच्या धोरणाचं बंड ! आतां आले सुधारणा राबविण्याच्या आमच्याच मताला. पण ही रंगपालट तरी हे मोकळेपणानं कबूल करतील का ? आतां माझ्याविरुद्ध धोरणाच्या बाबतींत टीका करायला कांहीं राहिलं

९

नाहीं; मग आले व्यक्तीच्या गुणदोषांवर, आणि त्याचं खापर सगळ्या मवाळ पक्षावर; आणि माझा अक्षम्य दोष काय ? तर १५ वर्षांपूर्वी राजद्रोहाच्या खटल्यांत मी सरकारी वकील होतों. पण मीं त्या वेळीं काय केलं याची तरी माझ्याकडे एकदा येऊन चौकशी करायची ! पण नकोच ! या बाबतींत आप्पासाहेबांनीं अन् त्यांच्या अनुयायांनीं माझ्यावर पूर्वी जो कहर केला अन् कालच्याही भाषणांत उद्धार केला, तो पाहून संताप मात्र होतो. तो प्रश्न सोडून दिला तरी याबद्दल आरोप करण्यापूर्वी आप्पासाहेबांसारख्या नांवाजलेल्या वकीलानं तरी मनाशीं विचार करायला हवा. वकील म्हटला म्हणजे पक्षकराचं काम करणं हें त्याचं कर्तव्य. मग तो पक्षकार सरकार असो, वा खाजगी व्यक्ति असो. राजद्रोहाच्या खटल्यांत सरकारी वकीलीचा राजिनामा न देतां मीं काम चालविलं, तें माझ्या बुद्धीनं मीं लोकांच्या हितासाठींच केलं. पण समजा तसं नाहीं; आणि मीं सरकारला मदत करून लोकांचं अहित केलं. परंतु असलेकर मामलेदारांनी लोकांवर हवा तसा जुलूम करून सपाटून पैसे खाल्ले. त्यांच्यावर सरकारनं खटला केल्यावेळीं आप्पासाहेबांनीं तरी आरोपीतर्फेचं वकीलपत्र घेऊन रयतेला छळणाऱ्या एका जुलमी अधिकाऱ्याचा बचाव कां केला ? त्यांनीं असल्या पाजी अधिकाऱ्याला लोकांच्या हितासाठींच वांचविलं असेल, नाहीं ? तसंच एका असहाय्य पोरीवर जबरी करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचा यथेच्छ फी घेऊन बचाव करणं हेंही लोकहिताचंच असेल, नाहीं ? त्यांत मात्र स्वार्थ नाहीं. आणि सरकारी वकिलानं सरकारी काम करणं हा मात्र स्वार्थ ! नो, नो, आयू विल् एक्सपोज् ऑल् धिस; अँड् फाइट् माय् बॅटल्. काय व्हायचं असेल तें होईल. माझ्या स्वाभिमानाला हें सहन होणं यापुढं मुळींच शक्य नाहीं. उभं रहावं कीं न रहावं याचा विचार तुझ्या इच्छेप्रमाणं मी आज शेवटच्या तारखेपर्यंत तहकूब ठेवला; पण आज माझा निश्चयच झाला आहे. आतां असाच जाऊन तीन वाजायच्या आंत माझा उमेदवारीचा फॉर्म मी देणारच." बाबासाहेबांचा आवाज फारच निश्चयी झाला. शेवटलें वाक्य बोलतांना त्यांनी आरामखुर्चीच्या हातावर जोरानें हात आपटला, आणि आवेशानें ते ताडदिशीं उठून उभे राहिले.

ते दोन मिनिटें तसेच स्तब्ध खिडकींतून बाहेर पाहात विचारमग्न उभे राहिले; मग खिशांतून घड्याळ काढून पाहून म्हणाले, " अरे, बारा वाजून गेले; मला गेलंच पाहिजे. कोर्टांत जाऊन प्रपोझर आणि सेकंडर म्हणून त्या लिमयांची आणि कुळकर्ण्यांची सही घेतों; आणि तसाच कलेक्टरकडे जाऊन फॉर्म देऊन टाकतों. बरं, यशवंत, It is now settled. तूं छापखान्याकडे विनंतीपत्र छापायला टाक; आणखी त्यांना म्हणावं उद्यां संध्याकाळला प्रती छापून तयार पाहिजेत. परवांच्या टपालानें तीं मतदारांकडे रवाना झालींच पाहिजेत. "

असें सांगून बाबासाहेबांनीं डोक्यावर पगडी चढविली. आणि नोकराला छत्री आणि बॅग मोटारींत नेऊन ठेवण्यास सांगून खालीं जाण्यासाठीं ते जिन्याकडे वळले, तों इतक्यांत बाहेरच्या दाराशीं दुसरी एक मोटार उभी राहून त्यांतून दोन व्यक्ती खालीं उतरल्या; व बाबासाहेब जिना उतरण्यासाठीं जिन्याच्या तोंडाशीं येतात तों त्या जिना चढण्यासाठीं खालच्या पायरीजवळ येऊन पोंचल्या. त्यांची आणि बाबासाहेबांची दृष्टादृष्ट होतांच बाबासाहेब आश्चर्यानें खिळून जागच्या जागींच उभे राहिले; व म्हणाले, " कोण आप्पासाहेब आणि यमू ! "

३

होय त्या व्यक्ति म्हणजे आप्पासाहेब व यमू याच होत्या. आप्पासाहेबांच्या चेहऱ्यावर उत्सुकता दिसत होती, तर यमूचा चेहरा गोंधळलेला व आश्चर्यचकित दिसत होता. बाबासाहेब तर क्षणभर आश्चर्यानें थिजून तसेच तेथें उभे राहिले. ज्या गृहस्थानें आदल्याच दिवशीं कानगांवासारख्या प्रमुख तालुक्याच्या गांवीं आपल्याबद्दल विषारी भाषण करून प्रचंड लोकसमाज आपल्या विरुद्ध बिथरून सोडला, व ज्याच्यावर आपण क्षणापूर्वीं इतके संतापलों होतों, ज्यानें आपल्याशीं सार्वजनिक बाबतींत आज पंचवीस वर्षें उभा दावा धरला, तो गृहस्थ ऐन वेळीं, कालच्या भाषणाला पुरे चोवीस तास उलटले नाहींत तोंच, आपल्या घरीं

पायानं चालत येतो; व तोही एकटा नव्हे, तर आपल्या मुलीला घेऊन याचा अर्थच बाबासाहेबांस कळेना. पण हें एक क्षणभरच. त्यांची आदर-सत्कारवृत्ति लागलीच जागृत झाली; व ते दोन तीन पायऱ्या खालीं उतरून जाऊन व हात पुढें करून म्हणाले, “ ओ हो, आप्पासाहेब, This is really a most pleasant surprise ! आपण या वेळीं याल हें मला स्वप्नांतसुद्धां वाटलं नव्हतं ! आणि तेही यमूला घेऊन ? ”

इतक्यांत आप्पासाहेब व यमू निम्मा जिना चढून वर आलेच होते. आप्पासाहेबांनीं बाबासाहेबांचा हात धरला व ते तिघे बरोबरच दिवाणखान्यांत शिरले. यशवंतरावही आप्पासाहेब व यमू आल्याबद्दलचे वडिलांचे उद्गार ऐकून तितक्याच आश्चर्यानें उभे राहिले होते. दिवाणखान्यांत येतांच बाबासाहेबांनीं आप्पासाहेबांना आपल्या आरामखुर्चीवर बसविलें; व त्यांच्याजवळची खुर्ची यमूला दिली. दोघांच्या या आकस्मिक येण्याचा अर्थ काय याचा बोध होण्यासाठीं यशवंतरावांनीं यमूच्या चेहऱ्याकडे पाहिलें. पण तिचाही चेहेरा गोंधळलेला दिसला होता; व तिनें यशवंतरावाच्या पाहाण्याचा अर्थ समजून आपल्यासही यांतील कांहीं ठाऊक नाहीं असें त्यांस मानेनें उत्तर दिलें. बाबासाहेबांनीं स्वतःसाठीं आप्पासाहेबांच्या समोर खुर्ची घेतल्यानंतर आप्पासाहेब म्हणाले, “ बाबासाहेब, माझ्या या येण्याचं आणि तेंही या वेळीं, तुम्हांला आश्चर्य वाटणं साहजिक आहे. मी कां आलों हें तर मी सांगतोंच. पण तुम्हीं आतां कुठं निघालां होतां तें मी विचारूं का ? ”

आप्पासाहेबांच्या या येण्यांत व बोलण्यांत कांहीं डाव तर नसेल ना, अशी शंका बाबासाहेबांस आल्यावांचून राहिली नाहीं. कारण कालचें विषारी भाषण करणारा गृहस्थ सद्हेतूनें आपल्याकडे येईल हें कोणास खरें वाटेल ? परंतु आपल्या घरीं आलेल्या गृहस्थाचा अनादर करणें शक्य नसल्यामुळें, व आपली उमेदवारी त्यांनीं आतां निश्चित केली असल्यामुळें त्यांनीं मोकळेपणानें उत्तर देण्याचें ठरविलें; व ते म्हणाले,

‘ अर्थात्, मी आतां माझा नॉमिनेशन् पेपर द्यायला निघालों आहें...

मीं आपल्या विरुद्ध उभं राहण्याचं ठरवलं आहे. आपला नॉमिनेशन् पेपर आपण दिला असेलच ?"

" नाहीं " आप्पासाहेबांनीं उत्तर दिलें; " आणि त्या बाबतातच मीं आलों आहें. मला—"

पण त्यांचें हें वाक्य पुरें होण्यापूर्वींच बाबासाहेब एकदम निकराच्या स्वरानें म्हणाले, " I am sorry. आपलं हें येणं व्यर्थ आहे. माझा उभं राहाण्याचा निश्चय आतां ढळणार नाहीं."

" पण मला बोलूं तर द्याल ? तुम्हीं आपला निश्चय मोडूंच नका. मी तुम्हांला येवढंच सांगणार आहें कीं, मी उभा राहून तुमच्या विरुद्ध लढत नाहीं. मी तुमच्या करितां माघार घेणार आहें." आप्पासाहेब शांतपणानें म्हणाले.

आप्पासाहेबांच्या या वाक्याचा त्या तीन मंडळीवर काय परिणाम झाला याचें वर्णन करणें अशक्य आहे. एखादी कांहींतरी अगदीं विलक्षण गोष्ट, अत्यंत कल्पनातीत, अलैकिक अशी, आणि तीही अनपेक्षित घडावी तसें त्या तिघांस झालें. बाबासाहेब, यमू, व यशवंतराव तिघेंही आपापल्या जाग्यांवरून नकळत उठून उभे राहिले, आणि एकदम म्हणाले " काय, तुम्हीं निवडणुकीला उभे राहात नाहीं !"

आप्पासाहेबांनी समाधानाचें स्मित केलें, व पहिल्याच शांतपणानें म्हटलें, " होय; मी उभा राहात नाहीं. मी बाबासाहेबांच्याकरतां माघार घेणार आहें."

" पण याचा अर्थ काय ?" तिघांनींही एकदम तितक्याच आश्चर्यानें विचारिलें.

" याचा अर्थ तोच." आप्पासाहेबांनीं उत्तर दिलें. " काल रात्रीपासून माझ्यांत फार फरक पडला आहे. देशभक्तीचा मक्ता ईश्वरानं एकाच पक्षाला दिला नाहीं. पक्षाचं नांव कोणतंही असलं, व एखाद्याचा कार्य करण्याचा मार्ग भिन्न असला तरी, देशभक्ति व देशसेवा ही सारखीच

असते; आणि ईश्वराच्या भक्तांत जशी जात नाहीं, तसे देशाच्या भक्तांत पक्ष नाहीत, हें तत्त्व मी काल रात्री शिकलों. आणि तेच कृतींत गिरविण्यासाठीं मी आतां घरीं परत येतांच तसाच यमूला घेऊन तुमच्याकडे धांवत आलों."

आप्पासाहेबांनीं हें भाषण इतक्या शांतपणानें व गंभीरपणानें केलें कीं, त्याचा त्या तिघांवरही परिणाम झाला; इतकेंच नव्हे तर, त्या दिवाणखान्यांतील वातावरणही एखाद्या उच्च तत्त्वानें भारल्यासारखें वाटूं लागलें. आप्पासाहेबांनीं बाबासाहेबांचा हात आपल्या हातांत घेतला, व किंचित् गद्गदस्वर होऊन म्हटलें,

"बाबासाहेब, मी आजपर्यंत तुमच्या बाबतींत फार अन्याय केला. तुमच्या अंतःकरणांतल्या खऱ्या देशभक्तीची जाणीव मला आजपर्यंत पटली नाहीं. ती काल रात्रीं पटली. मी इतके दिवस व्यर्थ विरोध केला. प्रागतिक या नांवाखालीं स्वार्थ साधून देशद्रोह करणारे तुमच्या पक्षांत कांहीं लोक असतील. तसे कोणत्याहि पक्षांत असतात. परंतु प्रागतिकांतही कांहीं खरे थोर लोक आहेत, व त्यापैकीं तुम्हीं एक आहांत याची मला काल जाणीव झाली. बाबासाहेब, तुम्ही खरे, सच्चे देशभक्त आहांत, तुमच्याशीं यापुढं मीं विरोध करणें शक्य नाहीं."

आप्पासाहेबांचे हे शब्द ऐकून यमू व यशवंतराव एकमेकांकडे चकित दृष्टीनें पाहूं लागले. बाबासाहेबांना आप्पासाहेबांच्या भाषणाचा रोख अझून कळेना. पण त्यांच्या भाषणावरून, आवाजावरून व मुद्रेवरून ते हें मनापासून बोलत होते हें खास. म्हणून बाबासाहेबांचाही आवाज गहिंवरून आला व ते म्हणाले,

– "आप्पासाहेब, सर्वसामान्य जनता तुम्हांला आपला पुढारी मानते; व म्हणून तुमचं हें सर्टिफिकीट म्हणजे या जनतेचंच मी सर्टिफिकीट समजतों. पण माझ्या अतिशय विरुद्ध असं भाषण कानगांवास काल संध्याकाळींच करून अझून पुरे चोवीस तासही लोटले नाहींत, तोंच तुम्हीं माझ्या

घरीं अवचित येऊन माझा हा गौरव करतां आहांत, याचा मला अर्थच कळत नाहीं."

" एकूण माझ्या कालच्या भाषणाची हकीगत तुमच्यापर्यंत इतक्यांत आली तर! पण तुमच्यावर मी जो अपकार करायला गेलों, तो उलट उपकारच झाला. चांगल्यासाठींच ईश्वरानं वाईटाची उत्पत्ति केली आहे हें तत्त्वज्ञांचं म्हणणं अगदीं खरं आहे. तें भाषण मीं केलं नसतं तर, काय सांगावं, आपला दुराग्रह व वैरभाव आजन्म तसाच टिकला असता."

" आप्पासाहेब, " बाबासाहेब अधीर होऊन म्हणाले, "आपण आमची उत्सुकता मात्र जास्त वाढवीत आहां."

" I am coming to the point. " आप्पासाहेब म्हणाले. " कालच्या माझ्या भाषणांत मीं तुमच्यावर फारच जोराचा हल्ला केला, व राजद्रोहाच्या खटल्याची हकीगत सांगून तुमच्या विरुद्ध लोकमत शक्य तितकं प्रक्षुब्ध केलं हें तुम्हाला कळलंच आहे. भाषण झाल्यावर, आपले नवे प्रांत, रावसाहेब ढवळे, हल्लीं तिथं फिरतीवर आहेत, त्यांच्याकडून मला रात्रीं फराळाला इकडेच या म्हणून बोलावणं आलं. ते व मी कॉलेजांत सहाध्यायी होतों, हें कदाचित् तुम्हांला ठाऊक असेल. त्याप्रमाणं मी त्यांच्याकडं गेल्यावर त्यांनीं राजद्रोहाच्या खटल्याची गोष्ट काढली, आणि त्या वेळची खरी हकीगत मला सांगितली. "

" हां, आपले ते नागेशराव ढवळे ! " बाबासाहेब मध्येंच उद्गारले. " आठवलं, ते त्या वेळीं इथं कलेक्टरचे चिटणीस होते. त्यांच्याबद्दल कलेक्टरचा कांहीं गैरसमज होऊन ते खटले चालू असतांच त्यांची एकदम दूर बदली करण्यांत आली. "

" हो तेच. आतां १६ वर्षांनीं ते या जिल्ह्यांत डिस्ट्रिक्ट डेप्युटी होऊन पुनः आले आहेत. "

" बरं, मग त्यांनीं काय हकीगत सांगितली आपल्याला ? " बाबासाहेबांनीं उत्सुकतेनें विचारलें.

" त्या बाबतींत माझे आपल्याबद्दल जे गैरसमज होते ते त्यांनीं सर्व दूर केले, व तुम्ही त्या वेळी निरपराधी लोकांना कसं वांचवलं त्याची सगळी हकीगत त्यांनीं सांगितली. माझा आपल्यावर मुख्य आक्षेप असा होता कीं, राजद्रोहाच्या खटल्यांत, आणि विशेषतः तो आपल्या व्यवसाय-बंधूंवर झाला असतांना, सरकारतर्फे तुम्हीं काम चालवणं अत्यंत वाईट होतं. यांत तुम्हीं सरकारला खुष करून आपला स्वार्थ साधला असं मला वाटत होतं. केवळ याच कारणावरून मीं आपला आजपर्यंत द्वेष केला. पण खरी वस्तुस्थिति तशी नव्हती. माझ्यावर व इतर कांहीं लोकांवर खटले करूं नयेत असंआपलं जोराचं मत,सरकारी वकील या नात्यानं, तुम्हीं सरकारला कळवलं होतं; तें न ऐकतां खटले करण्याचं सरकारनं ठरवल्यानंतर ते स्वतः चालवण्याचं नाकारून तुम्ही आपल्या सरकारी वकीलीचा राजीनामा द्यायला तयार झालां होतां; पण पोलीस, आमच्या-विरुद्ध खोटा पुरावा तयार करून, बॉंबच्या कटाशीं आमचा संबंध जोड-ण्याच्या खटपटींत आहेत असें तुम्हांला कळतांच तुम्हीं आपला राजीनामा देण्याचा विचार रद्द करून, आपल्या वजनानं पोलिसांचा प्रयत्न तेथल्या-तेथेंच दाबून टाकला; आणि पहिल्या फुसक्या पुराव्यावरच काम चालवणं सरकारला भाग पाडून माझं आणि इतर पुष्कळांचं निर्दोषित्व तुम्ही सिद्ध केलंत, व आम्हांला तुरुंगांत डांबण्याचा सरकारचा डाव चुकवलात. या सर्व गोष्टी ढवळ्यांनीं मला सांगितल्या; आणि माझा तुमच्यावरील आरोप, आणि द्वेष कसा निरर्थक व अन्याय्य आहे हें त्यांनीं मला दाख-वून दिलं. खोटे पुरावे तयार केले जात असल्याबद्दलची बातमी तुम्हांला ढवळ्यानींच कळविली असावी असा कलेक्टरला व अधिकाऱ्यांना संशय आला, आणि म्हणून त्यांची ताबडतोब इथून अगदीं दूरच्या टोंकाला बदली झाली हीही गोष्ट त्यांनींच मला सांगितली."

इतकें बोलून आप्पासाहेब जरा थांबले, व पुढे म्हणाले, " बाबासाहेब, तुम्ही त्यावेळीं केलं तेंच शहाणपणाचं केलं. पण आम्हांला या गोष्टींची कांहींच माहिती नसल्यामुळं आमचा गैरसमज झाला, व आम्हीं व्यर्थ तुमचा छळ केला. मला, बाबासाहेब, आपल्याला प्रश्न विचारायचा तो

हाच. ही सर्व खरी वस्तुस्थिात असतांना आपण आजपर्यंत आमच्यापासून ती कां लपवून ठेवली ? आणि लोकांचा गैरसमज व निंदा व्यर्थ कां सहन केली ?"

"आप्पासाहेब," बाबासाहेब, म्हणाले, "ढवळ्यांनीं सांगितलेली सर्व हकीगत अक्षरशः खरी आहे. मीं ती कोणास न सांगण्याचं कारण इतकंच कीं, पहिली गोष्ट म्हणजे त्या साऱ्या गोष्टी गुप्त सरकारी होत्या. आणखी दुसरं असं कीं, त्या कागदोपत्रींच्या पुराव्यानं सिद्ध केल्याशिवाय माझ्या शब्दांवर विश्वास तरी कोणीं ठेवला असता ? मी आपल्यालाच विचारतों, ही हकीगत तुम्हांला एखाद्या त्रयस्थ व माहितगार सरकारी अधिकाऱ्यानं न सांगतां मीं सांगितली असती, तर तुम्हांला ती खरी वाटली असती कां ? तसंच इतरांचं. आतां लोकांच्या अप्रीतीचं म्हणाल, तर ती आम्हां प्रागतिकांच्या नशीबीं नेहेमींचीच पुजलेली आहे. स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीप्रमाणं होईल तें कार्य करावं, आणि तेंच बक्षीस समजून त्यांतच समाधान मानून घ्यावं, हीच रानडे गोखल्यांची आम्हांला शिकवण आहे."

"पण हीच तुमची खरी तपश्चर्या आहे. ही सर्व हकीगत ऐकून मला काय वाटलं तें सांगतां येत नाहीं. आजपर्यंत तुम्हांला मीं जो जो विरोध केला, व तुमची जी जी निंदा केली, त्याचा मला फार पश्चात्ताप झाला; व मी ढवळ्यांच्याकडून परत आल्यावर मनाशीं निश्चय केला कीं, उद्यां घरीं परत येतांच ताबडतोब तुमच्याकडे येऊन तुमची खुल्या दिलानं मागल्या सर्व गोष्टींबद्दल क्षमा मागायची. तुमची कदाचित् चुकामूक होईल म्हणून घरीं परत उतरतांच यमूला तसाच घेऊन इकडे आलों. तिला यांतलं कांहीं सांगण्यासाठींसुद्धां घरीं थांबलों नाहीं. माझा मुख्य गैरसमज दूर होतांच माझी तुमच्याकडे पाहण्याची दृष्टि बदलली; तुमचे अनेक गुण, व आजपर्यंतची कामगिरी खऱ्या स्वरूपांत मला दिसूं लागली. बाबासाहेब, झालं गेलं सर्व विसरून जा. आपण आतां यापुढं एक होऊन कार्य करूं या. तुमच्या आमच्या कार्यपद्धतींत आजपर्यंत थोडाबहुत फरक होता. पण प्रतिसहकाराच्या सर्वमान्य तत्त्वामुळं तोही नाहींसा झाला

आहे. तरी पण पुढाऱ्यांपुढाऱ्यांतील वैयक्तिक गैरसमजामुळंच अजून खरी एकी होत नाहीं. आपलंही तसंच झालं. ते गैरसमज आतां गेले. Let us unite and work together. कौन्सिलांत जाऊन कार्य करायला अनुभवानं आणि अभ्यासानं माझ्यापेक्षां तुम्हींच अधिक योग्य आहां हें मी माझ्या गेल्या कौन्सिलच्या अनुभवानं प्रांजलपणानं कबूल करतों. मी बाहेर लोकमत तयार करून तुम्हांला साह्य करीन. तेंच काम मजकडून अधिक चांगलं होईल. म्हणून माझा निश्चय झाला आहे कीं, मी आतां निवडणुकीला उभा राहून तुम्हांला विरोध करूं इच्छित नाहीं. आपणां दोघांनाही निवडून येतां येतं तर आपण दोघेंही जोडीनं उभे राहिलों असतों, पण आपल्या जिल्ह्याच्या आजच्या परिस्थितींत तें शक्य नाहीं. तेव्हां आपल्यांतील लायक असेल त्यानं एकट्यानंच उभं राहिलं पाहिजे. तुम्हीं तसे आहांत; म्हणून तुम्हींच उभे राहा. मी तुम्हांला 'सपोर्ट' करतों.''

आप्पासाहेबांचें हें परिवर्तन व मनाचा मोठेपणा पाहून यमू व यशवंतराव या दोघांच्याही डोळ्यांत आनंदाश्रु उभे राहिले. त्या दोघांची एक मोठी महत्त्वाकांक्षा तृप्त झाली, व अत्यंत आनंदाच्या मुद्रेनें ते एकमेकांकडे व त्या दोघांकडे पाहूं लागले. आपल्या दोघांतील राजकीय वैर नष्ट झालें म्हणून बाबासाहेबांनाही अतिशय आनंद झाला; व ते आप्पासाहेबांच्या जवळ जाऊन त्यांच्या दोन्हीं खांद्यांवर हात ठेवून म्हणाले,

"आप्पासाहेब, तुमचे गैरसमज दूर होऊन आपण आतां मित्र झालों. तुमच्या औदार्याचा असा दुरुपयोग मी करणार नाहीं. तुम्हींही अत्यंत बुद्धिवान् व कर्तृत्ववान् आहांत; तुमच्या हातून कौन्सिलांत कार्य होणार नाहीं असं थोडंच आहे? गेल्या कौन्सिलांतली तुमची कामगिरीहि खरोखरीच प्रशंसनीय होती. नाहीं, मी या कामांत तुमचं मुळींच ऐकणार नाहीं. मीच तुमच्याकरितां माघार घेतों. तुम्हींच उभे रहा."

"छे," आप्पासाहेब जोरानें म्हणाले. "तें तर शक्यच नाहीं. माझा तो निश्चयच झाला आहे. मी तुमच्याशीं आजपर्यंत जें निष्कारण शत्रुत्व केलं त्याची भरपाई मला अशीच केली पाहिजे."

" पाहा, आप्पासाहेब, माझं ऐका. ज्या मला तुम्हीं आजपर्यंत इतका विरोध केला त्याला एकाएकीं, यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणं, असा पाठिंबा देणं तुम्हांला लोकांत अवघड जाणार आहे; व त्यामुळें लोकांचा तुमच्यावरील विश्वासही उघडण्याचा संभव आहे. असं धाडस तुम्हीं करूं नका. तुम्हांला पाठिंबा देणं मला तितकं अवघड नाहीं. कारण तुमच्या पक्षाशी सहकार्य करण्याचा आमच्या पक्षाचा ठरावच झाला आहे. म्हणून सांगतों, तुम्हींच उभे राहा; मी साफ उभा राहाणार नाहीं. "

तरीही आप्पासाहेबांना हें मान्य होण्याचा रंग मुळींच दिसेना; व बाबासाहेबही उभे राहाण्यास तयार होईनात. थोडया वेळापूर्वी एकमेकांविरुद्ध उभे राहण्याची ज्यांची स्पर्धा चालली होती, तेच दोन पुढारी आपण मागें घेऊन दुसऱ्यास उभें राहण्याबद्दल निकराने आग्रह करीत आहेत असा देखावा कोणास विस्मयकारक वाटणार नाहीं ? यमू आणि यशवंतराव आपल्या वडिलांमधील हा प्रेमाचा वाद कौतुकानें पहात होते. इतक्यांत घडयाळांत दोहोंचा ठोका पडला. तेव्हां यशवंतराव म्हणाले,

" बाबा, तीन वाजायच्या आंत नॉमिनेशन् पेपर दिला पाहिजे हें लक्षांत आहे ना ? दोन तर वाजलेच. तुमचं दोघांचं जर आतां एकमत झालं नाहीं, तर कोणीच उभं न राहतां इलेक्शन् मात्र हातचं जाईल."

" जाऊं दे, खुशाल जाऊं दे. आप्पासाहेब उभे रहात नसतील तर मला त्या इलेक्शनची मुळीच फिकीर नाहीं. " बाबासाहेबांनीं जोरानें उत्तर दिलें.

इतक्यांत आप्पासाहेबांच्या डोक्यांत कल्पना येऊन ते म्हणाले, " अहो, मी काढली एक तोड. तुमचा यशवंतही मतदार आहे हें मला ठाऊक आहे. म्हणून माझं म्हणणं असं आहे कीं, आपल्या दोघांऐवजीं त्यानंच उभं रहावं म्हणजे झालं. आपण दोघंही आतां वृद्ध झालों. तरुण माणसांना पुढें करून त्यांच्याकडूनच आतां आपण काम करवून घेतलं पाहिजे. मी करतों त्याला प्रपोझ, आणि तुम्हीं करा सेकंड; तो आहेच नव्या राष्ट्रीय पक्षाचा. जुन्या दोन पक्षांचं ऐक्य होऊन नवा राष्ट्रीय पक्ष

निर्माण कसा झाला याचं हं प्रत्यक्ष उदाहरणच होईल, नाहीं? आणखी शिवाय या कामाला त्याच्यासारख्या "भारतसेवका" शिवाय दुसरा अधिक लायक माणूस तरी कोण मिळणार?"

आप्पासाहेबांचा स्वतः उभें न राहाण्याचा आग्रह पाहून बाबासाहेबांनीं या योजनेला नाखुषीनें संमति दिली; व दोघांचाही उभें न राहण्याचा निश्चय पाहून, व नॉमिनेशन् पेपर देण्याची वेळ भरत आलेली पाहून यशवंतरावही त्यांच्या ऐवजीं उभे राहाण्यास कबूल झाले. लागलाच फॉर्म भरला, व आप्पासाहेब म्हणाले,

"बाबासाहेब, चला आपण दोघेजण हा फॉर्म देऊन येऊं." मग ते यमूकडे वळून म्हणाले, "यमे, तूं समेट करा, समेट करा म्हणून एकसारखी म्हणत होतीस, झालं ना आतां तुझ्या मनासारखं? तुम्हांला खरंच सांगतों बाबासाहेब, या यमीनं जर आज दोन वर्षं वाद करून तुम्हां प्रागतिकां बद्दलचे माझे पुष्कळसे गैरसमज नाहींसे केले नसते, तर हा गैरसमज दूर होऊनही तुमच्याशीं समेट करायला मी एकदम इतका तयार झालों नसतों."

"अरे वा!" बाबासाहेबांनीं उत्तर दिलें. "माझंही असंच झालं. या यशवंताचंही माझ्यामागं सारखं हेंच टुमणं चाललं होतं. तुम्ही आतां येण्याच्या आधीं तरी आमचा हाच वाद चालला होता. आणि मी अद्यापही मागं घेऊन तुमच्याशीं सहकार्य करावं असं तो मला आग्रहानं सांगत होता! मीही पण तुम्हांला तेंच सांगतों, या यशवंतानं तुमची बाजू माझ्यापुढं एकसारखी मांडून माझं मन पक्षांधपणापासून पुष्कळसं परावृत्त केलं होतं. सहकार्यासाठीं तुम्ही हात पुढं करतांच मीं तो आनंदानं स्वीकारण्याचं मुख्य कारण तरी तोच आहे."

"पण अजून एक शेवटचं पण महत्त्वाचं कार्य राहिलं आहे." आप्पासाहेब म्हणाले. "तेंही आतांच सांगून टाकतों. तुमच्या यशवंतरावानं यमूला परवां मुंबईस मागणी घातली होती; परंतु हा विवाह मला पसंत

पडणार नाहीं याच सबबीवर ती तिनं नाकारली. ही गोष्ट मला तिच्याकडून कळल्यावर मीं माझी नाखुषीची संमति दिली. तरी पण मला त्यांत समाधान नाहीं म्हणून तिनं लग्न न करण्याचंच ठरविलं. यमे," आप्पासाहेबांनीं तिला प्रेमानें जवळ घेऊन म्हटलें, " आतां यशवंताची मागणी मान्य करायला माझी तुला आनंदानं संमति आहे. बाबासाहेब, मी आपल्याला मुलीचा बाप म्हणून विनंती करितों. माझ्या या मुलीला आपण यशवंतरावाकरितां पदरांत घ्या."

" अरे, आजचा तर सारा आश्चर्याचाच दिवस दिसतो! साऱ्याच गोष्टी अनपेक्षित घडत आहेत. यशवंत तरी बराच लबाड आहे; त्यानं मला या गोष्टीचा मुळींच पत्ता लागूं दिला नव्हता! यमूसारखी लक्ष्मी, किंबहुना सरस्वती, आपल्या पायानं घरी चालत आली असतां कोण नाहीं म्हणेल! कालिदासानं म्हटल्याप्रमाणं " क इदानीम् शारदीम् ज्योत्स्नाम् पटान्तेन वारयति" आप्पासाहेब, तुम्हीं आज कित्येक गोष्टींनी मला चकित करीत आहां." बाबासाहेबांनीं यमूला प्रेमानें आपल्याजवळ घेतलें व वात्सल्यानें तिच्या डोक्यावरून हात फिरवून म्हटलें, 'यमे, my dear child, मला तुझ्याबद्दल पहिल्यापासूनच अभिमान व कौतुक वाटत होतं. I am proud of my son, I am prouder of you still. पण चला, आपण या गोष्टी आतां परत आल्यावर बोलूं; नाहीं तर नॉमिनेशन्‌ची वेळ मात्र चुकेल. यशवंत, आम्हीं दोघंही इतक्यांत कलेक्टरच्या कचेरीतून जाऊन तुझा नॉमिनेशनूपेपर देऊन येतों. आप्पासाहेब अजून उपाशींच आहेत. घरांत फराळाची तयारी करून ठेवायला सांग. पण तुझ्या आईला हें मात्र आतांच सांगूं नकोस अं. तें मींच परत आल्यावर तिची जरा गंमत करून तुम्हां सर्वांच्या समक्ष सांगेन. आप्पासाहेब, आतां सर्वांचा चहा इथंच झाला पाहिजे."

" आतां काय, तुम्हीं व्याही झालां आहांत." आप्पासाहेब हसत म्हणाले. " तुमचं म्हणणं मोडून थोडंच चालणार आहे?"

## ४

खालीं मोटारचें इंजिन सुरू झाल्याचा घररर आवाज ऐकूं आला. पाँ पँ शिंग वाजलें, व ती भर्रदिशीं निघून गेल्याचा चाकांचाहि आवाज झाला. दिवाणखान्यांत यशवंतराव व यमू दोघेंच उभीं होतीं. आत्यंतिक समाधानानें एकमेकांकडे पाहण्यापलीकडे कांहीं वेळ कोणासच कांहीं बोलतां येईना. शेवटीं यशवंतरावांनीं यमूजवळ जाऊन तिचा हात आपल्या हातांत घेतला, व म्हटलें, " यमू, आपली वकीली शेवटीं साधली ! "

" वकीली साधली खरी ! " यमूनें मधुर स्मित करून उत्तर दिलें, " पण ती तुमच्या नेहमीच्या वकीलीप्रमाणं दुही वाढवणारी मात्र नव्हे. उलट तिच्यामुळं कोर्टाच्या दारांत नित्य खेटे घालणारे आपले पक्षकार आज ऐक्याच्या दारांत उभे राहिले आहेत. "

समाधानाच्या प्रसन्नतेमुळें यमू यशवंतरांना या वेळीं फारच सुंदर दिसली. त्यांनीं तिचा दुसराही हात आपल्या हातांत धरला व जरा कंपित स्वरांत विचारलें, " यमे, पक्षकारच कां ? आपण त्यांचे वकील-सुद्धां आतां **ऐक्याच्या दारांतच** उभे नाहीं का ? "

यशवंतरावांच्या या प्रश्नानें यमूच्या चेहेऱ्यावर लज्जेची मनोहर छटा पसरली. ती पाहून आनंदित स्वरांत यशवंतरावांनीं पुनः विचारिलें,

" यमू, आप्पासाहेबांच्यान् बाबांच्या निवडणुकीच्या कामासाठीं आपण दोघंहि मुंबईहून इकडं यायला निघालों. त्यावेळीं तूं वचन दिलंस तें आठवतं ? "

" कोणतं वचन ? " यमूनें विचारलें.

" या दोघां पुढाऱ्यांत समेट घडवून आणण्यासाठीं शक्य ती खटपट करण्याचा आपण निश्चय केला; तेव्हां तूं म्हणालीस कीं, आपलं आतां खरोखरीच्या वकीलांसारखंच होणार आहे; कारण ते वकील जसे कोर्टांत जाईपर्यंत एकाच गाडींत बसून व हातांत हात घालून मित्रत्वानं जातात.

पण कोर्टापुढं जातांच आपापल्या पक्षकारांची बाजू घेऊन एकमेकांविरुद्ध लढतात, तसंच आपल्यालाहि या निवडणुकींत करावं लागेल."

"हो, पण आपण दोघं वकील तर संगनमत करून एकाच ध्येयासाठीं भांडत होतों. वकीलीच्या धंद्यांतल्या नीतिमत्तेस हें शोभेल कां?"

"अग, प्रेमांत व युद्धांत सर्व क्षम्य असतें. पण तें कसंहि असलं तरी, दोन्ही बाजूच्या वकीलांनीं एका गाडींत बसून येण्याचं पहिलं कार्य आपण त्यांचवेळीं पार पाडलं! हातांत हात घालण्याचं राहिलेलं कार्य मात्र वकीली साधली तर करायचं तूं कबूल केलं होतंस." अत्यंत प्रेमळ व मृदु स्वरांत यशवंतराव पुढें म्हणाले, "यमू, आतां तर, तूं कबूल केल्याप्रमाणं हातांत हात घालायला हरकत नाहीं ना?"

यमूने आपले हात यशवंतरावांच्या हातांत तसेच राहूं देऊन, त्यांच्याकडे किंचित् सलज्ज, पण अत्यंत प्रेमाचा व आनंदाचा कटाक्ष मात्र टाकला. यापेक्षां दुसरें उत्तर ती काय देणार?

समाप्त.

## गणेश महादेव आणि कंपनीचें

# प्रचलित प्रकाशन

### यशवंत

संपूर्ण व भरपूर लघुकथा देणारें लोकप्रिय मासिक. **दर अंकास ८ आणे**, वार्षिक **आगाऊ** ५ रु. व्ही. पी. नें ५।- रु.

### चार आणे माला

प्रत्येक पुस्तकांत गुप्त पोलिसाच्या चातुर्याची एक चटकदार संपूर्ण कादंबरी असते. प्रत्येकीं **किं. फक्त ४ आणे.**

### आठ आणे माला

मोठ्या आकाराचीं सुमारें १२५ पृष्ठांची एक मनोवेधक व रहस्यमय संपूर्ण कादंबरी प्रत्येक पुस्तकांत असते. प्रत्येकीं **किं. फक्त ८ आणे.**

### चरित्र माला

आबाल वृद्ध स्त्रीपुरुषांस आदर्शभूत अशा एका थोर व्यक्तीचें नामांकित लेखकानें लिहिलेलें सुमारें १२५ पृष्ठांचें प्रत्येक चरित्र **फक्त ८ आण्यास मिळतें.**

### सृष्टिज्ञान

तज्ञ विद्वानांनीं शास्त्रीय विषयांवरील शक्य तितक्या सोप्या भाषेंत चालविलेलें सचित्र मासिक **दर अंकास ४ आणे**, वार्षिक वर्गणी ट. ख. सह आगाऊ **३ रुपये**, व्ही. पी. नें ३। रु.

**व्हीलर स्टॉल्स, प्रमुख बुकसेलर्स व आमचे एजंटस् यांजकडे किरकोळ अंक मिळतील.**

**गणेश महादेव** आणि **कंपनी**, सदाशिव पेठ, **पुणें शहर**